


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार २६ जूलै २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४




आषाढी एकादशीचा भक्तिमय सोहळा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा



**पंढरपूर/प्रतिनिधी :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त संपूर्ण विठ्ठलनगरी ज्ञानोबा-तुकारामच्या जयघोषाने दुमदुमून गेली असताना राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सपत्नीक श्री विठ्ठल-रु क्मिणीची शासकीय महापूजा करू न राज्याच्या सुख-समृद्धी, भरघोस पाउस आणि जनकल्याणासाठी विठुरायाच्या चरणी प्रार्थना अर्पण केली. यंदाच्या शासकीय महापूजेचा मान धाराशिव जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील गौरगाव येथील माने दाम्पत्याला मिळाल्याने त्यांच्यासह मुख्यमंत्र्यांनी महापूजेत सहभाग घेतला. पहाटेपासूनच पंढरपूरात लाखो वारक-यांची गर्दी उसळली होती. चंद्रभागा नदीच्या तीरावर आणि विठ्ठल मंदिर परिसरात भक्तीचा महासागर लोटला होता. विठ्ठलाच्या दर्शनासाठी भाविकांच्या तब्बल २० ते २५ किलोमीटरपर्यंत रांगा लागल्याचे चित्र दिसून आले. टाळ-मृदंगाचा निनाद, हरिनामाचा गजर आणि वारक-यांचा उत्साह यामुळे संपूर्ण पंढरपूर भक्तिरसात न्हाउन निघाले.

**विठ्ठलाच्या दर्शनाने उर्जा मिळते-**मुख्यमंत्री फडणवीस

महापूजेनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, विठ्ठल मंदिरात आल्यानंतर सकारात्मक उर्जा मिळते. राज्यात सर्वत्र चांगला पाउस पडावा, शेतकरी सुखी व्हावेत आणि महाराष्ट्र समृद्ध व्हावा, अशी प्रार्थना विठुरायाच्या चरणी केली आहे. तसेच देशाच्या तरु णाईला योग्य दिशा मिळावी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना देशहिताची कार्ये करण्यासाठी शक्ती व आशीर्वाद लाभावा, अशीही प्रार्थना केली. त्यांच्या या वक्तव्याने राज्याच्या विकासासोबतच देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी केलेल्या प्रार्थनेचीही चर्चा रंगली.

**रुक्मिणी मातेला दुग्धाभिषेक; मंदिर समितीकडून सत्कार**

श्री विठ्ठलाची शासकीय महापूजा पूर्ण झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस आणि मानाचे वारकरी माने दाम्पत्य यांनी श्री रु क्मिणी मातेच्या मंदिरात जाउन दर्शन घेतले. यावेळी रु क्मिणी मातेला दुग्धाभिषेक करण्यात आला तसेच विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली. त्यानंतर श्री विठ्ठल-रु क्मिणी मंदिर समितीच्या वतीने मुख्यमंत्री आणि त्यांच्या पत्नींचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देउन सत्कार करण्यात आला.

**संत ज्ञानेश्वर महाराज पादुका मंदिराच्या नवीन भक्तनिवासाचे भूमिपूजन**

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरात आणखी एक महत्त्वाचा विकास प्रकल्प सुरू झाला. संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानच्या पादुका मंदिरासाठी उभारण्यात येणा-या नवीन भक्तनिवासाचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या भक्तनिवासामुळे भविष्यात आळंदीहून येणा-या वारक-यांना आणि भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध ➪(पान २ वर)

# शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधानांचा राजीनामा




## प्रल्हाद जोशींकडे कार्यभार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिला आहे. नीट पेपरफुटी प्रकरणी त्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टी (सीजेपी) गेल्या ३६ दिवसांपासून जंतर मंतरवर धरणे आंदोलन करत होती. शनिवारी रात्री सुमारे ८:१५ वाजता, प्रल्हाद जोशी यांच्याकडे प्रधान यांच्या मंत्रिमंडळाचा कार्यभार सोपवण्यात आला. जोशी हे अन्न व सार्वजनिक वितरण, उर्जा आणि ग्राहक व्यवहार मंत्री आहेत.

राजीनाम्यानंतर, कॉकरोच जनता पार्टीचे प्रमुख अभिजीत दीपके जंतर मंतरवर म्हणाले, 'ते म्हणायचे की या सरकारमध्ये राजीनामे होत नाहीत, पण जग नतमस्तक होते; त्याला नतमस्तक करू शकेल अशा व्यक्तीची गरज आहे.' प्रधान यांनी आपल्या राजीनाम्यासंदर्भात एक पत्र प्रसिद्ध केले. दोन पानांच्या, ५७५ शब्दांच्या या पत्रात, प्रधान यांनी इतर गोष्टींबरोबरच दोन ठिकाणी तरु णांची दिशाभूल केल्याचा उल्लेखही केला आहे. २०१४ मध्ये मोदी सरकार स्थापन झाल्यापासूनच्या १२ वर्षांत आंदोलनांमुळे राजीनामा देणारे धर्मेंद्र प्रधान हे पहिले मंत्री आहेत. यापूर्वी, २०१८ मध्ये परराष्ट्र व्यवहार राज्यमंत्री एम. जे. अकबर यांनी राजीनामा दिला होता, परंतु त्यावेळी 'मी टू' चळवळ जगभर पसरली होती आणि अकबर यांच्यावर त्यांच्या पत्रकारितेच्या काळात लैंगिक छळाचे आरोप होते.








### जंतर-मंतरवर जल्लोषः दीपके गुडघ्यावर बसले

*शनिवारी दुपारी २ वाजून १८ मिनिटांनी, धर्मेंद्र प्रधान यांनी सोशल मीडिया X वर दोन पानांची एक नोट पोस्ट केली. ज्यात त्यांच्या राजीनाम्याचा उल्लेख होता. जंतर-मंतरवर आंदोलन करणा-या CJP संस्थापकाला फोनवरू न याची* माहिती मिळाली. प्रधान यांनी शिक्षणमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे, हे कळताच ते गुडघे टेकून बसले, आकाशाकडे पाहिले आणि स्टेजवर सुमारे १० वेळा हात आपटून आनंद साजरा केला. ➪(पान २ वर)



### हा लोकशाहीचा विजय आहे-वांगचुक

*सोनम वांगचुक यांनी रुग्णालयातून एका पोस्टमध्ये लिहिले, हा लोकशाहीचा, प्रत्यक्ष लोकशाहीचा विजय आहे... रस्त्यांवरील लोकांचा विजय आहे. हा शांतता, संयम आणि चिकाटीचा विजय आहे. सीजेपी आणि जेन-झेडचे अभिनंदन. देशाच्या कानाकोप-यातून उठून उभ्या राहिलेल्या सर्व नागरिकांचे आभार.*

*विजयात नम्रता सर्वात मोटी गोष्ट - देशवासीयांना आणि हा मुद्दा सर्वप्रथम उचलणा-या CJP च्या तरु ण बंधू-भगिणींनाही मी मनःपूर्वक शुभेच्छा देतो.' याच बरोबर, विजयात नम्रता सर्वात मोटी गोष्ट आहे आणि तीच तुमचे चरित्र स्पष्ट करते. वांगचुक पुढे म्हणाले, 'शांततेच्या ताकदीसमोर कोणतेही शस्त्र टिकू शकत नाही. आता उत्तरदायित्व मिळाले आहे. शिक्षण व्यवस्थेत मूलभूत सुधारणा होणे आवश्यक आहे. मला पूर्ण आशा आहे की, या ऐतिहासिक घटनेनंतर एका नव्या भारताची सुरुवात होईल.*



प्रधानांचा राजीनामा निश्चित होताच, अभिजीत दीपके डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक झाले.




विजय साजरा करण्यासाठी तरु णांनी आणि विद्यार्थ्यांनी दिल्ली पोलिसांनी उभारलेल्या बॅरिकेड्सवर चढून त्यावर सेल्फी काढले.



CJP समर्थकाने 'पुष्पा झुकेगा नहीं' ची प्रसिद्ध पोझ दाखवली. झुकती है दुनिया, झुकानेवाला चाहिए, असेही दीपके म्हणाले होते.



कॉकरोच पार्टीच्या आंदोलकांनी जंतर मंतरवर नाचायला सुरु वात केली. सीजेपी समर्थक याला आपला सर्वात मोठा विजय मानत आहेत.



महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर येथे दीपके यांच्या घराबाहेर जल्लोष. फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.

## झुकती है दुनिया, झुकाने वाला चाहिए-अभिजीत

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-**धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा होताच जंतर मंतर येथे उपस्थित असलेल्या सर्व आंदोलकांनी मोठा जल्लोष सुरू केला. अभिजीत दिपके यांनी सर्वांना संबोधित केले. यामध्ये धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची माहिती दिली. तसेच या सरकारमध्ये राजीनामे होत नाही, असे म्हणत होते. पण आम्ही सांगू इच्छितो की, झुकती हैं दुनिया, झुकानेवाला चाहिए. धर्मेंद्र प्रधान यांच्यामुळे ज्या विद्यार्थ्यांचा जीव गेला, त्यांना हा विजय समर्पित आहे, असे अभिजीत दिपके यांनी सांगितले.

धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची बातमी समोर येताच, जंतर-मंतरवर आणि देशभरात आंदोलन करणा-या विद्यार्थ्यांमध्ये व तरु णांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. यावर पहिली प्रतिक्रिया देताना काकरोच जनता पार्टी चे संस्थापक अभिजित दीपके म्हणाले, आपण हे करू न दाखवले! धर्मेंद्र प्रधान यांनी अखेर राजीनामा दिला आहे. हा विद्यार्थ्यांच्या एकजुटीचा आणि संघर्षाचा मोठा विजय आहे. आज काकरोचेस जिंकले.. लोकशाही जिंकली! जय हिंद!

पुढे बोलताना दिपके म्हणाले, घाबरायचे नाही. ही लोकशाही आहे. लोकशाहीत व्यक्त ➪(पान २ वर)

**राजीनाम्यासह अशा होत्या सीजेपीच्या 3 मागण्या**

१. प्रधान यांचा राजीनामा.
२. आंदोलक आणि विद्यार्थ्यांवरील दाखल केलेले सर्व गुन्हे आणि कायदेशीर खटले मागे घेणे.
३. नीट पेपर फुटीनंतर ज्या विद्यार्थ्यांनी आपले प्राण गमावले त्यांच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची भरपाई.

## प्रमुख मागण्या मान्य झाल्याचा CJPचा दावा

**आंदोलनाची अधिकृत सांगता;**

**शांततेने आंदोलनस्थळ रिकामे करून आपल्या घरी परतावे, असे भावनिक आवाहन**

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशभरातील विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर गेल्या अनेक दिवसांपासून राजधानी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाची अखेर सांगता झाली आहे. केंद्र सरकारसोबत झालेल्या निर्णायक चर्चेनंतर आंदोलनकर्त्यांच्या प्रमुख मागण्या मान्य करण्यात आल्याचा दावा करत CJP (छात्र जाइंट प्लॅटफार्म) ने आंदोलन अधिकृतपणे मागे घेण्याची घोषणा केली. यावेळी संघटनेच्या नेतृत्वाने आंदोलनात सहभागी झालेल्या हजारो विद्यार्थी, युवक आणि पालकांचे आभार मानत सर्वांनी शांततेने आंदोलनस्थळ रिकामे करून आपल्या घरी परतावे, असे भावनिक आवाहन केले. गेल्या काही दिवसांपासून जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत होती. परीक्षा व्यवस्थेतील कथित



अनियमितता, पेपरफुटीच्या घटना, दोषींवर कठोर कारवाई, विद्यार्थ्यांना न्याय, शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता आणि भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी प्रभावी यंत्रणा उभारण्याच्या मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू करण्यात आले होते. आंदोलनाला देशभरातील विविध विद्यार्थी संघटना, पालक, सामाजिक कार्यकर्ते आणि अनेक राजकीय पक्षांनीही पाठिंबा दिला होता. आंदोलनाच्या काळात केंद्र सरकार आणि आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींमध्ये सलग तीन फे-यांत चर्चा झाली. या बैठकीत विद्यार्थ्यांनी मांडलेल्या पाच प्रमुख मागण्यांवर सरकारने सकारात्मक भूमिका ➪(पान २ वर)




## १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना अन्न विषबाधा

**● टीटंबा आदिवासी आश्रमशाळेतील घटना ● सेंट्रल किचनच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह**

**धारणी/प्रतिनिधी -** धारणी तालुक्यातील टीटंबा येथील शासकीय पोष्ट बेसिक आदिवासी आश्रमशाळेत शनिवारी दुपारच्या जेवणानंतर विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, मळमळ व पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने एकच खळबळ उडाली. प्राथमिक माहितीनुसार, शाळेतील १०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना अन्न विषबाधा झाल्याचा संशय असून सर्वांना तातडीने धारणी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुदैवाने सर्व विद्यार्थ्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती प्रशासनाने दिली. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, तहसीलदार प्रदीप शेवाळे, धारणी पोलीस ठाण्याचे ठाणेदार अवतारसिंग चव्हाण यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी उपजिल्हा रुग्णालयात दाखल झाले. त्यांनी विद्यार्थ्यांच्या



प्रकृतीची विचारपूस करून वैद्यकीय उपचारांचा आढावा घेतला. या घटनेनंतर आश्रमशाळांना पुरविण्यात येणाऱ्या सेंट्रल किचनच्या अन्नाच्या गुणवत्तेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. निकृष्ट दर्जाच्या अन्नामुळे ही घटना घडल्याचा आरोप होत असून संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे. दरम्यान, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांचा धारणी दौरा नियोजित असल्याने या घटनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शिंदे सेनेचे जिल्हा संघटक मन्ना दारसिंबे यांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे.



# अमरावतीच्या विकासावर अजितदादांचे प्रतिबिंब उमटले - आ.संजय खोडके

## महाराजस्व अभियान व समाधान शिबिराला लाभार्थी नागरिकांचा उत्फुर्त प्रतिसाद



**अमरावती/प्रतिनिधी: -** सरकार मध्ये राहून लोकनेता अजितदादा पवार यांनी समाज विकासाचे व लोकहिताचे जे काही निर्णय घेतले, जी धोरणे ठरविली , ज्या योजना राबविल्या, त्या सर्वांचा अमरावती शहराला पुरेपूर लाभ मिळाला. अमरावती विधानसभा मतदार संघाच्या विकासासाठी अजितदादा पवार यांनी वेगवेगळ्या क्षेत्राकरिता भरभरून निधी दिल्याने अमरावती शहराच्या शाश्वत विकासाला बळकटी मिळाली आहे. अमरावतीच्या विकासावर अजितदादा पवार यांचे प्रतिबिंब उमटले असून विकासाच्या प्रत्येक पाऊलावर दादांची आठवण आल्या शिवाय राहत नाही. अमरावती शहराला महानगराच्या धर्तीवर नवी ओळख व लौकिक मिळावा यासाठी पुढेही निधी कमी पडू देणार नाही,असा अजितदादांचा वादा होता. हा वादा आता मुख्यमंत्री देवेन्द्र फडणवीस व जिल्ह्याचे पालकमंत्री - नामदार चंद्रशेखर बावनकुळे पुढे नेत आहे. असे प्रतिपादन विधान परिषद आमदार संजय खोडके यांनी केले.

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेन्द्र फडणवीस यांच्या वाढदिवस व दिवंगत उपमुख्यमंत्री लोकनेता अजितदादा पवार यांच्या जयंती प्रित्यर्थ आयोजित जनसेवा सप्ताह अंतर्गत आज शनिवार दिनांक २५ जुलै २०२६ रोजी महाराजस्व अभियान व समाधान शिबीर स्थानिक श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन,मोर्शी रोड,अमरावती येथे राबविण्यात आले. शासकीय सेवा नागरिकांपर्यंत पोहोचून देण्यासाठी राज्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान राबविण्यात येत असल्याने यावेळी आमदार महोदय व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थी नागरिकांना विविध योजनांचे प्रमाणपत्र व दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

दरम्यान या महाराजस्व अभियान व समाधान शिबिरामध्ये आरोग्य सुविधा व योजना शिबीर, राशन कार्ड शिबीर, महसूल कागदपत्रे व दाखले वितरण, कामगार योजना शिबीर, रमाई आवास योजना व प्रधानमंत्री आवास योजना शिबीर, एस.टी. महामंडळ सवलतीच्या दरात प्रवासासाठी एन.सी. एम.सी. कार्ड शिबीर, आधार कार्ड केंद्र, पीआर कार्ड वाटप, पट्टे वाटप, सारथी,बार्टी, आर्टी योजना , समाज कल्याण विभाग योजना, दिव्यांग कल्याण योजना, अशा विविध योजनांचे स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी आमदार सुलभा खोडके , आमदार संजय खोडके यांनी शिबिरांना भेट देऊन लाभार्थ्यांचा उत्साह वाढविला. तत्पूर्वी महाराजस्व शिबिरात मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांची शुभेच्छा चित्रफीत, लोकनेता दिवंगत अजितदादा पवार यांच्या स्मृतींना उजाळा देणारी चित्रफीत तसेच पालकमंत्री ना. चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कामकाजाबद्दल माहिती दर्शविणारी चित्रफीत दाखविण्यात आली. यावेळी आमदार सुलभाताई खोडके यांनी सर्व लाभार्थीचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा देत प्रमाणपत्राचे वाटप केले. आपल्या प्रास्ताविकामधे उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी महाराजस्व अभियान आयोजनामागची रूपरेषा व्यक्त केली. सूत्रसंचालन - श्रीकृष्ण पखाले समाज कल्याण विभाग अमरावती आणि आभार प्रदर्शन नायब तहसीलदार - श्रीकृष्ण गाडेकर यांनी केले. यावेळी यश खोडके,मनपा आयुक्त मंगेश गोदावले, अमरावती उपविभागीय अधिकारी अनिल भटकर, उपजिल्हाधिकारी महसूल विवेक जाधव, उपजिल्हाधिकारी निवडणूक शिवाजी शिंदे, अमरावती तहसीलदार विजय लोखंडे, सहायक आयुक्त समाजकल्याण राजेंद्र जाधवर, मनपा स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, महिला बाल कल्याण सभापती ममता संदीप आवारे, नगरसेवक चंद्रकांत उर्फ चंदू खेडकर, प्रशांत उर्फ गुड्डू धर्माळे, मीनल योगेश सवाई, उपायुक्त मनपा नरेंद्र वानखडे, उपायुक्त मनपा भाग्यश्री बोरेकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष प्रशांत डवरे, शहरी अन्न व पुरवठा अधिकारी प्रवीण राऊत, अमरावती नायब तहसीलदार कृष्णा गाडेकर , टिना चव्हाण, माजी महापौर रिना नंदा आदींसह महसूल, कामगार विभाग , आरोग्य, एस.टी. महामंडळ, रोजगार हमी योजना, संजय गांधी निराधार योजना, समाज कल्याण विभाग रमाई आवास, पीएम आवास, भूमी अभिलेख विभाग, आदींचे विभागप्रमुख तसेच अधिकारी व कर्मचारी तसेच लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात एकूण २,५०० लाभार्थ्यांना विविध योजनांचे लाभ देण्यात आले.

# सुसंस्कृत समाज निर्मितीकरीता सशक्त मातृशक्तीची आवश्यकता -डॉ.मोहन भागवत



**नवी दिल्ली :** सुदृढ, स्वस्थ आणि सुसंस्कृत समाज निर्मिती करीता सशक्त मातृशक्ती ची आवश्यकता, असल्याचे प्रतिपादन प पू सरसंघचालक डॉ मोहन भागवत यांनी केलें. विश्व मांगल्य सभे तर्फे नवी दिल्ली येथे आयोजित राष्ट्रीय प्रबोधन बैठकीत 'युगानुकूल मातृत्व ' या विषयावर ते बोलत होते. प पू आचार्य जितेंद्रनाथ महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनात आयोजित या प्रबोधन बैठकीला भारताच्या सर्व प्रमुख राज्यांसह आसाम, त्रिपुरा, मेघालंय या राज्यातून सुद्धा प्रतिनिधी उपस्थित होते. विश्वमांगल्य सभेतर्फे आयोजित 'युगानुकूल मातृत्व' या विषयावरील प्रबोधन बैठकीच्या समारोप सत्रात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी मातृत्वाच्या शाश्वत महत्त्वावर भाष्य केले. ते म्हणाले की, 'मातृत्व या विषयावर मला बोलण्यास सांगणे हे स्वतःमध्येच एक विरोधाभास आहे. कारण या विषयावर महिलांचाच नैसर्गिक अधिकार आहे. पुरुषांनी यावर बोलणे योग्य वाटत नाही. मात्र, विश्वमांगल्य सभेने या विषयावर सखोल चर्चा केली असून आपल्या परंपरा, आजच्या काळातील गरजा आणि भविष्यातील दिशा यावर अनेक महान विचारवंतांनी चिंतन केले आहे. स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी, रवींद्रनाथ टागोर यांसारख्या महापुरुषांनीही या विषयावर व्यापक विचार मांडले आहेत.'भागवत पुढे म्हणाले, युगानुकूल मातृत्व हा विषय जरी काळानुरूप मांडला गेला असला, तरी मातृत्वाची शाश्वत तत्त्वे कधीही बदलत नाहीत. उलट त्या मूल्यांमधूनच युगपरिवर्तन घडविणारे व्यक्तिमत्त्व निर्माण होतात. आदिकाळापासून संपूर्ण सृष्टी मातृत्वाच्या आधारावरच टिकून आहे. प्रत्येक जीवाच्या जन्मामध्ये मातृत्वाचा सहभाग असतो. सृष्टीची निर्मिती, संवर्धन, पोषण आणि सातत्य हे मातृत्वाशिवाय अशक्य आहे.

प पू आचार्य जितेंद्रनाथ महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनात आयोजित या प्रबोधन बैठकीला भारताच्या सर्व प्रमुख राज्यांसह आसाम, त्रिपुरा, मेघालंय या राज्यातून सुद्धा प्रतिनिधी उपस्थित होते.

## १ व १० वरिल उर्वरित

### आषाढी एकादशीचा भक्तिमय सोहळा

होणार असून धार्मिक पर्यटनालाही मोठी चालना मिळणार असल्याचे सांगण्यात आले. **भक्तीसोबत विकासाचा नवा अध्याय-**यंदाच्या आषाढी एकादशीनंतर पंढरपूरच्या विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा सुरू होणार आहे. विठ्ठल मंदिर परिसरात भव्य कारिडॉर प्रकल्पाचे काम सुरू होणार असून भाविकांसाठी अधिक प्रशस्त, सुरक्षित आणि आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा सरकारचा मानस आहे. मात्र, या प्रकल्पामुळे मंदिर परिसरातील अनेक जुने वाडे, पारंपरिक वास्तू आणि ऐतिहासिक इमारती हटवाव्या लागणार आहेत. त्यामुळे अनेक स्थानिक नागरिक आणि वारकरी जुन्या पंढरपूरच्या आठवणी जपण्यासाठी यंदाची वारी विशेष भावनेने अनुभवत असल्याचे दिसून आले. काही नागरिकांनी भावना व्यक्तकरताना सांगितले की, यंदाची आषाढी एकादशी आमच्यासाठी विशेष आहे. कारण पुढील वर्षी हे जुने पंढरपूर कदाचित याच स्वरूपात पाहायला मिळणार नाही. या ऐतिहासिक वास्तूंच्या आठवणी आम्ही कायम जपून ठेवू.

### जंतर-मंतरवर जल्लोषः

यानंतर समर्थकांनी जल्लोष सुरू केला. स्टेजवरून देशभक्तीपर गीते वाजू लागली, आंदोलक नाचू लागले. जंतर मंतरवर अभिजीत दीपके म्हणाले, 'मंत्र्यांनी राजीनामा दिला आहे, पण आमच्या अजून दोन मागण्या आहेत. आम्ही असे जाणार नाही. एकदा कॉकरोच आत शिरले की ते बाहेर येत नाही. आत्महत्या केलेल्या मुलांच्या कुटुंबीयांना एक कोटी रु पयांची नुकसान भरपाई मिळाली पाहिजे. पोलीस अधिका-यांवर खटला चालवला पाहिजे.' दिल्ली पोलिसांच्या अधिका-यांनी हे लक्षात ठेवावे की ते कॉकरोचशी पंगा घेत आहेत. आम्ही एका मंत्र्याला राजीनामा देण्यास भाग पाडले आहे, तर तुम्ही कोण आहात? विद्यार्थ्यांवरील खटले मागे घेतले पाहिजेत. भाउ, ही लोकशाही आहे. महिनाभर लोक मला विचारत होते, 'तुम्ही काय करत आहात? अजून किती काळ इथे बसून राहणार?

### झुकती है दुनिया,

होण्याची भीती वाटू लागली, तर अशा लोकशाहीला अर्थ काय राहिला? तुम्ही जेव्हा तुमचा आवाज बुलंद कराल, तेव्हाच हे लोक सरळ राहतील आणि यांना सरळ ठेवणे गरजेचे आहे. हे जे स्वतःला बादशाह समजत आहे, ते आमच्यामुळे आहे. राजीनामा झाला असला, तरी आमच्या आणखीन दोन मागण्या आहेत. त्याशिवाय आम्ही हटणार नाही. आम्ही क?करोच आहोत. एकदा घुसलो की सहजासहजी बाहेर पडत नाही. काकरोचशी पंगा घेउ नका. या देशातील विद्यार्थ्यांनी मोठ्या हिंमतीचे काम केले आहे, असे एल्गार अभिजीत दिपके यांनी म्हटले आहे.

### प्रमुख मागण्या मान्य झाल्याचा

घेतल्याचा दावा क्खने केला आहे. सरकारकडून आवश्यक प्रशासकीय आणि धोरणात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्याचा निर्णय एकमताने घेण्यात आल्याचे नेतृत्वाने स्पष्ट केले.

### मेळघाटातील कुपोषण नियंत्रणासाठी

त्याच ठिकाणी घ्यावा, यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. दर्जेदार आहार मिळण्यासाठी आहार समिती सक्रिय करावी. यामध्ये समाजातील विविध घटकांचा समावेश करावा. जिल्हा नियोजनच्या निधीमधून अंगणवाडी बांधकामासाठी मिळणारा निधी एक वर्षाच्या आत खर्च करावा. खर्च करणे शक्य नसल्यास बांधकाम विभागाला एजन्सी म्हणून नेमून कामे तातडीने पूर्ण करावीत.

आदिवासींच्या मनात आरोग्य यंत्रणेबद्दल गैरसमज आहेत. ते दूर करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तसेच रुग्णालयात होणाऱ्या प्रसुतींमध्ये नैसर्गिक प्रसुती होण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्यामुळे आदिवासींना सिजरची असणारे भीती कमी होण्यास मदत होईल. महिला आणि आदिवासींकरिता असलेल्या योजनांची माहिती ग्रामसभेमधून देण्यात यावी. महिलादिनी होणाऱ्या ग्रामसभेत प्रामुख्याने महिलांच्या योजना सांगण्यात याव्यात,असेही त्या म्हणाल्या.

मेळघाटातील कुपोषणाच्या बाबतीत मध्यम तीव्र कुपोषण आणि गंभीर तीव्र कुपोषण हे दोन्ही घटक महत्त्वाचे आहेत. मध्यम तीव्र कुपोषण जरी कमी असला तरी यात सुधारणा करण्यात यावी. गंभीर तीव्र कुपोषणची आकडेवारी १०० च्या आत आणण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

आजच्या दौऱ्यादरम्यान आदिती तटकरे यांनी भोकरबर्डी, धुळघाट, कळमखार, लवादा आणि चित्री येथे अंगणवाडी केंद्रांना भेट दिली. तसेच बालके आणि आदिवासी समूहाशी संवाद साधला.

### परतवाड्यातील कुख्यात टोळी

१११चा समावेश करण्यास मंजुरी दिली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलीस अधीक्षकांनी आरोपींना तातडीने अटक करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार परतवाडा पोलिसांनी अवघ्या १२ तासांत आठ आरोपींना अटक करण्यात यश मिळविले.

तपासादरम्यान आरोपींच्या पूर्वीच्या गुन्हेगारी नोंदींची छाननी करण्यात आली. त्यामध्ये संबंधित आरोपी संघटित टोळीच्या माध्यमातून सातत्याने गंभीर गुन्हे करत असल्याचे स्पष्ट झाले. टोळीप्रमुखासह सदस्य कोणताही कायदेशीर व्यवसाय न करता गुन्हेगारीच्या माध्यमातून आर्थिक लाभ मिळवत असल्याचे तपासात उघड झाले. या टोळीविरुद्ध खुनाचा प्रयत्न, शासकीय कर्मचाऱ्यांवर हल्ला, बेकायदेशीर जमाव जमविणे, मारहाण, दुखापत, शिवीगाळ, धमकी देणे यांसारखे अनेक गंभीर गुन्हे यापूर्वी नोंद आहेत. तसेच नागरिकांमध्ये दहशत निर्माण करून बेकायदेशीर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा आणि आर्थिक हितसंबंध जपण्याचा प्रयत्न केल्याचेही तपासात निष्पन्न झाले. परतवाडा पोलीस ठाण्याने उपविभागीय पोलीस अधिकारी, अचलपूर यांच्या माध्यमातून सादर केलेल्या प्रस्तावाची कायदेशीर छाननी केल्यानंतर पोलीस अधीक्षकांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम १११ अंतर्गत कारवाईस मंजुरी दिली.

**कलम १११चे महत्त्व-** भारतीय न्याय संहितेतील कलम १११ ही संघटित गुन्हेगारीविरोधातील प्रभावी कायदेशीर तरतूद मानली जाते. या कलमानुसार केवळ एका गुन्ह्यापुरता तपास मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण गुन्हेगारी टोळी, तिची कार्यपद्धती, आर्थिक व्यवहार, गुन्हेगारीचे जाळे आणि त्यामागील संघटित रचनेचाही सखोल तपास करता येतो. त्यामुळे संघटित गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी या तरतुदीला विशेष महत्त्व आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास परतवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अचलपूर उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत. अमरावती ग्रामीण पोलीस दलाने संघटित गुन्हेगारी, खंडणी, दहशत निर्माण करणाऱ्या टोळ्या, बेकायदेशीर वर्चस्व प्रस्थापित करणारे घटक आणि कायदा-सुव्यवस्थेला बाधा आणणाऱ्या प्रवृत्तींविरोधात भविष्यातही कठोर व सातत्यपूर्ण कारवाई सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या नेतृत्वात, परतवाडा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजय आकरे, पोलीस उपनिरीक्षक विशाल रोकडे, पोलीस हवालदार अमोल देशमुख आणि पोलीस हवालदार दिनेश राठोड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

### आषाढी एकादशीचा उत्सव,

आमदार दादाराव केचे यांच्या सह मित्र परिवाराने दर्शनाचा लाभ घेता.व त्यानंतर संस्थानचे सहसचिव सत्यनारायण चांडक यांच्यातर्फे सर्व भक्तांना फराळाचा महाप्रसाद वितरित करण्यात आला. यावेळी विविध संस्थानचे सेवाधारी उपस्थित होते. भाविकांना दर्शनासाठी रांगेत सहकार्य करत हरिनामाचा गजर करत माऊली पुढे चला अशा पध्दतीने सेवा देत होते. यानिमित्त कुऱ्हा पोलीस स्टेशनचे ठाणेदार शिवहरी सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व पुरुष पोलिस, वाहतूक पोलीस, होमगार्ड चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच अध्यक्ष ना. बा.अमाळकर, विश्वस्त अतुल ठाकरे, व्यवस्थापक कपील गावंडे यांनी संस्थानतर्फे उत्तम व्यवस्था ठेवली.

**सरकारी मदत नको, लोकाश्रयच हवा-** आम्ही सरकारकडून काहीही घेत नाही. लोकांमधील दानदातेच हे संस्थान चालवतात. रोज गुप्तदान येते. भाविकांच्या देणग्या सुरुच असतात. त्यामुळे विठुमाऊलीच्या कृपेने काहीही कमीनाही. मंदिराच्या भक्तनिवासात २३ खोल्या आहेत. त्या भक्तांसाठी खुल्या असतात. दोन विक्सांपूर्वीच भंडाऱ्याच्या एका भक्ताने पाच-पाच लाखांचे दोन, दोन लाखाचा एक धनादेश दिला. नाव सार्वजनिक करतो म्हटले तर त्यांनी नकार दिला, एवढी श्रद्धा या संस्थांवर आहे.

**पालखी, ४३२ वर्षांची परंपरा-** येथून दरवर्षी पंढरपूरला पालखी जाते. वारीसोबत जाणाऱ्या या पालखीचे हे ४३२ वे वर्ष आहे. त्यावरुन या मंदिराची प्राचीनता लक्षात येते. यावर्षी ३०० भाविक पंढरपूरला गेले. मंदिरांचे विश्वस्त सुरेश चव्हाण,ह.भ.प.पंकज महाराज महल्ले यांच्या नेतृत्वात ३३ दिवस पायी चालून ८७५ किलोमीटरचे अंतर या भाविकांनी पार केले. पंढरपुरातील आठवडाभराच्या मुक्कामानंतर ते २९ जुलैला याठिकाणी परत येतील. त्यानंतर ३० जुलैला दहिहंडी आणि महाप्रसाद होईल.

### सरासरीपेक्षा ४३इ कमी पाऊस

जानेवारीनंतर पाणीटंचाई गडद होते. सक्कर तलावासह इतर जलस्त्रोत आटू लागतात. उन्हाळ्यात ३ ते ४ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा केला जातो. पाऊस सुरू झाल्यानंतर काही दिवसांत पाणीपुरवठा नियमित होतो. परंतु यावर्षी पाऊस न झाल्याने तलाव भरलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने २ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा करण्याचा निर्णय घेतला आहे. सध्या येथे पर्यटकांची संख्या जास्त असल्याने पाण्याची मागणीही वाढली आहे. **चिखलदऱ्यात आतापर्यंत झालेला एकूण पाऊसः**

- चिखलदरा सर्कल: ५०८.० पैकी ३८४.५ मिमी
- सेमाडोह: ५०८.० पैकी ३४३.३ मिमी
- चुरणी: ५०८.० पैकी २०१.५ मिमी
- टेंभूसोडा: ५०८.० पैकी ३०७.८ मिमी
- गोलखेडा बाजार: ५०८.० पैकी केवळ १९७.९ मिमी

### आर्थिक मदतीच्या आमिषाने

पाठविण्यात आले आहेत. मात्र ही रक्कम मुंबई येथील एसबीआय कार्यालयात होल्डवर असून ती मिळविण्यासाठी काही प्रक्रिया पूर्ण करावी लागेल,' असे सांगितले. आरोपीने विविध कारणे सांगत टप्प्याटप्प्याने फिर्यादींकडून ?२.५९ लाख जमा करून घेतले. काही दिवसांनी आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी १९३० सायबर हेल्पलाईनवर तक्रार नोंदविली. त्यानंतर नांदगाव खंडेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३१९(२) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमाच्या कलम ६६(सी) व ६६(डी) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास नांदगाव खंडेश्वर पोलीस करीत आहेत.

### हातभट्टी दारू व वरली

करताना आढळून आल्या. त्यांच्या ताब्यातून १०० लिटर हातभट्टी दारू व २०० लिटर मोहमास सळवा असा ?७५ हजार ७५० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी कायद्याच्या कलम ६५(क), (फ) व (ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत फ्रेजरपुरा हद्दीतील व्यंकय्यापुरा येथे सुरू असलेल्या वरली मटका अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. यावेळी सत्यनारायण सिंह ठाकूर (रा. चिचफैल) व प्रकाश लक्ष्मणराव भारुडकर (रा. अंकुरनगर) हे जुगार खेळताना आढळले. त्यांच्या ताब्यातून ?२ हजार ८६० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान, गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सिद्धार्थनगर, नवसारी येथेही गुन्हे शाखेने कारवाई केली. या कारवाईत सागर रामस्वरूप दुर्वे (वय २५) याला ताब्यात घेण्यात आले, तर राज रामनाथ वाघमारे हा फरार झाला. आरोपींकडून ७० लिटर गावठी हातभट्टी दारू, २० टँगो पंच देशी दारूच्या पावट्या व दारू विक्रीचे साहित्य असा ?१६ हजार ९०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी महाराष्ट्र दारूबंदी प्रतिबंध अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे शाखेच्या या सलग कारवाईमुळे अवैध दारू व जुगार व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

### अवैध चायना चाकूसह तरुण

आहे. पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त श्याम घुगे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सपोनि नितीन शिंदे तसेच डीबी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली.

### चोरीचे गौवंश कत्तलीसाठी नेताना

मधून दोन गौवंश जनावरे कत्तलीसाठी नेण्यात येत आहेत. या माहितीच्या आधारे मार्कंडा–ब्राम्हणवाडा थडी मार्गावरील पुलावर सापळा रचण्यात आला. कारवाईदरम्यान पोलिसांनी संशयित वाहन अडवून तपासणी केली असता, वाहनात दोन गौवंश जनावरे अत्यंत निर्दयपणे आखूड दोऱ्यांनी बांधून कोंबून ठेवलेली आढळली. प्राथमिक तपासात ही जनावरे चोरी करून कत्तलीसाठी नेली जात असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी दोन्ही आरोपींविरुद्ध ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र प्राणी संरक्षण (सुधारणा) अधिनियम, १९७६ मधील कलम ५(अ), ५(ब), प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम, १९६० मधील कलम ११(१)(ड), ११(१)(फ) आणि मोटार वाहन कायदा कलम १८४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत ४.५० लाख किमतीचे आयएनटीआरए पिकअप वाहन आणि दोन गौवंश जनावरे, असा एकूण ५.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी माधवराव गरूड आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत ब्राम्हणवाडा थडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक तथा ठाणेदार प्रशांत जाधव, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र पवार, पोलीस हेडकॉन्स्टेबल राजू मरस्कोल्हे, पोलीस शिपाई अनुप मानकर, अंकुश दाभाडे आणि चालक महिला पोलीस शिपाई वैष्णवी खेतकर यांनी सहभाग घेतला.

### सायबर फसवणुकीसाठी बँक खाते

सायबर गुन्हे तक्रार पोर्टलवर नोंद झालेल्या आर्थिक फसवणुकीच्या तक्रारींच्या 'मनी ट्रेल' तपासादरम्यान संबंधित बँक खात्याची माहिती प्राप्त झाली. त्यानुसार वरूड येथील युनियन बँक ऑफ इंडिया शाखेतील खाते हे सायबर आर्थिक फसवणुकीत वापरल्याचे आढळून आले.

बँकेकडून खाते उघडणी अर्ज, केवायसी कागदपत्रे आणि खात्याचे व्यवहार तपासल्यानंतर हे खाते देवांक कवडकर यांच्या नावावर असल्याचे स्पष्ट झाले. तपासात संबंधित खात्याचा वापर भारतातील विविध राज्यांमधील चार ऑनलाइन आर्थिक फसवणूक प्रकरणांमध्ये झाल्याचे समोर आले. या सर्व प्रकरणांतील १.५१ लाखांची रक्कम संबंधित खात्यात जमा झाल्याचे निष्पन्न झाले आहे.

प्राथमिक तपासात आरोपीने स्वतःचे बँक खाते सायबर गुन्हेगारांना उपलब्ध करून देत फसवणुकीतून मिळालेल्या पैशांचे आर्थिक व्यवहार करण्यास सहाय्य केल्याचा आरोप आहे. या प्रकरणाचा पुढील तपास वरूड पोलीस करीत आहेत.

### वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे बेलोरावासी

बसणार नाहीत. अश्या मागणीचे निवेदन वनअधिकारी यांना देण्यात आले.

यावेळी अनिल भारसाकळे ,राजू भारसाकळे ,गौरव भारसाकळे रमेश भारसाकळे,प्रमोद भारसाकळे,संदीप भारसाकळे,अजय भारसाकळे , शिवदास भारसाकळे , संजय भारसाकळे , सचिन भारसाकळे , प्रकाश भारसाकळे,विनोद भारसाकळे, मंगेश भारसाकळे , मनिष भारसाकळे ,साहेबराव तराळ प्रफुल शिंगणे, दिपक चारथळ, दिलीप चारथळ, मंगेश राणे, शंकर घाडगे अवधूत दहांडेकर ,बबन सपकाळ ,किरण नारोळकर दिपक भारसाकळे ,किशोर भारसाकळे , संजय ठाकरे ,चंदू ठाकरे ,नंदू नारोळकर, सागर अंबालकर उपस्थित होते.

### शेतकऱ्याने झोपडीच्या

केली असून त्यामध्ये आरोपींची नावे नमूद असल्यामुळे मृतकांच्या चहात्यांनी व शेतकऱ्यांनी पोलीस स्टेशन येथे धडक देऊन आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी. अन्यथा प्रेत उचलणार नसल्याची भूमिका घेण्यात आल्यामुळे काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

मृतक युवकाचे नाव पवन विश्वासराव भाकरे (वय ४५ वर्ष रा.तरोडा, डोमक) असे आहे.

याबाबत प्राप्त माहितीनुसार तरोडा येथील पवन विश्वासराव भाकरे यांची खेड भाग नंबर १ मध्ये शेती असून त्यांनी काही वर्षांपूर्वी कैलास सारडा रा. चांदूरबाजार यांचेकडून एक लाख ८५ हजार रुपये एजंट धरून २.५०% व्याजाने उसनवारी म्हणून घेतले होते.मात्र पवन भाकरे हे ११ महिन्यात पैसे परत करू न शकल्यामुळे सारडा व त्यांचे एजंट नवनीत चांडक रा.चांदूरबाजार व घनश्याम गट्टानी रा.मोर्शी यांनी पैशाचा तगादा लावून व ब्लॅकमेल करून त्रास देणे सुरू केले होते. पैशाची गॅरंटी म्हणून त्यांनी मृतक पवन भाकरे यांचेकडून त्यांचे खेड भाग नंबर १ मध्ये असलेली शेती खरेदी करून घेतली. पैसे परत केल्यावर शेत परत करून देऊ अशी ग्वाही आरोपींनी दिली. आरोपींनी त्यांच्याकडून जबरन शेती खरेदी करून घेतली होती.पवन भाकरे आपली शेती सोडण्याकरिता चार महिने पाच दिवसांनी १ लाख ८५ हजार व खरेदी खर्च २५ हजार असे एकूण २ लाख १० हजार रुपये जयस्तंभ चौक चांदूरबाजार येथील सारडा यांच्या दुकाना समोर त्यांना नगदी स्वरूपात परत केले. दरम्यान व्याजाचे पैसे ज्या दिवशी देशील त्यादिवशी खरेदी खत तुझ्या नावाने परतवून देऊ व्याजाचे पैसे जमा केल्यावर सुद्धा शेती खरेदी करून देण्यास टाळाटाळ करीत होते अशी नोट त्यांनी लिहून ठेवली.ज्या शेतीवर पवन भाकरे यांचा कुटुंबीयांचा उदरनिर्वाह चालत होता ती शेती आपल्या नावाने होत नसल्याच्या विवंचनेत असणाऱ्या पवन भाकरे या युवा शेतकऱ्याने शेतातील झोपडीत गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली.या घटनेमुळे अवैध सावकारा विरोधात प्रचंड रोष निर्माण झाला आहे. याप्रकरणी मोर्शीचे ठाणेदार राहुल आठवले यांनी आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करून पुढील तपास आरंभीला आहे. शेवटी पवनच्या पार्थिवावर उपजिल्हा रुग्णालय येथे शवविच्छेदन पार पडल्यानंतर प्रेत नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले.मृतक पवन च्या मागे वृद्ध आई-वडील,पत्नी,दोन मुली असा परिवार आहे.

### धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा

सातत्यपूर्ण आवाज आणि काँग्रेस पक्षाने राबविलेल्या विविध आंदोलनांमुळे केंद्र सरकारला अखेर माघार घ्यावी लागली, अशी प्रतिक्रिया खासदार बळवंत वानखडे यांनी दिली आहे. काँग्रेस पक्षाने संसदेत सातत्याने हा मुद्दा उपस्थित केला, रस्त्यावर उतरून आंदोलने केली आणि 'छात्रों की गूंज' या अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना देशव्यापी आवाज दिला. या एकत्रित दबावामुळेच सरकारला निर्णय घ्यावा लागला.

मात्र, हा संघर्ष इथेच थांबणार नाही. केवळ शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याने प्रश्न सुटणार नाही. NEET-UG परीक्षेतील गैरव्यवहारासाठी जबाबदार असलेल्या प्रत्येक व्यक्तीवर कठोर कारवाई झाली पाहिजे. देशाच्या परीक्षा प्रणालीत पारदर्शकता, विश्वासार्हता आणि उत्तरदायित्व निर्माण करण्यासाठी व्यापक शैक्षणिक सुधारणा तातडीने राबविण्यात याव्यात. तसेच, NEET प्रकरणावर संसदेत सविस्तर चर्चा करून विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे.

NEET-UG प्रकरणात न्यायासाठी संघर्ष करणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी, पालक, आंदोलक आणि या लढ्याला बळ देणाऱ्या प्रत्येक नागरिकाचे मनःपूर्वक अभिनंदन. काँग्रेस पक्ष वतीने विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठीचा हा लढा न्याय मिळेपर्यंत सुरूच राहील,असेही खासदार बळवंत वानखडे म्हणाले.

अकोला । वाशिम । बुलडाणा

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

■ रविवार, २६ जुलै २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

## चिखलात बुडालेल्या रस्त्याची ग्रामपंचायत प्रशासनाने अखेर केली तात्पुरती सोय



### अमरगडच्या विनोद राठोड ने लावून धरली होती मागणी

■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील तीर्थक्षेत्र अमरगड (वाईगोळ) येथील मागील दोन वर्षांपासून चिखल व खड्डेमय झालेल्या अंतर्गत रस्त्याच्या दुरुस्तीसाठी स्थानिक नागरिक विनोद विठ्ठल राठोड यांनी केलेल्या पाठपुराव्याला अखेर यश आले आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने तात्पुरत्या स्वरूपात रस्त्यावर खडी टाकून नागरिकांना दिलासा दिला आहे.

सोबतच्या छायाचित्रात रस्त्याची दयनीय अवस्था दिसत आहे. संपूर्ण रस्ता चिखल, खडी आणि पाण्याने भरलेला आहे. दोन्ही बाजूला घरे असून दुचाकीस्वार जीव मुठीत धरून मार्ग काढत आहेत. पावसाळ्यात हीच परिस्थिती आणखी गंभीर होते.

अनेक वर्षांपासून हे रस्ते खड्डेमय असूनही ग्रामपंचायत प्रशासनाकडून दखल घेतली जात नव्हती, अशी तक्रार स्थानिक निवासी विनोद विठ्ठल राठोड यांनी काही वृत्तपत्रांकडे केली होती. वृत्तपत्रांनी याची दखल घेत बातमी प्रकाशित केल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाले. राठोड यांच्या मागणीपुढे झुकत ग्रामपंचायत प्रशासनाच्या वतीने चिखलात बुडालेल्या रस्त्यावर गिट्टी-खडी टाकण्यात आली. यामुळे तात्पुरती का होईना, पण स्थानिक नागरिक व शाळकरी मुलांची गैरसोय काही प्रमाणात कमी झाली आहे.


माजी सरपंच व विद्यमान प्रशासकाच्या दारातील रस्ता अनेक वर्षापासून चिखलात बुडालेला

#### ग्रामस्थांची मागणी

तात्पुरत्या उपायासोबतच या रस्त्याचे लवकरात लवकर सिमेंट काँक्रिटीकरण करण्यात यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे. तीर्थक्षेत्र असल्याने दररोज भाविकांची वर्दळ असते. पावसाळ्यात या रस्त्यावरून चालणेही कठीण होते, त्यामुळे कायमस्वरूपी तोडगा काढावा. विनोद राठोड यांच्या पाठपुराव्यामुळे प्रशासनाला काम करावे लागल्याने ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

## केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याने मानोरा तालुक्यातील विद्यार्थ्यांत आनंदाची लहर



■ प्रतिनिधी | मानोरा ■

सततच्या पेपर फुटीला जबाबदार धरत केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी २१ तारखेला दिल्ली येथे सुरू असलेल्या आंदोलनात व पर्यावरणवादी-शिक्षणतज्ञ सोनम वांगचुक यांच्या समर्थनार्थ मानोरा शहरात रॅली काढणाऱ्या तालुक्यातील विद्यार्थ्यांनी अखेर प्रधान यांनी राजीनामा दिल्याने जल्लोष व्यक्त केला.

वंचित बहुजन विकास आघाडीच्या वतीने सुद्धा शहरात २३ तारखेला उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आंदोलन करण्यात आले होते. छायाचित्रात मानोरा शहरातील रस्त्यावर शालेय गणवेशातील विद्यार्थिनींची मोठी रॅली दिसत आहे. हात तिरंगा घेऊन व काही विद्यार्थी फलक घेऊन शांततेत मोर्चा काढत होते. पुढे शिक्षक व नागरिकही सहभागी होते.

विद्यार्थ्यांनी घोषणाबाजी करत शिक्षण व्यवस्थेत पारदर्शकता यावी, अशी मागणी केली होती. राजीनाम्याच्या वृत्तानंतर विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त करत हे विद्यार्थी शक्तीचे यश असल्याचे सांगितले.

> बहुजन समाजातील विद्यार्थी पुढे येऊन विकासाच्या प्रवाहात सामील होण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाचे साधन असून शिक्षण व्यवस्थेत व परीक्षा पद्धतींमध्ये पारदर्शकता येणे आता काळाची गरज आहे. भविष्यात असे प्रकार घडल्यास त्याचा परिणाम केंद्राप्रमाणेच राज्यातील शिक्षण मंत्र्यांना सुद्धा बसू शकतो.
>
> **गोपाल चव्हाण**
> गोरसेना जिल्हा उपाध्यक्ष वाशिम.

## आषाढी एकादशीनिमित्त वेदांत पब्लिक स्कूलमध्ये भक्तिरसाचा अविस्मरणीय सोहळा



■ प्रतिनिधी | कारंजा ■

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त वेदांत पब्लिक स्कूल, कारंजा येथे भक्ती, संस्कृती आणि सामाजिक जाणीव यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला. शाळेत आयोजित करण्यात आलेल्या दिंडी, पालखी मिरवणूक, धार्मिक नाटिका आणि जनजागृतीपर उपक्रमांमुळे संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेला.

या कार्यक्रमात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा परिधान करून उत्साहाने सहभाग घेतला. कैवल्य पवार यांनी भगवान विठ्ठलाची, उर्जिता काटकर यांनी माता रुख्मिणीची अत्यंत आकर्षक व प्रभावी भूमिका साकारली. तसेच आदिराज ठाकरे यांनी वीणाधारी भक्ताच्या वेशात सर्वांचे लक्ष वेधून घेतले. विद्यार्थ्यांनी संतांच्या जीवनावर आधारित लघुनाटिका सादर करून भक्ती, सदाचार आणि मानवतेचा संदेश दिला.

## एसएमसी शाळेच्या विद्यार्थ्यांची वारकरी दिंडी ठरली लक्षवेधी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आषाढी एकादशीच्या पावन पर्वाचे औचित्य साधून स्थानिक एस. एम. सी. इंग्लिश स्कूल, वाशीमच्या वतीने भक्तिमय वातावरणात भव्य 'वारकरी दिंडी' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या या उत्साही दिंडीने संपूर्ण वाशीम शहरात विठ्ठलनामाचा गजर करत वातावरण पूर्णपणे विठ्ठलमय करून सोडले. या सोहळ्याचे विशेष आकर्षण म्हणजे शाळेत साकारण्यात आलेला 'दिवे घाटातील वारकरी सोहळ्याचा देखावा', ज्याने उपस्थितांचे डोळे दीपवून टाकले.



दरवर्षीप्रमाणे यंदाही एस. एम. सी. इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी वारकरी संस्कृतीचे जतन करत विठ्ठल-रखुमाई, विविध संत आणि वारकऱ्यांच्या हुबेहूब वेशभूषा साकारल्या होत्या. एरवी शाळेच्या गणवेशात दिसणारे विद्यार्थी आज पांढरा सदरा, डोक्यावर गांधी टोपी, कपाळावर बुक्का आणि हातात पताका घेऊन आनंदाने टाळ-मृदंगाच्या तालावर फिरत होते. तर विद्यार्थिनी नववारी साडी, केसात गजरा आणि डोक्यावर तुळशी वृंदावन घेऊन दिंडीत सहभागी झाल्या होत्या.

ही पायी दिंडी एस. एम. सी. इंग्लिश स्कूलपासून सुरू होऊन शहरातील लाखाळा परिसरातून मार्गस्थ झाली. या वेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेले कीर्तन, नयनरम्य रिंगण आणि फुगड्यांच्या सादरीकरणाने उपस्थितांची तुफान वाहवा मिळवली.

शाळेच्या मुख्याध्यापिका मिना उबगडे यांच्या कल्पक संकल्पनेतून शाळेच्या सभागृहात दिवे घाटातील वारकरी सोहळ्याची कलाकुसर व हुबेहूब देखावा तयार करण्यात आला होता. वारकऱ्यांचा पालखी सोहळा आणि घाटातील शिस्तबद्ध रांगा यांचा हा देखावा पाहण्यासाठी नागरिकांनी विशेष गर्दी केली होती.

या नयनरम्य कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. हरिभाऊ क्षीरसागर होते. कार्यक्रमाचे उद्घाटन शाळेचे माजी विद्यार्थी तथा वाशीमचे नगराध्यक्ष अनिलजी केंदळे यांच्या हस्ते करण्यात आले. तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव श्री. पुरुषोत्तमजी शर्मा उपस्थित होते.

## ना ना मुंदडा विद्यालयात वृक्षदिंडीचे आयोजन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

दिंडीत लहान लहान चिमुकले विद्यार्थी यांनी वारकरी वेष परिधान केला होता तसेच मुलींनी लुगडे परिधान केले होते टाळ मृदुंग च्या गजरात झाडे लावा हा संदेश देत ही दिंडी ना ना मुंदडा विद्यालयातून गाडगेबाबा नगर परिसरात फिरून ओंकारगिर महाराज मंदिर येथे आली दिंडीला विधिवत वृक्षाची पूजा करून सुरुवात करण्यात आली. दरम्यान झाडे वाचवण्यासाठी वेगवेगळे संदेश तयार करून मुलांनी हातात घेत नागरिकांना दिले तसेच झाडे वाचवण्यासाठी घोषणा देण्यात आल्या अतिशय शिस्तबद्ध रित्या ही पालखी दिंडी गाडगेबाबा नगर परिसरात गेली काही विद्यार्थ्यांनी विठ्ठल रुक्मिणी तसेच महाराष्ट्रातील विविध संताच्या भूमिका साकारल्या होत्या.

## आषाढी एकादशी निमित्त मंत्री चारिटेबल ट्रस्टतर्फे वारकरी बांधवांना महाप्रसादाचे वाटप

■ प्रतिनिधी | वाशिम ■

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त संपूर्ण राज्य विठ्ठलभक्तीच्या रंगात न्हाऊन निघाले असताना, वाशिम शहरातील पाटणी चौक येथे मंत्री चारिटेबल ट्रस्टच्या वतीने वारकरी बांधव व विठ्ठलभक्तांसाठी साबुदाणा खिचडी व राजगिरा लाडूंच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात आणि भक्तिमय वातावरणात पार पडलेल्या या सेवाभावी उपक्रमाला वारकरी बांधवांसह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरीच्या वारीची परंपरा, संतांच्या विचारांचा वारसा आणि समाजसेवेचा संदेश जपण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. उपवास करणाऱ्या वारकरी



बांधवांसाठी पौष्टिक व सात्त्विक महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती. पाटणी चौक परिसर दिवसभर विठ्ठलनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला आणि भाविकांनी मोठ्या श्रद्धेने महाप्रसादाचा लाभ घेतला.

महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल-रुक्मिणी माऊली यांच्या चरणी भक्तिभाव अर्पण करत, वारकरी संप्रदायाच्या सेवा, समर्पण, समता आणि बंधुभावाच्या परंपरेला अभिवादन करण्याच्या उद्देशाने मंत्री चारिटेबल ट्रस्टकडून हा उपक्रम दरवर्षी राबविण्यात येतो.

### जाहीर नोटीस

**विदयमान ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम**

सि. एम. ए. नं. १४२/२०२६ चौ. ता. २५/०८/२०२६

आत्माराम व इतर विरूध्द निरंक

**अर्जदार :** १. आत्माराम किसन लोंढे वय अं. ६४ वर्षे, धंदा शेती.
२. केशव किसन लोंढे वय अं. ४८ वर्षे, धंदा शेती.
३. गोदावरी नागोराव तिडके वय अं. ५१ वर्षे, धंदा घरकाम.
अर्जदार क्र. १ व २ रा. काटा ता. जि. वाशिम
अर्जदार क्र. ३ रा. घाटपुरी रोड, साबणे लेआउट, खामगाव ता. खामगाव जि. बुलढाणा
**गैरअर्जदार :** निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वाना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क्र. १ व २ हे मयत नामे किसन महादु लोंढे यांचे मुले आहेत. अर्जदार क्र. ३ ही मयत नामे किसन महादु लोंढे यांची मुलगी आहे. मयत नामे किसन महादु लोंढे हे दिनांक ०२/०३/२०१८ रोजी मृत्यू पावलेत. तसेच अर्जदार यांची आई मयत नामे चंद्रभागाबाई किसन लोंढे हया दिनांक २५/०७/२०१२ रोजी मृत्यू पावल्यात. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २,' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. २५/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक २४/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

आदेशानुसार
सही
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर वाशिम

(शिक्का)

## दिंडी सोहळा म्हणजे भक्ती शिस्त आणि संस्काराचा संगम - लाव्हरे



■ प्रतिनिधी | वाशिम ■

आषाढी एकादशीचे औचित्य साधून विद्याभारती शाळेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य दिंडी सोहळ्याने संपूर्ण वाशिम नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली. 'ज्ञानोबा-तुकाराम', 'पांडुरंग हरी', 'जय जय राम कृष्ण हरी' आणि 'विठ्ठल... विठ्ठल...' या नामघोषाने परिसर दुमदुमून गेला. दिंडीतील भक्तिमय वातावरण पाहून अवघी पंढरीच वाशिम नगरीत अवतरल्याचा अनुभव उपस्थितांना आला. आज सकाळपासूनच ढगाळ व आल्हाददायक वातावरण असल्याने दिंडी सोहळ्याला एक वेगळीच भक्तिमय छटा लाभली. विद्याभारती शाळेतून मान्यवरांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून दिंडीचे प्रस्थान करण्यात आले.

यावेळ संस्थेचे अध्यक्ष दादासाहेब लाव्हरे शाळेचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी, उपाध्यक्ष नंदकिशोर मिटकरी संचालक भीमरावजी गंगावणे डॉ. चोपडे वैद्यकीय अधिकारी संचालक सुमित सुरेशराव मिटकरी मुख्याध्यापक नितेश मिटकरी पर्यवेक्षक विजय गोटे यांच्या शुभहस्ते पूजन करून दिंडीला प्रारंभ करण्यात आला.

दिंडीत लहान वारकरी विद्यार्थ्यांनी अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग घेतला. टाळकरी तुळसधारी कळसधारी भगवा ध्वजधारी विद्यार्थी विठ्ठल-रुक्मिणी संत ज्ञानेश्वर संत तुकाराम संत नामदेव संत एकनाथ संत जनाबाई आदी संतांच्या आकर्षक वेशभूषेत सहभागी झालेले विद्यार्थी हे दिंडीचे प्रमुख आकर्षण ठरले.

## विहिरीत पडलेल्या गाईला जीवदान

■ प्रतिनिधी | वाशिम ■

शहरातील सुंदर वाटिका परिसरात २४ जुलै रोजी सकाळच्या सुमारास एक गाय सुमारे ६० ते ७० फूट खोल पाण्याने भरलेल्या विहिरीत पडल्याची घटना घडली. याची माहिती मिळताच सर्पमित्र मयुरेश मानधणे यांनी क्षणाचाही विलंब न करता घटनास्थळी धाव घेत बचावकार्याची सूत्रे हाती घेतली.

मानधणे यांनी तातडीने गौरक्षकांशी संपर्क साधून क्रेनची व्यवस्था केली. त्यानंतर विहिरीत उतरून गाईला सुरक्षितरित्या पट्टा बांधण्यात आला. रोहित सहस्त्रबुद्धे, सचिन भालेराव आणि गणेश चव्हाण यांनी जीवाची पर्वा न करता क्रेनच्या साहाय्याने रेस्क्यू ऑपरेशन यशस्वी करत गाईला सुखरूप बाहेर काढले.

या बचावकार्यात बबलू शर्मा, महेश दायमा, अजय चव्हाण, सिद्धार्थ चव्हाण, गौरव धांडुरे यांच्यासह अनेकांनी मोलाचे सहकार्य केले.

विशेष म्हणजे, बचावकार्य सुरू असताना विहिरीत विषारी सापही आढळून आले. मात्र, या धोक्याची पर्वा न



करता सर्पमित्र मयुरेश मानधणे आणि अनंतराव देशमुख (बापू) यांनी धाडसाने संपूर्ण बचाव मोहिमेचे नेतृत्व केले. त्यांच्या तत्परतेमुळे मुक्या जीवाला नवजीवन मिळाले.

या धाडसी आणि संवेदनशील कार्याबद्दल सर्पमित्र मयुरेश मानधणे व त्यांच्या सहकाऱ्यांचे वाशीम शहरातून सर्वत्र कौतुक होत असून, मुक्या प्राण्यांप्रती दाखविलेल्या सेवाभावाला नागरिकांनी सलाम केला आहे.

### जाहीर नोटीस

**विदयमान ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) न्यायालय, वाशिम**

सि. एम. ए. नं. १३८/२०२६ चौ. ता. १७/०८/२०२६

**देवकाबाई व इतर विरूध्द निरंक**

**अर्जदार :** १. देवकाबाई रामचंद्र उर्फ राचंद्र लोंढे वय अं. ८४ वर्षे, धंदा घरकाम. २. भागवत रामचंद्र लोंढे वय अं. ६० वर्षे, धंदा शेती. ३. रामराव रामचंद्र लोंढे वय अं. ५६ वर्षे, धंदा शेती. ४. लक्ष्मण रामचंद्र लोंढे वय अं. ४९ वर्षे, धंदा शेती. ५. कमलाबाई महादेव शेळके वय अं. ५८ वर्षे, धंदा घरकाम. अर्जदार क्र. १ ते ४ रा. काटा ता. जि. वाशिम अर्जदार क्र.. ५ रा. उकळी जहा. ता. जि. वाशिम

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्या अर्थी या जाहीर नोटीस द्वारे सर्वांना सूचित करण्यात येते की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क्र. १ ही मयत नामे रामचंद्र महादु लोंढे यांची पत्नी आहे. अर्जदार क्र. २ ते ४ हे मयत नामे रामचंद्र महादु लोंढे यांचे मुले आहेत. अर्जदार क्र. ५ ही मयत नामे रामचंद्र महादु लोंढे यांची मुलगी आहे. मयत नामे रामचंद्र महादु लोंढे हे दिनांक १६/०२/२०२६ रोजी मृत्यू पावलेत. त्यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार यांनी वि. न्यायालयामध्ये 'बॉम्बे रेग्युलेशन VIII, १८२७ चे कलम २,' प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशिर वारस नाही.

त्याअर्थी सदर संबंधीत कोणास कसल्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी चौ. ता. १७/०८/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता किंवा ही नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसाच्या आत कागदपत्रासह वि. न्यायालयात स्वतः किंवा त्यांनी निर्देशित केलेल्या वकीला मार्फत हजर राहुन आपली लेखी हरकत दाखल करावे. अन्यथा कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत नाही असे समजुन सदर प्रकरण कायदयानुसार निकाली काढण्यात येईल. आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिली.

दि.२२ जुलै २०२६

आदेशानुसार
सही
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व. स्तर वाशिम

(शिक्का)

## 'विद्यार्थ्यांवरचे गुन्हे मागे घ्या; भविष्य उद्ध्वस्त करू नका!'

## मुख्यमंत्री फडणवीसांकडे आमदार साजिद खान पठाण यांची ठाम मागणी

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यात विविध ठिकाणी आपल्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरलेल्या तरुण विद्यार्थ्यांच्या खांद्यावर फौजदारी गुन्ह्यांचे ओझे लादून त्यांच्या उज्ज्वल भविष्यावर कायमचा काळा डाग उमटविण्याचा प्रकार तातडीने थांबवावा, अशी जोरदार मागणी अकोला पश्चिम मतदारसंघाचे आमदार साजिदखान पठाण यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. विद्यार्थ्यांवर आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले सर्व गुन्हे (एफआयआर) तात्काळ मागे घेण्याची मागणी करणारे सविस्तर निवेदन त्यांनी मुख्यमंत्री यांना पाठविले आहे.

निवेदनात आमदार पठाण यांनी स्पष्ट केले आहे की, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, अकोला यांसह राज्यभरातील हजारो विद्यार्थ्यांनी आपल्या मागण्यांसाठी शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने आंदोलन केले. मात्र, या आंदोलनांनंतर अनेक विद्यार्थ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले, तर अनेकांना पोलिसांच्या नोटिसा बजावण्यात आल्या. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी मांडलेल्या बहुतांश मागण्यांचे सकारात्मक निराकरण झाल्यानंतरही त्यांच्या डोक्यावर गुन्ह्यांची टांगती तलवार कायम ठेवण्यात आली आहे.



हे सर्व विद्यार्थी गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील असून शिक्षण, स्पर्धा परीक्षा, शासकीय-खासगी नोकऱ्या आणि भविष्यातील करिअर घडविण्यासाठी संघर्ष करत आहेत. अशा परिस्थितीत त्यांच्या नावावर गुन्हे कायम राहिल्यास त्यांच्या संपूर्ण आयुष्यावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. एका आंदोलनाची शिक्षा विद्यार्थ्यांना आयुष्यभर भोगावी लागणे ही लोकशाहीसाठी निश्चितच चिंतेची बाब असल्याचे आमदार पठाण यांनी नमूद केले.

लोकशाहीत शांततेच्या मार्गाने आपल्या भावना आणि मागण्या व्यक्त करणे हा घटनात्मक अधिकार आहे. कायदा व सुव्यवस्था राखण्याचे महत्त्व मान्य असले, तरी शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना गुन्हेगार ठरविणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या आयुष्याची सुरुवात न्यायालयीन खटले, पोलिसी कारवाया आणि कायदेशीर अडचणींनी होऊ नये, यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करण्याची गरज असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे तरुणांच्या प्रश्नांबाबत नेहमीच संवेदनशील राहिले आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याविरोधात दाखल झालेले सर्व गुन्हे तात्काळ मागे घेण्याचा निर्णय राज्य शासनाने घ्यावा, अशी अपेक्षा आमदार साजिद खान पठाण यांनी व्यक्त केली आहे. राज्यातील विद्यार्थी आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर आमदार पठाण यांनी घेतलेली ही भूमिका राजकीय आणि शैक्षणिक वर्तुळात चर्चेचा विषय ठरत असून, विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेण्याबाबत राज्य सरकार काय निर्णय घेते, याकडे आता संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २३९ ■ रविवार, २६ जुलै २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


### भूमिपूजन प्रसंगी खासदारांचा कंत्राटदारांना सज्जड इशारा

# विकासकामांचा दर्जा सर्वोच्च ठेवा; निकृष्ट कामे खपवून घेतली जाणार नाहीत

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा शहरातील प्रभाग क्रमांक ७ मधील घुगुसकर गॅरेज ते पावडे चौक या महत्त्वाच्या मार्गाच्या १ कोटींच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन राज्याचे राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते उत्साहात पार पडले. यावेळी वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी बोलताना खासदार अमर काळे यांनी शहरातील विकासकामे गुणवत्तापूर्ण आणि टिकाऊ व्हावीत, यावर भर देत कंत्राटदारांना स्पष्ट शब्दांत इशारा दिला. घुगुसकर गॅरेज ते पावडे चौक हा रस्ता अनेक वर्षांपासून खराब अवस्थेत असून तो बॅचलर रोडसह शहरातील प्रमुख मार्गांना जोडणारा

#### घुगुसकर गॅरेज-पावडे चौक सिमेंट रस्त्याचे भूमिपूजन



महत्त्वाचा दुवा आहे. त्यामुळे या सिमेंट रस्त्याच्या कामामुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पावडे चौक ते वर्धा रेल्वे स्थानक आणि शास्त्री चौकाकडे जाणाऱ्या रस्त्याचीही दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आणून देत, त्या मार्गाचेही सिमेंट काँक्रीटीकरण तातडीने हाती घेण्याची मागणी त्यांनी केली.

रस्त्यांचा दर्जा हा तडजोडीचा विषय नाही. अनेक ठिकाणी नव्याने झालेल्या सिमेंट रस्त्यांवर काही महिन्यांतच भेगा पडल्यामुळे अपघात घडले आहेत. जनतेच्या पैशातून होणाऱ्या कामांमध्ये निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे स्पष्ट करत त्यांनी तांत्रिक निकषांचे काटेकोर पालन आणि दर्जेदार साहित्याचा वापर करण्याचे आवाहन केले.

गटार योजनेच्या कामांमुळे शहरातील अनेक रस्त्यांचे नुकसान झाल्याचा उल्लेख करून ते रस्ते तातडीने दुरुस्त करण्याची मागणीही त्यांनी प्रशासनाकडे केली.

या कार्यक्रमाला नगराध्यक्ष सुधीर पांगूळ, राखी दुर्गेश पांडे, शैलेश मुन्ना झाडे, श्वेता अरुण पाठक यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वाठोडा परिसरात वाघाचा मुक्तसंचार; १० गावांना सतर्कतेचा इशारा

### पाझर तलावाजवळ पगमार्क आढळले; वनविभागाची गस्त वाढली, नागरिकांना खबरदारीचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा तालुक्यातील वाठोडा परिसरात पट्टेदार वाघाचा मुक्तसंचार सुरू असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर वनविभागाने परिसरातील दहा गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. मानव-वन्यजीव संघर्षाची शक्यता लक्षात घेऊन वनाधिकाऱ्यांनी गस्त वाढविली असून वाघाच्या हालचालींवर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. वाठोडा येथील पाझर तलाव परिसरात वाघाचे ताजे पगमार्क आढळल्याने नागरिकांमध्ये सावधगिरीचे वातावरण निर्माण झाले आहे.

वाठोडा-धामणगाव परिसरात वन व महसूल विभागाची जमीन असून या भागात वाघ फिरत असल्याची माहिती स्थानिक नागरिकांनी वनविभागाला दिली. त्यानंतर वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, मानद वन्यजीव रक्षक कौस्तुभ गावंडे आणि वन कर्मचाऱ्यांच्या पथकाने घटनास्थळी पाहणी केली. तपासणीदरम्यान पाझर तलाव परिसरात वाघाचे स्पष्ट पगमार्क आढळून आले. या पगमार्कच्या आधारे संबंधित वाघ अंदाजे तीन



**खबरदारीचा सल्ला**

वनविभागाने नागरिकांना रात्री शेतात एकट्याने न जाणे, टॉर्च व घुंगराची काठी सोबत ठेवणे, लहान मुलांना सायंकाळनंतर एकटे बाहेर न सोडणे, पाळीव जनावरे सुरक्षित व बंदिस्त गोठ्यात बांधणे आणि शेताच्या कुंपणात वीजप्रवाह सोडू नये, अशा सूचनांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले आहे.

वर्षांचा असल्याचा प्राथमिक अंदाज वनविभागाने व्यक्त केला आहे.

वाघाच्या हालचाली लक्षात घेता वाठोडा, धामणगाव, आमला, वाघधरा, बेलगाव, झाडगाव, लोणसावळी, शेकापूर, जोगाधरी आणि वायफड या गावांतील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वनविभागाचे पथक सातत्याने गस्त घालत असून वाघ दिसल्यास अथवा त्याच्या हालचालींची माहिती मिळाल्यास तातडीने वनविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करण्यास सांगण्यात आले आहे.

# भावनांच्या महासागरात दुमदुमला 'विठ्ठल... विठ्ठल'चा गजर

### पालखी खांद्यावर घेत खा.अमर काळे वारकऱ्यांत मिसळले

**वर्धा जनमाध्यम :** आषाढी भक्तीच्या मंगलमय वातावरणात वर्धा शहरात निघालेल्या श्री विठ्ठल पालखी सोहळ्याला भक्तीचा आणि सामाजिक ऐक्याचा अनोखा रंग चढला. नगरपरिषदेच्या घुगुसकर गॅरेज ते पावडे चौक सिमेंट रस्त्याच्या भूमिपूजन कार्यक्रमानंतर खासदार अमर काळे यांनी थेट वारकऱ्यांच्या पालखी सोहळ्यात सहभागी होत स्वतः पालखी खांद्यावर घेतली. विठ्ठल... विठ्ठल...च्या अखंड नामघोषात आणि टाळ-मृदंगाच्या निनादात त्यांनी वारकऱ्यांसमवेत काही अंतर पायी चालत भक्तिभाव व्यक्त केला. त्यांच्या सहभागाने संपूर्ण परिसर भक्तिरसाने भारावून गेला.

मालगुजारीपुरा बढे चौक ते धंतोली चौक मार्गावरील श्री विठ्ठल मंदिरात जाऊन खासदार अमर काळे यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीचे विधिवत दर्शन घेत पूजा-अर्चा केली. त्यानंतर



पारंपरिक पालखीची पूजा करून वारकरी संप्रदायाच्या परंपरेला अभिवादन केले. पालखी खांद्यावर घेत त्यांनी वारकऱ्यांसोबत चालत समाजात समता, प्रेम, सेवा आणि भक्तीचा संदेश दिला. यावेळी बोलताना वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा आत्मा असून तो समाजाला माणुसकी, बंधुभाव आणि एकतेची शिकवण देतो, असे खासदार अमर काळे यांनी सांगितले. राज्याच्या प्रगतीसाठी, शेतकऱ्यांच्या समृद्धीसाठी आणि सर्वसामान्यांच्या सुख-शांतीसाठी श्री विठ्ठलाच्या चरणी प्रार्थना केल्याचे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी अभुदय मेघे, संदीप कीटे, प्रणय कदम, नहुश झाडे, विजय घवघवे, सुनील बुरांडे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते, वारकरी आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात पार पडलेल्या या पालखी सोहळ्याने वर्धा नगरीत भक्ती, सामाजिक ऐक्य आणि वारकरी परंपरेचे दर्शन घडविले.

# दिल्लीतील आंदोलनाला समर्थन, गांधी पुतळ्याजवळ बेमुदत धरणे



**वर्धा जनमाध्यम :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनादरम्यान आंदोलकांवर झालेल्या कथित लाठीमाराच्या निषेधार्थ व त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविण्यासाठी वर्ध्यात शनिवार पासून महात्मा गांधी यांच्या पुतळ्याजवळ बेमुदत धरणे आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

धरणे आंदोलन दररोज सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू राहणार असून, दिल्लीतील विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असेपर्यंत वर्ध्यातील आंदोलनही कायम ठेवण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांवरील कारवाईचा निषेध नोंदवत त्यांच्या न्याय मागण्यांना पाठिंबा देणे हा या आंदोलनाचा उद्देश असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

यावेळी गजेंद्र सुरकार, सुनील ढाले, श्रेया गोडे, नंदकुमार कांबळे यांच्यासह विविध सामाजिक कार्यकर्ते, विद्यार्थी, युवक सहभागी झाले. नागरिकांनी या आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन आंदोलन कर्त्यांकडून करण्यात आले आहे.

तसेच अधिकाधिक नागरिकांनी धरणे आंदोलनात सहभागी होऊन विद्यार्थ्यांशी ऐक्य व्यक्त करावे व इतरांनाही या आंदोलनाची माहिती देऊन सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# मारुती समाधी-पाशील रोडची दयनीय अवस्था तातडीच्या दुरुस्तीची नागरिकांची मागणी

### ठिकठिकाणी खड्डे, पावसाळ्यात अपघाताचा धोका वाढला; तातडीने दुरुस्तीची नागरिकांची मागणी

**वर्धा जनमाध्यम :** सिंदी मेघे ग्रामपंचायत हद्दीतील मारुती समाधी–पाशील रोडची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, रस्त्यावर पडलेल्या मोठमोठ्या खड्ड्यांमुळे नागरिकांना रोज जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अनेक वर्षांपासून या मार्गाच्या दुरुस्तीकडे दुर्लक्ष झाल्याने रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. त्यामुळे वाहनचालक, दुचाकीस्वार तसेच पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने रस्त्यावरील खड्डे दिसून येत नाहीत. परिणामी वाहनांचे संतुलन बिघडून अपघात होण्याचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे. विशेषतः दुचाकीस्वार आणि शालेय विद्यार्थी यांना या मार्गावरून प्रवास करताना मोठी कसरत करावी लागत आहे. स्थानिक नागरिकांनी अनेकदा ग्रामपंचायत प्रशासनाकडे रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केली असली तरी अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीबाबत नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

मारुती समाधी–पाशील रोडची तातडीने




दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित आणि सुरळीत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा स्थानिक नागरिकांनी सिंदी मेघे ग्रामपंचायत प्रशासनाला दिला आहे.

### विठ्ठल चरणी पालकमंत्र्यांचे साकडे...

# आषाढी एकादशीनिमित्त डॉ.पंकज भोयर यांनी सपत्नीक केली श्री विठ्ठल-रुक्मिणीची पूजा

**वर्धा जनमाध्यम :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे गृह, गृहनिर्माण, शालेय शिक्षण, खनिकर्म व सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पत्नी ॲड. शितल भोयर यांच्यासह शहरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात विधिवत पूजा-अर्चना करून महाआरती केली. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि विठ्ठल विठ्ठल नामस्मरणाने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला.

पूजनानंतर डॉ. भोयर यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी राज्यातील जनतेचे आरोग्य, सुख, शांती, समृद्धी आणि



सर्वांगीण कल्याण लाभावे, शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद व भरभराट यावी तसेच समाजात ऐक्य, बंधुता आणि सद्भावना वृद्धिंगत व्हावी, अशी प्रार्थना केली. संतांच्या विचारांचे आचरण आणि विठ्ठलभक्तीचा संदेश समाजाला नवी दिशा देणारा असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी नगरसेवक प्रदीप तलमले, जयंत कावळे, नगरसेविका स्वाती गव्हाणे, नगरपरिषदेचे गटनेते विलास आगे, मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष श्रीराम गव्हाणे, कोषाध्यक्ष ज्ञानेश्वर जगताप यांच्यासह वारकरी, भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मंदिर आकर्षक सजावटीने उजळून निघाले होते. पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची मोठी गर्दी झाली होती. विठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेतील चिमुकल्यांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. पालकमंत्री डॉ. भोयर यांनी उपस्थित भाविकांशी संवाद साधत आषाढी एकादशीच्या शुभेच्छा दिल्या. विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होत राज्यात शांतता, समृद्धी आणि सर्वसामान्यांच्या जीवनात आनंद नांदावा, अशी सामूहिक प्रार्थना यावेळी करण्यात आली.

# विठ्ठल... विठ्ठल... नामघोषाने दुमदुमला वना नदीचा तीर

### हजारो भाविकांची श्री विठ्ठलाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी रीघ

**हिंगणघाट जनमाध्यम :** आषाढी एकादशीच्या पवित्र पर्वानिमित्त हिंगणघाट शहरालगतच्या वना नदीच्या तीरावर उभारण्यात आलेल्या भव्य श्री विठ्ठल मूर्तीच्या दर्शनासाठी शनिवारी पहाटेपासूनच भाविकांचा जनसागर लोटला. विठ्ठल... विठ्ठल... जय हरी विठ्ठल या अखंड नामगजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. वारकऱ्यांच्या टाळ-मृदंगाच्या गजरात, हरिनामाच्या जयघोषात आणि भक्तिभावाच्या वातावरणात वना नदीचा तीर अक्षरशः पंढरीचे रूप धारण करून गेला.

विदर्भातील धार्मिक आकर्षण ठरलेली ही भव्य श्री विठ्ठलाची मूर्ती शहरातील प्रसिद्ध चित्रकार



व मूर्तिकार हरिहर पेंदे यांनी साकारली आहे. वना नदीच्या निसर्गरम्य तीरावर उभारलेली ही देखणी मूर्ती दूरवरूनच भाविकांना आकर्षित करते. मूर्तीचे भव्य स्वरूप आणि कलात्मक साकारामुळे हे ठिकाण विदर्भातील श्रद्धेचे महत्त्वपूर्ण केंद्र बनले आहे.

दर्शनासाठी आलेल्या हजारो भाविकांनी श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होत आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी, आरोग्यासाठी आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. वारकरी संप्रदायाच्या अभंगांनी, भजनांनी आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजराने परिसर भक्तिरसाने ओथंबून गेला. लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर भक्तिभाव आणि समाधानाचे तेज झळकत होते. यंदाच्या आषाढी एकादशीला वना नदीचा तीर श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्माच्या अद्वितीय संगमाचा साक्षीदार ठरला. हजारो भाविकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे वना नदीवरील श्री विठ्ठल मूर्तीचे हे पवित्र स्थळ विदर्भातील महत्त्वाचे धार्मिक केंद्र म्हणून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. श्रद्धेच्या या महासागराने हिंगणघाट नगरी विठ्ठलमय झाल्याचे चित्र दिवसभर अनुभवायला मिळाले.

# जुन्या वादातून काठीने हल्ला; दाम्पत्याविरुद्ध गुन्हा

**हिंगणघाट जनमाध्यम :** जुन्या वादाचा राग मनात धरून दाम्पत्याने संगनमत करून एका पानटपरी चालकाला काठीने मारहाण केल्याची घटना हिंगणघाट तालुक्यातील चिंचोली येथे घडली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी २४ जुलै रोजी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिलाश कमलाकर कांबळे हे चिंचोली येथे पानटपरी चालवून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. काही दिवसांपूर्वी त्यांचा गावातील अमोल रामटेके याच्याशी किरकोळ कारणावरून वाद झाला होता. त्यानंतर दोघांमध्ये बोलणेही बंद होते.



२३ जुलै रोजी अभिलाश हे पानटपरी उघडण्यासाठी गेले असता तेथे नागरिकांची गर्दी होती. त्या गर्दीत अमोल रामटेके दिसल्याने अभिलाश यांनी त्याला तेथून निघून जाण्यास सांगितले. यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. त्यानंतर अमोल तेथून निघून गेला. मात्र काही वेळाने अमोल रामटेके हा त्याची पत्नी सुप्रिया हिच्यासह पुन्हा पानटपरीवर आला. जुन्या वादाचा वचपा काढण्याच्या उद्देशाने दोघांनी अभिलाश कांबळे यांना काठीने मारहाण करून जखमी केल्याची तक्रार पोलिसांत देण्यात आली. तक्रारीच्या आधारे हिंगणघाट पोलिसांनी संबंधित दाम्पत्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# पाच महिन्यांपासून पोलिसांना चकवा देणारा सराईत आरोपी जेरबंद

### अपहरण, मारहाण व तीन लाखांच्या खंडणीप्रकरणी देवळी पोलिसांची धडाकेबाज कारवाई, २३ गुन्ह्यांचा इतिहास उघड

**देवळी जनमाध्यम :** अपहरण, मारहाण आणि तीन लाख रुपयांच्या खंडणीप्रकरणी मागील पाच महिन्यांपासून फरार असलेल्या सराईत आरोपीला देवळी पोलिसांनी शिताफीने अटक केली. राकेश हरीचंद्र वाघन्ना (३०, रा. भिडी, ता. देवळी) याला २४ जुलै रोजी ताब्यात घेऊन न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून पुढील तपास सुरू आहे.

पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२ फेब्रुवारी २०२६ रोजी भिडी येथील पांडुरंग उत्तमराव डफरे यांचे आरोपी राकेश वाघन्ना व त्याच्या तीन साथीदारांनी अपहरण केले होते. फिर्यादीला जबरदस्तीने लाल रंगाच्या चारचाकी वाहनात बसवून हाताबुक्यांनी तसेच लाकडी काठीने मारहाण करण्यात आली. यावेळी जीवे मारण्याची धमकी देत तीन लाख रुपयांची खंडणी मागण्यात आली होती. या प्रकरणी देवळी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ११४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन देवळी पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. या प्रकरणातील इतर तीन आरोपींना यापूर्वीच अटक करण्यात आली होती. मात्र मुख्य आरोपी राकेश वाघन्ना हा नागपूर, अमरावती आणि यवतमाळ येथे ठिकठिकाणी लपून राहत पोलिसांना चकवा देत होता. अखेर गुप्त माहिती व तांत्रिक तपासाच्या आधारे पोलिसांनी त्याला जेरबंद करण्यात यश मिळविले.



तपासादरम्यान राकेश वाघन्ना हा सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले. त्याच्यावर सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ला, दुखापत तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत एकूण २३ गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे, सहाय्यक पोलीस अधीक्षक डॉ. वंदना कारखेले यांच्या मार्गदर्शनाखाली देवळी पोलीस ठाण्याचे ठाणेदार संदीप कापडे, पोलीस उपनिरीक्षक शिवराज जाधव, पोलीस नाईक दुर्गेश बानते आणि पोलीस शिपाई गणेश पवार यांनी केली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक शिवराज जाधव करीत आहेत.

# 26 दिवस उपोषण करूनही मला प्रामाणिकता सिद्ध करावी लागणार आहे का?

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट (NEET) प्रश्नपत्रिका फुटीच्या निषेधार्थ सलग २६ दिवस आमरण उपोषण करणारे सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी उपोषण संपवल्यानंतर सोशल मीडियावर सुरू झालेल्या टीकेला आणि ट्रोलिंगला जोरदार प्रत्युत्तर दिले आहे. सरकारकडून आश्वासन मिळाल्यानंतर २३ जुलै रोजी रात्री त्यांनी उपोषण मागे घेतले होते. मात्र, त्यानंतर काही जणांनी त्यांच्या निर्णयावर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्याने वांगचुक यांनी एक भावनिक व्हिडिओ प्रसिद्ध करत आपल्या भूमिकेचे स्पष्टीकरण दिले.व्हिडिओमध्ये बोलताना सोनम वांगचुक म्हणाले, २६ दिवस उपोषण केल्यानंतरही मला माझ्या पवित्र आंदोलनाची प्रामाणिकता सिद्ध करावी लागणार आहे का? जर सरकारशी तडजोडच करायची असती, तर इतके दिवस उपाशी राहण्याचा प्रश्नच निर्माण झाला नसता. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेला संघर्ष कोणत्याही राजकीय किंवा वैयक्तिक फायद्यासाठी नव्हता, तर तो पूर्णपणे नैतिक आणि जनहिताचा लढा होता.

**११ किलो वजन घटले, तरीही आंदोलन सुरू ठेवले**-आपल्या आंदोलनादरम्यान आलेल्या शारीरिक आणि मानसिक त्रासाचाही त्यांनी उल्लेख केला. वांगचुक म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी त्यांना अनेक कठीण प्रसंगांना सामोरे जावे लागले. आंदोलनादरम्यान शारीरिक झटापट सहन करावी लागली, जमिनीवर झोपावे लागले आणि उपोषणाच्या २०व्या व २२व्या दिवशी अत्यंत गंभीर परिस्थितीतही त्यांनी स्वतःची इच्छाशक्ती कायम ठेवली. या २६ दिवसांत माझे तब्बल ११ किलो वजन कमी झाले. लडाखच्या कडाक्याच्या थंडीतून दिल्लीच्या प्रखर उन्हात मी हे आंदोलन सुरू ठेवले. एवढ्या त्यागानंतरही मला माझ्या चारित्र्याचे किंवा प्रामाणिकतेचे प्रमाणपत्र कोणाकडून

## ट्रोलर्सवर सोनम वांगचुक यांचा संताप

घ्यावे लागणार आहे का? असा संतप्त सवाल त्यांनी उपस्थित केला.

**मी उपोषण कोणासोबत सोडलं, यावरच चर्चा का?**- सोशल मीडियावर काही जणांनी त्यांनी केंद्रीय मंत्र्यांच्या उपस्थितीत उपोषण सोडल्याबद्दल प्रश्न उपस्थित केले. यावर प्रतिक्रिया देताना वांगचुक म्हणाले, मी जर उपोषण सोडलं, तर कोणासोबत सोडलं? त्याच्यासोबतच का सोडलं? दुस-या व्यक्तीकडून का नाही सोडलं? अशा प्रकारचे प्रश्न विचारले जात आहेत. सकाळपासून अनेक लोक मला फोन करून किंवा सोशल मीडियावरील पोस्ट दाखवून सांगत आहेत की, तुमच्याबद्दल अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत. ते पुढे म्हणाले, कालपासून मी फक्त द्रव पदार्थ घेत आहे. त्यामुळे थोडी उर्जा मिळाली आणि मग या सर्व प्रश्नांना उत्तर देण्यासाठी हा व्हिडिओ करण्याचा निर्णय घेतला.



**सौदा करायचाच असता, तर २६ दिवस उपाशी राहिलो नसतो**

उपोषण संपवण्यामागे कोणताही राजकीय सौदा झाल्याचा आरोप फेटाळून लावताना वांगचुक म्हणाले, जर मला कोणाशी तडजोड करायचीच असती, तर मी २६ दिवस उपाशी राहिलो असतो का? अशा प्रकारचे सौदे आलिशान खोल्यांमध्ये बसून केले जातात; रस्त्यावर उपाशी राहून नाही. त्यांनी अशा प्रकारच्या संशयी मानसिकतेवरही तीव्र नाराजी व्यक्त केली. ज्या समाजात प्रत्येक आंदोलनामागे सौदा शोधला जातो, त्या मानसिकतेची लाज वाटायला हवी. अशा नीच विचारांना खतपाणी घालणारी प्रवृत्ती लोकशाहीसाठी धोकादायक आहे, असेही त्यांनी स्पष्टपणे म्हटले.

**नीट पेपरफुटीविरोधातील आंदोलनाला देशभरातून पाठिंबा**

नीट प्रश्नपत्रिका फुटीच्या निषेधार्थ सुरू केलेल्या या आंदोलनाला देशभरातील विद्यार्थी, पालक, शिक्षक आणि विविध सामाजिक संघटनांचा मोठा पाठिंबा मिळाला होता. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ करणा-यांवर कठोर कारवाई, पारदर्शक चौकशी आणि परीक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या मागण्यांसाठी वांगचुक यांनी हे उपोषण सुरू केले होते. सरकारकडून मागण्यांबाबत सकारात्मक आश्वासन मिळाल्यानंतर त्यांनी २३ जुलै रोजी रात्री उशिरा उपोषण समाप्त केले. मात्र, त्यानंतर सोशल मीडियावर त्यांच्या निर्णयावर प्रश्न उपस्थित झाल्याने त्यांनी हा व्हिडिओ प्रसिद्ध करून आपल्या आंदोलनामागील भूमिका आणि त्याग पुन्हा एकदा स्पष्ट केला.

**विद्यार्थ्यांसाठीचा संघर्ष सुरूच राहणार**-व्हिडिओच्या शेवटी सोनम वांगचुक यांनी स्पष्ट केले की, उपोषण संपले असले तरी विद्यार्थ्यांच्या न्यायासाठीचा त्यांचा संघर्ष थांबणार नाही. हे आंदोलन एखाद्या व्यक्तीविरोधात नव्हते, तर शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचाराविरोधात होते. विद्यार्थ्यांच्या भवितव्यासाठी आणि पारदर्शक परीक्षा व्यवस्थेसाठी माझा लढा यापुढेही सुरू राहील, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# ‘जेन झी’ने सरकारचा झिंज्या उपटल्या; ठाकरे बंधूंचा हल्लाबोल, मुंबईतील मोर्चा होणारच!

**मुंबई/प्रतिनिधी :**देशातील तरुण पिढीने अर्थात जेन झीने आपल्या सनदशीर आंदोलनाच्या जोरावर केंद्र सरकारचा मस्तवालपणा उतरवला आहे. जेन झी झीने सरकारची मस्ती जिरवली आहे आणि त्यांच्या झिंज्या उपटल्या आहेत. या विद्यार्थ्यांनी अख्ख्या देशाला भयाने पछाडलेल्या जाळ्यातून बाहेर काढले असून, देशात युवाशक्ती एकत्र आल्यास ती काय करू शकते, याची ही फक्त एक झलक आहे, अशा शब्दांत शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी (आज दि. २५) संयुक्त पत्रकार परिषदेत जंतर मंतरवर सुरु असणा-या विद्-यार्थी आंदोलनांचे कौतूक केले. तसेच, उद्या शिवाजी पार्क ते सिद्धिविनायक मंदिर असा मोर्चा निघणारच, असेही त्-यांनी यावेळी स्-पष्-ट केले.पत्रकार परिषदेत बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, भाजप सरकारने देशात असा भ्रम निर्माण केला होता की, देशात आता नागरिक उरलेलेच नाहीत, ती केवळ झुरळे आहेत. परंतु, या एका झुरळाने (सामान्य



विद्यार्थ्याने) हुकूमशाही सरकारला झुकवून दाखवले आहे. हा विषय केवळ एका राजीनाम्यापुरता मर्यादित नव्हता. या ऐतिहासिक आंदोलनाचे नेतृत्व करणा-या अभिजित दिपके यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. आंदोलन मागे घेतलेले नाही!

अभिजित दिपके यांनी आंदोलन मागे घेतलेले नाही. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मुख्य मागणी मान्य झाली असली, तरी विद्यार्थ्यांच्या आणखी दोन महत्त्वाच्या मागण्या अद्याप बाकी आहेत. त्या मान्य होणे अत्यंत आवश्यक आहे, असे ठाकरे यांनी स्-पष्-ट केले.

**विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेणार का?**-आंदोलनादरम्यान घडलेल्या प्रकारावर ताशेरे ओढताना उद्धव ठाकरे यांनी गृह मंत्रालयावर गंभीर आरोप केले. विद्यार्थ्यांच्या शांततापूर्ण आंदोलनात साध्या वेषातील गुंड घुसवण्यात आले होते. आंदोलक विद्यार्थ्यांवर पोलीस गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आता स्पष्ट खुलासा करावा की, या निष्पाप विद्यार्थ्यांवरील गुन्हे मागे घेतले जाणार आहेत का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला.

**सरकारची मस्ती जिरवली : राज ठाकरे**-झेन झीने सरकारची मस्ती जिरवली आहे आणि त्यांच्या झिंज्या उपटल्या आहेत, असे म्हणत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आंदोलक तरुणांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.दरम्यान, राज्यातील राजकीय घडामोडींवर बोलताना त्यांनी मुख्यमंर्त्यांवर निशाणा साधला. मुख्यमंत्री फडणवीस अचानक दिल्लीला का गेले, हे मला माहित नाही. त्याबाबतचा खुलासा त्यांनी स्वतःच करायला हवा, असा टोला राज ठाकरे यांनी लगावला.

**उद्याचा मोर्चा निश्चित!**-केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात आणि विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी उद्याचा नियोजित मोर्चा वेळेवरच निघणार असल्याचे स्पष्ट करत दादर येथील ऐतिहासिक शिवाजी पार्कपासून ते सिद्धिविनायक मंदिरापर्यंत हा भव्य मोर्चा काढला जाणार असून, त्यात नागरिकांनी आणि तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहनही उद्धव ठाकरे यांनी केले.

# ‘हा विजय सर्व विद्यार्थ्यांचा’ अभिजीत दिपके यांचे आई-वडील भावूक, डोळ्यांत आनंदाश्रू

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** विद्यार्थ्यांच्या विविध मागण्यांसाठी आणि परीक्षेतील गोंधळाविरोधात दिल्लीत सुरू असलेल्या तीव्र आंदोलनाला मोठे यश मिळाले आहे. केंद्रीय मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याची बातमी धडकताच, या आंदोलनात आक्रमकपणे आघाडीवर असलेल्या छत्रपती संभाजीनगरच्या अभिजीत दिपके याच्या आई-वडिलांनी आपल्या भावनांना वाट मोकळी करून दिली. लोकमत प्रतिनिधीशी संवाद साधताना अभिजीतची आई अनिता दिपके आणि वडील भगवान दिपके अत्यंत भावूक झाले असून, त्यांच्या डोळ्यांत आनंदाश्रू तरळले.

अभिजीतची आई अनिता दिपके म्हणाल्या, ‘अभिजीत दिल्लीला गेल्यानंतर आम्हाला त्याची सतत काळजी वाटत होती. मागील एका महिन्यापासून रात्री झोप येत नव्हती, घरामध्ये टीव्ही आणि मोबाईल पाहणे बंद केले होते. आंदोलनादरम्यान त्याला टायफ?इड झाला, तेव्हा आम्ही इकडे प्रचंड अस्वस्थ



झालो होतो. आम्ही दिल्लीला येतो म्हटल्यावर तो ‘तुम्ही तिकडेच थांबा, मी माझी काळजी घेतो’ असे सांगायचा. आज हे जे यश मिळाले आहे, ते केवळ माझ्या मुलाचे नसून देशातील सर्व विद्यार्थ्यांच्या एकजुटीचे आहे. आता मी त्याला उद्याच सांगणार आहे की, तू लवकर घरी ये, नाहीतर आम्हीच तुझ्याकडे येतो.‘

वडील भगवान दिपके यांनी अभिजीत आणि त्याच्या सहका-यांच्या संघर्षाचे कौतुक करताना सांगितले, ‘अभिजीत आणि त्याच्या सहका-यांनी विद्यार्थ्यांसाठी जी चळवळ उभी केली होती, त्याला अखेर यश आले आहे. आजकाल साधे सरपंचपद कोणी सोडायला तयार नसते, पण धर्मेंद्र प्रधान यांनी विद्यार्थ्यांचे भविष्य आणि हित लक्षात घेउन केंद्रीय मंत्री पदाचा राजीनामा देत मनाचा मोठेपणा दाखवला आहे. त्यांनी विद्यार्थ्यांना अभ्यास करण्याचा सल्ला दिला आहे, ते कौतुकास्पद आहे.‘

**२० तारखेच्या घटनेने थरकाप; ‘आता अभिजीतने घरी यावे’**

मागील ३० ते ३२ दिवसांच्या कठीण काळाची आठवण सांगताना भगवान दिपके म्हणाले, ‘तो येथून दिल्लीला गेल्यानंतरचे दिवस अतिशय कठीण होते. काळजीने आम्हाला जेवणही जात नव्हते. २० जुलै रोजी एका पोलीस अधिका-याने माइक जोरात ओढत त्याच्यावर हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा व्हिडिओ आम्ही पाहिला आणि आमचा थरकाप उडाला. मला वैयक्तिकरित्या राजकारण आवडत नाही, पण तो या लढ्यात उतरला आणि त्याने यश मिळवले. त्याने पुढे काय करावे हा त्याचा निर्णय असेल, पण आता त्याने तात्काळ आपल्या घरी परत यावे,‘ अशी आर्त साद त्यांनी घातली.

# युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय; शरद पवारांकडून कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी :** नीट पेपरफुटी प्रकरणावरून दिल्लीत जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी प्रतिक्रिया देत आंदोलक विद्यार्थ्यांच्या लढ्याचे कौतुक केले आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर शरद पवार यांनी सोशल मिडियावर पोस्ट करत हा निर्णय युवाशक्तीच्या एकजुटीचा विजय असल्याचे म्हटले आहे.शरद पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, नीट पेपरफुटीप्रकरणी दिल्लीत जंतर-मंतरवर सलग २८ दिवस तरुणाईने दिलेला लढा आणि दाखवलेली जिद्द वाखाणण्याजोगी आहे. आंदोलकांच्या मागणीनुसार केंद्रीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा दिल्याचा उल्लेख करत पवार म्हणाले, दडपशाहीला न घाबरता अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे



राहून सरकारला नैतिक जबाबदारी स्वीकारायला भाग पाडणारा हा लढा लोकशाहीच्या ताकदीचे प्रतीक आहे. हा देशातील युवाशक्तीच्या एकजुटीचा मोठा विजय आहे.

यावेळी त्यांनी विरोधी पक्षातील नेत्यांचेही आभार मानले. विरोधी पक्षातील प्रमुख नेत्यांनी ज्या पद्धतीने देशातील युवकांना नैतिक आणि संसदीय पाठबळ दिले, त्याबद्दल विरोधी पक्षातील सर्व खासदारांचे मन:पूर्वक आभार असे त्यांनी म्हटले. पुढे पवार यांनी लोकशाहीच्या भूमिकेवर भाष्य करत म्हटले, देशातील लोकशाहीने कात टाकली आहे, आणि त्याचे श्रेय देशातील युवा पिढीला जाते हे निश्चितपणे नमूद करावेसे वाटते. दरम्यान, नीट पेपरफुटी प्रकरणावरून काक्रोच जनता पार्टी (सीजेपी) आणि विद्यार्थ्यांनी दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन सुरू केले होते. शिक्षणमंर्त्यांच्या राजीनाम्यानंतर आंदोलनकर्त्यांनी ही पहिली मागणी पूर्ण झाल्याचा दावा केला असून, इतर मागण्यांसाठी लढा सुरू ठेवण्याचे संकेत दिले आहेत.

# मी देवेंद्रजींना महाराष्ट्रातच ठेवणार : अमृता फडणवीस

**पंढरपूर :** गेल्या काही दिवसांपासून राजकीय वर्तुळात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दिल्लीत केंद्रीय मंत्री होणार आहेत, भाजपचे केंद्रीय नेतृत्व त्यांना दिल्लीत बोलावून घेणार, अशी जोरदार चर्चा सुरू आहे.सर्वांत आधी मुख्यमंत्री फडणवीस हे केंद्रात जाणार असल्याचा दावा ठाकरे शिवसेनेचे नेते संजय राउत यांनी केला होता. तसेच फडणवीस दिल्लीला गेल्यास मुख्यमंत्रिपदासाठी एकनाथ शिंदे यांना संधी मिळावी, अशी अपेक्षा शिवसेनेतील नेत्यांकडून व्यक्तकेली जात आहे. दरम्यान फडणवीसांच्या दिल्ली वारीच्या या चर्चांवर त्यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांना विचारणा केली असता त्यांनी महत्त्वाचे भाष्य केले आहे.अमृता फडणवीस प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या. मुख्यमंर्त्यांच्या दिल्लीतील वर्णीबाबत विचारताच, त्या म्हणाल्या, नाही.. नाही.. मला महाराष्ट्रातच राहायचं आहे, त्यामुळे मी त्यांनाही महाराष्ट्रातच ठेवणार.. त्यांच्या या सूचक विधानाची सध्या सर्वत्र चर्चा सुरू आहे.दरम्यान, यावेळी अमृता फडणवीस यांनी दिल्लीच्या जंतर मंतरवरील विद्यार्थी आंदोलनाबाबतही आपली भूमिका मांडली. त्या म्हणाल्या, जोपर्यंत हे आंदोलन नीट पेपरफुटीबाबत आहे, तोपर्यंत ते योग्य आहे. नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणात सरकार पडद्यामागे काम करत होते, आता त्याचे परिणाम दिसत आहेत. फास्ट ट्रॅक कोर्ट, शिक्षा वाढवणे आणि अन्य बदल आणले जात आहेत. विद्यार्थ्यांवर अन्याय नको यासाठी सरकार वेगवेगळे नवे नियम आणत आहे.विद्यार्थ्यांना अपेक्षित आहे, तशी पेपरफुटी व्हायला नको, त्यांची मेहनत वाया जाता कामा नये, त्यांच्यावर अन्याय व्हायला नको याची सरकार तसदी घेत आहे असे अमृता फडणवीस यांनी म्हटले.



# प्रत्येक वेळी धर्म-जात आणत बसलो तर

## विद्यार्थ्यांच्या आंदोलनात मकरंद देशपांडेचा पाठींबा, रोखठोक बोलले!

**मुंबई/प्रतिनिधी :**प्रत्येकवेळी धर्म-जात, नॅशनल-अँटीनॅशनल, देशद्रोही, देश-विदेश याच्यावरच बोललं जात असेल तर विकास कसा होणार? माणूस कधीच पुढे जाणार नाही. कुठल्याही पक्षाला आधी जर फक्त सत्ताच हवी असेल मग कसं होणार? असे सवाल उपस्थित करत अभिनेते मकरंद देशपांडे यांनी मुंबईतील विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवला. मुंबईत आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्त्वात आयोजित करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात मकरंद देशपांडे यांनी शुक्रवारी हजेरी लावली. ‘जेव्हा आपण म्हणतो भविष्य उज्ज्वल आहे. तेव्हा कुणामुळे ते उज्ज्वल होणार आहे. आज मी ६० वर्षांचा आहे. माझ्यामुळे भविष्य उज्ज्वल होणार नाही. आज जो १८ वर्षाचा आहे, असे तरुण देशाचं भविष्य आहेत. त्यामुळे




त्यांना जो काही त्रास होत असेल, तो जर का तुमच्या डोळ्याखालून गेला नाही. त्याच्यावर जर समाधान निघालं नाही. तर मग अराजकता आहे‘, असं मकरंद देशपांडे म्हणाले. नीट पेपरफुटीच्या निषेधार्थ आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी दिल्लीत जंतरमंतरवर काक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजित दिपके यांच्या नेतृत्त्वात आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी शुक्रवारी मुंबईत शिवाजी पार्क येथे युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्त्वात विद्यार्थ्यांचं आंदोलन करण्यात आलं.

‘उत्तरदायित्व खूप महत्त्वाचं आहे. आपण आत्ता सरकारकडून उत्तरदायित्वाची अपेक्षा करतो. ते तेवढे तत्पर आहेत का? की त्यांना वेळ लागतोय, आश्वासन देत आहेत ते पूर्ण करणार आहेत का? इथे लक्ष गेलं पाहिजे. कुठलीही गोष्ट अशी तर होउ शकत नाही की आत्ता बोललं आणि झालं. हे संकेत खूप आहेत. ब-याच शहरात आता जंतरमंतर झालं आहे. हा राजकीय अजेंडा नाही. सगळे एकत्र येउन काहीतरी मागत आहेत. विद्यार्थ्यांना कुठेतरी त्रास होतोय. त्यांना असं वाटतंय की आत्ता जे घडतंय ते चुकीचं घडतंय. त्यामुळे याकडे लक्ष द्यायला हवं‘, असं मकरंद देशपांडे म्हणाले.

‘कुठल्याही पक्षाला, कुठल्याही सरकारला आधी जर फक्त सत्ताच हवी असेल मग कसं होणार? सत्ता तर दिली. पण कुणी दिली सत्ता? त्यांच्यासाठी तुम्ही विचार नाही का करणार? मग पुन्हा पुढचं इलेक्शन. दरवेळी आपण हेच ऐकतो. पुन्हा नवी आश्वासनं. पण आत्ता जे घडतंय त्याचं काय? हितासाठी बोललं पाहिजे. प्रत्येकवेळी धर्म-जात. देश-विदेश. नॅशनल-अँटीनॅशनल आणत बसलो तर विकास कसा होणार?‘, असंही मकरंद देशपांडे म्हणाले.

## नाशिक, पालघरमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के

**नाशिक :** नाशिक आणि पालघर या जिल्ह्यांमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याने नागरिकांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यात आज (२५ जुलै) सकाळी एकापाठोपाठ चार धक्के बसले, तर पालघर जिल्ह्यातही भूकंपाचे सत्र कायम असल्याचे पाहायला मिळाले. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी अथवा वित्तहानी झालेली नाही, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. नाशिक जिल्ह्यातील सुरगाणा तालुक्यातील बोरगाव आणि आसपासच्या परिसरात आज ( २५ जुलै) सकाळी ९.५५ वाजल्यापासून भूकंपाचे चार सौम्य धक्के जाणवले. या धक्क्यांची तीव्रता रिश्टर स्केलवर ३.६ नोंदवली गेली आहे. एकापाठोपाठ एक अशा चार वेळा जमिनीला हादरे बसल्यामुळे बोरगाव परिसरातील ग्रामस्थ आणि नागरिक घराबाहेर पडले. प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार या घटनेत कुठलेही नुकसान झालेले नाही. जिल्हा प्रशासन परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस तातडीने दिल्लीला, शिंदेही जाणार

**मुंबई /प्रतिनिधी :** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर देशाच्या राजकीय घडामोडींना वेग आला असून, त्याचे पडसाद आता महाराष्ट्राच्या राजकारणातही उमटताना दिसत आहेत. विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या मोठ्या घडामोडीनंतर महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तातडीने दिल्लीकडे रवाना झाले आहेत. ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेणार असल्याची माहिती समोर आली असून, या भेटीकडे राज्यासह देशाचे लक्ष लागले आहे.धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर केंद्र सरकारमध्ये मंत्रिमंडळ फेरबदलाची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अचानक दिल्लीला बोलावण्यात आल्याने विविध राजकीय चर्चांना उधाण आले आहे. फडणवीस यांना केंद्रात महत्त्वाची जबाबदारी मिळणार का, किंवा केंद्रीय मंत्रिमंडळातील संभाव्य बदलांबाबत त्यांच्याशी चर्चा होणार का, याबाबत तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. मात्र, याबाबत अधिकृतरीत्या कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही.सूत्रांच्या



माहितीनुसार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही दिल्लीला बोलावण्यात आल्याची चर्चा आहे. त्यामुळे राज्यातील सत्तासमीकरणे, आगामी मंत्रिमंडळ विस्तार आणि केंद्र-राज्य समन्वयाच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. महाराष्ट्र मंत्रिमंडळात फेरबदल होण्याच्या चर्चा आधीपासूनच सुरू होत्या. आता केंद्रातील संभाव्य फेरबदलामुळे या चर्चांना आणखी बळ मिळाले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी पहाटे आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात सपत्नीक शासकीय महापूजा केली. त्यानंतर ते दुपारी सोलापूरहून विशेष विमानाने दिल्लीकडे रवाना झाल्याची माहिती समोर आली आहे. दिल्लीत पोहोचल्यानंतर ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत महत्त्वपूर्ण चर्चा करणार असल्याचे सांगितले जात आहे.विशेष म्हणजे, धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी अद्याप कोणतीही सार्वजनिक प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्या दिल्ली दौ-यात नेमकी कोणती राजकीय रणनीती आखली जाणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.दरम्यान, नीट परीक्षा आणि प्रश्नपत्रिका फुटीच्या मुद्द्यावरून विरोधक आक्रमक झाले आहेत

# ट्रम्पचा पुन्हा धक्का, भारतासह 60 देशांवर टॅरिफ

**वॉशिंग्टन /वृत्तसंस्था-** अमेरिकेने भारतासह १७ देशांमधून आयात होणा-या वस्तूंवर १० टक्के तर ४३ देशांवर १२.५ टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय घेतला आहे. सक्तीच्या मजुरीद्वारे तयार केलेल्या वस्तूंविरोधातील कारवाईचा हा भाग असल्याचे अमेरिकेने स्पष्ट केले.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गुरुवारी जारी केलेल्या निवेदनात सांगितले की, संबंधित देशांनी सक्तीच्या मजुरीतून तयार झालेल्या वस्तूंवरील बंदी प्रभावीपणे अमलात आणावी, यासाठी १० टक्के आयातकर लागू करण्यात येत आहे. यापूर्वी ३ जून रोजी अमेरिकेने व्यापार कायद्यातील कलम ३०१ अंतर्गत भारतावर १२.५ टक्के आयातकर प्रस्तावित केला होता.अमेरिकेने आधी भारतावर १२.५ टक्के उच्च कर लावण्याचे ठरवले होते. परंतु, भारताने सक्तीच्या मजुरीविरुद्धच्या नियमांत त्वरित सुधारणा केल्यामुळे अमेरिकेने हा कर कमी करून १० टक्के केला.



यामुळे इतर देशांच्या तुलनेत भारतीय मालाला फायदा मिळेल.१० टक्के कर श्रेणीमध्ये भारत, कॅनडा, युनायटेड किंगडम, मेक्सिको आणि युरोपियन युनियनसह १७ देशांचा समावेश आहे. या देशांवरील आयात शुल्क तुलनेने कमी ठेवण्यात आले आहे. यूएस-मेक्सिको-कॅनडा करारातील वस्तूंना यात सवलत देण्यात आली आहे.१२.५ टक्के कर श्रेणीमध्ये ब्राझील, चिली, चीन, जपान आणि रशियासह ४३ देशांचा समावेश आहे. तेल, गॅस आणि खते या उत्पादनांना या करातून पूर्णपणे वगळण्यात आले आहे. या देशांनी सक्तीच्या मजुरीवरील आयातबंदीची प्रभावी अंमलबजावणी केली नसल्याचा दावा आहे.

**जगभरातून तीव्र विरोध-** ट्रम्प प्रशासनाच्या या निर्णयाचा जगभरातून तीव्र विरोध होत आहे. ब्राझीलने अमेरिकेविरुद्ध जशास तसे कर लावण्याचा इशारा दिला आहे. चिलीनेही यावर आक्षेप घेतला आहे.

# नक्षलवाद्यांचे सोंग घेउन दहशत पसरविणा-यांना बेड्या; गडचिरोली पोलिसांची कारवाई, दोघांना अटक

**गडचिरोली :** नक्षलवाद्यांचे अस्तित्व असल्याचा आभास निर्माण करून नागरिकांमध्ये भीती आणि दहशत पसरविण्याचा प्रयत्न करणा-या दोघांना गडचिरोली पोलिसांनी अटक केली आहे. पिपली बुर्गी पोलीस ठाण्याच्या हद्दीत लाल रंगाचे बॅनर आणि पत्रके लावून नक्षलवादी कारवायांचा बनाव रचल्याचा आरोप त्यांच्यावर असून, या प्रकरणातील अन्य आरोपींचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी शनिवारी दिली.गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद जवळपास संपुष्टात आणण्यात पोलिसांना यश आले असून, ऑपरेशन अंतिम प्रहार या मोहिमेअंतर्गत सातत्याने राबविण्यात आलेल्या कारवायांमुळे जिल्ह्यातील नक्षलवादी हालचालींना मोठा आळा बसल्याचा दावा पोलिसांनी केला आहे. अशा परिस्थितीत १२ जुलै रोजी पिपली बुर्गीपासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर जिजावंडी टोला मार्गावरील फाट्याजवळ अज्ञातांनी लाल रंगाचे कापडी बॅनर आणि पत्रके लावून नागरिकांमध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला होता.गावाच्या दिशादर्शक फलकाखाली लावण्यात आलेल्या बॅनरवर तसेच जवळच ठेवलेल्या पत्रकांवर दहशत निर्माण करणारा मजकूर लिहिण्यात आला होता. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेउन पोलीस अधीक्षक एम. रमेश यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू करण्यात आला. त्यानंतर १४ जुलै रोजी पिपली बुर्गी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेतील विविध कलमे, बेकायदा कृत्य प्रतिबंधक कायदा तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला.तपासादरम्यान तांत्रिक पुरावे आणि गोपनीय माहितीच्या आधारे शिवा अनिल मिस्त्री (वय ४८, रा. तरुणनगर, ता. पाखांजूर, जि. कांकेर, छत्तीसगड) आणि रोहित रणजित मल्लीक (वय २५, रा. वटेली, ता. एटापल्ली, जि. गडचिरोली) यांनी नक्षलवादी असल्याचे भासवून हे बॅनर व पत्रके लावल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दोघांना अटक करण्यात आली असून या कटात सहभागी इतरांचा शोध सुरू आहे.या कारवाईबद्दल पोलिस अधीक्षकांनी तपास पथकाचे कौतुक केले. तसेच अफवा, भूलथापा किंवा दहशत निर्माण करणा-या कोणत्याही प्रकारच्या कृत्यांना नागरिकांनी बळी पडू नये, असे आवाहन त्यांनी केले.

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# रेल्वे क्रांतीची नांदी

मराठवाड्यात रेल्वे विस्ताराच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. धाराशिव–बीड–छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील सुमारे २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच लोकसभेत याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी हा रेल्वे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या नवीन रेल्वे मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वेक्षणास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. डीपीआर तयार करण्याचे काम सुरू झाले असून, अहवाल पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनासोबत पुढील चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर नीती आयोग, अर्थ मंत्रालय आणि इतर संबंधित संस्थांकडून आवश्यक मंजुरी घेतल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत निर्णय घेतला जाईल. कोणत्याही मोठ्या रेल्वे प्रकल्पाला तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय अशा विविध स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणून या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली आहे. धाराशिव आणि बीड हे मराठवाड्यातील असे जिल्हे आहेत, जिथे रेल्वे सुविधांचा विस्तार तुलनेने कमी आहे. त्यामुळे या नवीन रेल्वे मार्गामुळे या दोन्ही जिल्ह्यांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. या मार्गामुळे प्रवास सुलभ होण्यासोबतच व्यापार, उद्योग, रोजगार आणि पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळणार आहे. विशेष म्हणजे, हा रेल्वे मार्ग केवळ धाराशिव आणि बीड जिल्ह्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या मार्गामुळे मराठवाड्यातील विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या प्रवाशांची सोय होणार असून, या भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे. रेल्वेचा विकास हा कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. छत्रपती संभाजीनगर हे सध्या राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक म्हणून ओळखले जात आहे. औद्योगिक विकास, उत्पादन क्षेत्र आणि लॉजिस्टिक हब म्हणून या जिल्ह्याने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. धाराशिव - बीड - छत्रपती संभाजीनगर हा प्रस्तावित नवीन रेल्वे मार्ग दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच पुढील दक्षिण भारताशी अधिक थेट संपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रेल्वे जोडणीमुळे केवळ प्रवाशांची सुविधा वाढणार नाही, तर मालवाहतुकीसाठी अधिक सक्षम आणि कार्यक्षम रेल्वे नेटवर्क उपलब्ध होणार आहे. विशेषतः शेंद्रा - बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही), अभियांत्रिकी आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना या मार्गाचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. कंटेनर, औद्योगिक कच्चामाल, तयार उत्पादने तसेच कृषी मालाची वाहतूक अधिक वेगाने आणि कमी खर्चात करणे शक्य होईल. परिणामी उद्योगांची कार्यक्षमता वाढेल आणि मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल. हा रेल्वे प्रकल्प भविष्यात मराठवाड्याच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. दळणवळणाच्या सुविधांच्या बाबतीत मराठवाड्याने गेल्या काही वर्षांत प्रगती केली असली तरी अनेक मोठ्या प्रकल्पांसाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. या भागाला सक्षम पायाभूत सुविधांची आवश्यकता असून, त्यासाठी प्रभावी नियोजन आणि मजबूत नेतृत्वाची गरज आहे. वेळेची बचत आणि जलद प्रवासासाठी आज अनेक नागरिक विमानसेवेकडे वळत आहेत. मात्र, मराठवाड्यासारख्या आठ जिल्ह्यांच्या मोठ्या विभागात सध्या केवळ छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथेच विमानसेवा उपलब्ध आहे. भविष्यात या सुविधा अधिक जिल्ह्यांपर्यंत विस्तारल्यास प्रादेशिक विकासाला आणखी वेग मिळू शकतो. रेल्वे, विमान आणि रस्ते वाहतुकीचे सक्षम जाळे निर्माण झाल्यास मराठवाडा केवळ राज्याच्या नव्हे, तर देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचा केंद्रबिंदूबनू शकतो. जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील नागरिकांना विमान प्रवासासाठी आजही शेकडो किलोमीटरचा प्रवास करून विमानतळ गाठावे लागते. छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथून मोजक्याच शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध असल्याने अनेक प्रवाशांना मुंबई किंवा पुणे गाठून पुढील हवाई प्रवास करावा लागतो. काही महिन्यांपूर्वी बीड येथे विमानतळ उभारणीच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या होत्या. प्रस्तावित विमानतळासाठी बीडमध्ये तांत्रिक सर्वेक्षणही पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे बीड विमानतळाच्या उभारणीचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळते यावरच बीडकरांचे विमानतळाचे स्वप्न अवलंबून आहे. दरम्यान, लातूर विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १ जून रोजी ५६ कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून लातूर विमानतळाचा विकास होऊन आगामी काळात तेथून विमानसेवा सुरू होण्याची शक्यता वाढली आहे. सध्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून मुंबई, दिल्ली, हैदराबाद आणि बंगळुरू या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू आहे. तर नांदेड विमानतळावरून बंगळुरू, हैदराबाद, गाझियाबाद, गोवा, पुणे, अहमदाबाद आणि नागपूर या शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध आहे. मराठवाड्यातील बीड आणि लातूर येथून आगामी काळात विमानसेवा सुरू झाल्यास या भागाच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नवीन रेल्वे मार्गांसोबतच विमानसेवेचा विस्तार ही मराठवाड्यासाठी निश्चितच आनंदाची बाब ठरत आहे. राज्य शासन आणि केंद्र सरकारकडून पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात असल्याने मराठवाड्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळत आहे.

# निर्यात संधी की नवी स्पर्धा?

**भारताला ब्रिटनने १ जुलैपासून लागू केलेल्या पोलादावरील नव्या शुल्काबाबतही चिंता होती. भारत दरवर्षी ९० कोटी डॉलरपेक्षा अधिक किमतीचे पोलाद ब्रिटनला निर्यात करतो. या पार्श्वभूमीवर ब्रिटनने लवचिक भूमिका घेत भारताच्या सुमारे ८५ टक्के पोलाद निर्यातीला नव्या शुल्कातून सूट देण्यास मान्यता दिली आहे.**




भारत आणि ब्रिटन यांच्यातील ऐतिहासिक मुक्त व्यापार कराराच्या अंमलबजावणीस नुकतीच सुरुवात झाली. या करारामुळे भारताच्या सुमारे ९९ टक्के निर्यातीवर ब्रिटनमध्ये कोणतेही सीमा शुल्क आकारले जाणार नाही. त्याबदल्यात भारतही ब्रिटिश उत्पादनांवरील सुमारे ९० टक्के आयात शुल्क टप्प्याटप्प्याने कमी करणार आहे. भारतीय उद्योग, निर्यातदार आणि सरकार या नव्या स्पर्धात्मक वातावरणाशी किती वेगाने जुळवून घेतात व उद्भवणाऱ्या आव्हानांना किती दूरदृष्टीने सामोरे जातात, यावरच या ऐतिहासिक कराराचे दीर्घकालीन यश निश्चित होणार आहे.

भारत आणि ब्रिटन यांच्यातील व्यापक आर्थिक व व्यापार करार (कॉम्प्रिहेन्सिव्ह इकॉनॉमिक अँड ट्रेड ॲग्रीमेंट – सीईटीए) अधिपृतपणे लागू झाला आहे. या करारामुळे भारताच्या सुमारे ९९ टक्के निर्यातीवर ब्रिटनमध्ये कोणतेही सीमा शुल्क आकारले जाणार नाही. त्याबदल्यात भारतही ब्रिटिश उत्पादनांवरील सुमारे ९० टक्के आयात शुल्क टप्प्याटप्प्याने कमी करणार आहे. सध्या भारत आणि ब्रिटन यांच्यातील वस्तू व्यापाराचे मूल्य सुमारे २५.१० अब्ज डॉलर असून त्यात दरवर्षी सुमारे ८.५ टक्क्यांनी वाढ होत आहे. या कराराच्या माध्यमातून २०३० पर्यंत दोन्ही देशांमधील वस्तू आणि सेवा व्यापार १०० अब्ज डॉलरपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या मुक्त व्यापार कराराचा सर्वाधिक लाभ भारताच्या कृषी आणि अन्नप्रक्रिया उद्योगाला होणार आहे. मसाले, कडधान्ये, चहा, आंब्याचा गर, लोणची, तयार खाद्यपदार्थ, प्रक्रिया केलेले अन्न, टयुना आणि कोळंबी यांसारख्या उत्पादनांवरील निर्यात शुल्क पूर्णपणे हटविण्यात आले आहे. याशिवाय श्रीअन्न (मिलेट्स), फणस आणि विविध देशी वनौषधीजन्य उत्पादनांचाही या यादीत समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे भारताच्या श्रीअन्नाला जागतिक बाजारपेठ मिळवून देण्याच्या मोहिमेला मोठी चालना मिळेल. पृषी आणि अन्नप्रक्रिया उद्योगाचा अंदाज आहे की, या करारामुळे पुढील तीन वर्षांत भारताच्या पृषी निर्यातीत सुमारे २० टक्क्यांनी वाढ होऊ शकते.

कृषी क्षेत्राबरोबरच वस्त्रोद्योग, तयार कपडे, पादत्राणे, खेळणी, क्रीडा साहित्य आणि चामडय़ाच्या वस्तू तयार करणाऱ्या श्रमप्रधान उद्योगांनाही या कराराचा मोठा फायदा होणार आहे. यापूर्वी भारतीय निर्यातदारांना ब्रिटनमध्ये या उत्पादनांवर सुमारे १२.५ टक्के सीमा शुल्क भरावे लागत होते. चीन वगळता व्हिएतनाम, बांगलादेश, श्रीलंका आणि पाकिस्तानसारख्या देशांना या शुल्कातून सूट मिळाल्यामुळे भारतीय उत्पादने स्पर्धेत मागे पडत होती. परिणामी, ब्रिटनमधील सुपरमार्केटमध्ये भारतीय वस्तूंची उपस्थिती लक्षणीयरीत्या कमी झाली होती. आता शुल्कमुक्त प्रवेश मिळाल्यामुळे भारतीय उत्पादने या देशांशी अधिक प्रभावीपणे स्पर्धा करू शकतील. ब्रिटनकडे भारताकडून होणाऱ्या निर्यातीत औषधे, विद्युत उपकरणे, औद्योगिक यंत्रसामग्री, वाहनांचे सुटे भाग आणि रत्न-आभूषणांचा मोठा वाटा आहे. या उत्पादनांवर आधीही फार मोठे शुल्क नव्हते. मात्र आता ते पूर्णपणे हटविण्यात आल्यामुळे चीन आणि युरोपमधील उत्पादकांशी स्पर्धा करताना भारतीय उद्योगांना अधिक बळ मिळेल.

या कराराचे महत्त्व आणखी एका कारणामुळे वाढते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्कवाढीच्या धोरणामुळे अमेरिकन बाजारपेठेत निर्यात करणे अधिक कठीण झाले आहे. दुसरीकडे युरोपियन संघासोबतचा मुक्त व्यापार करार अद्याप लागू झालेला नाही. अशा परिस्थितीत ब्रिटनसोबतचा करार भारतीय उद्योगांसाठी नव्या बाजारपेठेची दारे उघडणारा ठरू शकतो. भारतासाठी हा करार सेवा क्षेत्राच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाचा आहे. आज भारत ही सेवा-आधारित अर्थव्यवस्था बनली आहे. या करारानुसार दोन्ही देशांनी एकमेकांच्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून पाच वर्षांपर्यंत सामाजिक सुरक्षा कर आकारला जाणार नाही, यावर सहमती दर्शविली आहे. त्यामुळे ब्रिटनमध्ये काम करणाऱ्या भारतीय पंपन्यांच्या कर्मचाऱ्यांना दुहेरी कर आकारणी कराराच्या तरतुदींनुसार पाच वर्षांपर्यंत ब्रिटनचा राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा कर भरावा लागणार नाही. हीच सवलत भारतात कार्यरत ब्रिटिश कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांनाही लागू असेल. ब्रिटनमध्ये काम करणाऱ्या भारतीय व्यावसायिकांमध्ये माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कर्मचाऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्यांना आयकराव्यतिरिक्त वेतनाच्या सुमारे १२.५ टक्क्यांपर्यंत राष्ट्रीय सामाजिक सुरक्षा कर भरावा लागत होता. आता या सवलतीमुळे त्यांचा आर्थिक भार कमी होईल. माहिती तंत्रज्ञानाबरोबरच आरोग्य, वित्तीय सेवा आणि शिक्षण क्षेत्रात कार्यरत भारतीय पंपन्यांसाठीही ब्रिटनची बाजारपेठ अधिक सुलभ होणार आहे.

या करारात दोन्ही देशांतील कंपन्यांना सरकारी तसेच खासगी क्षेत्रातील निविदांमध्ये सहभागी होण्याची संधी देण्यात आली आहे. त्यामुळे परस्पर गुंतवणूक, तंत्रज्ञान हस्तांतरण आणि नवोन्मेषाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. याच कारणामुळे या कराराला व्यापक आर्थिक आणि व्यापार करार असे संबोधले जात आहे. भारताने या चर्चेदरम्यान भारतीय व्यावसायिक आणि विद्यार्थ्यांसाठी व्हिसा प्रक्रिया अधिक सुलभ करण्यावर भर दिला होता. मात्र या करारात व्हिसांची संख्या वाढविण्याची तरतूद करण्यात आलेली नाही.

भारताला ब्रिटनने १ जुलैपासून लागू केलेल्या पोलादावरील नव्या शुल्काबाबतही चिंता होती. भारत दरवर्षी ९० कोटी डॉलरपेक्षा अधिक किमतीचे पोलाद ब्रिटनला निर्यात करतो. या पार्श्वभूमीवर ब्रिटनने लवचिक भूमिका घेत भारताच्या सुमारे ८५ टक्के पोलाद निर्यातीला नव्या शुल्कातून सूट देण्यास मान्यता दिली आहे. उर्वरित १५ टक्के निर्यातही कोटा व्यवस्थेद्वारे शुल्कमुक्त ठेवण्याचा मार्ग स्वीकारण्यात आला आहे. या कराराचा भाग म्हणून भारत आजपासून स्कॉच व्हिस्कीवरील आयात शुल्क १५० टक्क्यांवरून ७५ टक्क्यांपर्यंत कमी करीत आहे. पुढील दहा वर्षांत ते टप्प्याटप्प्याने ४० टक्क्यांपर्यंत आणले जाणार आहे. त्यामुळे भारतीय मद्यनिर्मिती उद्योगासमोर स्पर्धा वाढणार असली तरी स्कॉचचा वापर करून मिश्रित व्हिस्की तयार करणाऱ्या भारतीय पंपन्यांना त्याचा फायदा होण्याची शक्यता आहे.

भारत ब्रिटनमधून वाहने, औद्योगिक यंत्रसामग्री, त्यांचे सुटे भाग आणि विद्युत उपकरणांचीही मोठ्या प्रमाणावर आयात करतो. या करारानुसार यंत्रसामग्री आणि सुटय़ा भागांवरील शुल्क कोटा व्यवस्थेंतर्गत १०० टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी केले जाणार आहे, तर सौंदर्यप्रसाधनांवरील आयात शुल्क पुढील दहा वर्षांत पूर्णपणे हटविण्यात येणार आहे.

ब्रिटिश सरकार हा करार आपल्या इतिहासातील सर्वात वेगाने अमलात आलेल्या व्यापार करारांपैकी एक म्हणून सादर करत असून त्यासाठी देशभर प्रचार मोहिमाही राबवित आहे. ब्रेझिटमुळे झालेल्या आर्थिक नुकसानीची भरपाई आणि अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या शुल्क धोरणामुळे निर्माण झालेल्या जागतिक अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर भारतासारखी वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि विशाल ग्राहक बाजारपेठ ब्रिटनसाठी अत्यंत महत्त्वाची ठरत आहे. तथापि, या कराराचे खरे यश भारतीय निर्यातदार या नव्या संधीचा किती प्रभावी उपयोग करतात, यावर अवलंबून असेल. मुक्त व्यापार करार बाजारपेठेची दारे उघडतात. मात्र त्या बाजारपेठेत टिपून राहण्यासाठी उत्पादनांची गुणवत्ता, स्पर्धात्मक किंमत, जागतिक मानकांचे पालन आणि वेळेवर पुरवठा या घटकांनाच निर्णायक महत्त्व असते.

याशिवाय ब्रिटनमधील नव्या राजकीय नेतृत्वाचा कल कामगार हक्क, कार्बन उत्सर्जन, पर्यावरणीय निकष आणि उत्पादन मानकीकरण यांसारख्या बिगर-शुल्क अटी अधिक कठोर करण्याकडे असण्याची शक्यता आहे. भविष्यात या निकषांच्या माध्यमातून अप्रत्यक्ष व्यापार अडथळे निर्माण होऊ शकतात. त्यामुळे या मुक्त व्यापार कराराचे यश केवळ शुल्क कपातीवर अवलंबून राहणार नाही. भारतीय उद्योग, निर्यातदार आणि सरकार या नव्या स्पर्धात्मक वातावरणाशी किती वेगाने जुळवून घेतात व उद्भवण्या आव्हानांना किती दूरदृष्टीने सामोरे जातात, यावरच या ऐतिहासिक कराराचे दीर्घकालीन यश निश्चित होणार आहे.

**स्वरदा वैद्य**

# शिक्षण सुधारण्याची वेळ

शिक्षण हा कोणत्याही समाजाच्या प्रगतीचा आणि विकासाचा मुख्य पाया असतो. चांगल्या शिक्षणाचा अर्थ केवळ परीक्षांमध्ये मिळालेले गुण, सर्वोच्च टक्केवारी किंवा पदवी मिळवणे एवढाच मर्यादित नसतो. विद्यार्थ्यांना विचार करण्याची क्षमता देणे, त्यांच्यात चांगल्या मूल्यांची जपणूक करणे आणि त्यांना देशाचे एक जबाबदार नागरिक बनवणे ही शिक्षणाची खरी भूमिका असते; परंतु दुर्दैवाने आजच्या काळात शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मोठ्या प्रमाणावर बदलला आहे. शिक्षण हे समाजसेवेचे माध्यम न राहता अनेक ठिकाणी तो एक मोठा व्यवसाय बनल्याची भावना पालकांच्या मनात निर्माण होत आहे. त्यामुळे आजच्या संपूर्ण शिक्षण व्यवस्थेचा सर्वंकष विचार करण्याची तीव्र गरज निर्माण झाली आहे.

खासगी शाळांनी शिक्षणाच्या क्षेत्रात अनेक अत्याधुनिक आणि दर्जेदार सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत, हे वास्तव नाकारता येत नाही; परंतु दुसरीकडे या शाळांचे सतत वाढणारे शुल्क सामान्य आणि मध्यमवर्गीय कुटुंबांसाठी एक मोठा आर्थिक ताण ठरत आहे. आपल्या मुलांच्या चांगल्या भविष्यात खंड पडू नये म्हणून अनेक पालक कर्ज काढून किंवा स्वतःच्या दैनंदिन गरजा बाजूला ठेवून फी भरतात. या परिस्थितीमुळे शिक्षण हा सर्वांसाठी समान संधी देणारा मूलभूत अधिकार उरला आहे की तो केवळ आर्थिक श्रीमंतीवर अवलंबून असलेला एक विशेषाधिकार बनला आहे? यासाठी खासगी शाळा पूर्णपणे बंद करणे हा उपाय नसून, शाळांच्या शुल्कात पारदर्शकता आणणे, शिक्षणाच्या गुणवत्तेवर शासकीय नियंत्रण असणे आणि सरकारी शाळांचा दर्जा उंचावणे यावर अधिक भर दिला पाहिजे.

आजच्या परीक्षा व्यवस्थेबाबतही अनेक शंका आणि चिंता व्यक्त केल्या जात आहेत. राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाच्या प्रवेश परीक्षांचे पेपर फुटण्याच्या घटनांमुळे विद्यार्थी आणि पालकांचा संपूर्ण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होतो. वर्षानुवर्षे दिवस-रात्र मेहनत करणाऱ्या प्रामाणिक विद्यार्थ्यांना काही लोकांच्या गैरप्रकारांमुळे त्रास सहन करावा लागणे अत्यंत अन्यायकारक आहे. या घटनांमुळे संपूर्ण शैक्षणिक चौकटीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होते.

याच पार्श्वभूमीवर अनेक घटकांकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी केवळ बारावीच्या गुणांचा आधार घ्यावा, अशी मागणी केली जात आहे. सध्या विद्यार्थ्यांना एकाच प्रवेशासाठी वारंवार वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षा द्याव्या लागतात. यामुळे त्यांच्यावर मानसिक ताण, आर्थिक खर्च आणि अतिरिक्त स्पर्धात्मक भार वाढतो; मात्र सर्व राज्यांतील मूल्यमापन पद्धती आणि मंडळे समान नसल्यामुळे केवळ बारावीच्या गुणांवर प्रवेश देणेही



**शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण, परीक्षा व्यवस्थेवरील प्रश्नचिन्हे आणि गुणवत्तेच्या आव्हानांमुळे आज शिक्षण व्यवस्थेचा सर्वंकष पुनर्विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे.**

आव्हानात्मक ठरू शकते. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांना समान न्याय देणारी, पारदर्शक आणि अत्यंत विश्वासार्ह प्रवेश प्रक्रिया विकसित करणे आवश्यक आहे. शिक्षकांच्या भरती प्रक्रियेतही मोठे बदल करणे गरजेचे आहे. केवळ पात्रता परीक्षा ही शिक्षकांची मूळ गुणवत्ता तपासण्यासाठी पुरेशी असू शकत नाही. विषयाचे सखोल ज्ञान, शिकवण्याचे कौशल्य, विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याची कला आणि प्रत्यक्ष मुलाखत या सर्व बाबींचा विचार करून शिक्षकांची निवड केली पाहिजे. यामुळे शिक्षण व्यवस्थेत अधिक सक्षम आणि समर्पित शिक्षक येऊ शकतील. शिक्षणाच्या या संपूर्ण प्रवासात पालकांचा सहभागही अधिक संस्थात्मक आणि प्रभावी असायला हवा.

पालकांची भूमिका ही केवळ वेळेवर शाळांचे शुल्क भरण्यापुरती मर्यादित राहू नये. प्रत्येक शाळेत पालकांचे प्रतिनिधित्व करणारी एक सक्षम व्यवस्थापन समिती असणे अत्यंत गरजेचे आहे. एखादा शिक्षक सातत्याने अध्यापनात निष्काळजीपणा करत असेल किंवा आपल्या जबाबदाऱ्या पार पाडत नसेल, तर या समितीला तक्रार करण्याचा आणि चौकशीची मागणी करण्याचा अधिकार असावा. यामुळे शिक्षकांमध्ये उत्तरदायित्वाची भावना वाढेल आणि शिक्षणाचा दर्जा सुधारेल.

शिक्षणाशी संबंधित प्रश्नांवर आज राजकीय वाद आणि आरोप-प्रत्यारोप होताना दिसतात. शासनाने आपल्या चुकीच्या निर्णयांमध्ये सुधारणा करण्याची तयारी दर्शवली पाहिजे, तर विरोधकांनी केवळ टीका न करता विधायक आणि योग्य पर्याय सरकारसमोर ठेवले पाहिजेत. विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य कोणत्याही राजकीय संघर्षाचे साधन बनता कामा नये.

आज गरज आहे ती शासकीय शाळांचा दर्जा उंचावण्याची, खासगी शाळांच्या शुल्कावर नियंत्रण ठेवण्याची आणि विद्यार्थ्यांवरील अनावश्यक ताण कमी करण्याची. शिक्षण ही स्पर्धा नसून सर्वांना पुढे जाण्याची एक समान संधी असावी, तरच एक सक्षम राष्ट्र निर्माण होऊ शकेल.

**वीरेंद्र सोनवणे**

# 'हो आम्ही.... आहोत झुरळ'



व्हिज्युअल कल्पकतेला प्रचंड वैश्विक अपील , प्रचंड ताकद असते. अभिजीत दीपके यांनी सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या एका शब्दातून तिडीक येऊन 'हो आम्ही आहोत झुरळ' म्हणत मीम बनवून Cockroach Janata Party ची ऑनलाइन घोषणा केली आणि त्यांनी काही दशलक्ष तरुण तरुणींच्या हृदयाला स्पर्श केला. ते लाखो तरुण तरुणी आतून हलले. त्यांनी आपला प्रतिसाद अभिजित कोण, कुठला यावर अवलंबून ठेवावयास नकार दिला. It captured their imagination. मग लाखो अभिजीत तयार झाले. त्यांनी आपापल्या कल्पना शक्तीचे घोडे चौफेर उधळू दिले. जंतरमंतर आणि अनेक ठिकाणी या तरुणांच्या कल्पक घोषणा पोस्टर्स, मिम्स, गाणी, व्हिडिओ आणि ऑडिओ क्लिप्सष्ठआणि बरेच काही यांचा स्फोट झाला आहे.

And rest is history आजूबाजूच्या देशातून जेन झी केलेली उलथापालथ याच्या बातम्या, दृश्ये पेपर, मीडियातून वाचत, पाहत होतो. आपल्या देशात देखील जेन झी आहे याचा विसर पडला होता. जेन झी ने दहशत झुगारुन देताना स्वतःलाच नाही आम्हाला देखील मुक्त केले आहे.

**संजीव चांदोरकर**

रविवार, दि. २६ जुलै २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना दोन लाखांपर्यंत कर्जमाफीचा लाभ – मंत्री अशोक उईके

## ५६ लाख शेतकऱ्यांना ३६,५८५ कोटींची कर्जमाफी,४८ हजार कोटींची वीज थकबाकीही माफ

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २५ :** राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना तब्बल ३६ हजार ५८५ कोटींचा लाभ देणारी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना' ही राज्याच्या कृषी क्षेत्रासाठी ऐतिहासिक ठरणार असल्याचा दावा राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी केला.

यवतमाळ येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केलेल्या घोषणांची माहिती दिली. उईके म्हणाले की, यापूर्वीच्या महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील लाभाच्या अटींमध्ये बदल करण्यात आला असून, आता दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ अधिक व्यापक स्वरूपात मिळणार आहे. पूर्वी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांना लाभ मिळत नव्हता.मात्र नव्या योजनेत अशा शेतकऱ्यांनाही दोन लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा लाभ दिला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी २०२६-२७ मध्ये नवीन कर्ज घेऊन वेळेत परतफेड करण्याची अटही रद्द करण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यातील साडेसात अश्वशक्तीपर्यंतच्या कृषीपंपधारक कडून वीजबिल आकारले जाणार नसून, त्यांच्या वीज वापराची सुमारे ४८ हजार कोटींची जुनी थकबाकी ही माफ करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री यांनी केल्याचे उईके यांनी सांगितले. याशिवाय शेतकऱ्यांना विविध योजनांद्वारे सुमारे ९५ हजार कोटींचे आर्थिक सहाय्य दिले जात असून, शेती अधिक सक्षम व शाश्वत करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार संयुक्तपणे प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. कोणतीही निवडणूक समोर नसताना सरकारने कर्जमाफीचा निर्णय घेतला असून, शेतकऱ्यांच्या हिताच्या निर्णयांमध्ये राजकारण केले जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले. पत्रकार परिषदेत ॲड. प्रफुल चव्हाण, देवानंद पवार, राजू पडगिलवार, शंतनू शेटे आणि नितीन गिरी उपस्थित होते. यावेळी ॲड. प्रफुल चव्हाण यांनी राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याचे सांगितले. तसेच संत रविदास महाराज यांच्या ६५० व्या जयंतीनिमित्त सलग सहा महिने भारतीय जनता पक्षातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. यामध्ये संत रविदास महाराजांच्या जीवनावर आधारित प्रदर्शने, प्रश्नमंजुषा स्पर्धा तसेच विद्यार्थ्यांसाठी जनजागृतीपर कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. याशिवाय 'हर घर तिरंगा' अभियानही १५ ऑगस्टपासून राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

# आषाढी एकादशीला सेवाभावाचा अनोखा संगम..!

## भाविकांसाठी खिचडी वाटप,अभंगांनी दुमदुमली ज्ञानेश्वर संस्थान परिसर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पुसद, दि. २५ :** आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त भीमशक्ती, रिपाइं (आठवले गट), बिरसा मुंडा ब्रिगेड आणि राजू दुधे मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने श्री ज्ञानेश्वर संस्थान मंदिर परिसरात भाविकांसाठी साबुदाणा खिचडी वाटप व अभंग गायनाचा भक्तिमय कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विदर्भातील प्रति पंढरपूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या संस्थानात दर्शनासाठी येणाऱ्या हजारो वारकऱ्यांच्या उपवासाची सोय करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्री रेणुकाई दिव्यांग संघाच्या कलावंतांनी सादर केलेल्या अभंग गायनाने परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. त्यानंतर विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांना साबुदाणा खिचडीचे वाटप करण्यात आले. यावेळी पुसद नगरपरिषदेचे माजी पाणीपुरवठा सभापती राजू दुधे, रिपाइं (आठवले गट)चे अध्यक्ष लक्ष्मण कांबळे, बिरसा मुंडा ब्रिगेडचे प्रदेश संघटक पांडुरंग व्यवहारे, भीमशक्तीचे अध्यक्ष संतोष अंभोरे, नगरपरिषदेचे शिक्षण सभापती विठ्ठलराव खडसे, नारायण आप्पा वडस्कर, डॉ. शंकर दळवे, बाबुराव पाईकराव, अंबादास वानखेडे, प्रदीप पापीनवार, सुनील आहाळे, अनिल तोंडारे, नितेश खंदारे, गुरु उचाडे, नारायण गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.संपूर्ण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आयोजक संघटनांच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. सामाजिक बांधिलकी आणि धार्मिक श्रद्धेचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमास भाविक व नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# पेपरफुटी, शिक्षणाचे बाजारीकरण,रोजगार विरोधात विद्यार्थी हक्क संघर्ष मोर्चा..!

## सर्व विद्यार्थी संघटनांना एकत्र येण्याचे आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २५ :** देशभरातील स्पर्धा परीक्षांमधील वारंवार होणारी पेपरफुटी, शिक्षणाचे वाढते बाजारीकरण, रोजगाराचा गंभीर प्रश्न आणि विद्यार्थ्यांवरील कथित दडपशाहीच्या निषेधार्थ रविवार, २६ जुलै रोजी दुपारी ३ वाजता संविधान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय असा विद्यार्थी हक्क संघर्ष मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा एनएसयूआयचे जिल्हाध्यक्ष गौरव राठोड यांनी पत्रकार परिषदेत केली.

देशभरात गेल्या काही वर्षांत विविध स्पर्धा परीक्षांचे १५२ पेपर फुटल्याचा दावा करत लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ झाल्याचा आरोप करण्यात आला. तसेच, नीट पेपरफुटी नंतर मानसिक तणावामुळे २१ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचा उल्लेख करत या घटनांबाबत तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. पत्रकार परिषदेत आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीचार्ज व अश्रुधुराच्या वापराचा निषेध नोंदविण्यात आला. राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP-२०२०), शिक्षणाचे वाढते खाजगीकरण, वाढती शुल्करचना, शिष्यवृत्ती व आरक्षणावरील प्रश्न तसेच शिक्षण आणि रोजगाराच्या संधी कमी होत असल्याने विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याने प्रश्न सुटणार नसून शिक्षण व रोजगारासंदर्भातील व्यापक धोरणात्मक बदल आवश्यक असल्याची भूमिका आयोजकांनी मांडली. या मोर्चात सर्व विद्यार्थी संघटना, कोचिंग संस्था, सामाजिक संघटना तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते सहभागी होणार असल्याचे सांगण्यात आले. पत्रकार परिषदेला ॲड. सीमा तेलंग, पंकज कांबळे, फैजान शेख, आदित्य गणवीर, कुणाल तिरपुडे, बादल वासनिक, आकाश वाघ, मानसी थूल, प्रियंका बागडे, दर्शन ठाकरे, संमेक नगराळे, रोशन हिवराळे आणि रितेश गोवारकर यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांवर लाठी, सरकारवर स्वाक्षरीचा प्रहार

## जंतर-मंतर लाठी हल्ल्याच्या निषेधार्थ उमरखेड युवक काँग्रेसचे स्वाक्षरी आंदोलन..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**उमरखेड, दि. २५ :** दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित लाठीहल्ल्याच्या निषेधार्थ उमरखेड शहर युवक काँग्रेसच्या वतीने शुक्रवारी महात्मा गांधी पुतळ्यासमोर स्वाक्षरी अभियान राबविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांना पाठिंबा देत केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

अभियानादरम्यान केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विद्यार्थ्यांची जाहीर माफी मागावी तसेच आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांशी कथित अमानुष वागणूक देणाऱ्या संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या. युवक काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा आवाज दडपण्याऐवजी त्यांच्या मागण्यांवर सकारात्मक तोडगा काढणे ही सरकारची जबाबदारी असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी युवक काँग्रेस कायम त्यांच्या पाठीशी उभी राहील, असा निर्धारही व्यक्त करण्यात आला. या स्वाक्षरी अभियानात विद्यार्थी, युवक, नागरिक आणि कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत हजारो स्वाक्षऱ्यांद्वारे विद्यार्थ्यांवरील कथित कारवाईचा निषेध नोंदविला. अभियानात काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस गोपाल अग्रवाल, युवक काँग्रेसचे शहराध्यक्ष ईश्वर गोस्वामी, उपाध्यक्ष दर्शन भंडारी, अक्षय अभय गोस्वामी, देवा इंगोले, सिद्धेश्वर जगताप, प्रकाश वानखेडे, कैलास इंगोले, सूरज जाधव, शंकर टमके यांच्यासह युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात



### गुरुकुल कॉन्व्हेंट मुकूटबन येथे आषाढी वारी उत्साहात संपन्न

**झरी :** गुरुकुल कॉन्व्हेंट मुकूटबन येथे आषाढी एकादशीनिमित्य पारंपारीक आषाढी वारीचा कार्यक्रम मोठया उत्साहात आणी भक्तिमय वातावरणात संपन्न झाला . विद्यार्थ्यांनी टाळ -मृदुंगाच्या गजरात विठ्ठल रुक्मीनीच्या वेषभुशेत दिंडी काढत ज्ञानोबा -तुकाराम यांच्या जयघोषाने संपूर्ण परीसर भक्तीरसात न्हाऊन निघाला .

यावेळी छोटया चिमुकल्यांनी अभंग भजन आणि वारकरी परंपरेवरील कार्यक्रम सादर करून उपस्थिताची मने जिंकली . कार्यक्रमांतून विध्यार्थ्यांना संताची शिकवण भारताची संस्कृती'भक्ती शिस्त आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देण्यात आला .

याप्रसंगी मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृदांनी विद्यार्थ्यांना संतपरंपरेचे महत्व सांगुन जीवनात सदाचार सेवा समता आणि मानवतेचे मुल्ये जोपासण्याचे आवाहन केले . कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचारी गुरुकुल परीवाराचे योगदान लाभले .



### पांढरकवडा शहरात मोकाट गुरांचा वाढता उपद्रव..!

**वाहतुकीला अडथळा, अपघाताचा धोका वाढला**

**पांढरकवडा :** शहरात दिवसेंदिवस वाहतुकीची वर्दळ वाढत असताना मोकाट गुरांचा प्रश्न अधिकच गंभीर बनला आहे. शहरातील मुख्य रस्ते, चौक, बाजारपेठ तसेच प्रमुख मार्गांवर गुरे मोठ्या संख्येने ठाण मांडून बसत असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी गर्दीच्या वेळेत मुख्य चौकांमध्ये गुरांचा वावर अधिक असल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते. दुचाकीस्वार, रिक्षाचालक आणि चारचाकी वाहनचालकांना गुरांना चुकवत वाहन चालवावे लागत असल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. अनेकदा गुरांच्या अचानक रस्त्यावर येण्यामुळे किरकोळ अपघात घडल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. स्थानिक नागरिकांनी या समस्येबाबत अनेकदा तक्रारी केल्या असल्या तरी अद्याप ठोस उपाययोजना झालेली दिसून येत नाही. नगर परिषद प्रशासनाने मोकाट गुरांचा बंदोबस्त करून त्यांची योग्य व्यवस्था करावी, तसेच गुरांच्या मालकांवर आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.



### किन्नर समाजाचे ठाणेदार वैजनाथ मुंडे यांना निवेदन..! "आम्हाला सन्मानाने जगू द्या"

**दिग्रस :** दिग्रस शहरातील किन्नर समाजाने आज दिग्रस पोलीस स्टेशनचे ठाणेदार वैजनाथ मुंडे यांना निवेदन देऊन त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबत आवाज उठवला.

किन्नर समाजाच्या प्रतिनिधींनी निवेदनात म्हटले आहे की, त्यांना समाजात नेहमीच दुय्यम वागणूक दिली जाते. त्यांच्या हक्कांकडे दुर्लक्ष केले जाते. तसेच काही ठिकाणी त्यांना विनाकारण त्रास दिला जातो. आम्ही देखील या देशाचे नागरिक आहोत. आम्हाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. आमच्यावर होणारा अन्याय थांबवावा" अशी मागणी त्यांनी निवेदनात केली.

ठाणेदार वैजनाथ मुंडे यांनी निवेदन स्वीकारून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे.

किन्नर समाजाने यापुढेही त्यांच्या हक्कांसाठी लढा सुरूच ठेवणार असल्याचे सांगितले.

# बाभुळगाव बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात यंदा कापूस खरेदी होणार..!

## जिनिंग-प्रेसिंग सुरू, शेतकऱ्यांना मोठा दिलासा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**बाभुळगाव, दि. २५ :** बाभुळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात यंदा कापूस खरेदी सुरू होणार आहे. महाराष्ट्र राज्य कापूस एकाधिकार योजनेअंतर्गत जिनिंग-प्रेसिंग बंद असल्याने शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी बाहेर जावे लागत होते.ज्यामुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत होता.

बाभुळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कापूस हे मुख्य उत्पन्नाचे पीक आहे. मात्र गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्र राज्य कापूस एकाधिकार योजना बंद पडल्याने आणि महासंघाकडे जिनिंग-प्रेसिंग व सहकारी जिनिंग कापूस उपलब्ध न झाल्याने या कार्यक्षेत्रातील कापूस खरेदी बंद होती. त्यामुळे शेतकऱ्यांना कापूस विक्रीसाठी बाहेर जावे लागत होते.बाजार समितीच्या प्रयत्नांमुळे बाभुळगाव-धामणगाव रोडवर दोन जिनिंग-प्रेसिंगचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. आणखी एका जिनिंगचे कामही सुरू आहे. सभापती दिनेश गुल्हाने, उपसभापती डॉ. रमेश माहनूर , संचालक शेख अय्यूब व सचिव विलास गायकवाड यांनी सी.सी.आय. च्या अधिकाऱ्यांसोबत २१ जून २०२६ रोजी प्रत्यक्ष बैठक घेतली. या बैठकीत कार्यक्षेत्रातील शेतकऱ्यांना होणारा त्रास, कापसाची गुणवत्ता यासह सर्व बाबींवर सविस्तर चर्चा झाली. अधिकाऱ्यांनी जिनिंग-प्रेसिंगचे कामकाज लवकर पूर्ण करून कापूस खरेदी सुरू करण्याचे आश्वासन दिले आहे. शेतकऱ्यांना दिलासा संचालक मंडळाच्या या प्रयत्नांमुळे यंदा बाभुळगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना गावातच कापूस विक्रीची सुविधा मिळणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, वाहतूक खर्च वाचणार असून कापसाला योग्य भाव मिळण्याची अपेक्षा आहे. लवकरच बाभुळगाव बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात कापूस खरेदी सुरू होणार असल्याची माहिती सचिव विलास गायकवाड यांनी दिली.

# पर्यावरणाचा संदेश घेऊन पांढरकवड्यातील मित्रांची पंढरपूर वारीत अनोखी जनजागृती



✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा , दि. २५ :** यंदाच्या आषाढी पंढरपूर वारीत पांढरकवडा येथील सहा मित्रांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत अनोखी जनजागृती केली. संत तुकाराम महाराज व संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या पर्यावरण संरक्षणाच्या विचारांपासून प्रेरणा घेत त्यांनी आकर्षक जनजागृती फलकांसह वारीत सहभाग नोंदवून हजारो वारकऱ्यांना वृक्षसंवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि स्वच्छ पर्यावरणाचे महत्त्व पटवून दिले. "पर्यावरणाचे रक्षण, हीच आपल्या संतांची शिकवण!" तसेच संत तुकाराम महाराजांचा "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती" हा संदेश असलेले फलक हातात घेऊन त्यांनी वारकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. श्रद्धा आणि विज्ञान यांची सुंदर सांगड घालत पर्यावरण संरक्षण हीच आजच्या काळाची खरी गरज असल्याचा संदेश त्यांनी दिला. या उपक्रमात प्रा. डॉ. अमर वंजारी, जि. प. शिक्षक प्रकाश दवलकर, आकाश बोरकर, प्रदीप यरके, राजेंद्र घोडाम आणि वाटगुरेसर यांनी सक्रिय सहभाग घेतला.



# दिग्रसात रंगला चिमुकल्यांचा भक्तीसोहळा!

**दिग्रस, दि. २५ :** आषाढी एकादशीच्या निमित्ताने दिग्रस येथील श्रीराम स्कूलच्या वतीने विठ्ठल नामाच्या गजरात भव्य दिंडी सोहळा उत्साहात पार पडला. पारंपरिक वेशभूषा केलेल्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रुक्मिणी आणि संतांची रूपे साकारत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. टाळ-मृदंगाचा निनाद आणि विविध चौकांमध्ये घातलेल्या गोल रिंगणाने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. बालवयातच वारकरी परंपरा व सुसंस्कार रुजावेत, या उद्देशाने आयोजित ही दिंडी संत गजानन महाराज मंदिरात दर्शनाने संपन्न झाली. या सोहळ्यास शिक्षक, पालक आणि संत गजानन महाराज सेवा समितीचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# धोकादायक वळण रस्त्याने घेतला तरुणाचा बळी..!

## मोहदा–झोटिंगधरा मार्गावर भीषण धडकेत २४ वर्षीय युवक ठार,

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २५ :** पांढरकवडा केळापूर तालुक्यातील मोहदा–झोटिंगधरा मार्गावरील धोकादायक 'ब्लाइंड स्पॉट'ने शनिवारी (दि. २५ जुलै) आणखी एका निष्पाप तरुणाचा बळी घेतला. हेटी–झोटिंगधरा गावादरम्यान वळण रस्त्याने सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास दोन दुचाकींची समोरासमोर भीषण धडक होऊन २४ वर्षीय दीपक संतोष कनाके (रा. मेटीखेडा, ता. कळंब) यांचा जागीच मृत्यू झाला, तर पांढरकवडा येथील जिंकण सूर्यवंशी व करीम शेख हे दोघे गंभीर जखमी झाले.

अपघाताच्या तीव्रतेमुळे दोन्ही दुचाकींचा अक्षरशः चक्काचूर झाला. मिळालेल्या माहितीनुसार, दीपक कनाके हे काही कामानिमित्त मोहदा येथे आले होते. तेथून वरूड (ता. राळेगाव) येथे नातेवाईकांना भेटण्यासाठी दुचाकीने (क्र. MH २९ Z ८४३१) निघाले होते. त्याचवेळी जिंकण सूर्यवंशी व करीम शेख हे सराठी परिसरातून बकरी खरेदी करून दुचाकीने (क्र. MH २९ ७०२६) मोहदाच्या दिशेने येत होते. हेटी–झोटिंगधरा गावादरम्यान दोन्ही वाहने धोकादायक वळणावर समोरासमोर आली आणि क्षणार्धात भीषण धडक झाली. या अपघातात दीपक कनाके यांच्या डोक्याला व छातीला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर जिंकण सूर्यवंशी व करीम शेख हे दोघे गंभीर जखमी असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. स्थानिक नागरिकांच्या मते, अपघाताचे मुख्य कारण रस्त्यावरील धोकादायक रचना आहे. संबंधित ठिकाणी दोन्ही बाजूंनी उतार असून मध्यभागी उंच चढ असल्याने समोरून येणारे वाहन शेवटच्या क्षणापर्यंत दिसत नाही. त्यामुळे हा 'ब्लाइंड स्पॉट' कायमच अपघाताला निमंत्रण देत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याच ठिकाणी यापूर्वीही अनेक अपघात घडले असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाने कोणतीही ठोस उपाययोजना केली नसल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली. अपघाताची माहिती मिळताच मोहदा येथील पोलीस पाटील पियुष गबराणी यांनी घटनास्थळी धाव घेत स्थानिक नागरिक योगेश शाहू, मोरेश्वर गायकवाड व रोशन वाघरहांडे यांच्या मदतीने दोन्ही जखमींना तातडीने रुंझा येथील शासकीय आरोग्य केंद्रात उपचारासाठी रवाना केले. त्यांच्या तत्परतेमुळे जखमींना वेळेत वैद्यकीय मदत मिळाली. घटनेची माहिती मिळताच पांढरकवडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार लहुजी तावरे यांनी सहकाऱ्यांसह घटनास्थळी भेट दिली. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी पांढरकवडा उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला असून अपघाताची नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास ठाणेदार लहुजी तावरे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.दरम्यान, या भीषण अपघातानंतर ग्रामस्थांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे तीव्र नाराजी व्यक्त करत संबंधित ठिकाणी तातडीने रस्त्याचे रुंदीकरण, धोकादायक चढाची उंची कमी करणे, तसेच 'अपघातप्रवण क्षेत्र', 'हळू चाला' आणि 'वेग मर्यादा'चे इशारा फलक बसविण्याची मागणी केली आहे. "आणखी किती जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?" असा संतप्त सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

# एमएसएफडीएच्या युजी ४.० अभ्यासक्रमाच्या सक्तीवर शैक्षिक महासंघाचा आक्षेप

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०च्या प्रभावी अंमलबजावणीस अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ,महाराष्ट्र प्रदेश यांचा कायमच सक्रिय पाठिंबा राहिला असून शिक्षकांचे सातत्यपूर्ण प्रशिक्षण आणि व्यावसायिक क्षमतावृद्धी ही काळाची गरज असल्याची भूमिका महासंघाने पुन्हा अधोरेखित केली आहे. तथापि, संचालक उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांच्या अलीकडे जारी पत्रकानुसार राज्यभरातील सर्व सन्माननीय प्राचार्य,प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्था (एमएसएफडीए) यांच्या एलएमएसवरील युजी ४.० हा ऑनलाइन अभ्यासक्रम पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अभ्यासक्रम पूर्ण करण्याची सक्ती,१००० शुल्क आकारणी, केवळ इंग्रजी भाषेतील उपलब्धता आणि १०० टक्के नोंदणीच्या निर्देशांबाबत महासंघाने गंभीर आक्षेप नोंदवत मा. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सविस्तर निवेदन सादर केले आहे.

महासंघाने निवेदनात स्पष्ट केले आहे की, महाराष्ट्र राज्य अध्यापक विकास संस्थेची स्थापना शिक्षकांच्या व्यावसायिक गुणवत्ता विकास, प्रशिक्षण, संशोधन आणि शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी करण्यात आली आहे. मात्र, सध्याच्या युजी४.० अभ्यासक्रमाच्या अंमलबजावणीत प्रशिक्षणाच्या मूळ उद्देशापेक्षा अनिवार्य अनुपालनावर अधिक भर दिला जात असल्याचे दिसून येत असून, ही बाब संस्थेच्या स्थापनेमागील उद्दिष्टांशी सुसंगत वाटत नाही.निवेदनात पुढे नमूद करण्यात आले आहे की, उपलब्ध शासन निर्णयांचा अभ्यास करता सर्व शिक्षक, प्राचार्य आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी शुल्क भरून विशिष्ट ऑनलाइन अभ्यासक्रम अनिवार्यपणे पूर्ण करावा, अशी स्पष्ट तरतूद आढळत नाही. अशा परिस्थितीत प्रशासकीय पत्रांच्या माध्यमातून १०० टक्के नोंदणी आणि अभ्यासक्रम पूर्णत्वाची अनिवार्यता लागू करण्यात आल्याने त्याचा वैधानिक आधार स्पष्ट करण्याची आवश्यकता महासंघाने व्यक्त केली आहे.

महासंघाने १००० शुल्क आकारणीवरही आक्षेप घेतला असून, शासनाने आवश्यक मानलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर आर्थिक भार टाकणे योग्य नसल्याचे म्हटले आहे. प्रशिक्षण आवश्यक असल्यास ते शासनाच्या खर्चातून किंवा संबंधित संस्थेच्या निधीतून पूर्णपणे नि:शुल्क उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली आहे.याशिवाय, संपूर्ण अभ्यासक्रम केवळ इंग्रजी भाषेत उपलब्ध असल्याबाबत महासंघाने गंभीर चिंता व्यक्त केली आहे. महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने शिक्षक मराठी माध्यमातून अध्यापन करीत असून, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० मध्ये भारतीय भाषांना प्रोत्साहन देण्यात आले आहे. त्यामुळे UG४.० अभ्यासक्रम मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांमध्ये उपलब्ध करून देण्याची मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

## जंतर-मंतर विद्यार्थी आंदोलनावरील अत्याचाराचा निषेध

**कुऱ्हा/वार्ताहर**



देशाची राजधानी नवी दिल्लीच्या भूमीवर जंतर-मंतरचे आंदोलन व नीट परीक्षा घोटाळ्याचे विरोधात गेल्या अनेक दिवसापासून विद्यार्थी आंदोलन सुरू आहे.आंदोलन शांततापूर्ण मार्गानेच सुरू होते. सदर आंदोलनाला शक्ती देण्यासाठी जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते व वैज्ञानिक सोनम वांगचुक आमरण उपोषणाला बसले होते.दिल्ली पोलिसांची दंडेली अधिकच वाढली. आंदोलनावर अंधाधुंद लाठीचार्ज केला.त्याचाराच्या या भीषणतेच्या पातळीवर या जबाबदार असणाऱ्या केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा देण्याची मागणी केली होती. याची संतप्त प्रतिक्रिया कुऱ्हा गावात उमटल्या.

यावेळी आंदोलनातील शहीद विद्यार्थिनीला श्रद्धांजली वाहिली.जाहीर सभेत विद्यार्थी नेते अमरावती विद्यापीठ सिनेट सदस्य व ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशनचे अमरावती विभागीय समन्वयक प्रा. कैलास चव्हाण,ए आय एस एफ चे माजी राज्य सचिव अशोक सोनारकर, महाराष्ट्र राज्य किसान सभेचे कॉम्रेड दिलीपसिंह नहाटे ,उपसरपंच सालीमखा पठाण यांनी मार्गदर्शन केले.संचालन कॉ. देवेंद्र बावणे यांनी केले.आंदोलनामध्ये प्रा.ओम पाखरे, सिद्धेश तिंतुरकर, सुनील मोरे,आकाश भामुद्रे ,भूषण काळबांडे, भूषण राऊत, नमो राऊत, मंगेश तेलमोरे, बाबाराव राऊत दादारावजी इंगळे, अब्दुल जमीर, शेख दाऊद, ऋषिकेश खानंदे रवींद्र नारळे,वामनराव बावणे, राजाभाऊ बाभुळकर,संतोष भैसे, अब्दुल रशीद भाई, हुकुमचंद सुरसे,प्रशांत निस्ताने ,नितीन काळकर यांचे सह शेकडो नागरिकांचा सहभाग होता.

## आधुनिक शेतीसाठी शेतकरी आणि कृषी विक्रेत्यांनी एकत्र येण्याची गरज- पंकज बोंडे

**लेहेगाव/वार्ताहर**

आजच्या काळात शेती करणे पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे. बदलते हवामान,अनियमित पाऊस, वाढते तापमान, नवीन रोग व किडींचा प्रादुर्भाव, मजुरांची कमतरता, उत्पादन खर्चात वाढ आणि बाजारभावातील अनिश्चितता यामुळे प्रत्येक शेतकरी चिंतेत आहे. अशा परिस्थितीत एकट्याने शेतीतील प्रत्येक समस्येवर मात करणे कठीण होत चालले आहे असे शेतकरी चर्चासत्रात न्यू राम अॅग्रोटेक, लेहेगाव येथे पंकज सु. बोंडे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावर एकच प्रभावी उपाय आहे की शेतकऱ्यांनी एकत्र येणे, चर्चा करणे आणि अनुभवांची देवाणघेवाण करणे.

एका शेतकऱ्याने केलेला यशस्वी प्रयोग दुसऱ्या शेतकऱ्यासाठी मार्गदर्शक ठरू शकतो. एखाद्या शेतात आलेल्या रोगावर योग्य उपाय दुसऱ्या शेतकऱ्याचे नुकसान वाचवू शकतो. त्यामुळे प्रत्येक गावात, प्रत्येक कृषी केंद्रावर आणि प्रत्येक तालुक्यात नियमित शेती चर्चा होणे ही काळाची गरज आहे. आज आधुनिक शेतीसाठी आधुनिक फवारणी यंत्रे, पेरणी यंत्रे, हार्वेस्टर, माती परीक्षण, हवामानाचा अंदाज, मोबाईल अॅप आणि विविध आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे. मात्र प्रत्येक शेतकऱ्याची आर्थिक परिस्थिती अशी नसते की तो ही सर्व साधने स्वतः खरेदी करू शकेल. अशावेळी गावातील शेतकरी एकत्र येऊन सामूहिक पद्धतीने यंत्रसामग्रीचा वापर केल्यास खर्च कमी होईल आणि उत्पादनक्षमता वाढेल.अलीकडे आपण पाहिले की सोयाबीन बियाण्याच्या प्रश्नावर अनेक गावांतील शेतकरी एकत्र आले. त्यांच्या एकजुटीमुळे शासनालाही या प्रश्नाची गंभीर दखल घ्यावी लागली. यावरून स्पष्ट होते की एकजूट आणि संघटित चर्चा यामध्ये मोठी ताकद असते.

या चर्चांमध्ये नवीन बियाण्यांची माहिती,रोग व किड नियंत्रण,माती परीक्षण व खत व्यवस्थापन हवामानानुसार पीक नियोजन,पाणी बचत तंत्रज्ञान, आधुनिक शेती, यंत्रसामग्री, शासनाच्या योजना व अनुदान बाजारभाव व विक्री नियोजन,नैसर्गिक व शाश्वत शेती, यशस्वी शेतकऱ्यांचे अनुभव यासोबत शेतात प्रत्यक्ष प्रात्यक्षिके, पीक पाहणी, प्रयोग आणि अनुभवांची देवाणघेवाण झाली तर प्रत्येक शेतकरी अधिक आत्मविश्वासाने निर्णय घेऊ शकेल.

## अंजनगाव बारीसह चार गावातील भूधारकांची माहिती सादर करण्याचे आदेश

**अंजनगाव बारी/वार्ताहर**

वर्धा–बडनेरा रेल्वे तिसरा व चौथा मार्ग प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून, अंजनगाव बारी, म्हसला, पार्डी व उदखेड येथील बाधित भूधारकांची माहिती तातडीने संकलित करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी, अमरावती यांनी संबंधित तलाठ्यांना दिले आहेत.

२२ जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या पत्रानुसार, रेल्वेच्या संयुक्त मोजणी अहवाल प्रक्रियेसाठी संबंधित जमीनधारकांच्या आधारकार्डाच्या प्रती, मोबाईल क्रमांक आणि सध्याचा संपूर्ण पोस्टल पत्ता तातडीने उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.रेल्वे सुधारणा अधिनियम १९८९ व २००८ मधील तरतुदींनुसार वर्धा–बडनेरा तिसरा व चौथा मार्ग प्रकल्पासाठी अंजनगाव बारी, म्हसला, पार्डी (देवी) आणि उदखेड येथील खासगी जमिनींचे भूसंपादन प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाले आहेत. या अनुषंगाने उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाकडे मोजणीसाठी प्रस्ताव पाठविण्यात आले असून, पुढील कार्यवाहीसाठी संयुक्त मोजणी आवश्यक आहे.

प्रशासनाने संबंधित गावांतील तसेच गावाबाहेर वास्तव्यास असलेल्या सर्व बाधित भूधारकांची अद्ययावत माहिती तातडीने तलाठी कार्यालयामार्फत भूसंपादन कार्यालयाकडे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर संयुक्त मोजणीची प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करून भूसंपादनाची पुढील कार्यवाही सुरू होणार आहे.दरम्यान, या रेल्वे प्रकल्पामुळे परिसरातील रेल्वे वाहतूक अधिक सक्षम व गतिमान होण्यास मदत होणार असून, प्रकल्पासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया आता अंतिम टप्प्याकडे वाटचाल करत असल्याचे दिसून येत आहे.

## 'विशेष सखोल पुनरीक्षण' मोहिमेत'बीएलओ' करणार घरोघरी जाऊन पाहणी

**अमरावती**-निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार 'विशेष सखोल पुनरीक्षण २०२६' ही विशेष मोहीम राबवली जात आहे. सुधारित वेळापत्रकानुसार, ३० जून ते ८ ऑगस्ट २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी प्रत्यक्ष मतदारांच्या घरी जाऊन गणना प्रपत्र भरून घेतील. यानंतर ८ ऑगस्टपर्यंत मतदान केंद्रांची पुनर्रचना आणि सुसूत्रीकरणाचे काम पूर्ण केले जाईल. या प्रक्रियेनंतर १७ ऑगस्ट रोजी मतदार याद्यांची प्रारूप प्रसिद्ध केले जाईल. १७ ऑगस्ट ते १६ सप्टेंबर दरम्यान नागरिकांना मतदार यादीबाबत आपले दावे व हरकती दाखल करता येतील, तर १५ ऑक्टोबरपर्यंत या सर्व हरकतींचा निपटारा केला जाईल. अखेर १९ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी अधिकृतपणे प्रसिद्ध केली जाणार आहे.

## नगराध्यक्षांच्या हस्ते घरकुल लाभार्थ्यांना पहिल्या टप्प्यातील अनुदान वाटप

**चांदूररेल्वे/वार्ताहर**

चांदूररेल्वे नगरपरिषद अंतर्गत शहरातील ३३ लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना २.० अंतर्गत १ लाखांचे घरकुल अनुदान नगराध्यक्षा डॉ. प्रियंका विश्वकर्मा यांच्या हस्ते व नगरसेवक नगरसेविकाच्या उपस्थित वाटप करण्यात आले.

चांदूररेल्वे नगरपरिषद अंतर्गत प्रधानमंत्री आवाज योजनेतील ३३ घरकुल लाभार्थ्यांना महाराष्ट्र राज्य शासनाकडून ४००००/- हजार रुपये तर केंद्र सरकारचे



६००००/- हजार रूपयांचे पहिल्या टप्प्यातील एकूण १ लाख रूपये अनुदानाचे पत्र देण्यात आले असून प्रत्यक्ष अनुदान ऑनलाईन प्रणाली मार्फत लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.ज्या लाभार्थ्यांचे नाव घरकुल योजनेच्या त्रुटींमुळे राहीले त्या लवकरात लवकर पूर्ण करून शहरातील इतर लोकांनाही घरकुल योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करणार असल्याचे डॉ. प्रियंका विश्वकर्मा यांनी सांगितले. यावेळी नगरपरिषद नगरसेवक काँग्रेस गटनेते अनिस सौदागर, हर्षल वाघ, अरिहंत गेडाम,निलोफर शेख, कल्पना लांजेवार,पूनम कोकाटे व नगरपरिषद कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पहिल्या शंभर रक्तदात्यांना मिळणार हेल्मेट भेट

### यश खोडके यांचे रक्तदानासाठी प्रोत्साहन

**अमरावती/का.प्र.**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ जुलै ते २७ जुलै दरम्यान विविध जनहितकारी कार्यक्रमांचे आयोजन सुरू आहे. या अंतर्गत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, यश खोडके मित्रपरिवार आणि कर्णसिंह रहाणे मित्रपरिवार यांच्या वतीने जवाहर गेट प्रभाग क्रमांक १४ मधील अंबाजोगाई परिसरस्थित मृगजिन मठात सत्तावीस जुलै रोजी सकाळी ८ वाजता ते दुपारी ४ वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात रक्तदात्यांना प्रोत्साहन देण्यासाठी सर्वप्रथम येणाऱ्या



शंभर रक्तदात्यांना बक्षीस म्हणून हेल्मेट भेट स्वरूपात दिले जाणार आहे.

या रक्तदान शिबिरात आ. सुलभा खोडके आणि संजय खोडके, मनपाचे स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, शोध प्रतिष्ठानचे अध्यक्ष यश खोडके तसेच राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष प्रशांत डवरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. नागरिकांनी या लोकोपयोगी शिबिरात जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन आपले योगदान द्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. शहरात विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेतली जात असून या रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभेल असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

## पावसाळ्यात विजेच्या धोक्यापासून सावध राहा

### उपकार्यकारी अभियंता तुषार गांजरे यांचे वीज ग्राहकांना आवाहन

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

पावसाळ्यात पाणी आणि ओलाव्यामुळे विजेचे अपघात होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. या पार्श्वभूमीवर वीज ग्राहकांनी अत्यंत सतर्कता बाळगणे आवश्यक असून सुरक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन अंजनगाव सुर्जी वीज वितरण कंपनीचे उपकार्यकारी अभियंता तुषार गाजरे यांनी केले आहे.

पावसाळ्याच्या दिवसात किरकोळ निष्काळजीपणामुळे देखील मोठा अनर्थ घडू शकतो.



त्यामुळे महावितरणकडून ग्राहकांसाठी महत्त्वाच्या सुरक्षा सूचना देण्यात आल्या आहे.ओल्या हाताने स्विच,प्लग, किंवा इतर कोणत्याही विजेच्या उपकरणाला अजिबात हात लावू नये.घरातील भिंत किंवा स्विचबोर्ड ओला झालेला असल्यास त्यापासून दूर राहावे. मीटरजवळ किंवा मेन स्विचजवळ पाणी झिरपत असल्यास तात्काळ मेन स्विच बंद करावा आणि विद्युत कर्मचाऱ्यांना कळवावे.घरातील फ्यूज वारंवार उडत असल्यास तांब्याची तार लावून जुगाड करू नये. सुरक्षेसाठी ISI मार्क असलेला MCB किंवा योग्य क्षमतेच्या अॅल्युमिनियम अलॉय फ्यूज तारेचाच वापर करावा.घरातील वायरींगचे अर्थिंग योग्य आहे की नाही याची खात्री करून घ्यावी. गीझर,वॉशिंग मशिन,फ्रिज, कुलर यांसारख्या उपकरणांना अर्थिंग असणे अत्यावश्यक आहे.विजेचे खांब,मेटलचे शेड,ट्रान्सफॉर्मर, किंवा स्टे वायरला जनावरे बांधू नयेत. तसेच या खांबांवर किंवा तारांवर कपडे वाळत घालू नयेत. शेतकऱ्यांनी सुद्धा काळजी घेणे गरजेचे असल्याचे तुषार गांजरे यांनी म्हटले आहे. शेतातील सबमर्सिबल पंप,मोटारचा स्टार्टर कोरड्या व सुरक्षित ठिकाणी ठेवावा. शेतात पाणी साचलेले असताना किंवा पाण्यात उभे राहून मोटार चालू-बंद करू नये. पायात रबरी चप्पल किंवा बूट वापरणे अधिक सुरक्षित राहील.वादळी वारे किंवा झाडांच्या फांद्या पडल्यामुळे वीजतार तुटून जमिनीवर पडलेली दिसल्यास तिला चुकूनही हात लावू नका. त्या ठिकाणापासून लांब राहा आणि इतरांनाही दूर ठेवा.अशी कोणतीही धोकादायक परिस्थिती निदर्शनास आल्यास नागरिकांनी स्वतः दुरुस्तीचा प्रयत्न न करता तात्काळ महावितरणच्या कर्मचाऱ्यांन सोबत संपर्क साधावा, असे आवाहनही उपकार्यकारी अभियंता तुषार गांजरे यांनी केले आहे.

## संक्षिप्त

### अरूणोदय इंग्लिश स्कूल येथे आषाढी एकादशी



**अमरावती -** व्ही.एम.व्ही. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू. कॉलेज ऑफ सायन्स, हर्षराज कॉलनी,अमरावती येथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने अरूणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. वसंत लुंगे पाटील यांच्या शुभहस्ते विठ्ठल रूखमाईची महापूजा करण्यात आली. विठ्ठल रूखमाईची पालखी काढण्यात आली व पावलांचे रिंगण घालण्यात आले. सर्व विद्यार्थी वारकऱ्यांच्या रुपाने दिंडीत सहभागी झाले.कार्यक्रमाला अरुणोदय शिक्षण संस्थेच्या सचिव डॉ. भारती लुंगे पाटील, अरूणोदय ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ, प्री-प्रायमरी इनचार्ज जोत्स्ना इंगोले शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

### भाविकांना फराळी उसळ वाटप



**अमरावती**-सर्वज्ञ फाऊंडेशन तथा रोटी बँकेच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर भाविकांना फराळी उसळीचे वाटप करण्यात आले. फाऊंडेशनचे अध्यक्ष मनीष पावडे व वैशाली पावडे यांच्या पुढाकाराने गोरगरीब, निराधार व गरजू नागरिकांना अन्नदानाचा उपक्रम सातत्याने राबविला जात आहे. यावेळी ज्येष्ठ समाजसेवक पुरुषोत्तमजी मुंदडा, अभिनंदन पेंढारी, दिपक हुंडीकर, महेंद्र देशमुख, मनीष पवार व मनीष पावडे यांच्या हस्ते विठ्ठल-रुक्माईच्या प्रतिमेचे तसेच तुळशी मातेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर सामूहिक आरती करून प्रसाद वितरित करण्यात आला व उसळ वाटपाच्या कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला.सेवाकार्यात गोविंद कासट मित्र मंडळ, अभिनंदन पेंढारी मित्र मंडळ परिवार, गांधी चौक मित्रपरिवार, यादव, अरुण बनारसे,गोवर्धन गावंडे,महेंद्र देशमुख भोरे, बनारसी, बाळासाहेब, गिरगावकर, राजेंद्र खंडारे, प्रदीप गोरे, सागर गोरे, निशिकांत राऊत,सुरेश भागवतकर, अक्षय कडू,मोहन कोहळे,सर्वज्ञ पावडे,यश कडू, निशिकेत रोंघे,गोपाल हिवराळे, साक्षात पावडे आदींनी मोलाचे सहकार्य केले. या उपक्रमाचा लाभ शेकडो भाविकांनी घेतला.

### लोकमान्य टिळक जयंती साजरी



**अमरावती**-श्री विद्यानिकेतन शिक्षण संस्था, रामनगर, अमरावती द्वारा संचालित विद्यानिकेतन प्राथमिक शाळा, रामनगर येथे भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे प्रणेते व लोकजागृतीचे महानायक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली.इयत्ता ५ वी ते ७ वीच्या विद्यार्थ्यांनी प्रभावी भाषणांद्वारे लोकमान्य टिळक यांच्या कार्याचा व विचारांचा परिचय करून दिला.मुख्याध्यापिका ज्योती जांभळे यांनी टिळकांच्या बालपणीच्या प्रेरणादायी घटना सांगत विद्यार्थ्यांना अन्यायाविरुद्ध खंबीरपणे उभे राहण्याचा संदेश दिला. शाळेतील ज्येष्ठ शिक्षिका आ. देशपांडे यांनी टिळकांच्या 'गीतारहस्य' या ग्रंथाचे तसेच 'केसरी' वृत्तपत्राच्या माध्यमातून झालेल्या जनजागृतीचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. शिक्षिका योगिनी घोटकर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत लोकमान्य टिळकांच्या निर्भीड विचारांची आणि त्यांच्या सिंहगर्जनेची प्रेरणा विद्यार्थ्यांसमोर मांडली.कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. विश्वप्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.इयत्ता ७ वीच्या विद्यार्थिनींनी अत्यंत उत्कृष्टरीत्या केली. संचालन इयत्ता ७ वीच्या वैष्णवी इंगोले व अनुष्का गुंजकर यांनी आत्मविश्वासाने व प्रभावीपणे केले.शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या उत्स्फूर्त सहकार्यामुळे लोकमान्य टिळक जयंतीचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

### एआयसीटीई अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम कार्यशाळा २७ पासून

**अमरावती**-कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडवत असताना, शिक्षकांनीही काळानुरूप अद्ययावत राहणे ही काळाची गरज बनली आहे. याच उद्देशाने श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनच्या एमसीए विभागाच्या वतीने २७ जुलै ते १ ऑगस्ट २०२६ या कालावधीत एआयसीटीई अटल फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम अंतर्गत 'नेक्स्ट जनरेशन एआय/ट्रेंड्स टूल्स अँड अँप्लिकेशन्स' या विषयावरील सहा दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन एमसीए विभागाच्या सेमिनार सभागृहात करण्यात आले आहे.कार्यशाळेचा उद्घाटन सोहळा सोमवार, २७ जुलै रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आला असून, डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली मंडळाच्या सचिव डॉ. माधुरी चेंडके तसेच श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. दाळू प्रमुख उपस्थित राहणार आहेत.सहा दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेमध्ये एआयचे बदलते तंत्रज्ञान समजून घेण्याची संधी प्राध्यापकांना मिळणार आहे. आजच्या उच्च शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग, जनरेटिव्ह एआय, डेटा अॅनालिटिक्स आणि स्मार्ट डिजिटल टूल्सचा वापर झपाट्याने वाढत आहे. अशा परिस्थितीत 'नेक्स्ट जनरेशन एआय/ट्रेंड्स टूल्स अँड अँप्लिकेशन्स' हा विषय प्राध्यापकांसाठी अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या प्रशिक्षणातून अध्यापन अधिक प्रभावी, संशोधन अधिक गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थीकेंद्रित शिक्षण अधिक परिणामकारक कसे करता येईल, याचे प्रत्यक्ष मार्गदर्शन मिळणार आहे.

# ओसाड महाविद्यालये; बकाल उच्च शिक्षण व्यवस्था

**महाराष्ट्रातील पारंपरिक वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये ३० ते ४० टक्के प्रवेश घटले असून कला आणि वाणिज्य शाखांच्या तुकड्या बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. मुक्त विद्यापीठांची वाढती पसंती, महागडे खासगी शिक्षण, बेरोजगारीची भीती आणि अद्ययावत अभ्यासक्रमांचा अभाव यामुळे उच्च शिक्षण व्यवस्था ओस पडत चालली आहे..**



परदेशी विद्यापीठे शिक्षणावरील खर्चाकडे गुंतवणूक म्हणून पाहत आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सेक्युरिटी, क्वांटम कॉम्प्युटिंग, मशीन लर्निंग यांसारखे अद्ययावत शिक्षण देण्यासाठी धडपडतात; परंतु आम्ही मात्र इंडियन नॉलेज सिस्टीमच्या नावाखाली दोन हजार वर्षे मागे जाण्याचे उद्दिष्ट घेऊन २१व्या शतकात वाटचाल करीत आहोत.

एके काळी जुनी प्राध्यापक मंडळी, 'आम्ही एकेक विद्यार्थी गोळा करून मोठ्या कष्टाने महाविद्यालय उभे केले', हे नवीन प्राध्यापकांना ऐकवीत तेव्हा ते मान्य करणे कठीण जाई; परंतु आज उभे राहिलेले विद्यार्थी प्रवेश संकट पाहता त्यातील सत्यता पटू लागली आहे. आता एकेका प्रवेशासाठी प्रयत्न करावा लागत आहे. प्रतिवर्षी त्याची तीव्रता वाढत चालली आहे. ज्या महाविद्यालयांना दोन किंवा तीन अनुदानित तुकड्यांची मान्यता आहे, तेथे मोठ्या मुश्किलीने एक तुकडीदेखील पूर्ण होऊ शकत नाही. असे का झाले? महाविद्यालये ओस का पडायला लागली?

ऑल इंडिया सर्वे ऑन हायर एज्युकेशनच्या २०२१-२२ च्या अहवालानुसार देशात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण केवळ ४.३३ कोटी असून त्यात २.७ कोटी महिला आहेत. हाच अहवाल असे सांगतो की, उच्च शिक्षणात अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांचे प्रमाण ६८.३३ लाख तर अनुसूचित जमातींचे २७.१ लाख असून या जातीतील महिलांचे उच्च शिक्षणातील प्रमाण पुरुषांच्या तुलनेत अर्ध्यापेक्षा कमी आहे. ओबीसी आणि अल्पसंख्याकांचीही तीच अवस्था आहे.

१.६३ कोटी ओबीसी पुरुष तर ३०.१ लाख अल्पसंख्याक पुरुष विद्यार्थी उच्च शिक्षण घेत आहेत, तर महिलांचे उच्च शिक्षणातील प्रमाण ओबीसीमध्ये ७३.१९ लाख तर अल्पसंख्याकांमध्ये १५.२ लाख आढळले आहे. याचाच अर्थ असा की, भारतातील जातिव्यवस्था, आर्थिक वर्ग आणि लिंगभाव यांसारख्या घटकांवर आधारित सामाजिक स्तरीकरण महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेवर मोठा विपरीत प्रभाव पाडते. त्यामुळे एकीकडे उच्च-निम्न जातीतील दरी तर दुसरीकडे स्त्री-पुरुष आणि ग्रामीण-शहरी दरी निर्माण होऊन उच्च शिक्षणात प्रवेश मिळविण्याच्या समान संधीमध्ये विषमता निर्माण झाली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या वंचित जमातीच्या विद्यार्थ्यांना आजही सामाजिक पूर्वग्रह आणि भेदभावांचा सामना करावा लागतो.

आयआयटी, आयआयएम यासारख्या उच्चभ्रूंची मक्तेदारी असलेल्या संस्थांमध्ये मागासवर्गीय पीडित विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याच्याही नोंदी आहेत. प्रवेश प्रक्रियेवर त्याचा विपरीत प्रभाव पडून मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा प्रवेश टक्का घसरतो आहे, ही वस्तुस्थिती आहे.

अलीकडे म्हणे महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेशाचा पॅटर्न पाहता विशिष्ट महाविद्यालयांवर विशिष्ट जातींचा शिक्का पडलेला आहे, त्यामुळे अन्य जातींतील मुले तेथे प्रवेश घेण्याचे टाळतात, त्यातून एका जातीची मक्तेदारी निर्माण होऊन सर्वसमावेशक प्रवेश होत नाही. सन्माननीय संस्थाचालकच जाहीरपणे याची वाच्यता करताना दिसतात. तथापि ही गोष्ट खरी आहे की, ज्या संस्था सेवा, त्याग, संविधानमूल्य, राष्ट्रबांधणी या उद्देशाने काम करतात, अशा महाविद्यालयात मागासवर्गीय विद्यार्थ्यांचा टक्का बऱ्यापैकी असतो. तिथे त्यांना एक प्रकारचा आपलेपणा वाटतो. पण म्हणून त्या शिक्का बसलेल्या संस्था कशा? उलट वस्तुस्थिती अशी आहे की, आज कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा जातनिहाय सर्व्हे केला तर आपणास सर्वाधिक मागास वर्गातील विद्यार्थी तिथे आढळून येतील. उच्चवर्णीय व आर्थिकदृष्ट्या सधन वर्गातील विद्यार्थ्यांनी कला शाखेत प्रवेश घेणे केव्हाच सोडून दिले आहे. मागासवर्गीय विद्यार्थ्यांमुळेच या संस्था तरत आहेत.

वरिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या घटत्या संख्येला मुक्त विद्यापीठे आणि दूरस्थ शिक्षण संस्था जबाबदार आहेत. पारंपरिक महाविद्यालयाच्या तुलनेत कमी फी, ७५ टक्के उपस्थितीची अट नसणे, निवास व प्रवास खर्चातील बचत, तुलनेने सोपा अभ्यासक्रम व हमखास पास होण्याची खात्री, नियमित पदवीच्या समकक्ष पदवी, नोकरी किंवा स्पर्धा परीक्षेची तयारी करीत असताना पदवी मिळविण्याची सोय यामुळे मोठ्या संख्येने विद्यार्थी पारंपरिक महाविद्यालयात प्रवेश घेण्याऐवजी मुक्त विद्यापीठे आणि दूरस्थ शिक्षणाला पसंती देत आहेत.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० अंतर्गत दूरस्थ शिक्षणाला कायदेशीर मान्यता देण्यात आली असून अधिकाधिक डिजिटल शिक्षण आणि लवचीकतेला महत्त्व देण्यात आले आहे. याचा विपरीत प्रभाव पारंपरिक महाविद्यालयाच्या प्रवेश प्रक्रियेवर होताना दिसून येत आहे. एक तर कला आणि वाणिज्य शाखांच्या तुकड्यांना विद्यार्थी न मिळाल्याने त्या बंद कराव्या लागत आहेत. दुसरे, विद्यार्थ्यांच्या घटत्या संख्येमुळे शासनाकडून मिळणारे अनुदान कमी झाल्याने महाविद्यालयांचे अंदाजपत्रक कोलमडले आहे. पटसंख्या कमी झाल्यामुळे प्राध्यापक अतिरिक्त ठरत आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या अधिकृत आकडेवारीनुसार महाराष्ट्रात दरवर्षी सरासरी अडीच लाख नवीन विद्यार्थी दूरस्थ अभ्यासक्रमासाठी नोंदणी करत आहेत.

०८ प्रादेशिक केंद्रे, १७०० पेक्षा जास्त शैक्षणिक साहाय्यता केंद्रे असे विद्यापीठाचे विस्तृत जाळे असून ते पारंपरिक महाविद्यालयांना मोठी स्पर्धा देत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील पारंपरिक महाविद्यालयांमधील प्रवेश संख्येत सुमारे ३० ते ४० टक्के अशी मोठी घसरण झाली आहे, असे अलीकडील अभ्यास सांगत आहेत. मुळात दूरस्थ शिक्षण धोरणाचा मुख्य उद्देश औपचारिक शिक्षण पद्धतीपासून वंचित राहिलेल्या घटकांना, नोकरदारांना आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना लवचीक व कमी खर्चात उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे हा होता; परंतु आज सर्रास सर्वच स्तरांतील विद्यार्थी सोय म्हणून दूरस्थ शिक्षणाला पसंती देतात. त्याची किंमत पारंपरिक महाविद्यालये मोजत आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

वरिष्ठ महाविद्यालयातील घटत्या विद्यार्थी संख्येला महागडे शिक्षण आणि उच्च शिक्षण व्यवस्थेचे खासगीकरणही जबाबदार आहे. नव्या सहस्रकात उद्योगपती मुकेश अंबानी आणि कुमार मंगलम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने गठित केलेल्या समितीने उच्च शिक्षण क्षेत्रात खासगी क्षेत्राला मुक्त वाव देण्यात यावा असा पवित्र घेतला. मग परिभाषा बदलली आणि ज्ञानार्थी लाभार्थी किंवा उपभोक्ते झाले तर ज्ञानदाते पुरवठादार बनले. उच्च शिक्षण व्यवस्थेत क्रोनी कॅपिटालिझमची ही सुरुवात होती.

राष्ट्रीय शिक्षण धोरण- २०२० ने तर यावर कळसच चढविला. त्यामुळे राजकारणी, उद्योजक, बडे नोकरशहा यांनी खासगी महाविद्यालये स्थापून प्रचंड माया कमविली. या व्यवस्थेत गरीब, होतकरू, गुणवान विद्यार्थी आपल्या कष्टाच्या बळावर जसे डॉक्टर, इंजिनीअर होऊ शकतात तसे मातब्बर श्रीमंत पालकांची सुमार बुद्धिमत्तेची मुलेही. त्यामुळे एकीकडे गुणवत्तेचे मातेरे झाले तर दुसरीकडे एकसमान शिक्षण घेण्याच्या हक्काला मर्यादा पडली. हा एक प्रकारे गरीब, आदिवासी, दलित, आर्थिकदृष्ट्या कमकुवत वर्ग जातींच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणातील समान संधीपासून वंचित ठेवण्याचा डाव आहे, असे म्हणणे भाग आहे.

शिक्षणसम्राटांनी शिक्षण महाग केले. मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ते परवडेनासे झाले. त्यामुळे या थरातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उच्च शिक्षणाच्या संधीपासून दूर लोटले जात आहेत. सार्वजनिक शिक्षणाच्या संदर्भात आपला प्रवास अनुदान धोरणापासून विनाअनुदान धोरणाकडे आणि आता नव्या सहस्रकात कायम विनाअनुदान धोरणाकडून स्वयम् अर्थसाहाय्यता धोरणाकडे सुरू असून सरकार उच्च शिक्षणातून अंग काढून घेत आहे. हा एक प्रकारे घटनात्मक जबाबदारीपासून पळ काढण्याचा हा प्रकार आहे. त्यामुळे उच्च शिक्षणाचे मातेरे होत आहे. परिणामी एकीकडे महागड्या खासगी शिक्षण संस्था, अभिमत विद्यापीठाची संख्या वाढली तर दुसरीकडे शासकीय अनुदानित महाविद्यालयांची कमी झाली.

महाविद्यालये ओसाड पडण्याला रोजगाराच्या संधींचा अभावदेखील कारणीभूत आहे. उच्च शिक्षण महाग झाल्यामुळे मर्यादित उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांना ते परवडत नाही, तर दुसरीकडे कर्जाची जोखीम पत्करूनही पदवी मिळवल्यानंतर नोकरीची खात्री नसल्यामुळे शिकून तरी काय करायचे, अशी वृत्ती बळावत आहे.

प्रिऑडिक लेबर फोर्स सर्व्हेच्या ताज्या आकडेवारीनुसार देशात बेरोजगारीचा दर ५.५३ आहे. भारतातील एकूण बेरोजगारांच्या संख्येत १५ ते २९ वर्षे वयोगटातील तरुणांचे प्रमाण लक्षणीय आहे. पदवीधर आणि उच्चशिक्षित तरुणांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण सर्वाधिक आहे. असे असेल तर तरुण पिढीचा पारंपरिक उच्च शिक्षणावरील विश्वास उडत जाणे स्वाभाविक आहे. परंतु यामुळे राजकारण्यांचे फावले आहे. भाऊ, दादा, ताई यांच्या मागेपुढे करण्यासाठी मोठ्या प्रमाणात युवक/युवती उपलब्ध आहेत. स्वस्त डेटामुळे अंबानीचे खिसे भरत आहेत; परंतु मोबाइल पिढ्या बरबाद करीत आहेत. हे शिक्षण व्यवस्थेचे बकालीकरण होत असल्याचे निदर्शक आहे.

आज कला, विज्ञान व वाणिज्य विद्याशाखा असणाऱ्या पारंपरिक महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कधी नव्हे इतके घटले आहे. जागतिकीकरणाने उभी केलेली आव्हाने पेलण्यासाठी आपण देशाला मजबूत करू शकलो नाही. केवळ अर्धवट अंधानुकरण करीत राहिलो. केंब्रिज, ऑक्सफर्ड, हार्वर्ड विद्यापीठे शिक्षणावर पाण्यासारखा पैसा खर्च करतात.

एखाद्या गरीब देशाच्या अर्थसंकल्पाएवढा खर्च एकएकटे विद्यापीठ करते. शिक्षणावरील खर्चाकडे ते गुंतवणूक म्हणून पाहतात. ते आर्टिफिशियल इंटेलिजन्स, सायबर सेक्युरिटी, क्वांटम कॉम्प्युटिंग, मशीन लर्निंग यांसारखे अद्यावत, कालसुसंगत शिक्षण देण्यासाठी धडपडत आहेत; परंतु आम्ही मात्र इंडियन नॉलेज सिस्टीमच्या नावाखाली दोन हजार वर्षे मागे जाण्याचे उद्दिष्ट घेऊन २१व्या शतकात वाटचाल करीत आहोत. ही विसंगती आहे. स्पर्धा परीक्षांच्या मायाजालाने बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या जीवनात अंधकार निर्माण केला आहे. सततच्या पेपरफुटीने त्यांचा आत्मविश्वास खचत चालला आहे. तो पुन्हा जागविणे आवश्यक असताना सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश त्यांना कॉक्रोच म्हणून हिणवितात.देशाचे आर्थिक सल्लागार 'मोठी स्वप्ने पाहू नका, त्याऐवजी प्लम्बिंग, इलेक्ट्रिशियन, सुतारकाम यांसारख्या प्रत्यक्ष मानवी कौशल्यावर आधारित श्रमावर लक्ष केंद्रित करा' असा सल्ला देतात. ही विटंबना नव्हे तर काय? एकीकडे तरुणांचा देश, डेमोग्राफिक डिव्हिडंड म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्यातील ऊर्जेला कुजवून टाकायचे हा घाणेरडा राजकारणी खेळ आहे. अशा धोरणामुळेच शिक्षण व्यवस्थेचे बकालीकरण सुरू आहे.

**प्रा. डॉ. विठ्ठल दहिफळे**

# संकोच नव्हे, संवाद हवा!

आजही अनेक पालक मुलांशी लैंगिक शिक्षणाबद्दल बोलणे टाळतात. काहींना संकोच वाटतो, काहींना भीती वाटते,तर काहींना वाटते,'अजून आपल्या मुलाचे वय नाही.' पण पालक गप्प राहिले म्हणून मुलांचे प्रश्न थांबत नाहीत.फक्त त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देणारा बदलतो. जर आई-वडिलांनी सांगितले नाही,तर इंटरनेट सांगते. सोशल मीडिया सांगतो. मित्र सांगतात. कधी अश्लील वेबसाईट्स शिकवतात,तर कधी अनोळखी लोक चुकीची माहिती देतात. म्हणून प्रश्न हा नाही की, आपल्या मुलांना लैंगिकतेबद्दल माहिती मिळणार की नाही. ती माहिती त्यांना कोणाकडून मिळणार?

लैंगिक शिक्षण म्हणजे मुलांना लैंगिक संबंधांसाठी प्रोत्साहन देणे नाही. उलट, त्यांना स्वतःचा आणि इतरांचा आदर करायला, योग्य-अयोग्य समजून घ्यायला, स्वतःचे संरक्षण करायला आणि जबाबदार निर्णय घ्यायला शिकवणे म्हणजे लैंगिक शिक्षण. शरीराचे काही अवयव खासगी असतात आणि त्यांना कोणालाही विनाकारण स्पर्श करण्याचा अधिकार नाही, हे स्पष्टपणे समजावून सांगा. त्यांना आत्मविश्वासाने 'नाही' म्हणायला शिकवा. पौगंडावस्थेत शरीरात आणि मनात होणारे बदल आधीच समजावून सांगा. मुलींमध्ये मासिक पाळी, शरीरातील बदल, भावनिक चढ-उतार; मुलांमध्ये आवाज बदलणे, दाढी-मिशी येणे, झोपेत वीर्यस्खलन होणे, शरीरातील इतर बदल - हे सर्व नैसर्गिक आहेत, याची त्यांना खात्री द्या. त्यामुळे त्यांच्या मनातील भीती आणि गोंधळ कमी होतो.किशोरवयात एखाद्याबद्दल आकर्षण वाटणे ही सामान्य गोष्ट आहे. पण त्या भावना जबाबदारीने हाताळणे महत्त्वाचे आहे. भावना चुकीच्या नसतात; चुकीचे निर्णय नुकसान करतात.मुलांना संमती म्हणजे काय हे नक्की शिकवा. 'नाही' म्हणजे नाही. गप्प राहणे म्हणजे होकार नाही. दबाव, भीती किंवा भावनिक ब्लॅकमेल करून मिळवलेली परवानगी ही संमती नसते. तसेच स्वतःलाही कोणत्याही गोष्टीसाठी 'नाही' म्हणण्याचा पूर्ण अधिकार आहे, हे त्यांना समजले पाहिजे. आजच्या डिजिटल युगात ऑनलाइन सुरक्षिततेबद्दल बोलणे तितकेच आवश्यक आहे. कोणालाही स्वतःचे खासगी फोटो किंवा व्हिडीओ पाठवू नयेत. अनेक मुलांचा पोर्नशी परिचय नकळत होतो. त्यामुळे या विषयावर शांतपणे बोला. पोर्न हे वास्तव नसते. ते मनोरंजन आणि पैशासाठी तयार केलेले असते. त्यातून नातेसंबंध, प्रेम, शरीर आणि जवळीक यांचे चुकीचे चित्र उभे केले जाते. त्यामुळे पोर्नकडून नव्हे, तर योग्य मार्गदर्शनातून लैंगिकतेबद्दल शिकणे गरजेचे आहे. तितकेच महत्त्वाचे म्हणजे मुलांना निरोगी नातेसंबंध म्हणजे काय हे समजावून सांगा. आदर, विश्वास, प्रामाणिकपणा, मोकळा संवाद आणि एकमेकांच्या मर्यादांचा आदर ही चांगल्या नात्याची लक्षणे आहेत.

तर मत्सर, नियंत्रण, धमक्या, अपमान आणि हिंसा ही धोक्याची चिन्हे आहेत. मित्रांच्या दबावाला बळी पडू नये, हेही शिकवा. खरी परिपक्वता म्हणजे इतरांचे अंधानुकरण करणे नाही, तर योग्य निर्णय घेण्याची क्षमता. योग्य वयानुसार गर्भधारणा, पालकत्वाच्या जबाबदाऱ्या आणि लैंगिक संसर्गजन्य आजार याविषयीही वैज्ञानिक आणि वस्तुनिष्ठ माहिती द्या. भीती दाखवू नका; सत्य सांगा.सर्वात महत्त्वाचे म्हणजे मुलांना हे नक्की सांगा - 'तू कोणत्याही विषयावर माझ्याशी बोलू शकतोस. चूक झाली तरी आधी माझ्याकडे ये.

मला सत्य ऐकायला आवडेल; कारण आपण मिळून त्यातून मार्ग काढू.' ज्या घरात मुलांना प्रश्न विचारण्याची मोकळीक असते, त्या घरातील मुलांना उत्तरे शोधण्यासाठी चुकीच्या दारांवर जावे लागत नाही. हे सर्व एका दिवसात सांगण्याची गरज नाही. यांचे प्रश्न ऐका. त्यांच्या कुतूहलाची थट्टा करू नका. त्यांना लाजवू नका. तुमचा उद्देश त्यांना दोष देणे नाही, तर त्यांचे सुरक्षित, निरोगी आणि जबाबदार भविष्य घडवणे आहे.

लक्षात ठेवा... मुलांशी लैंगिक शिक्षणाबद्दल बोलणे म्हणजे त्यांना लैंगिक संबंधांसाठी प्रोत्साहन देणे नव्हे; तर योग्य माहिती, योग्य मूल्ये, स्वतःचा आणि इतरांचा आदर, जबाबदारी आणि सुरक्षित निर्णय घेण्याची क्षमता देणे होय.

आपण गप्प राहिलो, तर इंटरनेट बोलू लागते. म्हणून पालकांनी संकोच सोडून संवाद सुरू करावा. कारण ज्या घरात संवाद असतो, त्या घरातील मुलांना उत्तरे शोधण्यासाठी चुकीच्या दारांवर टकटक करावी लागत नाही.संकोचामुळे निर्माण झालेली पोकळी चुकीची माहिती भरून काढते; पण विश्वासातून झालेला संवाद मुलांच्या आयुष्याला योग्य दिशा देतो.

**डॉ. स्वाती गानू**

## अनाकलनिय कोडे

खासदाराच्या मतदार संघाचा
कार्यभार खरच का हो
जास्त आहे..

म्हणून खासदारांची संख्या
वाढविण्याचा रचला
घाट आहे..!

भुक्षेत्र तर
पुर्ववतच आहे, मग
खासदार कशाला
वाढवयाचे..?
शासन यंत्रना आहे ना समर्थ
अनुत्पादक खर्च
कशाला करायचे..?

खासदार संख्या
वाढविण्यापेक्षा
कार्यक्षमता वाढविण्या
द्यावे प्रोत्साहन

तर मितव्ययतेच्या
तत्वाने
शासकीय खजिन्यात
वाढेल धन..!

त-ड-का



**प्रा.अशोक सारडा,** मेहकर
मो.९४२१३९४३३९

# संशोधन काय सांगते...

**मुळात या विषयात काही संशोधन झाले आहेत का, लोक याविषयी कसा विचार करतात, समोरच्याला जज करत असताना खरंच आपल्या मेंदूत काय घडत असते आणि मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून याला काही लॉजिक आहे हे सगळे आपण आजच्या विशेष लेखाच्या माध्यमातून समजून घेण्याचा प्रयत्न करूया....**

एखाद्या व्यक्तीविषयीचे एका भेटीत तयार होणारे मत किती खरे असते..? संशोधन काय सांगते.

मला तो बघूनच आवडला नाही.किंवा पहाताक्षणीच तो मस्त वाटला असे आपण खूप सहज म्हणतो. पण पहिल्याच भेटीत एखाद्या व्यक्तीविषयी तयार होणारे मत खरेच कितपत खरे असते? एका भेटीत आपण एखाद्या व्यक्तीबद्दल जे मत बनवतो,ते त्या व्यक्तीचे सत्य असते की आपल्या मेंदूने तयार केलेली एक तात्पुरती कथा? अनेक वर्ष सोबत राहूनही कधी कधी आपल्याला माणस कळत नाहीत असे आपणच म्हणतो आणि एकाच भेटीत मला तो किंवा ती कशी कळाली हे देखील आपणच म्हणतो. या सगळ्या म्हणण्यामागे, वाटण्यामागे काही तार्किक कारणे आहेत ही जगातल्या अनेक मोघम वाक्यांपैकी एक असणारी वाक्य आहेत.

### ...एखाद्या व्यक्तीला जेव्हा पहिल्यांदा आपण भेटतो तेव्हा मेंदूत काय घडते?

प्रिन्सटन युनिव्हर्सिटीच्या संशोधनात व्हिग्हा ग्त्त्ये आर्णि र्तैही ऊद्देदन यांनी २००६ मध्ये प्रसिद्ध केलेल्या अभ्यासानुसार एखाद्या व्यक्तीचा चेहरा पाहिल्यानंतर केवळ १०० मिलिसेकंदांत (०.१ सेकंद) आपला मेंदू ती व्यक्ती किती विश्वासू, सक्षम किंवा आकर्षक आहे याबद्दलचा निर्णय घेतो. यापेक्षा जास्त वेळ दिला, तरी माणसाचे ते पहिले मत म्हणजेच First Impression फारसे बदलत नाही.

जेव्हा Functional Magnetic Resonance Imaging या मशीनच्या माध्यमातून जेव्हा पहिल्यांदा भेटणाऱ्या लोकांच्या मेंदूचे स्कॅनिंग करण्यात आले, तेव्हा असे दिसले की, मेंदूमध्ये असणारा 'अमिग्डाला' हा भाग सेकंदाच्या काही भागात सक्रिय होतो आणि समोरच्या व्यक्तीकडून काही धोका आहे का, हे तपासतो. तर श्ग्दि न्ल्दिहे हे समोरच्या व्यक्तीचे हावभाव पाहून, तिच्या भावना काय आहेत हे समजून घेण्यास मेंदूला त्वरित मदत करतात.सोशल कॉग्निटिव्ह न्यूरोसायन्समध्ये हे विज्ञानाने प्रयोग करून सिद्ध केलेले आहे.

### मेंदू एखाद्या व्यक्तीबद्दलचे मत कसे तयार करते? मानसशास्त्र काय सांगते?

फार पुर्वी माणूस जंगलात राहत असे. उत्क्रांतीच्या इतिहासात आदिमानवाच्या काळात काळापासून स्वतःच्या संरक्षणासाठी समोरची व्यक्ती 'मित्र की शत्रू' हे सेकंदाच्या आत ओळखणे आवश्यक होते. त्यामुळे माणूस उत्क्रांत होत असल्यापासूनच माणसाच्या जडणघडणीत एखाद्या विषयीचे मत बनविण्याचे हे गुण आलेले असून ते आजही टीकून आहेत.


एखाद्या व्यक्तीविषयी आपल्या मनात घ्हूल्ग्दह तयार होते.म्हणजेच आपला मेंदू भूतकाळातील हजारो अनुभवांचे आणि चेहऱ्यांच्या हावभावांचे विश्लेषण करून सुप्त मनाच्या पातळीवर एखाद्या व्यक्तीविषयी मत किंवा निर्णय देत असतो.

### संशोधनातून काय समोर आले..?

नलिनी आंबडी आणि रॉबर्ट रोसेन्थल यांनी मानसशास्त्रात ऊप्ह एत्मे र्दैजेग्न र्प्िनदे हा अभ्यास केला होता. या अभ्यासात त्यांनी अनोळखी लोकांना शिक्षकांच्या केवळ २,५ किंवा १० सेकंदांच्या व्हिडिओ क्लिप्स दाखवल्या.ज्यामध्ये आवाज नव्हता फक्त त्यांचे हावभाव आणि देहबोली होती.आश्चर्याची गोष्ट म्हणजे, एवढ्या कमी वेळातही लोकांनी शिक्षकांच्या कार्यक्षमतेबद्दल जे अंदाज लावले,ते अगदी हुबेहूब त्या विद्यार्थ्यांच्या अभिप्रायासारखे होते ज्यांनी त्या शिक्षकांकडे पूर्ण सहा महिने किंवा वर्षभर शिक्षण घेतले होते.

यावरून काय सिद्ध होते की, आपला मेंदू समोरच्या व्यक्तीच्या देहबोलीतील अतिशय सूक्ष्म गोष्टी जसे की,हातांच्या हालचाली, चेहऱ्यावरील हावभाव, उठण्या-बसण्याची पद्धत आणि नजर मिळवणे यांचे केवळ काही सेकंदांत विश्लेषण करतो.

आदिमानवाच्या काळापासून माणसात ही माणस ओळखण्याची कला निर्माण झाली आहे आणि तिचा विकासही होत गेला आहे.पण जरी



आपण काही सेकंदांत अचूक अंदाज लावू शकत असले,तरी याला काही महत्त्वाच्या मर्यादा आहेत.संशोधनात असे दिसून आले की प्रत्येक मानवी गुणधर्म सारख्याच अचूकतेने ओळखता येत नाही.

जे गुण बाह्य वर्तनातून लगेच दिसून येतात, त्यांचा अंदाज लावणे खूप सोपे आणि अचूक असते. म्हणजेच एखादी व्यक्ती किती ूदंनू आहे, तिच्यात आत्मविश्वास किती आहे,किंवा ती किती उत्साही आहे,याचा अंदाज तिच्या केवळ चालण्यावरून किंवा हसण्यावरून २ सेकंदात ओळखता येणे शक्य आहे पण जे गुण व्यक्तीच्या विचारांशी किंवा नैतिकतेशी संबंधित असतात,त्यांचा अंदाज 'थिन स्लाइस' वरून लावणे कठीण आणि बऱ्याचदा चुकीचे ठरते.

म्हणजेच समोरची व्यक्ती किती प्रामाणिक आहे, ती किती विश्वासू आहे, किंवा तिच्या बुद्धिमत्तेचा स्तर काय आहे, हे केवळ २ सेकंदांच्या व्हिडिओवरून अचूकपणे ओळखता येत नाही.

### 'हॅलो इफेक्ट' मध्ये म्हणजे काय?

Halo Effect हा मानसशास्त्रातील एक संज्ञानात्मक पूर्वग्रह म्हणजेच cognitive bias आहे. यामध्ये एखाद्या व्यक्तीच्या एका ठळक गुणामुळे जसे की,आकर्षक दिसणे, आत्मविश्वास, प्रसिद्धी, चांगले बोलणे यामुळे आपण त्या व्यक्तीच्या इतर गुणांबद्दलही सकारात्मक निष्कर्ष काढतो.ही संकल्पना प्रथम Edward Thorndike यांनी १९२० मध्ये मांडली होती. एखादी व्यक्ती दिसायला आकर्षक आहे म्हणून आपण ती अधिक हुशार, सक्षम किंवा चांगल्या स्वभावाची असेल असे गृहीत धरतो. एखाद्या कंपनीचा ब्रँड प्रसिद्ध आहे म्हणून त्याची प्रत्येक उत्पादने चांगली असतील असे मानले जाते. आपला मेंदू सतत माहिती कमी वेळात समजून घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे एका ठळक वैशिष्ट्याच्या आधारावर संपूर्ण व्यक्तीबद्दल जलद निर्णय घेणे ही एक मानसिक शॉर्टकट प्रक्रिया असते. याला प्ल्रैग्म असेही म्हणतात.हा हॅलो इफेक्ट २ प्रकारे ओळखला जातो... सकारात्मक आणि नकारात्मक...

एका चांगल्या गुणामुळे इतर गुणही चांगले वाटण्याला सकारात्मक इफेक्ट म्हणतात तर एका नकारात्मक गुणामुळे संपूर्ण व्यक्तीबद्दल वाईट मत तयार होण्याला नकारात्मक इफेक्ट म्हणतात.

प्रसिद्ध अभिनेते,गीतकार जावेद अख्तर त्यांच्या मुलाखतीत सांगतात की, एखाद्या व्यक्तीला समजून घ्यायचे असेल की ती कशी आहे तर त्या व्यक्तीला रागात पहा.चांगल्या व्यक्ती ही रागातही डिसेंट वागते. ती कोणालाही घालून पाडून बोलत नाही. कोणाचा अपमान न करता आपले मत मांडते.हे मत तयार करणे किंवा होणे हे दिवसेंदिवस बदलत जाते का?

याविषयी बोलताना विद्यार्थी असणारा २४ वर्षीय विनयन वाघमारे नुसार,एखाद्या व्यक्तीविषयी मत ठरवणे हे खूप लहानपणापासून मी किंवा आपण सगळेच करत आलो आहोत. पण जसजसे मोठे होतो तसे मला वाटते की हे मत ठरवण्यातही एक समजंसपणा किंवा एक परिपक्वता येते.म्हणजे आम्ही लहानपणी शाळेत एखादे नविन शिक्षक वर्गावर पहिल्यांदा आले की,त्यांच्या वागण्यावरून मत ठरवायचो. म्हणजे ते कडक किंवा शिस्तीने वागले तर ते आम्हाला कडक वाटायचे.मुळात ते फार प्रेमळ आणि संवेदनशील वागत पण त्यावेळी शिस्त हा प्रकार आम्हाला जाच वाटत असे. त्यामुळे तुम्ही कोणत्या वयात याकडे कसे बघता हा देखील मुद्दा महत्त्वाचा आहे. म्हणजे आता जर मला एखाद्या शिक्षकाला जज करायचे असेल तर मी त्या शिक्षकांची बोलण्याची पद्धत, त्यांच्या बोलण्यात ते कोणते आणि काय संदर्भ देतायेत, त्यातून त्यांचे वाचन, त्यांचे विचार याचा मी अंदाज घेत असतो आणि त्यावरून त्यांच्याबद्दलचे माझे मत ठरवत असतो.

मला असे वाटते की, जेव्हा एकाच व्यक्तीबद्दल दोन वेगवेगळ्या व्यक्तींचे वेगवेगळे मत असते तेव्हा त्यांच्या वयाचा आणि अनुभवाची जोडणी त्यात झालेली असते. उदाहरणच घ्यायचे झाले तर एखादा टपोरी मुलगा एखाद्या मुलीला एकदम कूल वाटू शकतो तर त्याच मुलीच्या वडिलांना तोच मुलगा चांगले संस्कार नसणारा वाटू शकतो. त्यामुळे त्यात वय,अनुभव, परिपक्वता, विचार याही गोष्टी मला महत्त्वाच्या वाटतात.

पण एकूणातच मला असे वाटत नाही की 'पहिली छाप' हेच अंतिम सत्य असते.पहिल्या भेटीत माणसाविषयी एक साधारण अंदाज बांधला जाऊ शकतो जो नंतर काळाच्या कसोटीवर खोटा किंवा खरा ठरू शकतो.याविषयी स्वराली पवार नुसार, पहिल्या भेटीत आपल्याला फक्त एखाद्या व्यक्तीबद्दचा साधारण अंदाज येतो. म्हणजे आता या व्यक्तीला आपल्याला पुन्हा भेटायची इच्छा आहे की नाही हे आपण पहिल्या भेटीवरून ठरवत असतो. पण माझे असे ठाम मत आहे की एका भेटीत माणूस कळत नाही. काही काही माणसे तर त्यांच्यासोबत खूप दिवस राहूनही समजत नाहीत.

### नोकरीवर ठेवताना व्यक्तीची निवड

एखाद्या पदावर एखाद्या व्यक्तीची निवड करताना एका भेटीत त्या उमेदवाराला जज करणे तितकीशी सोपी गोष्ट नसते.कधी कधी गोष्टी एकदम चपखल बसतात तर कधी गोष्टी नको एवढ्या फिसकटून चुकीच्या व्यक्तीची निवड केली जाते.एका पोस्टसाठी आलेल्या शेकडो बायोडेटामधून योग्य व्यक्तीची निवड करणे कठिण ठरते म्हणून अनेकदा कंपन्या या त्या व्यक्तीला ६ महिने प्रोबेशन पिरियडवर ठेवतात. आणि त्यानंतर त्या व्यक्तीला कायमस्वरूपी कामावर ठेवायचे की नाही याचा निर्णय घेतात.

**श्रद्धा कोळेकर**

# ’एक वर्ग असा ही’ उपक्रमाचा श्रीगणेशा

## मुख्याधिकारी शशिकांत बाबर आठवड्यातून एक तास विद्यार्थ्यांसोबत

■ अकोट नगर परिषदेच्या ११ शाळांमध्ये टप्प्याटप्प्याने राबविणार उपक्रम

■ शिक्षण, करिअर, स्वच्छता आणि व्यक्तिमत्त्व विकासावर भर

■ प्रतिनिधी | अकोट ■

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन थेट शाळेत जाऊन त्यांच्याशी संवाद साधणार, त्यांच्या समस्या जाणून घेणार आणि करिअरपासून सामाजिक जबाबदारीपर्यंत विविध विषयांवर मार्गदर्शन करणार, या उद्देशाने अकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी शशिकांत मारोती बाबर यांनी ’एक वर्ग असा ही’ या अभिनव उपक्रमाची सुरुवात केली आहे. या उपक्रमाचा शुभारंभ २४ जुलै रोजी नगर परिषदेच्या उर्दू वरिष्ठ प्राथमिक शाळा क्र. ५ येथे उत्साहपूर्ण वातावरणात झाला.

या उपक्रमांतर्गत मुख्याधिकारी बाबर दर आठवड्याला नगर परिषदेच्या एका मराठी अथवा उर्दू माध्यमाच्या शाळेत जाऊन विद्यार्थ्यांसोबत सुमारे एक तास मुक्त संवाद साधणार आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसह आत्मविश्वास वाढविणे, करिअरविषयक मार्गदर्शन करणे, त्यांच्या अडचणी जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न करणे, तसेच स्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव निर्माण करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.



शुभारंभप्रसंगी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना मुख्याधिकारी बाबर यांनी शिक्षणाचे महत्त्व, नियमित अभ्यासाची सवय, शिस्त, सकारात्मक विचार आणि मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा दिली. विद्यार्थ्यांनीही मनमोकळेपणाने प्रश्न विचारत आपल्या अडचणी मांडल्या. प्रत्येक प्रश्नाला संयमाने उत्तरे देत त्यांनी विद्यार्थ्यांना आत्मविश्वासाने पुढे जाण्याचा संदेश दिला. यावेळी मुख्याधिकारी बाबर यांनी शाळेची पाहणी करून शिक्षकांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतला. विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराची तपासणी केली तसेच शाळेतील मूलभूत सुविधांची माहिती घेत आवश्यक सुधारणा करण्याबाबत सूचना दिल्या. शिक्षक, विद्यार्थी आणि शाळा प्रशासनाशीही त्यांनी सविस्तर चर्चा केली.

अकोट नगर परिषदेच्या अखत्यारीतील एकूण ११ मराठी व उर्दू माध्यमाच्या शाळांमध्ये हा उपक्रम टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रशासनाशी थेट संवाद साधण्याची आणि आपल्या समस्या मांडण्याची प्रभावी संधी उपलब्ध होणार आहे.

यासोबतच ’स्वच्छ शहर – सुंदर शहर, ग्रीन शहर’ ही संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून स्वच्छता, पर्यावरण संरक्षण आणि सामाजिक बांधिलकीची भावना रुजविण्यावरही भर दिला जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना देणारा हा उपक्रम पालक, शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून स्वागतार्ह ठरत असून अकोट नगर परिषदेच्या शैक्षणिक क्षेत्रातील हा एक सकारात्मक आणि प्रेरणादायी पुढाकार मानला जात आहे.

# आषाढी एकादशीनिमित्त ‘अकोट नगरी, स्वच्छतेची वारी’

**दिंडी मार्गांची विशेष स्वच्छता, भाविकांसाठी स्वच्छ वातावरण निर्मिती; नागरिकांनाही स्वच्छतेच्या अभियानात सहभागी होण्याचे आवाहन**



■ प्रतिनिधी | अकोट ■

आषाढी एकादशीच्या पार्श्वभूमीवर अकोट नगरपरिषदेने ‘अकोट नगरी, स्वच्छतेची वारी’ हा विशेष स्वच्छता उपक्रम राबवत शहरातील दिंडी व पालखी मार्गांची व्यापक साफसफाई केली. मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि स्वच्छता निरीक्षक अक्षय फडतरे यांच्या नेतृत्वात हा उपक्रम राबविण्यात आला.

आषाढी एकादशीनिमित्त शहरात विविध धार्मिक दिंड्या, पालख्या आणि मिरवणुका निघणार असल्याने भाविकांना स्वच्छ, सुरक्षित आणि प्रसन्न वातावरण मिळावे, या उद्देशाने नगरपरिषद प्रशासनाने विशेष नियोजन केले होते. त्यानुसार सफाई कर्मचाऱ्यांनी पहाटेपासूनच प्रमुख रस्ते, चौक, दिंडी मार्ग आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता केली.

या मोहिमेदरम्यान रस्त्यांवरील कचरा, प्लास्टिक व अन्य टाकाऊ वस्तू हटविणे, झाडलोट करणे तसेच सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्यावर भर देण्यात आला. धार्मिक उत्सवाच्या निमित्ताने स्वच्छतेचा संदेश देण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला.

यावेळी मुख्याधिकारी शशिकांत बाबर यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या कार्याचे कौतुक करताना, शहर स्वच्छ ठेवण्यासाठी त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे असल्याचे सांगितले. ’स्वच्छ व सुंदर अकोट घडविण्यासाठी सातत्याने परिश्रम घेणारे सफाई कर्मचारी हेच खऱ्या अर्थाने स्वच्छतेच्या वारीतील वारकरी आहेत,’ असे ते म्हणाले.

शहर स्वच्छ राखणे ही केवळ नगरपरिषदेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचेही कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. सार्वजनिक ठिकाणी कचरा न टाकता स्वच्छतेची सवय अंगीकारून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी नागरिकांना केले. या विशेष मोहिमेमुळे दिंडी मार्ग स्वच्छ आणि आकर्षक बनले असून, धार्मिक उत्सवासोबत स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या नगरपरिषदेच्या या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे.

## ताप, डेंग्यू-मलेरियाच्या रुग्णामध्ये वाढ

■ प्रतिनिधी | अकोला ■

राज्यात यंदा झालेल्या दमदार पावसामुळे डास मो’या प्रमाणात वाढले असून, त्याचा परिणाम म्हणून साथीच्या आजारांचा धोका देखील वाढला आहे. विशेषतः डेंग्यू आणि मलेरियाच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याने आरोग्य यंत्रणा सतर्क झाली आहे. अशा परिस्थितीत वेळेवर वैद्यकीय सल्ला मिळणे आणि उपचाराची योग्य दिशा मिळणे अत्यंत महत्त्वाचे ’रत आहे. याच पार्श्वभूमीवर नागरिकांना तातडीची आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासा’ी विशेष मान्सून आरोग्य उपक्रम राबविण्यात येत असून, ऑनलाईन डॉक्टरांचा सल्ला, होम हेल्थकेअर आणि मोफत व्हर्च्युअल ओपीडीसारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या.

# खेट्रीतील जि.प. उर्दू शाळेच्या तीन वर्गखोल्यांच्या दुरुस्तीस मंजुरी; ६.३० लाखांचा निधी, कामाला प्रारंभ



> ’गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थ्यांना नादुरुस्त वर्गखोल्यांमध्ये शिक्षण घ्यावे लागत होते. या प्रश्नासाठी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. अखेर जिल्हा परिषदेकडून तीन वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी ६.३० लाखांचा निधी मंजूर झाला असून कामालाही सुरुवात झाली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.’
>
> **जहूर खान,** सरपंच, खेट्री

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर पंचायत समिती अंतर्गत खेट्री येथील जिल्हा परिषद उर्दू शाळेतील जीर्ण झालेल्या तीन वर्गखोल्यांच्या दुरुस्तीस अखेर मंजुरी मिळाली असून, यासाठी ?६.३० लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. शनिवारी संबंधित वर्गखोल्यांची मोजमाप प्रक्रिया पूर्ण करून प्रत्यक्ष दुरुस्तीच्या कामाला सुरुवात करण्यात आली.

गेल्या दोन शैक्षणिक वर्षांपासून शाळेतील चार वर्गखोल्या अत्यंत जीर्ण अवस्थेत असल्याने विद्यार्थ्यांना उघड्यावर किंवा धोकादायक वर्गखोल्यांमध्ये शिक्षण घ्यावे लागत होते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या समस्येबाबत पालकांकडून सातत्याने नाराजी व्यक्त केली जात होती. या गंभीर समस्येची दखल घेत खेट्रीचे सरपंच जहूर खान यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत जिल्हा परिषदेकडून तीन वर्गखोल्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर करण्यात आला. दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सुरक्षित, सुस्थितीत आणि अधिक चांगल्या वातावरणात शिक्षण घेता येणार असल्याने पालकांसह ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे. सरपंच जहूर खान यांच्या पाठपुराव्याचेही परिसरात कौतुक होत आहे.

## शिक्षक हा मूलतः स्वभाव आहे - पुंडलिक

**अकोला :** समाजातील इतर वर्ग हा नोकरी करीत असतो. मात्र शिक्षक हे नोकरी करणारे असूनही तो स्वभाव आहे.हा स्वभाव शिक्षक असतानाही शिक्षक आहे व नसतानाही शिक्षक आहे.शिक्षक हा वर्गातही शिक्षक आहे व बाहेरही शिक्षक आहे. ज्याप्रमाणे इतर वर्गाला आपल्या कार्याच्या भूमिकेतून बाहेर येण्याची परवानगी आहे तशी शिक्षकाला नाही. म्हणून समाजात संस्कार पेरण्याची ताकद ही खऱ्या अर्थाने कोणत्याही पेशात नसून ती केवळ शिक्षकात आहे. म्हणून विद्यार्थ्यांच्या अनुषंगाने शिक्षकच खऱ्या अर्थाने राष्ट्र निर्माण करू शकत असल्याचे प्रतिपादन महावितरणचे अभियंता व प्रखर वक्ते अंबरीश पुंडलिक यांनी केले.

# धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यानंतर अकोल्यातील विद्यार्थ्यांचा जल्लोष



**साखळी अन्नत्याग आंदोलन मागे**

■ प्रतिनिधी | अकोला ■

केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची बातमी समोर आल्यानंतर अकोल्यातील आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सुरू असलेले साखळी अन्नत्याग व मूक आंदोलन विद्यार्थ्यांनी मागे घेत जल्लोष साजरा केला.

विद्यार्थ्यांवरील वाढता अन्याय, विविध स्पर्धा परीक्षा व भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहार, पेपरफुटी, भ्रष्टाचार, भरती प्रक्रियेतील विलंब, शिक्षणाचे वाढते खाजगीकरण तसेच विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांकडे होत असलेल्या दुर्लक्षाच्या निषेधार्थ अकोल्यातील विद्यार्थ्यांनी २५ जुलैपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर साखळी अन्नत्याग व मूक आंदोलन सुरू केले होते.

या आंदोलनाला काँग्रेस, महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे), संभाजी ब्रिगेडसह विविध राजकीय व सामाजिक संघटनांनी पाठिंबा दर्शविला. आंदोलनादरम्यान विद्यार्थ्यांनी हातात विविध मागण्यांचे फलक घेतले होते, तर अनेकांनी तोंडाला काळ्या पट्ट्या बांधून मूक आंदोलन करत केंद्र सरकारच्या धोरणांविरोधात निषेध व्यक्त केला.

दरम्यान, नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याची माहिती समोर आल्यानंतर अकोल्यातील आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी एकमेकांचे अभिनंदन करत घोषणाबाजी केली आणि आपले साखळी अन्नत्याग आंदोलन मागे घेतल्याची घोषणा केली. आंदोलनकर्त्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर केंद्र सरकारने सकारात्मक भूमिका घ्यावी, परीक्षा व भरती प्रक्रिया पारदर्शक करावी आणि विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी पुन्हा एकदा यावेळी केली.

## इनरव्हील नॉर्थने मेडिकल बँकला केले वॉकर प्रदान



■ प्रतिनिधी | अकोला ■

मानवसेवेत सक्रिय इनरव्हील क्लब ऑफ अकोला नॉर्थने रुग्णांची सेवा करणाऱ्या मेडिकल बँकला वॉकर वितरण केले. क्लबच्या अध्यक्ष ज्योती रुहाटिया यांच्या नेतृत्वाखाली स्थायी रोलिंग प्रोजेक्ट ‘मेडिकल बँक’ची फाउंडर प्रेसिडेंट साक्षी बंसल असून ही मेडिकल बँक गोरक्षण रोडवरील तुकाराम रुग्णालयात स्थित आहे. क्लबकडून त्या ठिकाणी एक वॉकर देण्यात आला. हे सेवाकार्य क्लबच्या सक्रिय सदस्य श्रीमती मंगला मुंधवणे यांच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले.

# अवैध हत्यारे, दारू तस्करीवर कारवाई, चोरीतील दागिने मूळ मालकाला परत

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■

अकोला जिल्हा पोलिसांच्या ’ऑपरेशन प्रहार’ मोहिमेअंतर्गत मुर्तिजापूर शहर पोलिसांनी एका दिवसात तीन वेगवेगळ्या कारवाया करत अवैध हत्यारे बाळगणाऱ्यांवर, अवैध दारू तस्करी करणाऱ्यांवर कारवाई केली. तसेच चोरीच्या गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला सुमारे १.१० लाखांचा मुद्देमाल न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण करून मूळ फिर्यादीच्या ताब्यात देण्यात आला. या सर्व कारवायांमधून सुमारे १६.६२ लाखांचा मुद्देमाल जप्त व परत करण्यात आला असून, चार आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



२४ जुलैच्या रात्री कारंजा बायपास पुलाखाली गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी एमएच-३०-सीबी-२९६४ क्रमांकाच्या इटिका कारची तपासणी केली. वाहनचालक हरीष गिरीष खनेवार हा मद्यधुंद अवस्थेत आढळून आला. त्याच्यासोबत असलेल्या निलेश बजरंग ठाकूर व पंकज बबन शेगावकर यांच्या ताब्यातून विनापरवाना दोन लोखंडी तलवारी जप्त करण्यात आल्या. या कारवाईत दोन तलवारी, तीन मोबाईल आणि इटिका कार असा १४.३२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याच दिवशी कारंजा बायपास परिसरात नाकाबंदीदरम्यान एमएच-३०-पी-१८७१ क्रमांकाच्या मारुती ओमनीची तपासणी केली असता ’बॉबी संत्रा’ कंपनीच्या ९० मिली क्षमतेच्या ५०० देशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या. या प्रकरणात आकाश शिवप्रसाद तिवारी याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून ?१.२० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दरम्यान, मुर्तिजापूर शहर पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक ६९/२०२१ मधील तपास पूर्ण झाल्यानंतर जप्त करण्यात आलेली ४ ग्रॅम सोन्याची लगड व २०० ग्रॅम चांदीची लगड असा १.१० लाखांचा मुद्देमाल न्यायालयाच्या आदेशानुसार फिर्यादी शक्तीसिंग दिलीपसिंग ठाकूर यांना परत करण्यात आला. या सर्व कारवाया पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक चंद्रकांत रेड्डी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी वैशाली मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडल्या. कारवाईत पोलीस निरीक्षक धर्मेंद्र जोशी, पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र वानखेडे, उज्वला भाले तसेच सुरेश पांडे, नंदकिशोर टिकार, सचिन दांदळे, गजानन खेडकर, सचिन दुबे, रोशन लकडे, नामदेव आडे आणि कृष्णा येरमुले यांनी सहभाग घेतला.

अवैध हत्यार प्रकरणाचा पुढील तपास सहायक फौजदार सुरेश पांडे, अवैध दारू वाहतूक प्रकरणाचा तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल सचिन दांदळे, तर चोरीतील मुद्देमाल परत करण्याची प्रक्रिया मसपोउपनि उज्वला भाले यांनी पूर्ण केली. पोलिसांच्या सलग कारवायांमुळे गुन्हेगारी प्रवृत्तीला चाप बसत असून, ’ऑपरेशन प्रहार’ मोहिमेला प्रभावी यश मिळत असल्याचे दिसून येत आहे.

### जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार नामे ओंकार बाबन तुमसरे, रा. अकोट फैल, अकोला, ता. व जि. अकोला हे ईक्वीटास स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड, शाखा अकोला यांचेकडून रु. १५,००,०००/- (पंधरा लाख रुपये फक्त) रकमेचे कर्ज घेत असून सदरहू कर्ज हे खालील मालमत्ता बँकेकडे गहाण ठेऊन घेत आहेत. त्या मालमत्तेचे वर्णन - ग्रामपंचायत खरप बु. चे हद्दीतील, मौजे उमरी, अकोला, ता. व जि. अकोला येथील सर्वे क्र. ७९/१, प्लॉट क्र. २३६ ची उत्तर दक्षिण वाटणी करून पूर्व भागाची निम्म जागा, महानगरपालिका मालमत्ता क्र. ४३९५ (नवीन) व ग्रामपंचायत मालमत्ता क्र. ७९ (जुना) सदर प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ ७९५.०० चौ.फुट म्हणजेच ७३.८८ चौ.मिटर व त्यावरील बांधकामासहीत. सदर प्लॉटचे मोजमाप पूर्व-पश्चिम उत्तर बाजू – २६ फुट म्हणजेच ७.९२ मीटर; पूर्व-पश्चिम दक्षिण बाजू - २७ फुट म्हणजेच ८.२६ मीटर; दक्षिण-उत्तर दोन्ही बाजू - ३० फुट म्हणजेच ९.१६ मीटर, ज्याच्या चतु:सीमा पूर्वेस - २० फुटाचा रस्ता; पश्चिमेस – प्लॉट क्र. २३६ मधील निम्मी जागा (खरे यांचे घर); उत्तरेस – प्लॉट क्र. २३५ ची जागा; दक्षिणेस - २० फुटाचा रस्ता या प्रकारे आहेत. येणेप्रमाणे सदरहू वरील वर्णनाच्या व चतु:सीमेच्या आतील मिळकती संबंधी इतर कुणासही कसल्याही प्रकारचा अधिकार, हक्क, हितसंबंध, बोजा, गहाण किंवा काहीही वाद असल्यास त्यांनी आमच्याकडे सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३ दिवसाचे आत लेखी हरकत संबंधित कागदपत्रांसह दयावी. वरील मुदतीत हरकत प्राप्त न झाल्यास सदर मालमत्ता ही बिन बोजा व बिन भानगडीची असल्याचे समजून आमचे पक्षकार पुढील व्यवहार पूर्ण करतील. त्यानंतर कुणाची काहीही हरकत व उजर आमचे पक्षकारावर लागू व बंधनकारक राहणार नाही. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला, दि. २४/०७/२०२६.

**अँड. एस. डी. तायडे**
जगदंबा नगर, खामगांव रोड, शेगांव.
मो. ९७३०८२९९२८

### जाहीर नोटीस

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११५८/२०२६ — प्रोसेस नं.९४११/२०२६
चौ.ता. ३१/०८/२०२६ — दिनांक : २३/०७/२०२६

**अर्जदार :** १, श्रीमती. चंद्रकलाबाई अशोक अबगड २. शुद्धोधन अशोक अबगड अर्जदार क्र. १ व २ रा. जगजीवन, राम नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. किरण दिपकर उमाळे रा. मु. पो. टेंभरू सोंडा, ता. चिखलदारा, जि. अमरावती. ४. सौ. सुजाता नंदलाल खंडारे रा. मु. पाचमोरी, पो. सुकोडा, अकोट रोड, ता. जि. अकोला. ५. सौ. वैशाली सुप्रीम निंबाळकर रा. इंडिया बेकरी, शंकर नगर, अकोला. ता. जि. अकोला. ६. दिपंकर अशोक अबगड रा. श्री. कॉलनी, पाण्याच्या टॉकीजवळ, अकोट, ता. अकोट, जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अशोक यशवंत अबगड
**पत्ता :-** रा. जगजीवन, राम नगर, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अशोक यशवंत अबगड यांचे दि. १९/०२/२०२६ रोजी राहत्या घरी जगजीवनराम नगर, अकोला. ता. जि. अकोला. येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११११/२०२६ — प्रोसेस नं.९२८९/२०२६
चौ.ता. २८/०८/२०२६ — दिनांक : २१/०७/२०२६

**अर्जदार :** अशोक जनार्धन अंभोरे, रा. सरस्वती कन्या विद्यालयाजवळ नित्यानंद नगर, चांदुर, मलकापुर, अकोला, ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : जनार्धन बंन्सी अंभोरे
**पत्ता :-** रा. सरस्वती कन्या विद्यालयाजवळ नित्यानंद नगर, चांदुर, मलकापुर, अकोला, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत जनार्धन बन्सी अंभोरे यांचे दि. ०४/११/२००३ रोजी शासकिय रूग्णालय, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक. २८/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २१/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११०४/२०२६ — प्रोसेस नं.८९१३/२०२६
चौ.ता. २१/०८/२०२६ — दिनांक : १७/०७/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती रोशनी सुशिल तेलगोटे २. संचित सुशील तेलगोटे ३. साधना दिलीप तेलगोटे सर्व रा. अकोली बु, अकोला. ता. जि. अकोला. मो. क्र. ९७६४४१ ९१५७

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुशिल दिलीप तेलगोटे
**पत्ता :-** रा. अकोली बु, गिता नगरच्या पुढे, अकोला. ता. जि. अकोला. मो. क. ९७६४४१९१५७

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुशिल दिलीप तेलगोटे यांचे दि. २७/०३/२०२६ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २१/०८/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १७/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

### जाहीर नोटीस

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ११०३/२०२६ — प्रोसेस नं.९१७०/२०२६
चौ.ता. २८/०८/२०२६ — दिनांक : २०/०७/२०२६

**अर्जदार :** १. प्रविण वामनराव डोंगरे २. माया वामनराव डोंगरे ३. वामनराव रानुजी डोंगरे सर्व रा. महात्मा फुले नगर, राष्ट्रीय शाळेजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : लिला वामनराव डोंगरे
**पत्ता :-** रा. महात्मा फुले नगर, राष्ट्रीय शाळेजवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत लिला वामनराव डोंगरे यांचे दि. २१/०८/२०२५ रोजी आयकॉन हॉस्पिटल, अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २८/०८/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

**आदेशानुसार**
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथून छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसूल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३ अंक २२७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन- ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# जिल्हा क्रीडा संकुलात तातडीने स्वतंत्र विद्युत रोहीत्र बसवा:पालकमंत्री

## जिल्ह्यात युवा खेळाडूंना उत्तमोत्तम सुविधा देण्याचे निर्देश

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्हा क्रीडा संकुल येथे विविध खेळाडू वर्षभर वेगवेगळ्या खेळांचा सराव करत असतात. या खेळाडूंना चांगल्या सुविधा मिळणे आवश्यक आहे. सोबतच खंडीत वीजपुरवठ्याचा त्यांच्या सरावावर परिणाम होऊ नये यासाठी संकुलाकरीता स्वतंत्र विद्युत रोहीत्र (DP) बसवा, असे निर्देश पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात पालकमंत्र्यांनी जिल्हा क्रीडा संकुल कार्यकारी समितीचा आढावा घेतला, त्यावेळी त्यांनी सदर निर्देश दिले. बैठकीला जिल्हाधिकारी वान्मथी सी,मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण,क्रीडा उपसंचालक महादेव कसगावडे, जिल्हा क्रीडा अधिकारी आशा मेश्राम यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा क्रीडा संकुलात ४०० मीटर धावनपथ, खुले प्रेक्षागृह, विविध खेळांचे मैदान, मल्टीजिम, वेटलिफ्टींग, फिजीकल एक्झरसाईज हॉल, फिटनेस सेंटर, बॅडमींटन हॉल व शुटींग रेंज, संरक्षण भिंत, मुलामुलींचे वसतीगृह, बहुउद्देशिय हॉल व वसतीगृहाचे विस्तारीकरण, संकुलातील अंतर्गत रस्ते, नाली, स्क्वॅश कोर्ट, बिलीयर्डस हॉल, लॅान टेनिस कोर्ट इत्यादी कामे पुर्ण झाली आहे. यासुविधांकरीता स्वतंत्र विद्युतीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे वीजेची मागणी वाढल्याने आणि अखंडीत वीज पुरवठा होण्यासाठी स्वतंत्र रोहीत्र बसविणे आवश्यक असल्याचे बैठकीत सांगण्यात आले. त्यामुळे स्वतंत्र रोहीत्र बसाविण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी विद्युत विभागास केल्या.

जिल्हा क्रीडा संकुलात ४०० मीटर सिंथेटीक धावनपथ व पॉलीमर ग्रास फुटबॉल मैदान तयार करण्याचे काम सद्या सुरु आहे. सदर कामासाठी यापूर्वी कंत्राटदारास मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे हे काम तातडीने पुर्ण करून मैदान खेळाडूंना उपलब्ध करून देण्यात यावे. खेळाडूंच्या मागणीनुसार संकुलातील बॅडमिंटन हॉल मधील वुडन फ्लोरींगमध्ये सिंथेटीक बॅडमींटन मॅट बसविण्यात यावी तसेच यासाठी आवश्यक साहित्य खरेदी करण्यात यावे,असे पालकमंत्र्यांनी सांगितले.

संकुलातील बॅडमींटन हॉल व व्यायामशाळेची नियमित देखभाल दुरुस्ती होणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र कंत्राटदार नेमण्यात यावा. जिल्ह्यात अनेक गुणवान खेळाडू आहे. त्यांना चांगल्या सुविधा दिल्यास ते जिल्ह्याचे नाव मोठे करू शकतात. त्यामुळे खेळाडूंच्या मागणीप्रमाणे आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्या. गेल्या काही दिवसात अनेक सुविधा आपण उपलब्ध करून दिल्या आहे. त्या सुविधांची देखभाल दुरुस्ती नियमितपणे केली जावी, असे पालकमंत्र्यांनी सांगितले.


वर्धा तथा सेलू तालुका क्रीडा संकुल कार्यकारी समितीचा आढावा देखील या तालुका समित्यांचे अध्यक्ष तथा पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी घेतला. वर्धा तालुका क्रीडा संकुल उत्तम झाले आहे. संकुलाच्या विस्तारासाठी लगतची जागा उपलब्ध करण्याचे निर्देश त्यांनी दिले. सेलू येथील क्रीडा संकुल देखील वर्धेच्याच धर्तीवर उत्तम करण्यात यावे. सेलू येथे व्यायामशाळा, क्रीडा सुविधांचा विस्तार करण्याबाबत सूचना केल्या.

### पर्जन्यजल संचयनच ठरणार भविष्याचा आधार

# रेन वॉटर हार्वेस्टिंग काळाची गरज, नागरिकांनी पुढाकार घ्यावा

**वर्धा/जनमाध्यम**

उन्हाळ्यात ४७ ते ४८ अंश सेल्सिअस तापमानाची झळ आणि त्यानंतर निर्माण झालेली भीषण पाणीटंचाई यामुळे वर्धा जिल्ह्यासह विदर्भातील जलसंकट अधिक गडद झाले आहे. पावसाळ्यात पाणी मुबलक उपलब्ध होत असले, तरी ते वाहून जाऊ न देता साठविणे आणि जमिनीत मुरविणे हीच भविष्यातील पाणीटंचाईवर प्रभावी उपाययोजना असल्याचे मत पर्यावरण संशोधक प्रा. गौरव सुरकार यांनी व्यक्त केले.



त्यांनी सांगितले की, रेन वॉटर हार्वेस्टिंग म्हणजे पावसाचे पाणी संकलित करून त्याचा वापर करणे किंवा ते जमिनीत मुरवून भूजल पातळी वाढविणे. छतावरील पाणी पाइपद्वारे विहीर, बोअरवेल, सोकपिट किंवा साठवण टाकीत सोडल्यास मोठ्या प्रमाणात पाण्याची बचत होऊ शकते. तसेच शेततळे, बंधारे आणि पाझर तलावांच्या माध्यमातूनही पावसाचे पाणी अडवून जलसंधारणाला चालना देता येते. पर्जन्यजल संचयनामुळे भूजल पातळी वाढते, पाणीबिलात बचत होते, दुष्काळाचा प्रभाव कमी होतो आणि भविष्यातील पाणीटंचाईवर प्रभावी नियंत्रण मिळवता येते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने आपल्या घरात, शाळेत, कार्यालयात आणि शेतात रेन वॉटर हार्वेस्टिंगची व्यवस्था उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. भविष्यातील जलसंकट टाळण्यासाठी केवळ शासनावर अवलंबून न राहता प्रत्येकाने पावसाच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तरच भावी पिढीसाठी सुरक्षित जलसंपदा निर्माण होईल, असे आवाहन प्रा. सुरकार यांनी केले.

**संक्षिप्त**

## ऑगस्ट व सप्टेंबर महिन्याचे शिधावाटप परिमान जाहीर

**वर्धा-** राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजनेंतर्गत अंत्योदय अन्न योजना तसेच प्राधान्य कुटूंब योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे



मोफत वाटप करण्यात येणार आहे. त्यानुसार ऑगस्ट व सप्टेंबरचे शिधावाटप परिमान जाहिर करण्यात आले आहे. ऑगस्ट महिन्यात नियमित प्राधान्य गट योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना प्रति व्यक्ती १ किलो गहू, २ किलो मका व २ किलो तांदूळ, नियमित अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना प्रति शिधापत्रिका ११ किलो गहू, ११ किलो मका व १३ किलो तांदुळ मोफत दिले जाणार आहे. साखर फक्त अंत्योदय योजना प्रति शिधापत्रिका १ किलो प्रमाणे किंवा साठा उपलब्धतेनुसार २० रुपये दराने वाटप करण्यात येईल. सप्टेंबर महिन्यात नियमित प्राधान्य गट योजनेच्या शिधापत्रिकाधारकांना प्रति व्यक्ती २ किलो गहू, १ किलो मका व २ किलो तांदूळ, नियमित अंत्योदय अन्न योजनेच्या शिधापत्रिका धारकांना प्रति शिधापत्रिका ११ किलो गहू, ११ किलो मका व १३ किलो तांदुळ मोफत दिले जाणार आहे. साखर फक्त अंत्योदय योजना प्रति शिधापत्रिका १ किलो प्रमाणे किंवा साठा उपलब्धतेनुसार २० रुपये दराने वाटप करण्यात येईल, असे जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी कळविले आहे.

## जमीन महसूल थकबाकीसाठी मालमत्तेचा लिलाव

**वर्धा-**अमरावती जिल्ह्यातील दर्यापुर येथील न्यायालयाच्या निर्देशानुसार जमीन महसूलाची वसुली करण्यासाठी विजयगोपाल येथील जमीनीची लिलावाद्वारे विक्री करावयाची आहे. त्यासाठी दि.२० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता ग्रामपंचायत कार्यालय, विजयगोपाल येथे जाहीर लिलाव आयोजित करण्यात आला आहे. खरेदीदारांनी लिलावापूर्वी अनामत रक्कम भरून लिलावात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. फौजदारी किरकोळ अर्ज ०४/२०२३ प्रियंका विरुध्द योगेश कलम १२५ (३) मध्ये दर्यापूर न्यायालयाच्या निर्देशानुसार योगेश नारायण डगवार यांच्याकडील जमिन महसूलाची थकबाकी म्हणुन ९ लाख ५१ हजार रुपये इतकी भरपाई म्हणुन देणे अनिवार्य आहे. यासाठी त्यांच्या मालकीचे विजगोपाल येथील शेत सर्व्हे क्रमांक ४८६/१ आराजी १.३९ हेक्टर आर या मालमत्तेची विक्री करुन वसुली करण्यात येणार आहे. सदर मालकमत्तेची विक्री करुन वसुल करण्यासाठी ग्रामपंचायत, विजयगोपाल येथे दि.२० ऑगस्ट रोजी दुपारी १२ वाजता लिलावाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर मालमत्तेची अपसेट किंमत ७ लाख ९२ हजार ७०३ रुपये आहे. ही किंमत मालमत्तेच्या मुल्यांकनाच्या आधारे निश्चित करण्यात आली आहे. इच्छुकांना मालमत्ता लिलावाद्वारे खरेदी करावयाची असल्यास त्यांनी लिलावाच्या दिनांकापुर्वी अनामत रक्कम अपर तहसिल कार्यालय, पुलगाव येथे जमा करावी, असे अपर तहसिलदार पुलगाव यांनी कळविले आहे.

# विद्यार्थ्यांची कागदपत्रे अडविल्याचा आरोप

## अभाविपच्या माजी कार्यकर्त्याचे आमरण उपोषण

**आष्टी/जनमाध्यम**

न्यू मोन्फोर्ट फार्मसी महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांची मूळ शैक्षणिक कागदपत्रे अडवून ठेवत अतिरिक्त रकमेची मागणी केली जात असल्याचा आरोप करत सुरू असलेले आंदोलन तीव्र झाले आहे. या प्रकरणी अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे (अभाविप) माजी कार्यकर्ते अक्षय राजूरकर यांनी महाविद्यालयाच्या आवारात आमरण उपोषण सुरू केले आहे.



विद्यार्थ्यांच्या म्हणण्यानुसार, महाविद्यालय प्रशासनाने अनेक विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे परत न दिल्याने त्यांच्या पुढील प्रवेश प्रक्रिया व शैक्षणिक कामकाजावर परिणाम होत आहे. याविरोधात २३ जुलैपासून विद्यार्थ्यांनी धरणे आंदोलन सुरू केले होते. पोलिसांनी मध्यस्थी करून २४ जुलैपर्यंत कागदपत्रे परत करण्यासाठी महाविद्यालयाला मुदत दिल्याचा दावा आंदोलनकर्त्यांनी केला आहे. मात्र, मुदत संपल्यानंतरही कागदपत्रे न मिळाल्याने आंदोलन अधिक तीव्र करण्यात आले.

यापार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या वतीने अक्षय राजूरकर यांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले. विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे विनाअट परत मिळेपर्यंत आणि या प्रकरणावर कायमस्वरूपी तोडगा निघेपर्यंत उपोषण सुरूच राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. उपोषणादरम्यान प्रकृतीस काहीही अपाय झाल्यास त्याची जबाबदारी महाविद्यालय प्रशासनाची राहील, असे निवेदन तहसीलदार व स्थानिक पोलिसांना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले

दरम्यान, या प्रकरणामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये नाराजीचे वातावरण असून प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे. महाविद्यालय प्रशासनाची भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## लाळ खुरकूत रोगतिबंधक लसीकरण मोहिम

**वर्धा/जनमाध्यम**

लाळ खुरकूत या घातक विषाणूजन्य रोगापासून पशुधनाचे रक्षण करण्यासाठी पशुसंवर्धन विभागाच्यावतीने लाख खूरकूत रोगतिबंधक लसीकरण मोहिम फेरी नऊचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात या मोहिमेला १३ ऑगस्टपासून सुरुवात होत आहे.

लसीकरण मोहिमेदरम्यान आपल्या पशुंचे लसीकरण करुन घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

परीणामकारक लसीकरण होण्यासाठी पशुसंवर्धन विभागामार्फत पशुधनाचे जंत निर्मुलन करण्यात येत असुन आवश्यक औषधींचा पुरवठा सर्व संस्थांना करण्यात आला आहे. महाराष्ट्र गोजातीय प्रजनन नियमन प्राधिकरणाकडे नोंदणीकृत असलेल्या सर्व खाजगी कृत्रिम रेतन तंत्रज्ञांना केंद्र शासनाच्या पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत पशुधनाला एफएमडी लसीकरण करुन त्याची नोंद घेतल्यास प्रति पशुधन ५ रुपये प्रमाणे प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे.

पशुधन रोगांपासून सुरक्षित ठेवणे व पशुपालकांचे आर्थिक नुकसान टाळणे यासाठी लाळ खूरकूत लसीकरण मोहिम फेरी ९ अत्यंत महत्वाची आहे.

या मोहिमेमुळे जिल्ह्यातील हजारो पशुधनाला लाळ खूरकत रोगापासून संरक्षण मिळणार असून पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतुकीसाठी सर्वांनी जबाबदारीने वागा

## वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन

### न्यू इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थी वाहतूक सुरक्षा समितीची बैठक



**वर्धा/जनमाध्यम**

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांच्या निर्देशानुसार न्यू इंग्लिश स्कूल, वर्धा येथे विद्यार्थी वाहतूक सुरक्षा समितीची बैठक उत्साहात पार पडली. बैठकीत शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच शालेय वाहतूक करणारे वाहनचालक व वाहनमालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विलास पाटील यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांची क्षमतेपेक्षा अधिक वाहतूक करू नये, अतिवेगाने वाहन चालवू नये, मद्यसेवन करून वाहन चालविणे टाळावे तसेच प्रत्येक वाहनाची फिटनेस, विमा आणि अन्य आवश्यक कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, असे त्यांनी सांगितले.

वाहनांमध्ये प्रथमोपचार पेटी, अग्निशमन यंत्र तसेच १०८, ११२, १०९१ आणि १०९८ हे आपत्कालीन दूरध्वनी क्रमांक दर्शविणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पालक, शिक्षक आणि वाहनचालक यांचा समन्वय वाढविण्यासाठी व्हॉट्सॲप समूह तयार करून कोणतीही अडचण निर्माण झाल्यास तातडीने पोलिसांची मदत घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. शाळा व महाविद्यालय परिसरात अमली पदार्थांची विक्री, संशयित अथवा मनोरुग्ण व्यक्तींचा वावर आढळल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी. विद्यार्थ्यांना गुड टच आणि बॅड टचबाबत जागरूक करणे तसेच मुलींची वाहतूक करणाऱ्या बसमध्ये महिला सहाय्यक नेमण्याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले.बैठकीच्या प्रारंभी शाळेचे प्राचार्य देवेन गुजरकर यांनी प्रस्तावना केली. शेवटी त्यांनी उपस्थितांचे आभार मानले. विद्यार्थी सुरक्षेसाठी शाळा, पालक, वाहनचालक आणि पोलीस प्रशासन यांनी समन्वयाने काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# राष्ट्रीय सेवारत्न पुरस्काराने इमरान राही यांचा गौरव

**वर्धा/जनमाध्यम**

साहित्यकार आणि ज्येष्ठ समाजसेवक इमरान राही हे केवळ वर्धा जिल्ह्याचे नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्राचे साहित्यरत्न असून समाजसेवा आणि साहित्याच्या माध्यमातून त्यांनी वर्धा जिल्ह्याला राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवून दिली आहे असे गौरवोद्गार प्रख्यात साहित्यिक डॉ. मुनीब हनफी यांनी काढले.



सहारा एज्युकेशन अ‍ॅन्ड वेलफेअर फाऊंडेशन महाराष्ट्रच्या वतीने इमरान राही यांना राष्ट्रीय सेवारत्न पुरस्काराने परभणी येथे सन्मानित करण्यात आले. लातूर येथे झालेल्या मुख्य कार्यक्रमास ते उपस्थित राहू न शकल्याने संस्थेच्या परभणी कार्यालयात विशेष समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी संस्थापक अध्यक्ष अजमत खान, प्राचार्य जावेद अन्सारी, सत्तार इनामदार, आर.डी. मगर, शब्बीर हुसेन कांटेवाले, अ‍ॅड. इब्राहीम बख्श आजाद, सैय्यद आसिफुद्दीन काजी,प्राचार्य रमेश निमसडकर, प्राचार्य अनिल खडतकर, प्रा. सुनील बाभळे, एहसान राही,राजू लभाणे,ज्येष्ठ पत्रकार युसुफ अनवर,प्राचार्य विनोद जवादे,प्रा. इमरान जमादार, प्रा. अजहर पंजेवाले, अमोल मानकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

इमरान राही यांनी सामाजिक आणि साहित्यिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिल्यामुळे त्यांच्याबद्दल आदर आणि अभिमान असल्याचे अजमत खान यांनी सांगितले. साहित्य व संस्कृती क्षेत्रातील त्यांची कामगिरी प्रेरणादायी असल्याचे मत प्राचार्य रमेश निमसडकर यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे संचालन प्राचार्य जावेद अन्सारी यांनी केले तर आभार शब्बीर हुसेन कांटेवाले यांनी मानले. पुरस्काराबद्दल इमरान राही यांचे विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

## वाळूची अवैध वाहतूक

**वर्धा-**जिल्ह्यात अवैध वाळू उपशाविरोधात पोलिसांनी कारवाईची मोहीम सुरू ठेवत खरांगणा (मोरांगणा) पोलिसांनी डोरली शिवारात धडक कारवाई केली. गस्तीवर असलेल्या पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ट्रॅक्टर-ट्रॉलीची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान ट्रॉलीमध्ये वाळूचा साठा आढळून आला. चालकाकडे वाळू वाहतुकीसाठी आवश्यक रॉयल्टीची पावती तसेच वाहनासंबंधी आवश्यक कागदपत्रे नव्हती. त्यामुळे पोलिसांनी ट्रॅक्टर, ट्रॉली व वाळूसाठा असा एकूण ५ लाख ५७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी विजय चाफले (रा. पिपरी-मेघे) व प्रतीक चौधरी (रा. सिंदी-मेघे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ज्युनिअर नेटवर्क अभियंता पदासाठी प्रस्ताव आमंत्रित

**वर्धा-**जिल्हाधिकारी कार्यालयातील सेतु शाखेमधील ज्युनिअर नेटवर्क अभियंताची रिक्त असलेली ३ पदे कंत्राट पध्दतीने बाह्ययंत्रणेद्वारे भरण्यात येणार आहे. यासाठी बाह्य संस्थांनी ३१ जुलै पर्यंत www.mahatenders.gov.in संकेतस्थळावर निविदा सादर कराव्या, असे आवाहन करण्यात आले आहे.ज्युनिअर नेटवर्क इंजिनिअर पदासाठी बी.टेक किंवा बी.ई इन आयटी, ई.ई. किंवा तत्सम तसेच नेटवर्क सर्टीफिकेट अर्हता असावी.

# केळी क्षेत्रवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची आवश्यकता-उमेश घाटगे

## केळी परिषद व प्रशिक्षण कार्यक्रम

**वर्धा/जनमाध्यम**

केळी पिकासाठी दर्जेदार रोपे आणि ठिंबक सिंचनाचा वापर करुन चांगले नियोजन केल्यास अधिक उत्पादन होऊ शकते. केळी पिकाचे हवामान, मध्यम आर्दता आणि जोरदार वाऱ्यापासून संरक्षण होणे आवश्यक आहे. जिल्ह्यात केळी क्षेत्रवाढीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची आवश्यकता असल्याचे मत विभागीय कृषि सहसंचालक उमेश घाटगे यांनी व्यक्त केले.

जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालय व आत्माच्या संयुक्त विद्यमाने जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्ह्यातील केळी मुल्यसाखळी विकास व केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी केळी परिषद व प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाला कृषि विद्यापिठाचे सहाय्यक प्राध्यापक राजेंद्र वानखेडे,कृषि पणन तज्ञ दिलीप पायदेकर, आरोग्य तज्ञ डॉ.स्वप्नील तळवेकर, जिल्हा केळी उत्पादक संघाचे डॉ.निखील ताल्हन, डॉ.विवेक चाकोले, स्वरुपा इंडस्ट्रीजच्या संचालक स्वरुपा चाकोले, वनस्पती संरक्षक अधिकारी संजय वाघ, केळी रत्न पुरस्कारार्थी कुंदन वाघमारे,



निर्यातदार दिपक शिंदे, हिमांशू शिंदे, महेश डुबे, राहूल वांदिले, बाजार समिती वर्धाचे सचिव समीर पेडके उपस्थित होते.

यावेळी राजेंद्र वानखेडे यांनी केळी लागवडीसाठी रोगमुक्त ३० ते ४५ सेमी उंचीची रोपे निवडून दोन रोपातील अंतर १.८ँ१.५ मीटर किंवा १.८ँ१.८ मीटर याप्रमाणे एका हेक्टरमध्ये साधारण ३ ते ३ हजार ७०० रोपाची लागवड करावी. आवश्यकतेनुसार शेतखताचा वापर करावा, असे सांगितले. दिलीप पायदेकर यांनी पणन महामंडळाद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. कुंदण वाघमारे यांनी केळीला बाजारातील मागणी व विविध भागातील केळी पिंकांचे बाजारभाव यावर माहिती दिली. डॉ. स्वप्नील तळवेकर यांनी लहान मुलांना आहारात केळी फळाचे महत्व याविषयावर माहिती दिली.

अरविंद उपरीकर यांनी रिपनिंग चेंबर, प्रक्रिया उद्योग व निर्यात व्यवस्था, केळी मुल्यसाखळीमध्ये प्रक्रिया, पॅकींग, रिपनिंग आणि निर्यात व्यवस्थापनाचे महत्व, केळीपासून विविध उत्पादने बनवून मार्केट लिंकेज करणे, मुल्यसंवर्धनाची संधी व प्रक्रिया उद्योग उभारणीसाठी कृषि विभागाच्या विविध योजनांची सांगड घालून प्रक्रिया उद्योग निर्मितीकडे पाऊल टाकणे योग्य असल्याचे सांगितले. यावेळी निकेश इंगोले, स्वरुपा चाकोले, डॉ.निखिल ताल्हन यांनी सुध्दा उपस्थितांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अरविंद उपरिकर यांनी तर आभार रोहन झांजरे यांनी मानले.यावेळी शेतकरी उत्पादक कंपनीचे प्रतिनिधी, केळी उत्पादक संघाचे प्रतिनिधी, केळी उत्पादक शेतकरी व लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २३९**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिर

## आमदार प्रवीण पोटे यांचे रक्तदान; शेकडो नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा दशक अभियान अंतर्गत आमदार प्रवीण पोटे पाटील यांच्या नेतृत्वात पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुप, अमरावती येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात आमदार प्रवीण पोटे पाटील यांनी स्वतः रक्तदान करून समाजापुढे सेवाभावाचा आदर्श निर्माण केला. तसेच शेकडो नागरिक, युवक आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करत या सामाजिक उपक्रमात सहभाग नोंदविला.

रक्तदान शिबिराला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. स्वेच्छेने रक्तदान करून अनेकांनी गरजू रुग्णांना जीवनदान देण्याच्या या उपक्रमात सहभाग घेतला. सेवा, समर्पण आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देणारा हा उपक्रम सेवा दशक अभियानाचा महत्त्वपूर्ण भाग ठरला.



यावेळी बोलताना आमदार प्रवीण पोटे पाटील म्हणाले, 'रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. आपण दिलेल्या एका रक्तपिशवीमुळे एखाद्या गरजू रुग्णाला नवजीवन मिळू शकते. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून प्रत्येक निरोगी नागरिकाने नियमित रक्तदान करण्याचा संकल्प करावा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा दशक अभियानाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचा आमचा प्रयत्न असून, अशा उपक्रमांमधून समाजात सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकी अधिक दृढ होईल.'

या प्रसंगी जयंत डेहनकर, शिवराय कुळकर्णी, महापौर श्रीचंद तेजवानी, श्रेयस पोटे , चेतन पवार, भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते पी. आर. पोटे पाटील एज्युकेशनल ग्रुपचे सर्व प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी आयोजकांनी विशेष नियोजन केले होते. उपस्थितांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# श्री.विठ्ठल रुक्मीणी संस्थान श्री क्षेत्र कौंडण्यपूर प्रथम क्रमांकाचे मानकरी

## निर्मल वारी, हरीत वारी २०२६ पुरस्कार

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** श्री. विठ्ठल रुक्मीणी मंदिर समिती यांच्या वतीने दरवर्षी पंढरपूरात येणाऱ्या दिंड्यामधून पर्यावरणाची जोपासना वृक्ष लागवड संगोपन प्रदुषण नियंत्रण वारकरी, परंपरा, पालन व वर्षभरात दिंडीच्या संस्थानच्या वतीने राबविणात येणाऱ्या उपक्रमासाठी निर्मल वारी हरीत वारी' हा पुरस्कार निकष पूर्ण करणाऱ्या तीन दिंड्याना देण्यात येतो. पन्नास, पंच्याहत्तर व एक लाख रुपये रक्कम व सन्मान चिन्ह प्रदान करण्यात येते.



या वर्षी सन २०२६ या प्रथम क्रमांकाचा पुरस्कार श्री. विठ्ठल रुख्मीणी संस्थान श्रीक्षेत्र कौंडण्यपूर (विदर्भ) यांना दि.२५ जुफै २०२६ रोज शनिवार (आषाढी एकादशी पर्वावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अमृता फडणवीस यांचे श्री विठ्ठल रुक्मीणी मंदीर समितीचे अध्यक्ष ह.भ.प. गहणीनाथ हैवसेकर, व निर्मल वारी, हरीत वारी प्रशिक्षण समितीचे ह.भ.प. शिवाजी महाराज मोरे, ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, व ह.भ.प.निळेताई यांचे व ना पालकमंत्री जयकुमार गोरे, गिरीश महाजन, आकाश फुंडकर, ह.भ.प. तृषार महाराज भोसले, यांचे उपस्थितीत श्री विठ्ठल रुक्मीणी संस्थानचे पायदळ दिंडी (पालखी) सोहळा प्रमुख तथा संस्थानचे सचिव ह.भ.प. सदानंद महाराज साधू व दिंडी चालक ह.भ.प.पकंज महाराज महल्ले (आळंदीकर) कौंडण्यपूर यांना प विठ्ठल रुक्मीणी महापुजेनंतर श्री विठ्ठल रुक्मीणी मंदिरांचे सभागृहात प्रदान करण्यात आले. या पालखीचे वैशिष्ट्ये की सन १९५४ साली संत सदगुरु सदाराम महाराज यांनी सुरु केली. प्रथम पायदळ दिंडी आज ४३२ वर्ष पूर्ण करित आहे.

श्रीक्षेत्र कौंडण्यपूर अमरावती होऊन ३३ दिवसांचा ६ जिल्ह्यातून प्रवास करित श्री क्षेत्र पंढरपूर येथे पोहचते व पौर्णिमे पर्यत दि. २९ जुलै २०२६ मुक्कामी राहून परतीचा प्रवास करते. या पालखी सोहळ्याचे संचालन विश्वस्त, मंडळाने नियुक्ती केलेली संचालन समिती करते.

या पुरस्काराचे श्रेय एकट्याचे नसून संचालन समितीचे सर्व विश्वस्त मंडळ सदस्य सुरेश चव्हाण, सुनिल वेरूळकर, स्वप्नील जामखटे ,संध्या वानखडे, श्याम श्रीराव, व विणेकरी विठोबाजी बागडे यांचे सर्वाचे असल्याचे संस्थानचे सचिव व सोहळा प्रमुख सदानंद महाराज साधू यांनी कळविले.

# तेली समाजाच्या विदर्भ महिला अध्यक्षपदी प्रा. डॉ. मोनिका उमक

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभा व अमरावती जिल्हा तैलिक समिती यांच्या वतीने आयोजित कार्यक्रमात माजी खासदार नवनीत राणा, मोर्शी नगराध्यक्ष प्रतिक्षा गुल्हाने, आर्वी नगराध्यक्ष स्वाती गुल्हाने उपस्थित होत्या. यावेळी प्रा. डॉ. मोनिका आशीष उमक यांची विदर्भ महिला अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यांच्या नियुक्तीमुळे तैलिक समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



ही नियुक्ती महाराष्ट्राचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे सहमतीने, राजेश हजारे महासचिव , विभागीय अध्यक्ष संजय हिंगासपुरे तसेच महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे राज्याध्यक्ष रामदास तडस यांनी केली.

प्रा. डॉ. मोनिका आशीष उमक या गेल्या अनेक वर्षांपासून 'स्वयंसिद्ध उद्योजकता विकास अभियानाच्या' माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि उद्योजकता विकासासाठी सातत्याने कार्यरत आहेत. त्यांनी विविध उपक्रमांद्वारे जनसहभागातून समाजोपयोगी कार्य करत महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी मोलाचे योगदान दिले आहे.

दरम्यान, याच कार्यक्रमात प्रा. विजय रावजी ढोले यांची विदर्भ कार्याध्यक्ष म्हणूनही नियुक्ती करण्यात आली. त्यांनीही अनेक वर्षे सामाजिक, शैक्षणिक व संघटनात्मक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले असून, त्यांच्या अनुभवाचा समाजकार्यासाठी निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# स्वच्छ, सुंदर अमरावतीसाठी महानगरपालिकेचा पुढाकार

## -आयुक्त डॉ.मंगेश गोंदावले यांची झोन क्र.३ मधील विविध भागांची पाहणी

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासोबतच पावसाळ्यात नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, या उद्देशाने अमरावती महानगरपालिका आयुक्त डॉ. मंगेश गोंदावले यांनी सोमवारी झोन क्र. ३ अंतर्गत विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करून स्वच्छता, नाल्यांची स्थिती, घनकचरा व्यवस्थापन आणि नागरी सुविधांचा सविस्तर आढावा घेतला. पाहणीदरम्यान संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत शहरात स्वच्छता अभियान अधिक प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश त्यांनी दिले.

आयुक्त डॉ.गोंदावले यांनी मधुबन ले-आऊट, साधना कॉलनी, यशोदा नगर चौक, दस्तुरनगर चौक, संजय गांधी नगर क्रमांक १ व २, फ्रेजरपुरा स्मशानभूमी परिसराची पाहणी केली. या भागांतील नाल्यांची साफसफाई, रस्त्यांच्या कडेला साचलेला कचरा, पावसामुळे निर्माण होणाऱ्या समस्या आणि स्वच्छता व्यवस्थेचा त्यांनी बारकाईने आढावा घेतला.



पावसाळ्यात नाल्यांमध्ये गाळ आणि कचरा साचल्यामुळे पाणी साचण्याच्या घटना घडू शकतात. अशा परिस्थितीला आळा घालण्यासाठी सर्व नाल्यांची नियमित साफसफाई करण्याचे, गाळ तातडीने उचलण्याचे आणि पाण्याचा निचरा सुरळीत राहील यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देश आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी आकाशवाणी केंद्राजवळील परिसर व सर्किट हाऊस परिसरातील लाल बंगला येथे नव्याने कचरा संकलन केंद्र उभारण्यासाठी प्रस्तावित जागेचीही पाहणी करण्यात आली. महानगरपालिका प्रशासन शहराला स्वच्छ, सुंदर आणि आरोग्यदायी बनविण्यासाठी सातत्याने विविध उपाययोजना राबवत असून, स्वच्छता व्यवस्थेत अधिक सुधारणा करण्यासाठी नियमित पाहणी, प्रभावी नियोजन आणि काटेकोर अंमलबजावणीवर भर दिला जात आहे. या पाहणीमुळे झोन क्र. ३ मधील स्वच्छता व्यवस्थेला अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. तसेच शहरातील नागरिकांनीही कचरा उघड्यावर न टाकता महानगरपालिकेच्या स्वच्छता उपक्रमांना सहकार्य करावे, असे आवाहन महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले. या पाहणी दरम्यान स्थायी समिती सभापती अविनाश मार्डीकर, पुर्व झोन सभापती इस्माईल कासम लालुवाले, महिला बाल कल्याण समिती सभापती ममता आवारे, नगरसेवक मंगेश मनोहरे, सचिन वैद्य, विक्की वानखडे, नगरसेविका पंचफुला चव्हाण, नुतन भुजाडे, अर्चना पाटील, डॉ.अर्चना आत्राम, विद्या माटे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, सहाय्यक आयुक्त नितीन बोबडे, भुषण पुसतकर, मंगेश कडु, वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) डॉ.अजय जाधव, जेष्ठ स्वास्थ निरीक्षक कुंदन हडाले, स्वास्थ निरीक्षक, मनपा कर्मचारी उपस्थित होते.

# केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा देशाच्या संविधानाचा व लोकशाहीचा विजय - किशोर बोरकर

**अमरावती/प्रतिनिधीः-** पेपर फुटी प्रकरणी गेल्या २५ दिवसांपासून दिल्लीच्या जंतरमंतर येथे वांगचुक आणि अभिजित दिपके यांचे आक्रमक आंदोलन,त्यानंतर देशाचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे पंतप्रधान मोदी यांच्या निवासस्थानी धरणे आंदोलन, आणि या दरम्यान राहुल गांधी यांना पोलिसांनी ताब्यात घेतांना अमानवीय वागणुक ,हि सर्व भाजपा सरकारची मुजोरी, दांडगाई व दडपशाही संपूर्ण देशाने बघितली आहे.



भारत देशाचे उद्याचे शिल्पकार असलेले विद्यार्थी व विद्यार्थ्यांनी सोबत अत्यंत खेदजनक अमानुषपणे पोलीसांनी केलेली मारहाण, सुध्दा देशाने प्रथमच बघितली आहे.या सर्व क्लेशदायक घटनांमुळे संपूर्ण देश ढवळून निघाला आहे.पाच,पाच वर्ष कठोर परिश्रम घेऊन परीक्षेची तयारी करणाऱ्या व येणाऱ्या काळाची उज्वल स्वप्ने बघणाऱ्या विद्यार्थ्यांनी फक्त न्याय मागितला होता, त्यांना न्याय तर फार दुर परंतु त्यांना व त्यांच्या पालकांना सुध्दा अमानुषपणे मारहाण जंतरमंतर येथे करण्यात आली आहे.याचा रोष संपूर्ण देशात पसरला होता.

लोकशाहीच्या माध्यमातून जणभावना पेटुन उठल्या व सरकारच्या हुकूमशाहीला न घाबरता देशातील विद्यार्थी व जनता रस्त्यावर उतरल्यामुळे आणि भाजप सरकार बहुमतात असतांना सुध्दा, केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला. भाजपा सरकारला शेवटी झुकावे लागले,हाच महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानाचा व लोकशाहीचा विजय आहे,अशी प्रतिक्रिया महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे सरचिटणीस किशोर बोरकर यांनी दिली आहे.

## फ्लॅट विकणे आहे

टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल आणि एक रूम असा फ्लॅट आहे.

**संपर्कः** ९४२२८५७१६९, ९४२२९१८५६९

# जिल्हा कॉंग्रेसची इर्विन चौकात निदर्शने

**अमरावती/प्रतिनिधीः-** नवी दिल्लीतील जंतर-मंतर येथे समाजसेवक सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांच्या न्याय्य मागण्यांसाठी सुरू असलेल्या आंदोलनाला पाठिंबा दर्शवत अमरावती जिल्हा कॉंग्रेस कमिटी (ग्रामीण)च्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करून केंद्र शासनाविरुद्ध निदर्शन करण्यात आले. शिक्षण व्यवस्थेतील अनियमितता दूर करून परीक्षा व प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता आणावी, अशी मागणी निवेदनातून जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख यांनी केली. यावेळी शिष्टमंडळात खासदार बळवंत वानखडे ,माजी आमदार विरेंद्र जगताप आदींची उपस्थिती होती,

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. हे निवेदन भारताचे राष्ट्रपती, पंतप्रधान, महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री तसेच संबंधित केंद्रीय व राज्यस्तरीय अधिकाऱ्यांपर्यंत तातडीने पाठविण्याची विनंती करण्यात आली आहे. आंदोलनात हरिभाऊ मोहोड, प्रकाश काळबांडे, रामेश्वर अभ्यंकर,प्रवीण मनोहर, श्रीकांतराव गावंडे,मुकद्दर खाँ पठाण, अरविंदराव लंगोटे, भैय्यासाहेब मेटकर,समीर पाटील, समाधान दहातोंडे, सुनील गावंडे,नितीन देशमुख, बाबूभाई इनामदार,पंकज वानखडे, संजय बेलोकर, गौतम सोनोने,निखिल कोकाटे,अमोल बोरेकर, कैलास आवारे, श्रीकांत बोंडे, प्रदीप देशमुख,विदर्भकुमार बोबडे, शाम बेलसरे, सहदेव बेलकर, इब्राहिम खाँ,राहुल गवई, राहुल गाठे, सच्चिदानंद बेलसरे, गजानन देशमुख, पंकज नेहारे, मिर्झा जाहीर बेग, राहुल येवले,उत्कर्ष देशमुख, अनिकेत डेंगळे,नितेश वानखडे,परिक्षीत जगताप,सागर देशमुख,यांचा सहभाग होता.



## जाहीर सुचना

सर्व लोकांस, तमाम जनतेस, बॅंका, वित्तीय संस्था व पतसंस्था यांना या जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील मालमत्तेचे **मुळ मालक सपना राजेंद्र जयस्वाल, रा.दुर्गानगर मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती** यांच्याशी खालील नमुद विवरणामध्ये व चतुःसिमेत वर्णन केलेली शेतजमीन खरेदी करण्याचा रितसर सौदा (विक्री करार) केला असून विसार रक्कम देवुन सदर मालमत्ता निर्वेध व निष्कटंक असल्याबाबत खात्री करण्यासाठी सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे.

**मालमत्तेचे सविस्तर वर्णन** - मौजे-पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील शेत भुमापन क्र.व उपविभाग ५६/२, भो.वर्ग १, एकुण क्षेत्रफळ १ हे. ४२ आर, पो.ख. ०.००, आकार रु. ३-५५ ही काळी जिरायत शेत जमीन, त्यावर असलेले झाडेझुडुपे, विहीर, पाण्याचे विहीरीवरील मोटरपंप साहित्यासह, स्लॅब खोल्या ३ व इतर बांधकाम, ठिंबक सिंचन व तदंगभूत वस्तुसह, याची चतुःसिमा - पुर्वेस -पाळा ते मोर्शी डांबर रोड, पश्चिमेस - अनंत भुंते यांचे शेत, उत्तरेस -अनिलभाऊ ढोले यांचे शेत व दक्षिणेस - जयस्वाल यांनी लिहुन दिलेली शेतजमीन.

तरी उपरोक्त वर्णन केलेल्या मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, बोजा, गहाण, ताबा, लीन, पोटगी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, वाटणीपत्र, अथवा इतर कोणताही हितसंबंध, वाद किंवा न्यायालयीन स्थगिती असल्यास, त्यांनी ही जाहीर सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ७ (सात) दिवसाच्या आंत खालील स्वाक्षरी करणा-या ॲडव्होकेट यांच्या पत्त्यावर मुळ कागदपत्रांच्या पुराव्यासह लेखी आक्षेप नोंदवावा.

सदर मुदतीत कोणाचाही कोणताही कायदेशिर आक्षेप अथवा तक्रार प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्ता पुर्णपणे निर्वेध व निष्कटंक आहे असे समजुन माझे पक्षकार खरेदीखताचा (Sale Deed) व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर आलेले आक्षेप किंवा मागण्या माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व कोणाचाही उजर चालणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**स्थळ : मोर्शी**
**दिनांक २४.०७.२०२६**

**(ॲड.अमित व्हि.ढोले)**
**रा.विद्याविहार कॉलनी, मोर्शी**
**ता.मोर्शी, जि.अमरावती**
**मो.९६८९५७३४८३**

## जाहीर सुचना

सर्व लोकांस, तमाम जनतेस, बॅंका, वित्तीय संस्था व पतसंस्था यांना या जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील मालमत्तेचे **मुळ मालक सपना राजेंद्र जयस्वाल, रा.दुर्गानगर मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती** यांच्याशी खालील नमुद विवरणामध्ये व चतुःसिमेत वर्णन केलेली शेतजमीन खरेदी करण्याचा रितसर सौदा (विक्री करार) केला असून विसार रक्कम देवुन सदर मालमत्ता निर्वेध व निष्कटंक असल्याबाबत खात्री करण्यासाठी सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे.

**मालमत्तेचे सविस्तर वर्णन** - मौजे-पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील शेत भुमापन क्र.व उपविभाग ५६/२/ब, भो.वर्ग १, एकुण क्षेत्रफळ ० हे. ७९ आर, पो.ख. ०.००, आकार रु. २-०० ही काळी जिरायत शेत जमीन, त्यावर असलेले झाडेझुडुपें अन्य ठिकाणाहून पाण्याचे हक्क, मोटरपंप सहित्यासह, ठिंबक सिंचन व ईतर बांधकामासह, सर्व तदंगभूत वस्तुसह, याची चतुःसिमा - पुर्वेस -पाळा ते मोर्शी डांबर रोड, पश्चिमेस - अनंत भुंते यांचे शेत, उत्तरेस -सपना जयस्वाल यांनी लिहून दिलेले शेतजमीन व दक्षिणेस - मनोहर शेडे यांचे शेत

तरी उपरोक्त वर्णन केलेल्या मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, बोजा, गहाण, ताबा, लीन, पोटगी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, वाटणीपत्र, अथवा इतर कोणताही हितसंबंध, वाद किंवा न्यायालयीन स्थगिती असल्यास, त्यांनी ही जाहीर सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ७ (सात) दिवसाच्या आंत खालील स्वाक्षरी करणा-या ॲडव्होकेट यांच्या पत्त्यावर मुळ कागदपत्रांच्या पुराव्यासह लेखी आक्षेप नोंदवावा.

सदर मुदतीत कोणाचाही कोणताही कायदेशिर आक्षेप अथवा तक्रार प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्ता पुर्णपणे निर्वेध व निष्कटंक आहे असे समजुन माझे पक्षकार खरेदीखताचा (Sale Deed) व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर आलेले आक्षेप किंवा मागण्या माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व कोणाचाही उजर चालणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**स्थळ : मोर्शी**
**दिनांक २४.०७.२०२६**

**(ॲड.अमित व्हि.ढोले)**
**रा.विद्याविहार कॉलनी, मोर्शी**
**ता.मोर्शी, जि.अमरावती**
**मो.९६८९५७३४८३**

## जाहीर सुचना

सर्व लोकांस, तमाम जनतेस, बॅंका, वित्तीय संस्था व पतसंस्था यांना या जाहीर सुचनेव्दारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार यांनी खालील मालमत्तेचे **मुळ मालक सपना राजेंद्र जयस्वाल, रा.दुर्गानगर मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती** यांच्याशी खालील नमुद विवरणामध्ये व चतुःसिमेत वर्णन केलेली शेतजमीन खरेदी करण्याचा रितसर सौदा (विक्री करार) केला असून विसार रक्कम देवुन सदर मालमत्ता निर्वेध व निष्कटंक असल्याबाबत खात्री करण्यासाठी सदरची नोटीस प्रसिध्द केली आहे.

**मालमत्तेचे सविस्तर वर्णन** - मौजे-पाळा, ता.मोर्शी, जि.अमरावती येथील शेत भुमापन क्र.व उपविभाग ५६/२/अ, भो.वर्ग १, एकुण क्षेत्रफळ ० हे. ८१ आर, पो.ख. ०.००, आकार रु. २-०५ ही काळी जिरायत शेत जमीन, त्यावर असलेले झाडेझुडुपे, विहीर, पाण्याचे विहीरीवरील मोटरपंप साहित्यासह, ठिबक सिंचन व बांधकामासह, सर्व तदंगभूत वस्तुसह, याची चतुःसिमा - पुर्वेस -पाळा ते मोर्शी डांबर रोड, पश्चिमेस - अनंत भुंते यांचे शेत, उत्तरेस -सपना जयस्वाल यांनी लिहून दिलेले शेत व दक्षिणेस - सपना जयस्वाल यांनी सदर विस्तार पावतीत लिहुन दिलेली शेतजमीन.

तरी उपरोक्त वर्णन केलेल्या मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, बोजा, गहाण, ताबा, लीन, पोटगी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, वाटणीपत्र, अथवा इतर कोणताही हितसंबंध, वाद किंवा न्यायालयीन स्थगिती असल्यास, त्यांनी ही जाहीर सुचना वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासुन ७ (सात) दिवसाच्या आंत खालील स्वाक्षरी करणा-या ॲडव्होकेट यांच्या पत्त्यावर मुळ कागदपत्रांच्या पुराव्यासह लेखी आक्षेप नोंदवावा.

सदर मुदतीत कोणाचाही कोणताही कायदेशिर आक्षेप अथवा तक्रार प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्ता पुर्णपणे निर्वेध व निष्कटंक आहे असे समजुन माझे पक्षकार खरेदीखताचा (**Sale Deed**) व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर आलेले आक्षेप किंवा मागण्या माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही व कोणाचाही उजर चालणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**स्थळ : मोर्शी**
**दिनांक २४.०७.२०२६**

**(ॲड.अमित व्हि.ढोले)**
**रा.विद्याविहार कॉलनी, मोर्शी**
**ता.मोर्शी, जि.अमरावती**
**मो.९६८९५७३४८३**

## जाहीर सुचना

आम जनतेस या जाहीर सुचनेव्दारे सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार **निलेश पोपटलाल शाह, रा.बनोसा, दर्यापूर** यांच्या नावे **१. दीपक पोपटलाल शाह, २. विपुल पोपटलाल शाह, ३. माधुरी रमेश वखारिया व ४.चेतन अजय वैद्य** यांनी दस्त क्र.२२२८/२०१९ दि.१८/०९/२०१९ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय दर्यापूर मध्ये नोंदलेला मुळ हक्क सोडल्याचा लेख त्यामध्ये असलेल्या मालमत्तेचे वर्णन :-मौजा- बनोसा, ता.दर्यापूर, जि.अमरावती येथील नझुल शीट नं.२७ मधील प्लॉट नं.१०६७ क्षेत्रफळ १५.७ चौ.मी.असे आहे. सदर मुळ हक्क सोडल्याचा लेख माझे माझे पक्षकाराजवळून हरवलेला आहे. त्यासंबंधी रितसर तक्रार सुध्दा माझे पक्षकार यांनी पोलिस स्टेशन दर्यापूर येथे दिलेली आहे. तरी ज्या कुणाला सदर हक्क सोडल्याचा लेख सापडले असेल त्यांनी मला खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर किंवा पत्यावर संपर्क साधावा.

**कार्यालय - श्री भागवत नगर, यशवंत लॉनच्या मागे, साईनगर, अमरावती**
**मो.क्र.- ९६६५७८६६७६**

**अमरावती.**
**दिनांक २५/०७/२०२६**

**स्वाक्षरी/-**
**ॲडव्होकट पंकज एन.ठाकरे**

## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे **मोहन विनायक काठोके** यांचे वतीने सदरची जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन :- मौजे-नवसारी,प्रगणे-नांदगाव पेठ,प्लॉट क्र.8/B/1, याचे एकुण क्षेत्रफळ 827.175 चौ.फुट, शेत सर्वे क्र.2,ता.आणि जि.अमरावती**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **मोहन विनायक काठोके** हे **जय अशोकराव वानखडे** यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेल आहे. तसेच **मोहन विनायक काठोके PNB HOUSEING FINANCE LIMITED येथे कर्जासाठी अर्ज केला असता सदर मिळकतीचे पूर्वीचे मुळ खरेदी खत ज्याचे दि.२८/०४/२०२१ रोजीचे दस्त क्र.२७०५ मुळ दस्त गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण/ राष्ट्रीयकृत /खाजगी /पतसंस्था/ सहकारी /इतर बॅक बोजा, कोणाचा मालकी अथवा वारसा हक्क, इतर बॅक गहाण-बोजा नोंद, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मो.क्र. वर ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या **७ (सात) दिवसाच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी तद्‌नंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता **PNB HOUSEING FINANCE LIMITED** येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार रितसर खरेदी खत नोंदणीकृत करुन सदर मालमत्ता गहाण करण्यात येईल करिता ही जाहीर सूचना देत आहे.

ठिकाण -तालुका आणि जिल्हा अमरावती
दि.२४/०७/२०२६

STAMP

-आपला-
**ॲडव्होकेट**
**रविंद्र रु.वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती**
**मो.नं. ९८२३६९८७४५**

## जाहीर नोटीस

**नोटीस देणार -**



**किशोर तिखिले**

१) **सौ.अनिता किशोर तिखिले,** वय ५६, धंदा-शेती
२) **कु.मोनाली किशोर तिखिले, लग्नानंतर सौ.मोनाली संकेत थोटांगे,** वय ३१ वर्षे, रा.पुणे
३) **कु.प्रगती किशोर तिखिले,** वय २७ वर्षे
४) **गौरव किशोर तिखिले,** वय २५ वर्षे
सर्व्हे नं. १ व ४ रा. रविकिरण कॉलनी जवळ, जगदाळे लेआउट साईनगर, मु.पो. अमरावती- ४४४६०१

तर्फे :- **ॲड.डी.बी.अग्रवाल, मुर्तिजापुर रोड, गणेशपुर, ता.दर्यापूर, जि.अमरावती**

मी खालील सही करणार जाहीर नोटीस देतो की,

**१)** आमचे उपरोक्त पक्षकार हिंदु कुटुंबातील घटक असुन नोटीस देणार नं.१ यांचे लग्न किशोर देविदास तिखिले सोबत २८/०३/१९९३ ला झाले होते. त्यांचू पासून तिला नोटीस देणार नं.२,३ व ४ हे तीन अपत्ये आहेत. नोटीस घेणार नं.२ हिचे लग्न झाल्यामुळे ती पतीसोबत पुणे येथे राहते व इतर उपरोक्त पत्यावर राहतात.

**२)** नोटीस घेणार नं.१ चे पती किशोर तिखिले हे जुन २०१२ मध्ये मुंबईला कामानिमित्त जातो म्हणुन घरुन निघुन गेले तेंव्हापासुन ते आजपर्यतही परत आले नाही. त्यांचा कोणताही फोन, मॅसेज व इतर माहिती आमचे पक्षकारापर्यत पोहचलेली नाही. कु. मोनाली चे लग्न २०२१ मध्ये झाले त्यावेळी सुध्दा ते आले नाही. आमचे पक्षकाराने त्यांची बरीच शोधोशोध केली. वाट पाहून एप्रिल २०१५ मध्ये पोलीस स्टेशन लोणी येथे याबाबत रिपोर्ट दिला होता. तरी सुध्दा अजुनपर्यत त्यांचा कोणताही सुगावा मिळालेला नाही. या लापता झालेल्या किशोर तिखिले व्यक्ती बाबत कोणालाही काही माहिती असल्यास आमच्या पत्यावर कळवावे.

करिता जाहीर नोटीस दिली आहे.

**दिनांक -२४/०७/२०२६**

**सही/-**
**ॲड. डी.बी.अग्रवाल, गणेशपुर**
**मोबा.- ७५८८०८५२०१**

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ३१८**
**आर.एन.आय.रजी.नं.** 49763/89 **पोस्टल लायसन क्र.** ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त




आषाढी एकादशी निमित्त अचलपूर शहरातील विलायतपुरा येथील प्राचीन विठ्ठल रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी भक्तांची मोठी गर्दी होती.मंदिराच्या परिसरात रितेश राखोंडे व दुर्गेश बर्वे यांनी आषाढी एकादशी निमित्त विठु रायाची काढलेली रांगोळी भक्तांसाठी आकर्षावगे केंद्र ठरली.

**छायाचित्र-हरिष पुरोहित, अचलपूर**



गेल्या दोन-तीन दिवसांपासून झालेल्या समाधानकारक पावसामुळे शिवारातील पिकांना नवसंजीवनी मिळाली असून शेतकऱ्यांनी सोयाबीन पिकाच्या डवरणीच्या कामाला वेग दिला आहे. सोयाबीन शेतातील डवरणी करतानाचे हे दृश्य.

**छायाचित्र : किशोर मोकलकर,** आसेगाव पूर्णा



## जनता विद्यालयात शिक्षक-पालक सभा

**अंजनगाव बारी-**जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, अंजनगाव बारी येथे चालू शैक्षणिक वर्षातील शिक्षक-पालक संघाची सभा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक गजेंद्र अवघड,तर पर्यवेक्षिका मनीषा चिंचोळकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात माता सरस्वती व स्वर्गीय भाऊसाहेब दातीर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. सभेचे प्रास्ताविक मनीषा चिंचोळकर यांनी केले. यानंतर शिक्षक-पालक संघाचे पुनर्गठन करण्यात आले. संघाच्या अध्यक्षपदी गजेंद्र अवघड यांची, तर उपाध्यक्षपदी पालक प्रतिनिधी जयेश राम नरेश राजकुमार यांची निवड करण्यात आली. शिक्षक प्रतिनिधी म्हणून सरिता राणे यांची नियुक्ती करण्यात आली. मुख्याध्यापक गजेंद्र अवघड यांनी पालकांच्या शंकांचे समाधान करताना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीत पालक आणि शिक्षक यांचा परस्पर समन्वय अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले.सभेला शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने पालक उपस्थित होते. संचालन डॉ. अर्चना पोकळे यांनी केले, आभार धनंजय चांदोरे यांनी मानले.



## एनसीसी प्रवेश प्रकिया यशस्वी

**चांदुर रेल्वे-**स्थानिक राजर्षी शाहू सायन्स कॉलेज चांदुर रेल्वे व ६२ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता एन.सी.सी प्रवेश प्रकिया राबविण्यात आली.सदर प्रवेश प्रकिया करिता एकूण २३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रवेश प्रकिया दरम्यान नोंदणी, कागदपत्र पडताळणी, लेखी प्रवेश परीक्षा व शारीरिक कार्यक्षमता चाचणी याचा समावेश होता. सर्व चाचण्यांचे मूल्यमापन S+ ते एफ श्रेणी व गुणांकन पद्धतीनुसार पारदर्शकपणे करण्यात आले. संपूर्ण निवड प्रक्रिया पीआय स्टाफ मेघनाथन रेड्डी,ललित कुमार व कर्नल आशिष चंद्रा, कमांडिंग ऑफिसर, ६२ महाराष्ट्र बटालियन एन.सा.सी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्य डॉ पी आर वडनेरकर यांच्या प्रेरणेने यशस्वीरित्या पार पडली. या प्रसंगी कॅडेट शौर्य रंगारी, कॅडेट हर्ष मलाधारी, कॅडेट अनुश्री गिरि व कॅडेट तनुश्री औरासे यांना CATC शिबीर ८ महाराष्ट्र बटालियन एन.सी.सी अमरावती येथे यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सन्मानीय प्राचार्य यांच्या शुभ हस्ते प्रमाणपत्र व पुष्प देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता CTO प्रा.डॉ.एस.एस.पाढेन, प्रा.ए.एन.खान सर्व सिनियर कॅडेट यांनी अथक परिश्रम घेतले.

# विभागात आतापर्यंत ९,७३२ विद्यार्थ्यांना ११वीला प्रवेश


## अजूनही ३,६३७ जागा रिक्त

**अमरावती/का.प्र.**

राज्यात इयत्ता ११वीची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. नियमित आणि विशेष फेऱ्या होऊनही अनेक जागा रिक्त आहेत. कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये, यासाठी सहा फेऱ्यांनंतर, इयत्ता ११वीच्या सातव्या आणि चौथ्या विशेष फेऱ्यांनंतर विद्यार्थ्यांसाठी पोर्टल सुरू केले जात आहे. या विभागात ३,६३७ जागा रिक्त आहेत. या रिक्त जागांच्या प्रवेशासाठी शुक्रवार, २४ जुलैपासून विशेष फेरी आयोजित केली जाईल.

शिक्षण विभागाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार, रिक्त जागांची यादी शुक्रवार, २४ जुलै रोजी सकाळी १० वाजता सादर केली जाईल. यानुसार, नोंदणीकृत विद्यार्थी २६ जुलै रोजी दुपारी ३ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत अर्जामध्ये त्यांच्या पसंतीच्या १० महाविद्यालयांची नावे नोंदवू शकतील. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप ११वीच्या प्रवेशासाठी अर्ज केलेला नाही, ते देखील पात्र असतील. विद्यार्थ्यांची निवड त्यांच्या महाविद्यालयाच्या पसंती आणि गुणांच्या आधारे केली जाईल.

ही यादी सोमवार, २७ जुलै



रोजी जाहीर केली जाईल. विद्यार्थी मंगळवार, २८ जुलै रोजी सकाळी १० वाजल्यापासून आपापल्या महाविद्यालयांमध्ये थेट पात्र असतील. विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगिन आयडीद्वारे ज्युनियर कॉलेजची माहिती उपलब्ध होईल. विद्यार्थी बुधवार, २९ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत आपापल्या महाविद्यालयांमध्ये नावनोंदणी करू शकतील. हे लक्षात घेण्यासारखे आहे की राज्यातील ९,६९८ ज्युनियर कॉलेजांमध्ये अंदाजे १,३९,२०१ जागा भरल्या जाण्याची अपेक्षा आहे, परंतु आतापर्यंत केवळ १,०७,४९२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. यापैकी ९६,५६७ कॅम्प कोट्यातून आणि १०,९०५ कोटा प्रवेश कोट्यातून आहेत. विभागात शिबिर प्रवेशासाठी एकूण १३,३६९ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते, तर आतापर्यंत कोट्यातील प्रवेशासाठी २,४१८ अर्ज स्वीकारण्यात आले आहेत. विज्ञान, वाणिज्य आणि कला शाखांमधील ९,९५७ वाटप करण्यात आली, परंतु ९,७३२ विद्यार्थ्यांनी थेट प्रवेश घेतला आहे. उर्वरित २२५ विद्यार्थ्यांना त्यांच्या पसंतीचे महाविद्यालय न मिळाल्याने प्रवेश मिळू शकलेला नाही. प्रवेश अर्जांच्या आधारे विभागात ३,६३७ जागा रिक्त आहेत.

## आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्यांचा विद्यापीठात ३१ जुलैला सत्कार

**अमरावती/प्रतिनिधी**

विद्यापीठ अंतर्गत सर्व विद्यार्थी विकास अधिकारी आणि समान संधी कक्ष समन्वयक यांच्या कार्यशाळेचे ३१ जुलै रोजी सकाळी १० वाजता विद्यापीठातील डॉ. के. जी. देशमुख सभागृह येथे आयोजन करण्यात आले आहे.या समारंभामध्ये मध्य विभाग, अखिल भारतीय व राष्ट्रीय कव्वाली आंतर विद्यापीठ अशा विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य प्राप्त करणारे विद्यार्थी व व्यवस्थापकांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह देऊन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या हस्ते गौरविले जाणार आहे. सत्कार सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून पार्श्वगायिका वैशाली माडे उपस्थित राहणार आहे.

संबंधितांनी कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी केले आहे.

## श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाला 'स्वायत्त' दर्जा

**अमरावती/का.प्र.**

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळद्वारा संचालित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, महाविद्यालयाला विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'स्वायत्त' महाविद्यालयाचा दर्जा प्रदान केला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील ही अत्यंत अभिमानास्पद आणि ऐतिहासिक उपलब्धी मानली जात असून, यामागे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सहकार्य आणि सकारात्मक भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे.

श्री हव्याप्र अभियांत्रिकी महाविद्यालयाने स्वायत्त दर्जासाठी सादर केलेला प्रस्ताव संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शिफारस केल्या नंतर विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) कडून दहा वर्षांच्या कालावधीकरिता स्वायत्त दर्जा प्रदान करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

यासंदर्भातील अधिकृत पत्र यूजीसीकडून विद्यापीठाला प्राप्त झाले आहे. स्वायत्त दर्जा प्राप्त झाल्यामुळे महाविद्यालयाला अभ्यासक्रम रचना, मूल्यांकन पद्धती, उद्योगाभिमुख शिक्षण, संशोधन, कौशल्य विकास आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार विविध नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविता येणार आहेत. विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, आधुनिक अभ्यासक्रम आणि रोजगाराभिमुख संधी उपलब्ध करून देण्यासाठी या दर्जाचा मोठा लाभ होणार आहे. महाविद्यालयाच्या या यशाबद्दल श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष एड. प्रशांत देशपांडे, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके, कोषाध्यक्ष प्राचार्य डॉ. श्रीनिवास देशपांडे, सचिव प्रा. विकास कोळेश्वर, सचिव प्रा. रवींद्र खांडेकर, प्रा. दीपाताई कान्हेगावकर यांनी अमरावती विद्यापीठाचे आभार तर अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. डाळू व सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांचे अभिनंदन केले आहे.

हे यश मंडळाचा गौरव वाढवणारे असून मंडळाचे यांचेसह मंडळाचे समस्त पदाधिकारी, प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### मुख्यमंत्री यांच्या हस्ते 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार' प्रदान

## श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थानला प्रथम क्रमांक

**कुऱ्हा/वार्ताहर**

देवशयनी आषाढी एकादशीनिमित्त आज श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'श्री विठ्ठल निर्मल दिंडी पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आले. शतकानुशतकांची पायी वारीची परंपरा जपत स्वच्छता, पर्यावरण, सामाजिक जनजागृती आणि प्रबोधनाचा संदेश देणाऱ्या दिंड्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. यंदाच्या पुरस्कारामध्ये श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर संस्थान यांनी प्रथम क्रमांक पटकावला. संस्थानला रु १ लाखांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक वारकरी धर्मसंकीर्तन सेवा



प्रतिष्ठान, जालना यांना मिळाला. त्यांना रु ७५ हजारांचा धनादेश व सन्मानचिन्ह, तर तृतीय क्रमांक श्री गोऱ्हेकर संस्था, आळंदी यांना मिळून रु ५० हजारांचा धनादेश व सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारकरी संप्रदायाची परंपरा, समाजप्रबोधनातील दिंड्यांचे योगदान आणि स्वच्छ,निर्मल वारीच्या संकल्पनेचे कौतुक करत सर्व विजेत्या संस्थांचे अभिनंदन केले. वारकरी परंपरेतून समाजाला सकारात्मक दिशा देणाऱ्या अशा उपक्रमांना राज्य शासनाकडून पुढेही प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी यावेळी सांगितले.

## न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलची वारी पांडुरंगाचा दारी

**अमरावती/का.प्र.**

बालाजी नगर, मोती नगर वार्ड स्थित न्यु गोल्डन इंग्लिश हायस्कुल, एन. जी. पब्लिक स्कूल तसेच साहिल प्राथ. व माध्य. शाळेच्या संयुक्त विध्यमाने आषाढ बाल दिंडी सोहळा हर्षोल्हासात पार पडला. महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठू माऊलीचे आशिर्वाद मिळवण्याकरिता वारकरी संप्रदायाच्या परंपरेनुसार आषाढी एकादशीच्या पावन पर्वावर दरवर्षी प्रमाणे यंदाही विद्यार्थ्यांची बालदिंडी काढण्यात आली. याप्रसंगी शाळेच्या प्रांगणामध्ये बाल वारकऱ्यांचा भक्तीमळा फुलला होता. या दिंडी सोहळ्याकरिता संस्थेचे अध्यक्ष अनिलजी आसलकर उपस्थित होते.यावेळी टाळ मृदुंगाच्या गजरात माऊलीच्या नामघोषाने दुमदुमलेल्या दिंडीने संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. पारंपारिक वेशभूषेमध्ये बाल वारकऱ्यांनी आतिशय उत्साहाने आषाढी एकादशी दिंडीमध्ये सहभाग घेतला. संपूर्ण श्रृंगारलेली ऐटदार पालखी, डोक्यावर तुळशी वृंदावन, हातामध्ये विणा, मृदंग, भक्तिभावाने डोईवर घेतलेला ग्रंथ, पालखीवर धरलेले छत्र चामर आणि मुखाने चाललेला होता.

सदर दिंडीमध्ये शाळेतील कर्मचारी कांचन



पांडे यांनी आपल्या सुमधुर वाणीने भजने गायलीत.मोतीनगर येथून निघालेली दिंडी कालीमाता मंदिर सबनीस प्लॉट, महानुभाव आश्रम रोड मार्गे फरशी स्टॉप येथील श्री विठठल रुख्मिणी मंदिरामध्ये दर्शनाकरिता थांबली.मंदिर परिसरामध्ये एन. जी. पब्लिक स्कुल च्या विद्यार्थ्यांनी संत गोरा कुंभार हि नृत्य नाटिका सादर केली तसेच न्यु गोल्डन इंग्लिश हायस्कुल च्या लेझीम पथकाने लेझीम सादरीकरण केले. त्या नंतर पालखी व बालभक्तगण प्रसाद कॉलनी साई मंदिर मार्गे शाळेमध्ये परतले. प्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियानामार्फत धम्माचा प्रसार

**चांदुर रेल्व/वार्ताहर**

तीन महिन्याचा वर्षावास कालखंडामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियानामार्फत बुद्ध आणि धम्माचा प्रसार आणि प्रचार करणार असल्याचं प्रतिपादन अभियान उपप्रमुख पपीता मनोहरे यांनी केले.

संपूर्ण १३ ही तालुका मध्ये अभियान आपल्या दारी, संडे म्हणजे मटण डे नसून विहार डे साजरा करण्याचा संकल्प डॉ बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियान अमरावती जिल्ह्याच्या वतीने चांदुर रेल्वे येथे



जिल्हाध्यक्ष बंडू आठवले यांच्या कमलकुंज निवासस्थानी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी अभियानाचे उपप्रमुख पपिता मनोहरे, अभियान कौर कमिटी प्रमुख पदमाकर वहिले, जिल्हाध्यक्ष बंडू आठवले उपस्थित होते.आषाढ पौर्णिमा ते कार्तिक पौर्णिमा वर्षावासाच्या कालखंडामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर धम्म प्रशिक्षण अभियानामार्फत संपूर्ण अमरावती जिल्ह्यामध्ये अभियान आपल्या दारी, संडे म्हणजे मटण डे नसून विहार डे आहे.

प्रत्येक तालुक्यात जाऊन बौद्ध धम्माचा प्रसार आणि प्रचार करण्यात येईल, तसेच चांदूर रेल्वे तालुका मध्ये अधिष्ठान स्पर्धेचे सुद्धा आयोजन करण्यात येणार आहे. त्यासाठी अनुक्रमे पहिले दुसरे तिसरे आणि उत्साहान पर बक्षीस दिले जाणार आहेत. यावेळी जिल्हा उपप्रमुख मृदुलाताई हेरोडे, नांदगाव खंडेश्वर तालुकाप्रमुख प्रदीप कोकाटे, चांदुर रेल्वे तालुकाप्रमुख मनोज गवई, दिवसा तालुकाप्रमुख बंडू ढोणे,लता बागडे,रजनी गजभिये,अरुणा आठवले,आर्वी तालुका प्रमुख माया काळबांडे, दुर्गा खंडारे सह तालुक्यातील व शहरातील पदाधिकारी उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सुरक्षिततेबाबत नेहमी जागरूक आणि निर्भय राहावे- लिंगोट



**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श याची योग्य माहिती प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कोणत्याही अनुचित प्रकाराला घाबरून न जाता विश्वासू व्यक्ती, पालक, शिक्षक किंवा पोलिसांना त्वरित माहिती दिल्यास अनेक गंभीर घटना टाळता येऊ शकतात. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सुरक्षिततेबाबत नेहमी जागरूक आणि निर्भय राहावे,' असे प्रतिपादन चांदूर रेल्वे पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक नंदलाल लिंगोट यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका मेश्राम होत्या, तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे अधीक्षक अविनाश नवघरे उपस्थित होते.

त्यांनी विद्यार्थ्यांनी अशा मार्गदर्शनाचा लाभ घेऊन सुरक्षित, सजग व जबाबदार नागरिक बनावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आकाश मोटघरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन अजमिरे यांनी मानले. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबीर

**चांदूरबाजार/वार्ताहर**

चांदूर बाजार तालुका ग्रामीण भारतीय जनता पार्टीच्या शिरजगांव कसबा मंडळातर्फे, राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या सामाजिक उपक्रमाला कार्यकर्ते व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.या शिबिरामध्ये तब्बल ५१ बाटल्या रक्ताचे संकलन करण्यात आले. रक्तदाना सारख्या जीवनदायी उपक्रमातून, मुख्यमंत्र्यांचा वाढदिवस, समाजोपयोगी पद्धतीने उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, रक्तदाते तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आयोजकांनी रक्तदात्यांचे आभार मानत भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्याचा संकल्प व्यक्त केला. यावेळी भाजपाचे तालुकाध्यक्ष हर्षल धुळे, जिल्हाउपाध्यक्ष मुरली माकोडे, जिल्हासचिव मनोहर सुने, सरचिटणीस अतुल दा?ोकार, चंद्रशेखर खडांगळे,प्रणित खवले,संजय थेलकर,बंडू अर्डक, निलेश देशमुख, सागर शिरभाते,दीक्षित खाजोने,पंकज वरठी,जगदीश पेठे,साहेबराव अस्वार, जयश्री पंडागडे,प्रीतम पवार,प्रफुल बिजवे,राहुल गांजरे,अभिजित तायडे, जितु पवार, पिंटू तायवाडे,कैलाश धुर्वे,दीपक गोहत्रे,स्वप्नील पावडे,जानराव डोमाळे,गोलु अलोणे,पवन राठोड,प्रेम दास राठोड, इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

## श्री मन्नालाल गुप्ता विद्यालयात वारकरी परंपरेचा उत्सव

### संत तुकाराम महाराजांच्या संदेशातून वृक्षारोपण व वृक्षवाटप!

**चांदूर रेल्वे/वाताईर**

स्थानिव श्री मन्नालाल गुप्ता विद्यालयातङ्ङ आषाढी एकादशीचे औचित्य साधून विविध शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे थाटात आयोजन करण्यात आले. संत जगद्गुरू तुकाराम महाराजांच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी' या अभंगाचा मूलमंत्र जपत, पर्यावरण संवर्धन आणि संस्कृतीचा अनोखा संगम या कार्यक्रमात पाहावयास मिळाला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना वाव मिळावा, या उद्देशाने या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांच्या भव्य पालखी सोहळ्याने झाली. विठ्ठल-रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम यांच्या रूपामध्ये



सजलेल्या चिमुकल्यांनी उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'ज्ञानबा-तुकाराम' च्या जयघोषात परिसर भक्तिमय झाला होता. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नयनरम्य वारकरी नृत्य आणि भजन गायनाने कार्यक्रमाची रंगत अधिकच वाढवली.

'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' व वृक्षवाटप केवळ धार्मिक सण साजरा न करता सामाजिक उत्तरदायित्व जपण्यासाठी आषाढी एकादशीच्या निमित्ताने उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण व वृक्षवाटप करण्यात आले. निसर्गाचे रक्षण हाच खरा धर्म मानून विद्यार्थ्यांनी रोपांचे संगोपन करण्याची शपथ घेतली. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सक्षम बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष राजीव शिवणकर तथा शाळेचे मुख्याध्यापक नितीनजी कडू, शिक्षक दशरथ हिंगणकर, तुषार ठाकरे, सनील झोपाटे, प्रकाश ठाकरे, प्रशांत मकेश्वर, मुदस्सर शेख; ज्येष्ठ शिक्षिका स्वप्नाली चौखंडे, अश्विनी देशमुख, वैशाली गिरी, भाग्यश्री अवघड,शरयू काळे, साबिया पठाण, शीला कणके तसेच शिक्षकेतर कर्मचारी विश्वजीत देशमुख, गजानन चव्हाण, बाळासाहेब देशमुख प्रामुख्याने उपस्थित होते. विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी स्वतः हिरिरीने सहभाग घेऊन हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पाडला.

## जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की मी, माझे पक्षकार नामे **मोहन विनायक काठोके** यांचे वतीने सदर जाहीर नोटीस देतो ती येणे प्रमाने,

**मिळकतीचे वर्णनः मौजे नवसारी, प्रगणे- नांदगाव पेठ, प्लॉट क्रं. ८/B विभाजित प्लॉट क्रं. ८/B/१ याचे एकूण क्षेत्रफळ ८२७.१७५ चौ. फुट. शेत सर्वे क्रं. २, ता. आणि जिल्हा. अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **मोहन विनायक काठोके हे जय अशोकराव वानखडे यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तसेच मोहन विनायक काठोके PNB HOUSING FINANCE LIMITED येथे कर्जासाठी अर्ज केलेला असता सदर मिळकतीचे पूर्वीचे मूळ खरेदीखत ज्याचे दि. २८/०४/२०२१ रोजीचे दस्त क्र. २७०५ मूळ दस्त गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किवा कुठे गहान/राष्ट्रीयकृत / खाजगी//पतसंस्था/सहकारी/इतर बँक बोजा, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बँक गहाण-बोजा नोंद, इतर कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्रं. वर हि जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या **७ दिवसाच्या आत** पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राह्य धरल्या जाणार नाही. आणि सदर मालमत्ता **PNB HOUSING FINANCE LIMITED. येथे कर्जासाठी केलेल्या अर्जानुसार रीतसर खरेदी खत नोंदणीकृत करून सदर मालमत्ता गहाण करण्यात येईल** करिता हि जाहीर सूचना देत आहे. आपला

ठिकाण - तालुका आणि जिल्हा अमरावती.
दि. २४/०७/२०२६

**ॲडव्होकेट**
**रवींद्र रू. वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलनी, अमरावती**
**मो. नं. ९८२३६९८७४५**

# मेळघाटातील कुपोषण नियंत्रणासाठी उपाययोजना करणार

## -महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे



**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाटातील चिखलदरा आणि धारणी तालुक्यातील कुपोषणाचा प्रश्न गंभीर आहे. याबाबत शासन सकारात्मक पावले उचलत असून गेल्या काळात कुपोषणाचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली आहे. येत्या काळातही माता आणि बाल संगोपनासाठी विविध उपयोजना करण्यात येऊन मेळघाटातील कुपोषण नियंत्रित करण्यावर भर देण्यात येईल, अशी माहिती महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिली.

धारणी येथील तहसील कार्यालयात मेळघाटातील विविध प्रश्नाबाबत आज (दि.२५) आढावा घेण्यात आला. यावेळी प्रभुदास भिलावेकर, उपविभागीय अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, महिला बालविकास उपायुक्त विलास मसराळे आदी उपस्थित होते.

तटकरे म्हणाला, मेळघाटात काही प्रमाणात बालविवाहाची समस्या आहे. त्यामुळे कमी वयात मातृत्व येत असल्याने कुपोषित बालके जन्माला येण्याची शक्यता असते. यावर उपाययोजना म्हणून बालविवाहासोबतच मातांना पोषक आहार मार्गदर्शनासाठी महिला सेविकेची निवड करून तिला प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या सेविकेमार्फत आदिवासींना समजेल अशा भाषेत आरोग्यविषयक माहिती देण्यात येणार आहे. तसेच बाळ जन्माला आल्यानंतर १ हजार दिवसांच्या आहाराचे नियोजन करण्यात येणार आहे. शासनाच्या या उपाययोजनांमुळे कुपोषित बालके जन्माला येण्यापासून बचाव होणार आहे.

मेळघाटातील अंगणवाडी स्मार्ट करण्यासाठी विजेच्या सोयीसाठी सोलार, स्वच्छतागृह आणि शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. याठिकाणी गरोदर मातांना देण्यात येणारा आहार त्यांनी ☞(पान २ वर)

# चिमुकल्यांची पंढरीची वारी...



**तिवसा/प्रतिनिधीः-** तिवसा येथे आज सर्वत्र आषाढी एकादशीनिमित्त ठिकठिकाणी कार्यक्रम साजरे होत असतांना येथील गणेशदास राठी संस्थेअंतर्गत येणाऱ्या श्री देवरावदादा हायस्कूलच्या इंग्लिश स्कुलच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अक्षरशः विठ्ठल-रुख्मिनीच्या भूमिका हुबेहूब सादर केल्या.सोबतच टाळ-मृदंग घेऊन,पांढरे फेटे,डोक्यावर तुळसी वृंदावन घेऊन वाजत-गाजत विद्यार्थ्यांनी शहरातून काढलेल्या वारी ने संपूर्ण जनतेचे लक्ष वेधून घेतले.मुलांना तयार करण्यासाठी पालक व शिक्षकांनी केलेल्या मेहनतीचे देखील कौतुक करण्यात आले. (छाया:-हेमंत निखाडे)

# परतवाड्यातील कुख्यात टोळी विरुद्ध मकोका कायद्यान्वये कारवाई

## ८ आरोपींना १२ तासांत अटक; नवीन बीएनएस अंतर्गत पहिली कारवाई

### -अमरावती ग्रामीण पोलिसांची ऐतिहासिक कारवाई

### -भारतीय न्याय संहितेच्या कलम १११चा प्रथमच वापर



**अमरावती/प्रतिनिधीः-** ग्रामीण पोलिसांनी संघटित गुन्हेगारीविरोधात मोठी आणि ऐतिहासिक कारवाई करत भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम १११चा प्रथमच वापर केला आहे. नवीन फौजदारी कायदे लागू झाल्यानंतर अमरावती ग्रामीण पोलीस दलाने केलेली ही पहिलीच कारवाई असून, संघटित गुन्हेगारीविरोधातील लढ्यात महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे. परतवाडा पोलीस ठाण्यात दाखल भारतीय न्याय संहितेच्या कलम १०३(१), १०९(१), १८९(२), १८९(४), १९० आणि १९१(२) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी, संघटित पद्धतीने सुरू असलेली गुन्हेगारी कृत्ये आणि नागरिकांमध्ये निर्माण केलेली दहशत लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी कलम ☞(पान २ वर)

# आषाढी एकादशीचा उत्सव, टाळ-मृदंगाच्या गजर

## विदर्भाचे पंढरपूर कौंडण्यपुरात हजारो भाविकांची मांदियाळी



**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** कृष्णदेवाने माता रुक्मिणीचे हरण ज्या ठिकाणाहून केले होते, त्या कौंडण्यपूरला विदर्भाचे पंढरपूर म्हणतात. शनिवार २५ जुलैला आषाढी एकादशीला येथील विठ्ठल-रुक्मिणी संस्थानात मोठा उत्सव भरला. टाळ-मृदंगाचा गजर, महिलांतर्फे गायली जाणारी विठ्ठलाची गाणी व भजने, कदमताल करीत चालणारे भक्त असे या मंदिर परिसराचे चित्र होते. संस्थानचे सहसचिव सत्यनारायण चांडक व अमरावती अप्पर पोलीस अधीक्षक यांनी सहपरिवारासह पहाटे ६ वाजता विठ्ठल रूक्मिणी महापूजा व अभिषेक केला. त्यानंतर भाविकांसाठी मंदिर खुले केले. तेव्हापासून ते रात्रीचे ८ वाजले तरीही भाविकांची गर्दी होती. अधून-मधून पावसाचा जोर सुरु असला तरी मात्र भाविकांची गर्दी जैसे थे होती. यावेळी मंदिरांचे अध्यक्ष ना.बा.अमाळकर, विश्वस्त अतुल ठाकरे व्यवस्थापक प्रशांत गावंडे आदी उपस्थितीत श्रींची पूजा,अभिषेक आरती पार पडला.तसेच भाजपा माजी जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख,माजी ☞(पान २ वर)

# सरासरीपेक्षा ४३% कमी पाऊस

## पर्यटन नगरी चिखलदऱ्यात पाणीटंचाईचे सावट



**चिखलदरा/प्रतिनिधी -** पावसाळा सुरू होऊन ५० दिवसांहून अधिक काळ लोटला आहे. तरीही जलस्त्रोतांमध्ये अल्प प्रमाणातच पाणीसाठा झाला आहे. याच कारणामुळे पर्यटन नगरी म्हणून प्रसिद्ध असलेल्या चिखलदरा शहरात २ दिवसांच्या अंतराने पाणीपुरवठा केला जात आहे.

शहरात सुमारे ९१८ नळ कनेक्शन आहेत. पर्यटन नगरीला साखर तलावातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र पावसाअभावी या तलावात केवळ ५ फूट पाणी साठले आहे.

तहसीलमध्ये देखील सरासरीच्या तुलनेत कमी पाऊस झाला आहे. २२ जुलैपर्यंत तहसीलमध्ये सरासरी ५०८.० मिमी पाऊस होतो. परंतु यंदा केवळ २८७.२ मिमी पाऊस झाला आहे, जो ५६.५ टक्के आहे. माहितीनुसार चिखलदऱ्यात दरवर्षी ☞(पान २ वर)

# आर्थिक मदतीच्या आमिषाने महिलेची २.५९ लाखांची ऑनलाइन फसवणूक

## -नांदगाव खंडेश्वर पोलिसांत गुन्हा



**अमरावती/प्रतिनिधीः-** आर्थिक मदत मिळणार असल्याचे आमिष दाखवून एका महिलेकडून २ लाख ५९ हजारांची ऑनलाइन फसवणूक केल्याची घटना नांदगाव खंडेश्वर तालुक्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी वंदना (संस्था चालक, रा. देशमुखपुरा, नांदगाव खंडेश्वर) यांना अज्ञात व्यक्तीने फोन करून, 'तुमच्या एसबीआय खात्यात आर्थिक मदत म्हणून ६ लाख ☞(पान २ वर)

# हातभट्टी दारू व वरली मटका अड्ड्यांवर छापे

## दोन ठिकाणी दारूसाठा जप्त, मटका अड्ड्यावर कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** शहर गुन्हे शाखेने शनिवारी (२५ जुलै) फ्रेजरपुरा व गाडगेनगर पोलीस ठाण्यांच्या हद्दीत अवैध व्यवसायांविरोधात धडक कारवाई करत हातभट्टी दारू, मोहमास सळवा तसेच वरली मटका जुगारावर छापे टाकले. या तीन स्वतंत्र कारवायांमध्ये एकूण सुमारे ९५ हजार ५१० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून संबंधित आरोपींविरुद्ध विविध कायद्यांन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील देवीनगर, वडाळी परिसरात गुन्हे शाखेच्या पथकाने गुप्त माहितीच्या आधारे छापा टाकला. यावेळी नंदा देविदास भारद्वाज (वय ५०, रा. देवीनगर, वडाळी) या त्यांच्या घरासमोरील आवारात हातभट्टी दारूची विक्री☞(पान २ वर)

# अवैध चायना चाकूसह तरुण ताब्यात

## आर्म्स ॲक्टअंतर्गत गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** राजापेठ पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने उड्डाणपुल परिसरात गस्तीदरम्यान अवैध शस्त्र बाळगणाऱ्या एका १९ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले. त्याच्याकडून सुमारे १,५०० किमतीचा ३२ इंच लांबीचा चायना चाकू जप्त करण्यात आला असून, त्याच्यासह एका महिलेविरुद्ध आर्म्स ॲक्ट व महाराष्ट्र पोलीस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी (२५ जुलै) दुपारी साडेतीनच्या सुमारास राजापेठ उड्डाणपुलाजवळ डीबी पथक गस्त घालत असताना एका इसमाच्या हातात चायना चाकू असल्याची माहिती मिळाली. घटनास्थळी पोहोचल्यावर एका दुचाकीजवळ एक पुरुष व एक महिला मोठ्याने वाद घालत असल्याचे दिसून आले. पोलिसांनी संशयिताची चौकशी केली असता त्याने आपले नाव अजिंक्य अनिलराव श्रीराव (वय १९, रा. अजमेरा डेकोरेशनजवळ, गांधी चौक, अमरावती) असे सांगितले. झडतीदरम्यान त्याच्याकडून एकूण ३२ इंच लांबीचा, त्यापैकी २० इंच पात्याचा व १२ इंच मुठीचा चायना चाकू जप्त करण्यात आला. या प्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात आरोपी तसेच संबंधित महिलेविरुद्ध आर्म्स ॲक्ट कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५, ११० व ११७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला ☞(पान २ वर)

# चोरीचे गौवंश कत्तलीसाठी नेताना दोघे जेरबंद

## ब्राम्हणवाडा थडी पोलिसांची कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** ब्राम्हणवाडा थडी पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत चोरी केलेले गौवंश जातीचे दोन जनावरे कत्तलीसाठी वाहतूक करणाऱ्या दोघांना अटक केली. या कारवाईत सुमारे ५.१५ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, त्यामध्ये दोन गौवंश जनावरे आणि एक आयएनटीआरए पिकअप वाहनाचा समावेश आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये अब्दुल मुजम्मिल अब्दुल रऊफ (वय ३१, रा. घाटलाडकी) आणि सद्दाम खान नियाज खान (वय ३०, रा. ब्राम्हणवाडा थडी) यांचा समावेश आहे.

पोलिसांना २४ जुलै रोजी गुप्त माहिती मिळाली होती की, मार्कंडा गावाकडून ब्राम्हणवाडा थडीच्या दिशेने एका पांढऱ्या रंगाच्या आयएनटीआरए पिकअप (क्र. एमएच-३० डीई-६१५५)☞(पान २

# सायबर फसवणुकीसाठी बँक खाते उपलब्ध करून दिल्याप्रकरणी युवकावर गुन्हा दाखल

## देशभरातील चार ऑनलाइन फसवणूक प्रकरणांशी संबंध



**अमरावती/प्रतिनिधीः-** राष्ट्रीय सायबर गुन्हे तक्रार पोर्टल व केंद्रीय गृह मंत्रालयाच्या 'समन्वय' पोर्टलवरील माहितीच्या आधारे वरूड पोलिसांनी सायबर आर्थिक फसवणुकीसाठी स्वतःचे बँक खाते उपलब्ध करून दिल्याप्रकरणी एका युवकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या खात्याचा वापर देशातील विविध राज्यांतील चार ऑनलाइन आर्थिक फसवणूक प्रकरणांमध्ये झाल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, संबंधित खात्यात एकूण १.५१ लाखांची रक्कम जमा झाल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणी देवांक सतीश कवडकर (वय २१, रा. साई संगम कॉलनी, टेंभूरखेडा रोड, वरूड) याच्याविरुद्ध वरूड पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१७(२) व ३१८(४) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, राष्ट्रीय ☞(पान २ वर)

# वन्य प्राण्यांच्या त्रासामुळे बेलोरावासी धडकले वन अधिकाऱ्याच्या कार्यालयावर



**खल्लार/प्रतिनिधीः-** खल्लार नजिकच्या बेलोरा शेत शिवारामध्ये दिवसेंदिवस वन्य प्राण्यांचा त्रास प्रचंड वाढत चालला असून वन्य प्राण्यांच्या नुकसानामुळे बेलोरा ग्रामवासी परतवाडा येथील वनपरीक्षेत्र अधिकारी कार्यालयात धडकले.

शेत शिवारातील मोकाट असलेल्या वन्य प्राण्यांना पकडुन सुरक्षित जंगलात सोडल्यास शेतक-यांना दिलासा मिळेल व शेती पिकाचे नुकसान होणार नाही. गावात असणा-या बंध्या व ई क्लास यावर वृक्ष लागवड करावी जेणेकरून त्यामध्ये जंगली डुक्कर,हरीण व रोही या सारखे प्राणी लपुन☞(पान २ वर)

# शेतकऱ्याने झोपडीच्या बाशाला घेतला गळफास

## -शेतकऱ्यांची पोलीस स्टेशनवर धडक, अवैध सावकारा विरोधात प्रचंड रोष



**मोर्शी/प्रतिनिधीः-** अवैध सावकारीच्या पाशात अडकलेल्या तरोडा(डोमक)येथील एका ४५ वर्षीय युवा शेतकऱ्याने शेतातील झोपडीच्या बाशाला नायलॉनच्या दोरीचा गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना आज दि.२५ जुलै रोजी सकाळी ८ वाजता उघडकीस आली.या घटनेमुळे मोर्शी शहरासह तालुक्यातील शेतकरी वर्गात संतापाची लाट निर्माण झाली आहे.मृतक शेतकऱ्याने मृत्यूपूर्वी लिहून ठेवलेली नोट पोलिसांनी जप्त☞(पान २ वर)

# धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा लोकशाहीवादी संघर्षाचा विजय - खा बळवंत वानखडे



**अमरावती/प्रतिनिधीः-** केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा हा देशभरातील विद्यार्थी, युवक, पालक आणि विरोधी पक्षांनी उभारलेल्या लोकशाहीवादी संघर्षाचा विजय आहे. जंतर-मंतरपासून ते देशातील विविध भागांपर्यंत झालेली शांततापूर्ण आंदोलने, संसदेतील ☞(पान २ वर)

### खरा 'प्रधान' अद्याप बाकी



धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा सुरुवात असून आणखीन दोन राजीनामे वेटिंग वर आहेत. एका प्रधानाचा राजीनामा झाला आहे. खऱ्या प्रधानाचा अद्याप बाकी आहे. हे तर विद्यार्थ्यांचे आंदोलन होते ते यशस्वी झाले. आता विद्यार्थ्यांचे बाप, शेतकरी जेव्हा रस्त्यावर उतरतील तेव्हा सरकारला ' पळता भूई कमी पडेल. संवेदना गमावलेले हे सरकार रसातळाला गेल्याशिवाय देशाला 'सोनिया'चा दिनू दिसणार नाही यात वाद नाही.

**-दिलीप एडतकर, सरचिटणीस प्रदेश काँग्रेस**

# सारांश

जनमाध्यम एक प्रतिष्ठित सवय

❑ रविवार, २६ जुलै २०२६ ❑ E-paper - www.janmadhyam.com


# ‘किंग ऑफ द नॉर्थ’ पर्व



ब्रिटनच्या राजकारणात नेतृत्वबदल झाला असून, लेबर पार्टीने अँडी बर्नहॅम यांच्याकडे पंतप्रधानपदाची जबाबदारी सोपवली आहे. कीर स्टार्मर यांच्या नेतृत्वावरील नाराजीनंतर झालेला हा बदल पक्षाच्या नव्या दिशेचा संकेत मानला जात आहे.दिल्लीत ‘कॉकरॉच पार्टी’च्या गदारोळाची चर्चा सुरू असताना एका महत्त्वाच्या राजकीय घडामोडीकडे वृत्तपत्रांचे तुलनेने कमी लक्ष गेले. ती घटना म्हणजे ब्रिटनच्या पंतप्रधानपदी अँडी बर्नहॅम यांची झालेली निवड.

५६ वर्षीय अँडी बर्नहॅम हे ब्रिटनचे पंतप्रधान बनलेले गेल्या दशकातील सातवे नेते ठरले. ब्रिटनच्या घटनात्मक व्यवस्थेनुसार प्रत्येक वेळी सार्वत्रिक निवडणूक घेऊनच पंतप्रधान बदलण्याची आवश्यकता नसते. सत्ताधारी पक्षाकडे बहुमत कायम असेल, तर पक्षांतर्गत बदलातूनही नवा नेता निवडला जाऊ शकतो. लेबर पार्टीकडे संसदेत बहुमत होते; मात्र पंतप्रधान कीर स्टार्मर यांचा पक्षातील संसदीय सहकार्यांचा पाठिंबा हळूहळू कमी होत गेला. पक्षांतर्गत नाराजी वाढल्याने अखेर स्टार्मर यांना पदाचा राजीनामा द्यावा लागला आणि त्यांच्या जागी अँडी बर्नहॅम यांची निवड झाली. मात्र हा केवळ नेतृत्वबदल नव्हता. स्टार्मर यांच्या काही धोरणात्मक निर्णयांमुळे लेबर पार्टीचा जनाधार कमी होत असल्याची भावना पक्षातील अनेक नेत्यांमध्ये निर्माण झाली होती. त्यांच्या कार्यकाळातील अनेक निर्णयांवर टीका झाली आणि पक्षातील अनेक राजकारण्यांचा त्यांच्यावरील विश्वास डळमळीत झाला. याच पार्श्वभूमीवर अँडी बर्नहॅम यांची निवड ही लेबर पार्टीमध्ये नव्या दिशेचा प्रयत्न म्हणून पाहिली जात आहे.

अर्थात, बर्नहॅम यांची पंतप्रधानपदी झालेली निवड ही सहजसाध्य नव्हती. ‘किंग ऑफ द नॉर्थ’ म्हणून ओळखले जाणारे बर्नहॅम हे गेल्या चार वर्षांतील ब्रिटनचे पाचवे पंतप्रधान आहे. मात्र, त्यांच्यासमोर असलेली आव्हाने अत्यंत व्यापक आणि गंभीर आहेत. बर्नहॅम यांच्यासमोरील प्रमुख आव्हान म्हणजे देशाची ठप्प झालेली अर्थव्यवस्था. ‘स्टॅग्नंट इकॉनॉमी’ म्हणजे अशी अवस्था, ज्यामध्ये आर्थिक विकासाचा वेग अत्यंत मंदावतो. अशा परिस्थितीत नवीन रोजगारनिर्मिती कमी होते आणि नागरिकांच्या जीवनमानावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. ब्रिटनमध्ये २००८ पासून सुरू असलेल्या या आर्थिक अडचणींमुळे अनेक गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत. बर्नहॅम यांच्यासमोर अर्थव्यवस्थेला नवसंजीवनी देणे, रोजगाराच्या संधी वाढवणे आणि नागरिकांचा विश्वास पुन्हा मिळवणे हे महत्त्वाचे आव्हान आहे.ब्रिटनमधील नागरिक वाढत्या करांच्या ओझ्यापासून दिलासा मागत आहेत. त्यामुळे नव्या नेतृत्वासमोर कर धोरण आणि अर्थव्यवस्थेला स्थैर्य देण्याचे मोठे आव्हान आहे. सध्या ब्रिटनची अर्थव्यवस्था मंदावलेली आहे. उत्पन्नातील वाढती दरी, बाजारपेठांवरील दबाव आणि जीवनमानातील घसरण या समस्या सरकारसमोर उभ्या आहेत. या आव्हानांना बर्नहॅम यांना प्रभावीपणे सामोरे जावे लागेल. नागरिकांचे खालावलेले जीवनमान सुधारायचे आहे, मात्र त्याच वेळी प्रमुख कर वाढवण्याचे टाळण्याचे कठीण संतुलन साधावे लागणार आहे. अमेरिकेच्या भूमिकेचे केवळ अनुकरण न करता पश्चिम आशिया आणि युक्रेन युद्धासारख्या मुद्द्यांवर स्वतंत्र आणि स्पष्ट भूमिका घेण्याचे आव्हान त्यांच्यासमोर असेल. याशिवाय ब्रिटनमधील राजकीय अस्थिरता संपवून देशाला स्थिर सरकार देणे हे त्यांच्यासाठी सर्वात मोठे आव्हान आहे. गेल्या दशकात ब्रिटनने सात पंतप्रधान पाहिले आहेत. केवळ क्षमायाचना करण्यापेक्षा नागरिकांना सरकार कडून तातडीने आणि ठोस परिणामांची अपेक्षा आहे. सरकारमध्ये विकेंद्रीकरण आणण्याची गरज बर्नहॅम यांनी ओळखली आहे.

# जंतर-मंतरचे वारे परिवर्तनाचा सांगावा तर नव्हेत?

आंदोलन ना आता एकाच एका नेत्यावर अवलंबून राहिलं आहे, ना एकाच मागणीपुरतं सीमित. ते आपल्याच मर्यादा ओलांडून पुढे जाऊ लागलंय. लोकशाही कधी नेतृत्वाच्या मेहरबानीवर अवलंबून नसतेच. म्हणतात ना ‘लोकांनी लोकांसाठी लोकांचे’ वगैरे २०-२१ जुलैला राजधानीतल्या विस्तीर्ण रस्त्यांवर जे ओसंडून वाहत होते ते होते- ‘आम्ही भारताचे लोक’. हे असे लोक आहेत ज्यांनी स्वीकारलं आहे की आता सत्ताधारी, विरोधक, माध्यमं, न्यायालयं, एखादी संघटना, एखादा नेता यांच्यावर अवलंबून राहण्यात काहीही हशील नाही. आपल्या भविष्यासाठी आपल्यालाच हातपाय हलवावे लागतील. ही जाणीव एवढी तीव्र, की पोलिसांचे दंडुके, अश्रुधुराने जळजळणारे डोळे, उमटलेले वळ, फुटलेली डोकी, रक्तबंबाळ कपडे, रस्त्यावर बेशुद्ध पडलेले सहकारी सारं काही पाहूनही ही गर्दी मागे हटण्यास तयार नाही. मोडलेला मंच पुन्हा उभारून पुन्हा दंडुके झेलण्यासाठी तेवढ्याच उमेदीने ही झुरळं पुन्हा एकदा सज्ज झाली आहेत. महिनाभराच्या या आंदोलनाने अनेक प्रस्थापित गृहितकांना हादरे दिले. कसे ते पाहूयाष्पोरंच आहेत, त्यात आळशी जेन-झी. फेसबुक-इन्स्टाचे फॉलोअर्स कार्यकर्त्यांत परिवर्तीत होणं शक्यच नाहीष्ठही तर आपची बी टीम खदखदणा-या असंतोषाची वाफ हळूहळू बाहेर जाऊ देण्यासाठी भाजपनेच उघडून ठेवलेला वॉल्व यांना परदेशातून आर्थिक पाठबळ मिळतंय बरेच आरोप झाले. हा काळाच असा आहे की काहीच खरं वाटत नाही. सकाळचा निष्ठावंत नाक दाबलं गेलं की ताबडतोब तेवढीच निष्ठा नव्या पक्षाच्याष्ठ नव्हे नेत्याच्या चरणी वाहण्यास सज्ज असतो. मोठाले पक्ष रातोरात फुटतात. त्यात या नवख्यांचा आवेश खरा मानून आपलं हसं करून घेण्यास कोणीच तयार नव्हतं. तो आवेश खरा होता की नाही, याविषयी आजही खात्रीने सांगता येणार नाही. पण आजचा असंतोष २०० टक्के खरा आहे. समस्या ख-या आहेत, हाल खरे आहेत. म्हणूनच शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधानांच्या राजीनाम्याची मागणी घेऊन सुरू झालेला हा प्रवास आता पंतप्रधानांना जबाबदार धरण्यापर्यंत पोहोचलाय.या ‘भारताच्या लोकां’मध्ये एवढी ताकद की सुरुवातीला दबक्या पावलांनी आंदोलनाला फ्लाइंग व्हिजिट देणा-या, समाजमाध्यमांवर व्हिडीओ प्रसारित करून दुरूनच पाठिंबा दर्शवणा-या, एरवी सदैव हस्तिदंती मनो-यात आणि सुरक्षारक्षकांच्या गराड्यात वावरणा-या, शुभ्र कपड्यांतल्या सुस्तावलेल्या विरोधकांनाही रस्त्यावर उतरण्यास त्यांनी भाग पाडलं.

साठ-सत्तर वर्षांच्या घरातले खासदार बॅरिकेड्सवरून उड्या मारता पाहण्याचा दुर्लभ योग या देशात प्रदीर्घ काळानंतर जुळून आला.नेत्यांच्या इशा-यांवर चालणा-या चळवळींबाबत एक मोठी समस्या असते. नेता मॅनेज झाला की चळवळ आपोआप गुंडाळली जाते. मग नेता एखाद्या पक्षाच्या वळचणीला जाऊन बसतो. त्याचे बगलबच्चे त्याच्या मागेपुढे करत राहतात.



*आंदोलन ना आता एकाच एका नेत्यावर अवलंबून राहिलं आहे, ना एकाच मागणीपुरतं सीमित. ते आपल्याच मर्यादा ओलांडून पुढे जाऊ लागलंय. लोकशाही कधी नेतृत्वाच्या मेहरबानीवर अवलंबून नसतेच. म्हणतात ना ‘लोकांनी लोकांसाठी लोकांचे’ वगैरे २०-२१ जुलैला राजधानीतल्या विस्तीर्ण रस्त्यांवर जे ओसंडून वाहत होते ते होते- ‘आम्ही भारताचे लोक’. हे असे लोक आहेत ज्यांनी स्वीकारलं आहे की आता सत्ताधारी, विरोधक, माध्यमं, न्यायालयं, एखादी संघटना, एखादा नेता यांच्यावर अवलंबून राहण्यात काहीही हशील नाही. आपल्या भविष्यासाठी आपल्यालाच हातपाय हलवावे लागतील.*

नेता गब्बर होत जातो आणि बिचारे दंडुके खाणारे निष्ठावंत गरीबच राहतात. भल्याभल्यांना मॅनेज करणा-या भाजपने उद्या सीजेपीच्या नेतृत्वाला मॅनेज केलं तर काय, हा प्रश्न होताच. वांगचुक यांना उचलून रुग्णालयात नेल्यानंतर त्यांचाही सूर बदलला. त्यांच्या मागण्यांतून राजीनामा हा शब्दच गायब झाला. त्यांचा रोख हळूहळू सत्ताधा-यांकडून विरोधीपक्षांकडे वळतो की काय, असं भासू लागलं. पण २० जुलैला आंदोलनाचा मंच पाडून टाकल्यानंतर तो पुन्हा उभारणारी, मैदान सोडण्यास अजिबात तयार नसणारी, झालेला कचरा गोळा करत फिरणारी, जखमांवर पट्ट्या बांधून पुन्हा सज्ज झालेली राजधानीच्या रस्त्यावरची १८-२० वर्षांची मुलं ठामपणे सांगतायत- आम्ही कोणा एका नेत्यावर विसंबून नाही, आम्ही स्वतः पुरेसे आहोत.या आंदोलनाच्या निमित्ताने आणखी एक बाब पुढे आली की आपला आवाज देशभर पोहोचवण्यासाठी आता केवळ वृत्तवाहिन्यांवर अवलंबून राहण्याची गरज उरलेली नाही.

पोरं महिनाभर जीवघेण्या उकाड्यात जंतर-मंतरवर ठाण मांडून बसली होती, निषेधाची गाणी गात होती, रात्री एकमेकांना वारा घालत आळीपाळीने झोपत होती. कधी त्यांचं पाणी कापलं जात होतं, कधी आजुबाजूची दुकानं बंद केली गेली, कधी शौचालयं.

पाऊस सुरू झाला तेव्हा छतासाठीचं प्लास्टिक मिळवण्यासाठीही त्यांना हुज्जत घालावी लागली. वाहिन्यांना यातलं काहीही दिसलं नाही. पण त्यांनी डोळे बंद केले म्हणून तांबडं उगवायचं राहिलं नाही. मुलं स्वतःच समाजमाध्यमांवरून जगासमोर आपली अवस्था मांडत राहिली. अनेक युट्युबर्स सातत्याने तिथून वार्तांकन करत होते.

२०-२१ला त्यांनीही दंडुके खात वार्तांकन केलं. देशातल्या नाही, पण जगभरातल्या मुख्य प्रवाहातल्या प्रसार माध्यमांनी या अत्याचारांची दखल घेतली.

सोनम वांगचुक यांचं उपोषण गाजलं. त्यांच्याविषयी देशभरातून प्रचंड काळजी व्यक्त केली गेली. त्यांना बळजबरीने रुग्णालयात नेऊन तर सरकारने देशावर खूपच उपकार केले. जे तोवर या आंदोलनाशी संलग्न नव्हते तेही जागे झाले. पण या सा-यात ऑल इंडिया स्टुडंट्स असोसिएशन - ‘आयसा’च्या नेहा बोरा, आमीन अमितोज आणि मनीष कुमार या तिघांनी तब्बल २३ दिवस उपोषण केलं. वांगचुक यांच्या वयाचा विचार करता उपोषण त्यांच्यासाठी घातक होतंच, पण या तरुणांच्या आरोग्याचंही यात प्रचंड नुकसान झालं असणार, त्यांची तेवढीशी दखल घेतली गेली नाही. यातली नेहा शेतक-यांच्या आंदोलनातही सहभागी झाली होती.

पीएचडी मिळवलेली ही जेएनयूमधली विद्यार्थिनी. परदेशात जाणं, उत्तम पगाराच्या नोक-या मिळवून ऐश करणं शक्य असताना हे विद्यार्थी नेते आपल्या मागच्यांची वाट सुकर करण्यासाठी झटताना दिसले. विद्यार्थी चळवळी अद्याप जिवंत असल्याची साक्ष या आंदोलनाने दिली.

कोणत्याही आंदोलनाला किंवा त्यात सहभागी झालेल्यांना लेबलं लावून मोकळं होण्यात हे सरकार पटाईत. अर्बन नक्षल्स, सोरोस फंडेड, खालिस्तानी, अँटी नॅशनलष्ठ इथेही हे प्रयत्न झाले, पण देशाच्या विविध भागांतून, वेगवेगळ्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीतून आलेली आणि मुख्य म्हणजे विविध धर्म-पथांची १५-२० वर्षांची ही मुलं. त्यामुळे लेबलं लावण्याचा फंडा फोल ठरला.या आंदोलनाने धडधडीतपणे समोर आणलेली बाब म्हणजे मोदी सरकारची पूर्णपणे चुकलेली गणितं. पोरंच आहेत, बसू देत जंतर-मंतरवर.

चार दिवस टाइमपास करतील आणि उकाड्याला कंटाळून निघून जातील. शिवाय आपण विरोधकांचे आवाज दाबतो, हा कलंकही धुतला जाईल.

जगासमोर लोकशाहीचा देखावा उभा करता येईल, या हिशेबाने सीजेपीला मोकळं रान दिलं गेलं. दिपके विमातळावर उतल्या उतरल्या आंदोलनाची परवानगी मिळाली. पण आंदोलन वाढत गेलं. सरकारच्या अपेक्षेपलीकडे वाढलं.

२० जुलैला जे केलं ते- जे. पी. नड्डांना निवेदन स्वीकारायला लावण्याचं काम आधीही करता आलं असतं. काहीतरी आश्वासनं देऊन बोळवण करता आली असती. पण ‘मोदी सरकार कधी झुकत नसतं,’ हा माज नडला. आंदोलनाने विक्राळ रूप धारण केल्यानंतर मग सारंच हातून निसटलं. मेट्रो स्थानकं बंद ठेवण्याची वेळ ओढावली, एवढ्या प्रचंड प्रमाणात सशस्त्र फौजफाटा ठेवूनही हातात निव्वळ तिरंगा वा पुस्तकं घेतलेली मुलं संसदेच्या उंबरठ्यावर येऊन पोहोचली. संसदेवरच्या हल्ल्यानंतर बहुतेक प्रथमच भर सभागृहातल्या खासदारांना आतच थांबण्याच्या सूचना देण्याची वेळ आली. सरकारने सोपं काम कठीण केलं आणि स्वतःच स्वतःचं हसं करवून घेतलं.

या आंदोलनाने तरुणांमधल्या भीतीला उखडून फेकलं. पालकांच्या विरोधाची, ट्रोल्सकडून बदनामीची, नोकरी जाण्याची अगदी जिवाचीही भीती मागे टाकून हा समुदाय वाटचाल करत होता. हा उद्याचा मतदार आहे.

पुढच्या निवडणुकीत मत देताना तो आजचे घाव विसरेल का? शक्यता कमीच आहे.यातून काय हाती लागलं? समजा उद्याच हे आंदोलन पूर्णपणे दाबलं गेलं किंवाष्ठ शक्यता कमीच आहे, पण समजा धर्मेंद्र प्रधानांनी राजीनामा दिला. वा अचानक भलतंच काही आणखी ‘गंभीर’ घडलं – जे सरकार अडचणीत आलं की सामान्यपणे घडतंच – तर काय? सारं मुसळ केरात? घाम, अश्रू, रक्त सारं पाण्यात? पण सगळंच एवढं सोपं नसतं.

जखमा अशा सहज भरून निघत नाहीत. या जखमांचे परिणाम कदाचित ताबडतोब दिसणार नाही. तेवढ्या तीव्रतेने दिसणार नाहीत, पण आज ना उद्या बदल दिसेलच. स्थायी काहीच नसतं. बदल अपरिहार्यच. राज्यकर्त्यांनी कितीही नाकारलं तरी तो होतोच.

# गुंतवणुकीसाठी आकर्षक संधी

भारताची ‘सेवा अर्थव्यवस्था’ हा देशाच्या आर्थिक विकासाचा मुख्य कणा आहे. वाढते उत्पन्न, वेगाने होत असलेले डिजिटलायझेशन, अर्थव्यवस्थेचे औपचारि कीकरण, सरकारची पूरक धोरणे आणि ग्राहकांच्या बदलत्या सवयी या सर्व गोष्टींमुळे सेवा क्षेत्रातील गुंतवणुकीकडे पुढील अनेक वर्षांसाठी एक शक्तिशाली संधी म्हणून पाहिले जात आहे. किमान ३ ते ५ वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक गुंतवणूक कालावधी असलेल्या गुंतवणूकदारांसाठी वैविध्यपूर्ण ‘थिमॅटिक सर्व्हिसेस फंड’ एक उत्तम पर्याय राहणार आहे.भारताच्या विकासाची कथा नेहमी देशाच्या उत्पादकतेच्या महत्त्वाकांक्षांशी जोडली गेलेली आहे. गेल्या काही वर्षांत केंद्र सरकारच्या ‘प्रॉडक्शन लिंक्ड इन्सेंटिव्ह’ (पीएलआय)सारख्या उत्पादकतेशी संबंधित सरकारी योजनांनी मोठ्या प्रमाणात प्रसारमाध्यमांचे लक्ष वेधून घेतले आहे. तरीही उत्पादन क्षेत्रात सुरू असलेल्या या बदलांच्या पलीकडे दुसरी आणि तितकीच शक्तिशाली अशी घोडदौड सुरू आहे आणि ती भारताच्या अर्थव्यवस्थेला एक नवा आकार प्रदान करताना दिसत आहे. कदाचित ही घोडदौड दीर्घकालीन गुंतवणुकीची एक उत्तम आणि आकर्षक संधी उपलब्ध करून देत आहे. हा नवीन कल म्हणजे सेवा क्षेत्राचा झपाट्याने होत असलेला विकास होय.गेल्या दोन दशकांत भारताच्या एकूण मूल्यवर्धित (जीव्हीए) उत्पादनाच्या पातळीवर देशाचे सेवा क्षेत्र हे उद्योग आणि कृषी या दोन्ही क्षेत्रांपेक्षा सातत्याने अधिक वेगाने वाढले आहे. भारताने यांत्रिक, अवजड वस्तू आणि औद्योगिक उत्पादन क्षेत्रात मोठा टप्पा सर केला असून आता थेट तंत्रज्ञान आणि सेवा-आधारित अर्थव्यवस्थेच्या दिशेने झेप घेतली आहे. आकडेवारीतून सेवा क्षेत्राची कामगिरी लक्षात येते. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये, भारताच्या एकूण मूल्यवर्धित उत्पादनात सेवा क्षेत्राचा वाटा तब्बल ६५ टक्के इतका राहील, असा अंदाज वर्तवण्यात आलेला आहे. या क्षेत्राच्या तुलनेत उद्योग क्षेत्राचा वाटा २१ टक्के तर कृषी क्षेत्राचा वाटा १४ टक्के इतका गृहीत धरण्यात आलेला आहे.हा बदल एक अतिशय व्यापक असा संरचनात्मक बदल दर्शवितो आणि तो म्हणजे देश श्रीमंत होत चालला असताना देशाच्या आर्थिक उलाढालीत सेवा क्षेत्राचा वाटा अधिकाधिक वाढत चालला आहे. सेवा क्षेत्राला ताकद देणारे पाच संरचनात्मक घटक आहेत. भारताच्या सेवा क्षेत्राला अनेक दीर्घकालीन रचनात्मक घटकांमुळे गती मिळत आहे आणि या घटकांचे दीर्घकाळ महत्त्व टिकून राहण्याची शक्यता आहे.अर्थव्यवस्थेचे औपचारिकीकरणरोख रकमेवर आधारित अनौपचारिक अर्थव्यवस्थेतून कामगारांचे औपचारिक क्षेत्राकडे स्थलांतर होत आहे. या बदलामुळे त्यांना दरमहा स्थिर वेतन, कर्जासाठी चांगल्या पत पात्रतेची निर्मिती आणि आर्थिक उलाढालीबाबत सहज पडताळणी करता येईल, अशी डिजिटल माहिती तयार होत चालली आहे. हे औपचारिकीकरण देशांतर्गत उपभोगाला चालना देते आणि विविध प्रकारच्या सेवा व्यवसायांसाठी ग्राहकांचा पाया अधिक विस्तृत करत चालले आहे.



भारताची डिजिटल अर्थव्यवस्थ`कडे वाटचालसध्या जवळपास ७० टक्के भारतीय इंटरनेटशी जोडले गेल्यामुळे भारत ही जगातील सर्वात मोठ्या डिजिटल अर्थव्यवस्थेपैकी एक बनली आहे. ही डिजिटल पायाभूत सुविधा वित्तीय सेवा, आरोग्य सेवा, शिक्षण, मनोरंजन, प्रवास आणि व्यापार यांसारख्या अनेक क्षेत्रांतील व्यवसायांसाठी पुढील कित्येक दशकांपर्यंत कार्यरत राहणार असून त्यातून एक मोठी आणि व्यापक संधी निर्माण होणार आहे.डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधायूपीआयसारख्या मंचांनी सेवा पुरवठादारांसाठी नवीन ग्राहक जोडण्याचा खर्च लक्षणीयरीत्या कमी केला आहे. त्याचबरोबर पेमेंटमधील अडथळे डिजीटल पध्दतीमुळे दूर होऊन अत्यंत सुलभ झाले आहे.

यामुळे डिजिटल पद्धतींचा स्वीकार करण्याचा वेग वाढला आहे. त्याचबरोबर व्यावसायिक कार्यक्षमता सुधारली आहे आणि विविध सेवा उद्योगांचा नफा वाढण्यास मदत झाली आहे.उच्च दर्जाच्या सेवांकडे कलभारतीय नागरिकांचे उत्पन्न वाढत चालले आहे, शहरीकरण वेगाने होत आहे आणि लोकांच्या महत्त्वाकांक्षासुध्दा उंचावत आहेत.

# कौल पायदळी



ठाकरे सेनेच्या सहा खासदारांचे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलिनीकरण करण्यास मंजुरी देण्यात आली. या निर्णयाला आव्हान देणा-या याचिकेवर सुनावणी घेण्यास आता सर्वोच्च न्यायालयाने संमती दर्शवली आहे. तृणमूल काँग्रेस या पश्चिम बंगालमधील पक्षाच्या २० खासदारांबाबतचा निर्णय अद्याप झालेला नाही. त्यांनी एका अगदीच पाटी कोरी असलेल्या अनोळखी पक्षात प्रवेश केला आहे.त्यावर काय निर्णय होतो याकडेही सगळ्यांचे लक्ष लागले आहे. तथापि, हे विषय गंभीर आहेत. त्याचे कारण मतदारांचा कौल मनमानी पद्धतीने बदलण्याचा प्रकार लोकप्रतिनिधींनी सुरू केला आहे. या निवडून आलेल्या प्रतिनिधींना तो अधिकार आहे का? याचा सोक्षमोक्ष लावणे गरजेचे आहे. राजकारणाचा मूळ ढाचा सध्या एका विचित्र आणि चिंताजनक वळणावर येऊन ठेपला आहे.ज्या कायद्याची निर्मिती लोकप्रतिनिधींची खरेदी-विक्री थांबवण्यासाठी आणि मतदारांच्या कौलाचा सन्मान करण्यासाठी करण्यात आली होती, तोच कायदा आज सत्तांतराचे आणि राजकारणातील सोयीस्कर समीकरणांचे सर्वात मोठे साधन बनला आहे. पक्षांतर विरोधी कायदा आज आपल्याच मूळ उद्दिष्टांपासून भरकटल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.सर्वोच्च न्यायालयाने लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला आणि ठाकरेसेना सोडून बंडखोर गटात सामील झालेल्या सहा खासदारांना नोटीस बजावली आहे. न्यायालयाने तूर्तास या विलीनीकरणाला स्थगिती देण्यास नकार दिला असला, तरी या निमित्ताने पुन्हा एकदा पक्षांतर विरोधी कायद्यातील गंभीर पळवाट चव्हाट्यावर आली आहे. दहाव्या अनुसूचीतील परिच्छेद ४ मध्ये विलीनीकरणाचा अपवाद देण्यात आला आहे.या नियमानुसार, जर एखाद्या राजकीय पक्षाच्या विधिमंडळ किंवा संसदेतील सदस्यांपैकी दोन-तृतीयांश (२/३) सदस्यांनी दुसया पक्षात विलीन होण्याचा निर्णय घेतला, तर त्यांच्यावर अपात्रतेची कारवाई होत नाही. १९८५ मध्ये जेव्हा हा कायदा संमत झाला, तेव्हा त्यातील तरतुदींमागचा हेतू स्वच्छ होता. मात्र, गेल्या काही वर्षांतील घडामोडी पाहिल्या तर हा अपवाद म्हणजेच कायद्याची सर्वात मोठी पळवाट ठरला आहे. पूर्वी ज्या कथित राजकीय फेरजुळण्या फुटकळ स्वरूपात होत होत्या त्यांना आता घाऊक स्वरूप प्राप्त झाले आहे.आता वैयक्तिक पातळीवर एकापाठोपाठ एक आमदार किंवा खासदार पक्ष सोडत नाहीत; तर थेट दोन-तृतीयांश संख्याबळ गाठून संपूर्ण गटच बाहेर पडतो. याचा अर्थ एका प्रस्थापित पक्षातील ८० ते ९० टक्के माल किंवा डोकी तशीच्या तशी वेगळ्या पक्षात जाऊन बसतात.



# ऐनवेळी घेतला लग्न मोडण्याचा निर्णय

साखरपुडा झाला, पत्रिकाही छापल्या अन ऐनवेळी शिल्पा शिंदेने घेतलेला लग्न मोडण्याचा निर्णय; त्यानंतर कधीच थाटला नाही संसार, म्हणालेली: 'लॉक अप सीझन २'मुळे अभिनेत्री शिल्पा शिंदेच्या खासगी आयुष्याबद्दल अनेक चर्चा सुरू आहेत. अभिनेत्रीने लोकप्रिय अभिनेत्याबरोबर साखरपुडा झाल्यानंतर मोडलेलं लग्न, आजही आहे अविवाहितशिल्पा शिंदे हिंदी टेलिव्हिजनवरील लोकप्रिय अभिनेत्री आहे. सध्या ती 'लॉक अप २' या रिॲलिटी शोमुळे चर्चेत आहे. वाईल्ड कार्ड स्पर्धक म्हणून तिने काही दिवसांपूर्वी या शोमध्ये एन्ट्री घेतली होती. त्यानंतर अभिनेत्री कुठल्या न कुठल्या कारणामुळे चर्चेत असल्याचं दिसतं. या शोमध्ये अनेक स्पर्धक त्यांच्या व्यावसायिक आयुष्यासह खासगी आयुष्यामुळेही चर्चेत असतात. अशातच आता शिल्पासुद्धा तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आलीये.

'लॉक अप २' मधील एका भागात स्पर्धक आकांक्षा चौधरीने शिल्पा शिंदे आई न झाल्याबद्दल टिप्पणी केली. यानंतर दोघींमध्ये जोरदार भांडण झालं नंतर यामुळे शिल्पा भावुकही झाली. त्यामुळे सध्या शिल्पाच्या खासगी आयुष्याबद्दल चर्चा सुरू झाली आहे. खरंतर ४८ वर्षीय शिल्पा ख या आयुष्यात सिंगल आहे. तिने एकदा साखरपुडा मोडल्यांनंतर पुन्हा लग्न केलेलं नाही.एबीपीच्या वृत्तानुसार शिल्पाचा अभिनेता रोमित राजबरोबर साखरपुडा झाला होता. परंतु, लग्नाच्या आधी तो मोडला आणि त्यांचं नातं सुरू होण्याआधीच संपलं. 'मायका – साथ जिंदगी भर का' या मालिकेच्या सेटवर दोघांची पहिली भेट झालेली. नंतर मैत्रिचं रूपांतर प्रेमात झालं आणि जवळपास दोन वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर २००९मध्ये दोघांनी साखरपुडाही केला होता. साखरपुड्यानंतर लग्नाचीसुद्धा सर्व तयारी झालेली एवढंच काय तर पत्रिकाही छापल्या होत्या पण, ऐनवेळी त्यांचं हे नातं तुटलं आणि दोघे वेगळे झाले.आजही अविवाहित आहे अभिनेत्रीउल्लेख केलेल्या माध्यमाच्या वृत्तानुसार शिल्पाने स्वत: हे नातं संपवल्याचं सांगितलं होतं. त्यावेळी संसार थाटण्याची ती योग्यवेळ नाही असं वाटल्याने तिने हा निर्णय घेतल्याचं म्हटलं होतं. तसंच 'बिग बॉस सीझन ११'मध्येही शिल्पाने याबद्दल भाष्य केलं होतं. रोमित राज आणि त्याच्या कुटुंबीयांच्या वागणुकीमुळे ती त्रस्त होती आणि त्यामुळेही लग्न मोडण्याचा निर्णय

# बॉलीवूड विद्यार्थ्यांच्या पाठीशी



नीट परीक्षेचे पेपर लीक झाल्याने जे विद्यार्थी मेहनतीने अभ्यास करतात अशा विद्यार्थ्यांसोबत धोका झाला आहे. संपूर्ण हिंदुस्थान तरुणांसोबत आहे. हे आंदोलन सकारात्मकतेत बदलेल, अशी अपेक्षा आहे.

**सलमान खान,** अभिनेता

स्वार्थींपासून सावधान राहापेपर लीक झाल्याने हजारो विद्यार्थी आणि पालकांचे स्वप्न धुळीस मिळतात. जे शिक्षणाच्या माध्यमातून आपल्या भविष्याचा मार्ग निवडतात. शांततापूर्ण आंदोलन करणाया विद्यार्थ्यांनी काही मतलबी लोकांपासून सावधान राहायला हवे.

**आर. माधवन,** अभिनेता

आजची लढाई, ही उद्यासाठीदिल्लीत लढत असलेले विद्यार्थी हे स्वतःसाठी लढत नाहीत. ते उद्याच्या भविष्यासाठी लढत आहेत. विद्यार्थ्यांची हिंमत आणि ठाम निर्णय पाहून थक्क झाले. या विद्यार्थ्यांचे खरेच ऐकले जात आहे का, जे उद्याचा देश सांभाळणार आहेत.

**आलिया भट्ट,** अभिनेत्री

बटवा– याऐवजी बातचीत महत्त्वाचीदिल्लीतील आंदोलन हे केवळ विद्यार्थ्यांपर्यंत मर्यादित नाही. आता हे एक मोठी गोष्ट बनली आहे. जे आपल्या सर्वांना विचारते, आपल्याला कसा देश हवा आहे. मला वाटते आम्हाला बटर्वा– याऐवजी बातचीत हा मार्ग निवडायला हवा.

**अरमान मलिक,** गायक

जेव्हा एक मुलगा रडला होताज्या वेळी एक मुलगा रडला होता, त्याच वेळी त्याचे ऐकायला हवे होते. त्याऐवजी आपण वाट पाहिली. कोणताही देश त्या वेळी अयशस्वी होतो, ज्या वेळी मुलांच्या प्रश्नाला उत्तर देण्याऐवजी विद्यार्थ्यांना बॅरिकेड्टस आणि लाठीमाराचा सामना करावा लागतो.

**कमल हसन,** अभिनेता

सिस्टमवरून विश्वास उडू नयेकोणताही देश आपल्या तरुणांना मोठे स्वप्न पाहायला सांगू शकतो, परंतु ते स्वप्न अडचणीत सापडले असतील तर शांत बसू शकत नाही. कृपया या विद्यार्थ्यांचे ऐकून घ्या. कृपया त्यांचा सिस्टमवरून विश्वास उडता कामा नये. जे त्यांच्याकडे अपेक्षा घेऊन आले आहेत.

**चित्रांगदा सिंह,** अभिनेत्री

तरुणांचा आवाज ऐकायला हवाजेव्हा तरुणांना उसे वाटते की, त्यांचे कोणी ऐकत नाही, तेव्हा समाजाने त्यांचा आवाज ऐकायला हवा. प्रत्येक मताचा सन्मान आणि आदर राखला गेला पाहिजे. शांतता हीच आपली सर्वात मोठी ताकद आहे.

**राजकुमार राव,** अभिनेता

आता नाही तर कधी जागे होणारअसा भित्रेपणा कधी पाहिला का?, या देशात हे लोक जे करत आहेत. यामुळे मला मोठ्या वेदना होत आहेत. रागाने माझा मेंदू फुटत आहे. देशवासीय लोकहो, तुम्ही कधी जागे व्हाल. आता होणार नाही तर मग कधी होणार?

**विशाल ददलानी,** संगीतकार

मला विद्यार्थ्यांचा अभिमान आहेमुंबईत आंदोलन करत असलेल्या विद्यार्थ्यांचा मला अभिमान आहे. देशातील आपले तरुण पोलिसांच्या लाठीहल्लूयाचा सामना करण्याचे धाडस दाखवत आहेत. विद्यार्थ्यांना हे सगळे करावे लागतेय, याचे मला दुःख वाटत आहे.

**ट्विंकल खन्ना,** अभिनेत्री

# आदेश बांदेकरांनी वारीत अनुभवली मनाची श्रीमंती

विविध ठिकठिकाणहून वेगवेगळ्या वयोगटातून आलेले अखंड गजर, अभंग, भक्तीगीतं, वारकरी अशा भारावलेल्या वातावरणात मी गेले अनेक दिवस होतो. आषाढीच्या निमित्तानं केलेली वारी समृद्ध करणारी आणि भरभरून आनंद देणारी ठरली. माझा हा संपूर्ण प्रवास प्रेक्षकांना आदेश विश्व या माझ्या युट्यूब चॅनलवरून पाहता येतोय. मी आधी देहू आणि नंतर आळंदी येथे गेलो आणि तिथून वारीचा प्रवास सुरू केला.



संत तुकाराम महाराज, संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांच्या विविध पालख्यांसोबत मी सासवडपर्यंतचा प्रवास केला. मी सासवडला पोहोचलो, नेमका त्याच वेळी ब्रह्मसंत सोपानकाका महाराजांच्या पालखीचा प्रस्थान सोहळा होता. मला त्या रथाचं सारथ्य करण्याची सुवर्णसंधी लाभली. तिकडून मी काटेवाडीला गेलो, मेंढ्यांचं रिंगण बघितलं; त्यावेळी गणेश महाराज, वैभव महाराज आणि संत तुकाराम महाराजांच्या ११व्या वंशातील पदाधिकारी मंडळी भेटली. त्यांच्या सांगण्यावरून मी जगतगुरू संत तुकाराम महाराजांच्या रथाचंही सारथ्य केलं. आतापर्यंत मी ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज आणि सोपानदेव महाराज या तीन पालख्यांसोबत चाललोय. पण यावर्षीच्या पालखीत मी निवृत्ति, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई आणि एकनाथ, नामदेव, तुकाराम अशा सगळ्या पालख्यांना भेटू शकलो.


५ जुलैला आळंदीत प्रचंड पाऊस होता. पावसामुळे क्षणोक्षणी मला वारी कशी होईल याची काळजी होती. महापूर आला, पण तो भक्तीचा होता! वारकऱ्यांची भक्ती, त्यांचं चालणं, वावरणं, विठुरायाच्या नामात दंग होणं, हे सगळं भारावून टाकणारं होतं.

मी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या मंदिरात जात होतो, तेव्हा एक छोटीशी रूपा नावाची मुलगी आली, तिनं माझ्या कपाळावर गंध लावलं. तासाभरानंतर तिथून बाहेर पडल्यावर, रूपा आली आणि तिनं माझ्या पायाला पट्टी लावली. पायाला नख उपटल्यानं जखम झाली होती, जी मला जाणवलीच नव्हती. त्या चिमुरडीनं माझी ज्याप्रकारे काळजी घेतली, हा माझ्यासाठी वारीतला भावूक क्षण होता.

जणू मुक्ताईच माझ्यासाठी धावून आली! गेल्या वर्षी वेळापूरजवळ मला एक आजोबा भेटले होते.

# श्रद्धेचा अपमान करण्याचा हेतू नाही, दिग्दर्शकांचे स्पष्टीकरण

अनेक दिवसांपासून चर्चेत असलेला आणि प्रेक्षकांमध्ये उत्सुकता निर्माण करणारा 'इंद्रजाल' हा चित्रपट आज २४ जुलैपासून संपूर्ण महाराष्ट्रात चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. प्रदर्शनाच्या पार्श्वभूमीवर चित्रपटाचे दिग्दर्शक यांनी सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट शेअर करत प्रेक्षकांना चित्रपटाबाबत कोणतेही गैरसमज न ठेवता तो चित्रपटगृहात येऊन पाहावा असे आवाहन केले आहे. सोशल मीडियावर पोस्टद्वारे एक व्हिडीओ शेअर करत त्यांनी, त्यांच्याबरोबर प्रिमिअरच्या दिवशी घडलेला प्रसंग सांगितला. एका अनोळखी व्यक्तीने त्यांच्याजवळ येत साधू संत आणि हिंदू धर्म यावर चुकीचा संदेश चित्रपटात दिल्याचं म्हटलं, यावर प्रतिक्रिया देणारा व्हिडिओ शेअर करत दिग्दर्शकाने आपली बाजू मांडली.




'इंद्रजाल' हा केवळ एक चित्रपट नसून, अनेक वर्षांच्या मेहनतीने, जिद्दीने आणि स्वप्नाने साकारलेला प्रयत्न असल्याचे दिग्दर्शकांनी आपल्या या इन्स्टा पोस्टमध्ये म्हटले आहे. या चित्रपटातून कोणत्याही साधू–संतांचा, धर्माचा किंवा श्रद्धेचा अपमान करण्याचा आमचा हेतू कधीच नव्हता आणि यापुढेही नसेल, असे स्पष्ट करत त्यांनी प्रत्येक श्रद्धेचा आणि भावनेचा आदर करत असल्याचे सांगितले आहे. काही गैरसमजांमुळे चित्रपटाबाबत चुकीचा संदेश जाऊ नये, एवढीच आमची मनापासून इच्छा आहे, असेही दिग्दर्शकांनी नमूद केले आहे.

कृपया चित्रपट प्रदर्शित होऊ द्याः तो पाहा आणि मग आपला निर्णय घ्या, असे भावनिक आवाहन त्यांनी प्रेक्षकांना केले आहे. 'इंद्रजाल'च्या संपूर्ण टीमने अनेक वर्षे घेतलेल्या मेहनतीला प्रेक्षकांच्या प्रेमाची आणि आशीर्वादाची गरज असल्याचे सांगत, २४ जुलैपासून चित्रपटगृहात प्रदर्शित होणाऱ्या 'इंद्रजाल'ला प्रेक्षकांनी नक्की भेट द्यावी आणि आमच्या या स्वप्नाला आपला आशीर्वाद द्यावा', असे आवाहन दिग्दर्शकांनी केले आहे.

'इंद्रजाल' या चित्रपटाचे दिग्दर्शन आणि संकलन दिग्दर्शक जागेश्वर ललिता ढोबळे यांनी केले आहे. तर निर्मितीची धुरा निर्माती सुचेता अजय निकम यांनी पेलवली आहे. तर सहनिर्माते अजय शिवराम निकम आणि मंगेश शालीग्राम वैती आहेत.

चित्रपटाचे लेखन लेखक नामदेव मुरकुटे यांनी केले आहे. तर संपूर्ण चित्रपट आकाश सेठी याने त्याच्या कॅमेऱ्यात कैद केला आहे.




# प्रभू श्रीरामांची भूमिका साकारताना...

नितीश तिवारी यांनी दिग्दर्शित केलेल्या रामायण या सिनेमाबद्दल प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता आहे. काही दिवसांपूर्वी सिनेमातील रणबीर कपूरचा लूक पाहायला मिळाला होता. त्यानंतर एक व्हिडीओ व्हायरल झाला होता, तो व्हिडीओ रामायण या सिनेमातील असल्याचे सांगितले जात होते. मात्र, निर्माते किंवा सिनेमाची टीम यांच्याकडून कोणतीही प्रतिक्रिया पाहायला मिळाली नव्हती.रामायण या सिनेमाचा ट्रेलर २४ जुलैला प्रदर्शित होणार होता. त्यामुळे सर्व जण ट्रेलर प्रदर्शित होण्याची वाट पाहत होते. मात्र, आता ट्रेलरच्या प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. सिनेमाचे निर्माते नमित मल्होत्रा यांनी सोशल मीडियावर याबद्दल पोस्ट शेअर करीत सांगितले आहे. त्यांनी लिहिले, ' 'रामायण'साठी आजचा दिवस खूप खास आहे. 'रामायण' जगभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचं माझं स्वप्न आता 'सोनी पिक्चर्स एंटरटेन्मेंट' बरोबरच्या भागीदारीमुळे प्रत्यक्षात उतरलं आहे. त्यामुळे आता आम्ही चित्रपटाचा ट्रेलर जागतिक स्तरावर नंतर प्रदर्शित करणार आहोत', असे म्हणत प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलल्याचे त्यांनी स्पष्ट केले.२०२६ या कार्यक्रमात रणबीर कपूर, यश, निर्माते नमित मल्होत्रा, दिग्दर्शक नितीश तिवारी यांनी हजेरी लावली होती. त्यावेळी 'रामायण' सिनेमाबद्दल चर्चा झाली. तसेच रामायण सिनेमातील प्रभू श्रीरामांची भूमिका साकारण्याआधी मनात भीती होती, असे रणबीरने म्हटले आहे.'त्यावेळी माझ्या मनात खूप भीती होती'तो म्हणाला, 'जेव्हा मला पहिल्यांदा या चित्रपटाबद्दल विचारण्यात आले होते, त्यावेळी माझ्या मनात खूप भीती होती आणि प्रश्न होते. मी ही भूमिका निभावू शकेन का? मी त्यासाठी पुरेसा सक्षम आहे का? असे अनेक प्रश्न मला पडले होते. मात्र, त्यानंतर माझ्या मनात कृतज्ञतेची भावना होती. आयुष्यात एकदाच मिळणारी सुवर्णसंधी आणि मोठी नैतिक जबाबदारी होती.'रणबीर कपूर म्हणाला, 'प्रभू श्रीराम हे आदर्श आहेत. धैर्य, करुणा, क्षमाशीलता व धर्मनिष्ठा या मूल्यांचं ते मूर्तिमंत प्रतीक आहेत. त्यांची भूमिका साकारण्याची संधी मिळणं ही जितकी मोठी गोष्ट आहे, तितकीच ती जबाबदारीही मोठी असून ती थोडी दडपण आणणारी आहे.

# वाझुद्दीन सिद्दीकीनंतर आता आलिया भट्टची तुंबाड २ मध्ये एन्ट्री

बॉलिवूडचा ब्लॉकबस्टर आणि कल्ट क्लासिक हॉरर–थ्रिलर चित्रपट तुंबाडच्या दुस–या भागात मोठी स्टारकास्ट बघायला मिळणार आहे. या चित्रपटाच्या दुस– या भागात आता प्रसिद्ध अभिनेता नवाझुद्दीन सिद्दीकी याच्यानंतर आता अभिनेत्री आलिया भट्टची एन्ट्री झाली आहे. तुंबाडचे निर्माते सोहम शाह यांनी याबाबत घोषणा केली आहे. आलिया सिनेमात एका महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे.सोहम शहा यांनी आलियासोबतचे काही फोटो सोशल मीडियावर शेअर करत तिचे त्याच्या टीममध्ये स्वागत केले आहे.




या फोटोत आलियाच्या हातात तुंबाडमधली पिठाची बाहुली दिसत आहे. मात्र यात आलियाची भूमिका नक्की काय असेल यावर मात्र मौन बाळगण्यात आले आहे.'तुंबाड २' या चित्रपटातील काही भाग हा मुंबईत शुटींग करण्यात येणार असून, याकरता मुंबईत एका शहरासारखा दिसणारा ७–८ एकरांचा भव्य सेट उभारण्यात आला आहे.

# आदिनाथ-ऊर्मिला यांचा १५ वर्षांनंतर घटस्फोट

ज्येष्ठ अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शक महेश कोठारे यांचा मुलगा आदिनाथ व अभिनेत्री ऊर्मिला कानेटकर यांनी १५ वर्षांनंतर विभक्त होण्याचा निर्णय सोशल मीडियावरून जाहीर केला आहे. दोघांनी परस्पर संमतीने वेगळे होत आहोत, असे पोस्टमध्ये म्हटले आहे.आदिनाथ आणि ऊर्मिला यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवर एक पोस्ट शेअर करत चाहत्यांना ही धक्कादायक माहिती दिली आहे. खूप विचारमंथनानंतर त्यांनी परस्पर संमतीने आणि अत्यंत सामंजस्याने पती–पत्नी म्हणून वेगळे होण्याचा निर्णय घेतला आहे. पती–पत्नी म्हणून आमचा प्रवास इथेच थांबत असला तरी आमची लाडकी लेक जिजा हीच आमचे सर्वस्व आहे. तिच्या साठी आम्ही नेहमी एकत्र उभे राहू.






# 'इठा' चित्रपटावर कायदेशीर कारवाईची टांगती तलवार

बॉलिवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर सध्या तिच्या आगामी 'इठा' चित्रपटामुळे चांगलीच चर्चेत आहे. हा बहुचर्चित चित्रपट महाराष्ट्राच्या तमाशा सम्राज्ञी स्वर्गीय विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनप्रवासावर आधारित आहे. या चित्रपटाचा टीझर नुकताच प्रदर्शित झाला असून, प्रेक्षकांमध्ये याबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र, सुरुवातीला केवळ चित्रपटाच्या नावावरून झालेला वाद शमत नाही तोच, आता हा सिनेमा एका नव्या आणि गंभीर वादाच्या भोव– यात अडकला आहे. विठाबाईच्या स्वतःच्या कुटुंबीयांनीच आता चित्रपटाच्या कथेवर आणि ऐतिहासिक तथ्यांवर तीव्र आक्षेप नोंदवला आहे.टीझरमधील 'या' गंभीर त्रुटींवर आक्षेपविठाबाई नारायणगावकर यांचे नातू धनंजय खुडे यांनी या चित्रपटाच्या टीझरवर नाराजी व्यक्त करत निर्मात्यांवर गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते, चित्रपटात मूळ इतिहासाची मोठ्या प्रमाणावर मोडतोड करण्यात आली असून चुकीची माहिती प्रेक्षकांसमोर मांडली जात आहे. खुडे यांनी निदर्शनास आणून दिले आहे की, ख– या तमाशा फडाचे मूळ नाव 'भाऊ बापू नारायणगावकर तमाशा मंडळ' असे होते; परंतु टीझरमध्ये त्याचा 'भाऊ गावकर तमाशा मंडळ' असा पूर्णपणे चुकीचा उल्लेख करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त, १९६१ साली विठाबाईना मिळालेल्या प्रतिष्ठेच्या राष्ट्रपती पदक वितरणाचा प्रसंगही वास्तवाला धरून नसून त्याचे चुकीचे सादरीकरण करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला आहे.कुटुंबीयांची परवानगी न घेताच निर्मितीया चित्रपटाचे दिग्दर्शन सुप्रसिद्ध दिग्दर्शक लक्ष्मण उत्तेकर करत आहेत. मात्र, धनंजय खुडे यांनी स्पष्ट केले आहे की,चित्रपट बनवण्यापूर्वी दिग्दर्शक किंवा निर्मिती संस्थेने विठाबाईंच्या कुटुंबीयांची कोणतीही अधिकृत परवानगी घेतलेली नाही. कोणतीही शहानिशा न करता आणि कुटुंबाला विश्वासात न घेता हा जीवनपट पडद्यावर आणला जात असल्या बद्दल त्यांनी अत्यंत तीव्र शब्दांत संताप व्यक्त केला .

# शहरी जीवनातील वाढता मानसिक तणाव

आजच्या धावपळीच्या आणि स्पर्धात्मक युगात प्रगतीची शर्यत जिंकण्याच्या नादात माणूस स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करत आहे. नुकत्याच समोर आलेल्या एका धक्कादायक अहवालानुसार, देशातील शहरी भागात राहणारे तब्बल ८२ टक्के नागरिक तीव्र मानसिक तणावाखाली जीवन जगत आहेत. वाढती महागाई, आर्थिक अस्थिरता आणि भविष्याची चिंता यांसारख्या कारणांमुळे शहरी भारतीयांचे मानसिक आरोग्य धोक्यात आले आहे.अहवालातील ठळक मुद्दे: जागतिक स्थिती: मानसिक आरोग्य क्रमवारीत ८४ देशांपैकी भारत ६० व्या क्रमांकावर आहे. आर्थिक तणाव: सुमारे ४१ टक्के नागरिकांनी मान्य केले आहे की, आर्थिक उद्दिष्टे पूर्ण करण्याच्या धडपडीमुळे त्यांना तीव्र तणाव जाणवतो.



तरुणाईवर सर्वाधिक परिणाम: २५ ते ३४ वयोगटातील तरुण पिढी तणावाचा सर्वाधिक सामना करत आहे. जबाबदा-यांचे ओझे, वाढते घरभाडे, गृहकर्जाचे हप्ते आणि करिअरमधील अनिश्चितता यामुळे या वयोगटाचा 'आरोग्य गुणांक' वयोवृद्धांपेक्षाही कमी असल्याचे दिसून आले आहे.महानगरे विरुद्ध ग्रामीण भागया अहवालातील एक रंजक विरोधाभास म्हणजे ग्रामीण भागातील नागरिकांचे आरोग्य शहरी नागरिकांपेक्षा अधिक चांगले आहे. ग्रामीण भागाचा एकूण आरोग्य गुणांक ६७ असून शहरांचा केवळ ६३ आहे. शहरांमधील प्रदूषण, कामाचा ताण, लांबचा प्रवास आणि 'सामाजिक एकाकीपणा' हे तणावाचे प्रमुख घटक ठरत आहेत. शहरात भौतिक सुविधा जास्त असल्या तरी, तिथे शांततेचा अभाव असल्याचे अहवाल स्पष्ट करतो.तज्ज्ञांचा सल्ला: आर्थिक नियोजनासह मानसिक आरोग्याची काळजीकेवळ सकस आहार किंवा व्यायाम तणावमुक्तीसाठी पुरेसा नाही. तज्ज्ञांच्या मते, आताच्या काळात आर्थिक नियोजनाची शिस्त लावणे आणि खर्चावर नियंत्रण ठेवणे अनिवार्य झाले आहे. याबाबत बोलताना प्रहार न्यूजलाईनने स्पष्ट केले की, आरोग्यासोबत पैशाचा ताळमेळ बसवणे ही काळाची गरज आहे. तणाव ही जीवनशैलीची 'नॉर्मल' गोष्ट नसून, १४ टक्के लोकांनी तो 'नियंत्रणाबाहेर' असल्याचे मान्य केले आहे, ही धोक्याची घंटा आहे.उपाययोजना: आर्थिक शिस्त आणि नियोजनावर भर द्या. मानसिक आरोग्यासाठी स्वतःच्या दिनचर्येतून वेळ काढा. तणाव असह्य वाटल्यास मदत मागायला संकोच करू नका.अहवालाचा निष्कर्ष असा कीपैसा महत्त्वाचा असला तरी मानसिक शांतता त्याहून अधिक महत्त्वाची आहे. आरोग्य, मन आणि आर्थिक शिस्त यांचा समतोल राखणे हीच खरी संपत्ती असल्याचे तज्ज्ञ सांगत आहेत.



# आरओ की उकळलेले पाणी?

पावसाळा सुरू झाला की वातावरणात बदल होतो आणि साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव वेगाने वाढू लागतो. या दिवसांत दूषित अन्नामुळे किंवा पाण्यामुळे पोट बिघडण्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर उद्भवतात. अशातच आपल्या मनात हा प्रश्न नक्कीच येतो की, पावसाळ्यात नेमके कोणते पाणी पिणे सुरक्षित ठरते? आरओ चे पाणी की उकळलेले पाणी? चला तर मग जाणून घेऊया याचे योग्य उत्तर.आरओ की उकळलेले पाणी: पावसाळ्यात काय ठरते योग्य?आरोग्यासाठी फायदेशीर उकळलेले पाणी: आरओ च्या पाण्यामध्ये अनेकदा आवश्यक घटकांची कमतरता असू शकते आणि ते पाण्यातील सर्व विषाणू व जिवाणू पूर्णपणे नष्ट करेलच असे नाही. याउलट, पावसाळ्याच्या दिवसांत उकळलेले पाणी पिणे शरीरासाठी सर्वाधिक सुरक्षित मानले जाते. पाणी चांगले उकळल्यामुळे त्यातील बहुतांश हानिकारक सूक्ष्मजीव नष्ट होतात आणि विविध आजारांपासून संरक्षण होते.दूषित पाण्यामुळे होणारे प्रमुख आजारअसुरक्षित किंवा दूषित पाणी प्यायल्यामुळे शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतात. उकळलेले पाणी प्यायल्याने खालील आजारांपासून बचाव होण्यास मदत होते: अतिसार,टायफॉइड, कॉलरा कावीळ हिपॅटायटीस आव उकळलेले पाणी पिण्याचे आश्चर्यकारक फायदेपाण्याचा प्रकार कोणताही असो, आरोग्याच्या दृष्टीने उकळवून थंड केलेले पाणी पिणे नेहमीच गुणकारी ठरते:पचनक्रिया सुधारते: उकळलेले पाणी प्यायल्याने पोटाचे अनेक विकार आणि बद्धकोष्ठतेची समस्या दूर होण्यास मदत होते.वजन नियंत्रण: हे पाणी शरीराची चयापचय क्रिया (शूरंदत्रेस) सुधारते, ज्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत होऊ शकते.त्वचेचे आरोग्य: उकळलेले पाणी शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करते, ज्यामुळे त्वचेची नैसर्गिक चमक टिकून राहते.

# ब्रेन डिटॉक्स खरेच शक्य आहे का?



आजकाल शरीरासोबतच 'ब्रेन डिटॉक्स' हा शब्दही मोठ्या प्रमाणावर चर्चेत आहे. मात्र, मेंदूला कोणत्याही जादुई पद्धतीने स्वच्छ करता येत नाही. तज्ज्ञांच्या मते, ब्रेन डिटॉक्स म्हणजे मेंदूवरील ताण कमी करणा-या आणि मानसिक आरोग्य सुधारवणा-या सवयी अंगीकारणे होय. यामध्ये सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे पुरेशी झोप. दररोज ७ ते ९ तासांची शांत झोप घेतल्याने मेंदू दिवसभरातील माहितीची प्रक्रिया करतो आणि पुनरुज्जीवित करतो.मोबाइल, लॅपटॉप आणि सोशल मीडियाचा अतिवापर मानसिक थकवा वाढवतो. त्यामुळे दिवसभरात काही वेळ डिजिटल ब्रेक घेणे आवश्यक आहे. याशिवाय पुस्तक वाचणे, कुटुंबासोबत वेळ घालवणे किंवा निसर्गाच्या सान्निध्यात राहणे यामुळेही मानसिक ताण कमी होतो.

आहाराचाही मेंदूच्या आरोग्यावर मोठा परिणाम होतो. हिरव्या भाज्या, फळे, सुका मेवा, प्रोटीनयुक्त पदार्थ आणि पुरेसे पाणी यामुळे मेंदूला आवश्यक पोषण मिळते.

नियमित व्यायाम किंवा दररोज किमान ३० मिनिटे चालल्याने रक्ताभिसरण सुधारते आणि मूडही चांगला राहतो.योग, ध्यान, श्वसनाचे व्यायाम आणि सकारात्मक विचार या सवयी मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरतात.

# जास्त मीठ खाणे आरोग्यासाठी ठरू शकते हानिकारक



आपल्या खाद्य संस्कृतीमध्ये मीठाचे महत्त्व हे फार अबाधित आहे. मीठामुळे पदार्थांची लज्जत वाढण्यास मदत होते. मीठ नसल्यास जेवणाला चवच लागत नाही. त्यामुळेच मीठ हा आपल्या खाद्यसंस्कृतीचा महत्त्वाचा भाग आहे.अन्नाची चव वाढवण्यासाठी मीठ आवश्यक असले, तरी त्याचे अतिसेवन आरोग्यासाठी घातक ठरू शकते. अनेकजण स्वयंपाकात घातलेल्या मिठाबरोबरच पॅकेज्ड पदार्थ, चिप्स, नमकीन, लोणची आणि फास्ट फूडमधूनही मोठ्या प्रमाणात सोडियम घेत असतात. त्यामुळे नकळत शरीरात आवश्यकतेपेक्षा जास्त मीठ जाते. तज्ज्ञांच्या मते, दीर्घकाळ जास्त मीठ खाल्ल्यास उच्च रक्तदाब, हृदयविकार, स्ट्रोक आणि मूत्रपिंडाशी संबंधित आजारांचा धोका वाढू शकतो.बहुतांश प्रौढांनी दिवसाला सुमारे एक चमचा मीठ, यापेक्षा जास्त सेवन करू नये. उच्च रक्तदाब, हृदयविकार किंवा किडनीच्या समस्यांनी त्रस्त असलेल्या व्यक्तींनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार यापेक्षा कमी मीठ घ्यावे. फक्त स्वयंपाकात वापरलेल्या मिठावर लक्ष ठेवणे पुरेसे नसून, प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांमधील सोडियमचाही विचार करणे आवश्यक आहे.मीठाचे प्रमाण कमी करण्यासाठी घरचे ताजे अन्न खाण्यावर भर द्यावा. पदार्थांना चव आणण्यासाठी लिंबू, कोथिंबीर, आले, लसूण किंवा इतर मसाल्यांचा वापर करता येतो. खरेदी करताना अन्नपदार्थांवरील न्यूट्रिशन लेबल तपासून कमी सोडियम असलेले पर्याय निवडावेत.

# कच्चा आवळा की आवळ्याचा रस?



आवळा हा आपल्या आरोग्यासाठी अत्यंत गुणकारी आणि पौष्टिक मानला जातो. हिवाळा असो वा उन्हाळा, अनेक जण रोजच्या आहारात याचा वेगवेगळ्या प्रकारे समावेश करतात. परंतु, बयाच लोकांच्या मनात हा संभ्रम असतो की कच्चा आवळा खाणे शरीरासाठी जास्त फायदेशीर आहे की त्याचा रस पिणे बाजारामध्ये मिळणारे आवळ्याचे रस आणि घरचा कच्चा आवळा यांपैकी नेमकी कशाची निवड करावी, हे समजून घेणे आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

आवळा हे निसर्गातील सर्वात पौष्टिक फळांपैकी एक आहे. हा प्रामुख्याने व्हिटॅमिन सी आणि विविध खनिजांचा एक उत्कृष्ट स्त्रोत आहे. याव्यतिरिक्त यामध्ये आरोग्यासाठी फायदेशीर असणारे अनेक फायटोकेमिकल्स आढळतात. आवळ्यामध्ये प्रामुख्याने पॉलिफेनॉल्स, टॅनिन्स, एम्बलिकॉल, फायलेम्बलीन, लिनोलिक अ?सिड, कोरिलागिन आणि रुटीन हे महत्त्वाचे घटक असतात, जे शरीराला अंतर्गत पातळीवर संरक्षण देण्याचे काम करतात.पोषणशास्त्राच्या दृष्टीने, रसाच्या तुलनेत कच्च्या आवळ्याला नेहमी पहिले प्राधान्य दिले पाहिजे. याचे मुख्य कारण म्हणजे कच्चा आवळा खाल्ल्याने त्यामध्ये असणारे नैसर्गिक फायबरचा चोथा शरीराला मूळ स्वरूपात मिळते.

# डायबिटीजमुळे खांदा का होतो जाम?

मधुमेह म्हटला की, त्याचा संबंध थेट हृदयविकार, किडनीच्या समस्या, डोळ्यांचे आजार किंवा मज्जासंस्थेच्या (छर्शीशि) नुकसानीशी जोडला जातो. परंतु, मधुमेहाचा एक अतिशय सामान्य पण दुर्लक्षित दुष्परिणाम शरीराच्या सांध्यांवर, विशेषतः खांद्यावर होतो.



अनेक मधुमेह असलेले रुग्ण खांद्यामध्ये सतत होणाऱ्या वेदना आणि जडपणामुळे त्रस्त असतात, मात्र या दोन्ही समस्यांचा परस्परांशी जवळचा संबंध आहे याची त्यांना जाणीव नसते. वैद्यकीय भाषेत याला 'डायबेटिक शोल्डर' किंवा 'फ्रोझन शोल्डर' म्हणतात. वेळेवर उपचार न केल्यास ही समस्या दैनंदिन साधी कामे करणेही कठीण करून टाकते.

फ्रोझन शोल्डर, ज्याला वैद्यकीय भाषेत 'अ‍ॅडेसिव्ह कॅप्सुलायटिस' म्हणतात, हा असा आजार आहे ज्यामध्ये खांद्याच्या सांध्याभोवती असणारे आवरण जाड होते, त्याला सूज येते आणि तो भाग कडक होतो. शरीरात साखरेचे प्रमाण दीर्घकाळ अनियंत्रित राहिल्यामुळे खांद्याच्या अस्थिबंधनांमधील आणि टेंडन्समधील 'कोलाजेन' या प्रोटीनच्या रचनेत बदल होतो. यामुळे हे उती कमी लवचिक बनतात आणि त्यांच्यावर सूज व चट्टे तयार होऊन खांद्याची हालचाल पूर्णपणे मंदावते.

फ्रोझन शोल्डर सामान्यतः एका वेळी एकाच खांद्याला होतो. परंतु, एका खांद्याचा त्रास बरा झाल्यानंतर काही महिन्यांनी किंवा वर्षांनी दुसऱ्या खांद्यालाही हा त्रास होऊ शकतो; मात्र दोन्ही खांदे एकाच वेळी 'फ्रोझन' होण्याचे प्रमाण अत्यंत दुर्मिळ आहे.

# पावसाळ्यात 'लेप्टो'चा इशारा

पावसाळा सुरू होताच डेंग्यू, मलेरिया आणि चिकुनगुनियासारख्या आजारांचा धोका वाढतो. मात्र, याइतकाच गंभीर आणि अनेकदा दुर्लक्षित राहणारा लेप्टोस्पायरोसिस हा आजारही बेतू शकतो. दूषित पाणी किंवा चिखलाच्या संपर्कातून पसरणा-या या संसर्गामुळे मूत्रपिंड, यकृत आणि फुफ्फुसांसारखे महत्त्वाचे अवयव निकामी होण्याची शक्यता असते,' असे सांगून उंदीर आणि इतर प्राण्यांच्या मलमूत्रातून पसरणर्ा?या या आजारावर तज्ज्ञांनी अधिक प्रकाश टाकला.आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले, 'पावसाळ्यात साचलेले पाणी आणि चिखल यामध्ये उंदराच्या मलमूत्राद्वारे लेप्टोस्पायरा हा विषाणू पसरतो. या विषाणूद्वारे माणसांना हा आजार संक्रमित होतो. या आजारामुळे यकृत, किडनी, हृदय यांच्यावर परिणाम होऊ शकतो. तसेच, कावीळ होण्याची शक्यता अधिक असते. पायात जखम, फोड, चीर, भेग असे काही असेल आणि पावसात पाय भिजले असतील, चिखल लागला असेल तर त्याद्वारे हे विषाणू शरीरात पसरतात. पावसाळ्यात अनेक नाले, ओढे, गटारे तुंबलेली असतात. हे सांडपाणी या आजाराचे वाहक ठरते. या सांडपाण्यातून चालताना या आजाराचा धोका संभवतो. स्वच्छता कर्मचारी, कामगार यांनी पावसाळ्यात गम बूटचा वापर करणे आवश्यक आहे.'आजाराची लक्षणे'साधारण एक आठवडाभर लक्षणे दिसत नाहीत. त्यानंतर



डोकेदुखी, डोळे जळजळ करणे, डोळे लाल होणे, उलट्या, मळमळ यासारखी लक्षणे दिसायला लागतात.

यावर त्वरित डॉक्टरांचा सल्ला न घेतल्यास शरीराच्या विविध अवयवांवर याचा प्रतिकूल परिणाम होऊन अवयव निकामी होण्यापर्यंत या आजाराची तीव्रता वाढू शकते,' असे तज्ज्ञांनी सांगितले.काय काळजी घ्याल?'बाहेर जाताना शक्यतो सांडपाण्यातून चालणे टाळावे, आजाराचे लक्षण दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, सहव्याधी असणर्ा?यांनी पायाची विशेष काळजी काळजी घ्यावी. तसेच, बाहेर फिरणे शक्यतो टाळावे. यासाठी एथ्थ्एअ ही चाचणी करून घ्यावी. याद्वारे या आजाराची तीव्रता लक्षात येईल,' असे आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले.तज्ज्ञ काय सांगतात लेप्टोस्पायरोसिस आजारामुळे आपल्या अवयवांवर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. सध्या मुंबईमध्ये या आजाराचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर आढळत आहेत. या आजारात प्रमुख्याने लघवी तांबूस, पिवळी होणे, भूक न लागणे ही मुख्य लक्षणे आहेत. जर अशी लक्षणे असेल तर त्वरित उपचार घ्यावेत. असे, संसर्गजन्य आजार तज्ज्ञ डॉ. अमित द्रविड सांगतात. पावसाळ्यामध्ये हा आजार होऊ नये यासाठी विशेष काळजी घेण्याची गरज असते. कारण दूषित पाणी शरीरात गेले, तर हा आजार संभवू शकतो.

# आहारात भेंडी आरोग्यवर्धक

भेंडी ही अनेकांच्या आवडीची आणि पोषक गुणांनी समृद्ध अशी भाजी आहे.

तिच्यामध्ये फायबर, व्हिटॅमिन ए, सी, के, फोलेट, कॅल्शियम, मॅग्नेशियम, पोटॅशियम आणि लोह यांसारखे महत्त्वाचे पोषक घटक मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे नियमित आणि संतुलित प्रमाणात भेंडीचे सेवन केल्यास शरीराला अनेक आरोग्यदायी फायदे मिळू शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे.भेंडीतील विद्राव्य फायबर पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते. त्यामुळे बद्धकोष्ठता, गॅस आणि अपचन यांसारख्या समस्या कमी होण्यास मदत मिळू शकते. तसेच फायबरमुळे पोट



जास्त वेळ भरल्यासारखे वाटते, त्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यासही मदत होऊ शकते.भेंडीतील फायबर रक्तातील साखरेचे शोषण मंदावण्यास मदत करत असल्याने मधुमेह असलेल्या व्यक्तींना काही प्रमाणात फायदा होऊ शकतो. मात्र, यामुळे औषधांची गरज संपत नाही. डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे किंवा उपचारांमध्ये कोणताही बदल करू नये.भेंडीमध्ये असलेले अँटिऑक्सिडंट्स आणि फायबर खराब कोलेस्टेरॉल कमी करण्यास मदत करू शकतात. त्यामुळे हृदयाचे आरोग्य चांगले राहण्यास हातभार लागू शकतो. याशिवाय, व्हिटॅमिन सी रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करते, तर व्हिटॅमिन ए, ल्युटीन आणि झेक्सॅन्थिन हे घटक डोळ्यांच्या आरोग्यासाठी उपयुक्त मानले जातात.

# वारंवार मुतखडा होण्याची मुख्य कारणे


लघवीमधील काही विशिष्ट क्षारांचे आणि रसायनांचे प्रमाण वाढल्यास त्यांचे स्फटिक बनतात आणि त्यातून मुतखडा तयार होतो. लघवीत कॅल्शियम, ऑक्झालेट किंवा युरीक ?सिडचे प्रमाण वाढणे आणि 'सिट्रेट' या घटकाचे प्रमाण कमी असणे हे यामागील मुख्य कारण आहे. याशिवाय रोजच्या आहारात पाण्याचे प्रमाण कमी असणे, कुटुंबात आधी कोणाला मुतखड्याचा त्रास असणे, लठ्ठपणा, आहारात मिठाचे (सोडियम) अतिप्रमाण, मांसाहाराचे जास्त सेवन, गॉउट, हायपरपॅराथायरॉईडिझम आणि चयापचयाचे विकार यांमुळे वारंवार मुतखडे होतात.

मुतखड्याची प्रमुख लक्षणे म्हणजे पाठीत किंवा पोटाच्या एका बाजूला अचानक तीव्र वेदना होणे, लघवीतून रक्त पडणे, मळमळ, उलट्या, लघवी करताना जळजळ होणे आणि कधीकधी ताप येणे. मुतखड्यासोबत ताप येणे हे गंभीर संसर्गाचे लक्षण असू शकते, त्यामुळे अशा वेळी तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधावा.

लोकांमध्ये असा मोठा समज आहे की दूध-दही खाल्ल्याने मुतखडा वाढतो. परंतु, वैद्यकीय शास्त्रानुसार, दररोज योग्य प्रमाणात (सुमारे १००० ते १२०० मिग्रॅ) आहारातून कॅल्शियम घेणे अत्यंत आवश्यक आहे. आहारातील कॅल्शियम आतड्यात ऑक्झालेटशी बांधले जाते, ज्यामुळे ऑक्झालेट शरीरात शोषले जात नाही आणि मुतखड्याचा धोका कमी होतो. त्यामुळे आहारातील दूध-दही किंवा कॅल्शियम पूर्णपणे बंद करणे चुकीचे आणि नुकसानकारक ठरू शकते.

लिंबू पाण्याचा फायदा : लिंबामध्ये 'सिट्रेट' असते, जे लघवीत खड्यांचे स्फटिक बनण्यापासून रोखते. नियमित लिंबू पाणी प्यायल्याने सिट्रेटचे प्रमाण थोडे वाढते, पण केवळ लिंबू पाणी हा यावर संपूर्ण उपचार नाही. गंभीर आजारात डॉक्टरांच्या सल्ल्याने 'पोटॅशियम सिट्रेट'ची औषधे घ्यावी लागतात.

ऑक्झालेट असलेले अन्न : पालक, बीट, ड्रायफूट्स, चॉकलेट, चहा यामध्ये ऑक्झालेट जास्त असते. परंतु, सर्वांनाच हे बंद करण्याची गरज नसते. ज्यांच्या लघवीच्या चाचणीत ऑक्झालेट जास्त येते, त्यांनीच हे पदार्थ मर्यादित प्रमाणात खावेत. ऑक्झालेटयुक्त पदार्थ खाताना कॅल्शियमयुक्त पदार्थांसोबत (उदा. दुधासोबत) खाल्ल्यास ऑक्झालेटचे शोषण कमी होते.



पाणी पिण्याचे प्रमाण : दिवसातून किमान २.५ ते ३.५ लिटर द्रवपदार्थ किंवा पाणी पिणे गरजेचे आहे, जेणेकरून २४ तासांत किमान २ ते २.५ लिटर लघवी होईल. दर तासाला पाणी पिण्याची गरज नसते, तर दिवसभरात लघवीचा रंग फिकट पिवळा राहील अशा प्रकारे सतत हायड्रेटेड राहणे महत्त्वाचे आहे.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय किंवा गरज नसताना कॅल्शियमच्या गोळ्या दीर्घकाळ घेणे टाळावे. जेवणाच्या मध्ये किंवा रिकाम्या पोटी घेतलेल्या कॅल्शियमच्या गोळ्यांमुळे काही व्यक्तींमध्ये मुतखड्याचा धोका वाढू शकतो. जर डॉक्टरांनी कॅल्शियमच्या गोळ्या लिहून दिल्या असतील, तर त्या नेहमी जेवणासोबतच घ्याव्यात.

# आपली मुले



आम्हा सर्व मित्र–मैत्रिणींची मुलं तेव्हा लहान होती. आई–बाबा म्हणून आम्ही चुकत माकत घडत होतो आणि आमची मुलेही घडत होती. एकदा उदय नावाच्या आमच्या मित्राने त्याला आवडलेल्या एका पुस्तकाचा उल्लेख केला. हे पुस्तक म्हणजे डॉ. विजया वाड यांचे आपली मुलं!२००१ साली प्रकाशित झालेले हे पुस्तक. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे निवृत्त संचालक वि. गो. कुलकर्णी यांनी या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेत अत्यंत स्पष्ट विधान केले आहे. ते म्हणतात,'शाळा हे मुलांचे बालपण गाडून टाकणारे ठिकाण आहे काय? या पुस्तकाच्या अनुक्रमणिकेवरून नजर फिरवताना अतिशय महत्त्वाचे विषय समोर येत गेले. 'घरचं वातावरण,' 'एकुलतं एक,' 'शिक्षा आणि पारितोषिक,' 'प्रगतिपुस्तक', 'संस्कार', 'आत्महत्येपासून दूर', 'पालक? नव्हे मालक!', या काही विषयांवरून नजर जरी फिरवली तरी हे पुस्तक अनेक अंगांनी पालकांशी हितगुज करते.मुलगा आणि मुलगी यांच्यात वेगवेगळ्या घरांमध्ये केला जाणारा भेद दाखवणारा 'भेदाभेद अमंगळ' हा लेख या पुस्तकात आहे. स्वयं निर्णयाची ताकद पालकांनीच मुलींमध्ये निर्माण करायला हवी, हे विविध अनुभवांमधून विजया बाईंनी मांडले आहे.

बाईंच्या वर्गातली एक मुलगी हुंड्याच्या विषयावरच्या निबंधात लिहिते, की मी हुंडाबळी होण्याचा प्रश्नच येत नाही कारण माझे लग्नच होणार नाही. मुलीचे रूप, तिचा रंग या गोष्टींना समाज किती महत्त्व देतो हे सांगताना बाई एखाद्या रंगाने काळ्या रूपवान नसणे मुलीच्या आईलाच तिची लाज वाटते हे अनुभवाद्वारा व्यक्त करतात. मुलांच्या निकोप वाढीसाठी घरातले वातावरण पूरक असावे लागते, हे सांगताना वाडबाई लिहितात, ' ज्या घरात मोठी जागा आहे पण मनात जागा नाही, त्या घरांना घरपण कुठलं ? मुलं शोधत असतात मनातली जागा! 'शाळांतून लैंगिक शिक्षण देणे का गरजेचे आहे आणि नकळत्या वयात केवळ मुले चोरटेपणाने त्यांचे कुतूहल शमवतात आणि यातून गुन्हे घडतात, हे सांगणारा लेख आवर्जून समजून घ्यावा असा आहे.'पौगंडावस्थेतील आपला मुलगा किंवा मुलगी सुरवंटाच्या अवस्थेत असते. त्यांच्याशी सहज संवाद साधा. या नात्यातला विश्वास आणि मोकळेपणा म्हणजे विकासाची मनमोकळी संधी !'पालक नव्हे मालक ! 'या लेखाचा शेवट कायम माझ्या स्मरणात राहिलेला आहे. 'कुठेच डेड एंड नसतो. एका रस्त्याला दुसरा रस्ता फुटतो.'शिक्षक आणि प्राचार्य म्हणून वाड बाईंचा अनुभव प्रदीर्घ आहे. या दीर्घ प्रवासातील प्रसंग प्रत्यक्षात आसपास घडलेले आहेत.

या अनुभवांच्या कथा पुस्तकात बोलक्या होतात. 'जीवन चार गुणांपुरते मर्यादित नाही. एखाद्या जवळ असलेली माणुसकी लाख मोलाची असते' हे काही विद्यार्थी त्यांच्या वागण्यातून पटवून देतात.मुलांवर कोणतीही लेबले न लावता, ती आहेत तसे त्यांना स्वीकारणे गरजेचे असते.या पुस्तकात शाळेतले, घरातले, समाजातले अनेक अनुभव शब्दबद्ध झालेले आहेत. अतिशय सहज सुंदर संवादात्मक भाषा हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य. कथन करण्याच्या प्रभावी शैलीमुळे हे अनुभव वाचकाच्या मनाला भिडतात. आपल्या अवतीभवती कुठे ही घडू शकतील असे हे अनुभव आपल्या मुलांना वाढवताना सर्व पालकांना उपयुक्त ठरतील यात शंका नाही.

शहरातल्या ब–याच घरातले पालक आज अर्थार्जना साठी बाहेर पडतात. श्रीमंत असो वा गरीब प्रत्येक घरात वेगवेगळ्या परिस्थितीत मुले वाढत असतात आणि आहे त्या परिस्थितीत त्यांच्या वाढीसाठी योग्य वातावरण देणे हे त्यांच्या समोरचे मोठे आव्हान आहे.

आज त्रिकोणी कुटुंबात तर ते अधिक आहे. अशावेळी आपली मुलं मौल्यवान असल्यामुळे त्यांना जपण्यासाठी 'आपली मुलं 'सारखे एखादे पुस्तक हाती हवेच कारण जन्म दिला म्हणून पालक हे मुलांचे मालक ठरत नाहीत. त्यांची भूमिका झाडांची काळजी घेणा–या माळ्याची असायला हवी तरच प्रत्येक मूल स्वतःच्या सुगंधासह बहरते.

# धगधग 'ते' होर्मुझ

***इराण–इस्रायल–अमेरिका यांच्यातील ताज्या संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा एकदा धगधगली आहे आणि जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आली आहे. पर्शियन आखाताला ओमानच्या आखाताशी जोडर्णा–या या अरुंद सामुद्रधुनीतून जगातील मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि कंटेनर वाहतूक होते. त्यामुळे येथे निर्माण होणारा कोणताही तणाव संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला हादरा देऊ शकतो.***

इराण–इस्रायल–अमेरिका यांच्यातील ताज्या संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनी पुन्हा एकदा धगधगली आहे आणि जागतिक राजकारणाच्या केंद्रस्थानी आली आहे. पर्शियन आखाताला ओमानच्या आखाताशी जोडणा–या या अरुंद सामुद्रधुनीतून जगातील मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल, नैसर्गिक वायू आणि कंटेनर वाहतूक होते. त्यामुळे येथे निर्माण होणारा कोणताही तणाव संपूर्ण जगाच्या अर्थव्यवस्थेला हादरा देऊ शकतो. इराणमध्येही राजकीय अस्थिरता वाढत आहे. सत्ताधारी गटात मवाळ आणि कट्टर अशा दोन प्रवाहांमध्ये मतभेद उघड झाले आहेत.

अली खामेनी यांच्या निधनानंतर सर्वोच्च नेतृत्वाची सूत्रे स्वीकारलेल्या मोजतबा खामेनी यांनी अद्याप जनतेसमोर प्रत्यक्ष येणे टाळले आहे. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाबद्दल प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. १० जुलैनंतर इराणमध्ये न्यायव्यवस्था, लष्कर, बसीज मिलिशिया आणि सरकारी प्रसारण संस्थांमधील महत्त्वाच्या नियुक्तभ्या होणार आहेत. या नियुक्तभ्यांवरून इराण पुढे शांततेचा मार्ग स्वीकारणार की संघर्ष अधिक तीव्र करणार, याचे संकेत मिळतील. आज जगाचे लक्ष केवळ होर्मुझ सामुद्रधुनीकडे नाही, तर तेथून पुढे घडर्णा ?या प्रत्येक राजकीय आणि लष्करी निर्णयाकडे लागले आहे. कारण या अरुंद समुद्री मार्गातील प्रत्येक हालचाल जागतिक ऊर्जा सुरक्षा, व्यापार आणि अर्थव्यवस्थेचे भविष्य ठरवू शकते.

अमेरिका–इराण युद्धापूर्वी २८ फेब्रुवारी २०२६ पूर्वी दररोज सुमारे २३० तेल, वायू आणि मालवाहू जहाजे होर्मुझच्या मार्गाने प्रवास करत होती. मात्र युद्ध सुरू झाल्यानंतर परिस्थिती पूर्णपणे बदलली. आज सुमारे १,७०० हून अधिक जहाजे आखातात किंवा त्याच्या आसपास अडकून पडली आहेत. परिस्थिती सुधारली तरी ही कोंडी दूर होण्यासाठी अनेक महिने लागू शकतात. या वर्षात जहाजवाहतूक पूर्ण क्षमतेने पूर्ववत होईल, अशी आशा तज्ज्ञांना नाही.संरक्षण तज्ज्ञांच्या मते, युद्धाच्या सुरुवातीला इराणने होर्मुझ सामुद्रधुनीच्या उत्तर–पश्चिम भागात मोठ्या प्रमाणावर पाणसुरुंग पेरले. त्यामुळे जहाजांना ठरवून दिलेल्या सुरक्षित मार्गानेच प्रवास करावा लागत आहे. जोखीम पत्करून इतर मार्ग वापरणा–या जहाजांवर ड्रोन किंवा क्षेपणास्त्र हल्ले करण्यात आले. युद्धापूर्वी इराणकडे सुमारे ३,००० पाणसुरुंग असल्याचा अंदाज होता.

पाणसुरुंगांचा धोका केवळ जहाजांपुरता मर्यादित नाही. तेल किंवा रसायन वाहून नेणा–या टँकरखाली स्फोट झाल्यास मोठी पर्यावरणीय आपत्ती ओढवू शकते. एका सुपरटँकरमधील मालाची किंमत कोटय़वधी डॉलर्सची असते. त्यामुळे सामुद्रधुनी पूर्णपणे सुरक्षित असल्याची खात्री झाल्याशिवाय



जहाजमालक आणि विमा कंपन्या जोखीम घेण्यास तयार नाहीत. याशिवाय, अरुंद समुद्री मार्गात शेकडो जहाजे अडकलेली असल्याने एखाद्या जहाजाला आग लागली किंवा अपघात झाला, तर त्याचा परिणाम इतर अनेक जहाजांवर होऊ शकतो. सध्या तेल आणि वायू वाहून नेणा–या काही जहाजांना मर्यादित परवानगी देण्यात आली असली तरी दिवसाला केवळ १८ ते २५ जहाजेच या मार्गाने जात आहेत. युद्धापूर्वी हा आकडा २२० ते २४० दरम्यान होता. त्यामुळे लाखो बॅरल तेल आखातात अडकून पडले असून जागतिक तेलसाठा २००३ नंतरच्या नीचांकी पातळीवर पोहोचला आहे.युद्ध सुरू झाल्यानंतर तीन महिन्यांनी पाकिस्तानच्या मध्यस्थीने इस्लामाबादमध्ये एक १४ कलमी सामंजस्य करार झाला. त्यानंतर इराणने पेरलेले पाणसुरुंग हटवण्याचे काम सुरू केले. मात्र २९ जून २०२६ पर्यंत मुख्य जलमार्गात अडथळा ठरणारे सुमारे ३८० पाणसुरुंग हटवायचे बाकी होते. त्यामुळे सामुद्रधुनीतील वाहतूक वर्षाअखेरपर्यंत विस्कळीत राहण्याची शक्यता आहे. मुख्य जलवाहतूक मार्ग बंद असल्याने जहाजांना इराण आणि ओमानच्या किना–यालगतच्या अरुंद मार्गांचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे सुरक्षा धोक्यात आली आहे. जहाजांची गर्दी वाढल्याने टक्कर होण्याची किंवा जहाज किना–यावर अडकण्याची शक्यता अधिक वाढली आहे. सागरी वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मते, या संकटामुळे जागतिक मालवाहतूक क्षमतेवर सुमारे २० ते २५ टक्के परिणाम झाला आहे. वाहतुकीचे दर वाढले आहेत.

तणाव कमी झाला तरी पुरवठा साखळी पूर्ववत होण्यासाठी अनेक महिने लागू शकतात.अमेरिका, ब्रिटन, प्रफान्स आणि जर्मनी यांच्या नौदलांनी ड्रोन बोटी, युद्धनौका आणि सुरुंगशोधक जहाजांच्या मदतीने होर्मुझ सामुद्रधुनी सुरक्षित करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तरीही हा मार्ग पूर्णपणे सुरक्षित होण्यासाठी मोठा कालावधी लागेल, असे संरक्षण तज्ज्ञांचे मत आहे. जॉइंट मेरिटाइम इन्फॉर्मेशन सेंटरने जहाजांसाठी नवीन मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. जहाजांनी एआयएस ट्रान्सपॉन्डर सुरू ठेवावेत, रडार वापरावा, रात्री दिवे सुरू ठेवावेत, नियमित रेडिओ संपर्क साधावा आणि अमेरिकेच्या एनसीएजीएस यंत्रणेशी सतत समन्वय ठेवावा, असे निर्देश देण्यात आले आहेत. यापूर्वी सुरक्षेच्या कारणास्तव जहाजांना एआयएस बंद ठेवून 'डार्क ट्रव्हल' करण्याचा सल्ला दिला जात होता.१९ जून २०२६ रोजी अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या इस्लामाबाद करारातील एक महत्त्वाची तरतूद पुढील काळात मोठा वाद निर्माण करू शकते.

या करारानुसार इराणला होर्मुझ सामुद्रधुनीचे प्रशासन आपल्या पद्धतीने चालवण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे. त्याअंतर्गत जहाजांवर नौकानयन शुल्क आणि पर्यावरण शुल्क आकारण्याचा अधिकार इराणला मिळू शकतो. ओमानच्या सहकार्याने इराण भविष्यात या सामुद्रधुनीचे संयुक्त प्रशासनही करू शकतो.इराणचा दावा आहे की, युद्धामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई म्हणून जहाजांकडून विशेष सुरक्षा आणि पर्यावरण शुल्क आकारले जाईल. मात्र आंतरराष्ट्रीय सागरी कायद्यानुसार कोणतेही किनारी राष्ट्र प्रत्यक्ष सेवा दिल्यास शुल्क आकारू शकते; परंतु आंतरराष्ट्रीय सामुद्रधुनीतून प्रवास करण्यासाठी सार्वत्रिक टोल आकारू शकत नाही. त्यामुळे या निर्णयाला गल्फ को–ऑपरेशन कौन्सिलमधील अनेक देशांनी विरोध दर्शवला असून संयुक्त राष्ट्रांच्या सागरी कायद्यांतर्गत आक्षेपही नोंदवला आहे.१ जुलै २०२६ रोजी दोहा येथे अमेरिका आणि इराण यांच्यात झालेल्या अप्रत्यक्ष चर्चेत कोणतीही ठोस प्रगती झाली नाही. त्यानंतर सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या अंत्यसंस्कारापर्यंत शांतता राखण्याचे आवाहन करण्यात आले होते.

मात्र ७ जुलै रोजी इराणने ओमानच्या आखातातून बाहेर पडणा–या तीन तेलवाहू जहाजांवर ड्रोन आणि क्षेपणास्त्र हल्ले केले.

***सार्वजनिक जागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावल्यास गुन्हे कमी होतात, ही बाब जगजाहीर आहे. परंतु गुन्हेगारांनी या सर्व्हिलन्समधूनही पळवाटा काढल्या आहेत. त्यापैकी एक महत्त्वाची पळवाट म्हणजे भारनियमन. सीसीटीव्हीमुळे गुन्हे सोडविण्यास मोठी मदत होते आणि पोलीस पथकांची कार्यक्षमतासुद्धा वाढते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कॅमेरे गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्याचे काम करतात.***

# एआय सीसीटीव्ही कॅमेरे निष्फळ

सार्वजनिक जागांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावल्यास गुन्हे कमी होतात, ही बाब जगजाहीर आहे. परंतु गुन्हेगारांनी या सर्व्हिलन्समधूनही पळवाटा काढल्या आहेत. त्यापैकी एक महत्त्वाची पळवाट म्हणजे भारनियमन. सीसीटीव्हीमुळे गुन्हे सोडविण्यास मोठी मदत होते आणि पोलीस पथकांची कार्यक्षमतासुद्धा वाढते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, कॅमेरे गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्याचे काम करतात. वाढत्या गुन्हेगारीचा सामना करण्यासाठी देशभरात सीसीटीव्ही आणि नियंत्रण कक्षांचे जाळे उभारण्याच्या उद्देशाने केंद्रीय गृह मंत्रालयाने अनेक उपक्रम हाती घेतले आहेत.केंद्रीय गृह सचिव देखील राज्यांना आणि केंद्रशासित प्रदेशांना पत्र लिहून त्यांच्या क्षेत्रातील सर्व 'ब्लाइंड स्पॉट्स' सीसीटीव्हीच्या निगराणीखाली आणण्याबाबत सूचना देत असतात. मात्र, अखंड वीजपुरवठा नसेल तर सीसीटीव्हीचे कितीही अत्याधुनिक जाळे असले तरी ते कॅमेरे केवळ खांबावर अडकविलेले जड नारळ ठरतात. आश्चर्याची गोष्टम्हणजे, गुन्हेगारांना याची चांगलीच जाणीव असते.उदाहरणार्थ, नसरापूर येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्कार आणि हत्या प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याने भारनियमनाची वेळ लक्षात घेऊन गुन्हा करण्याचा कट आखला. जेणेकरून, वीज नसल्याने गावातील कॅमे–यांमध्ये तो कैद होणार नाही. पत्रकारांशी चर्चा करताना नसरापूर केस मधील पीडितेचे वडील म्हणाले, गुन्हा घडला त्या दिवसाव्यतिरिक्त, पोलिसांनी घटनेच्या दोन–तीन दिवस आधीचेही सीसीटीव्ही फुटेज गोळा केले. त्यात त्यांना आढळले की, आरोपी पीडितेवर पाळत ठेवत होता आणि तिच्या दैनंदिन हालचालींचे निरीक्षण करत होता.हा एक सुनियोजित गुन्हा होता. कॅमे–यांचा विचार करता, नसरापूर ग्रामपंचायतीने सर्वत्र सीसीटीव्ही कॅमेरे बसवले आहेत. मात्र, दुर्दैवाने ज्या दिवशी ही घटना घडली, त्या दिवशी दिवसभर वीजपुरवठा खंडित असल्याने हे कॅमेरे बंद होते. आरोपीला याची कल्पना होती. हा गुन्हा दुपारी ३:१२ ते ३:५१ या वेळेत घडला. वीज नसल्याने त्याला सीसीटीव्हीची भीती नव्हती.पण परिसरातील एका मिठाईच्या दुकानात जिलेबीची ऑर्डर आली होती, त्यामुळे त्यांचे इन्व्हर्टर सुरू होते. त्यांच्या सीसीटीव्हीमध्ये आरोपी भीमराव कांबळेच्या हालचाली कैद झाल्या होत्या. तो पीडितेसोबत गोठ्यात जाताना आणि तिथून एकटाच बाहेर पडताना दिसतो. या फुटेजमुळे पोलिसांना एक भक्कम खटला (वॉटरटाइट केस) तयार करण्यास मदत झाली. इथेच बॅकअप वीजपुरवठ्याचे महत्त्व अधोरेखित होते.सुरक्षिततेचा भ्रमवीज नसल्यास कॅमेरे निकामी होतात. पण ही समस्या फक्त नसरापूर पुरतीच मर्यादित आहे का? जवळजवळ प्रत्येक भारतीय शहरात वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे सुरक्षा प्रणालीमध्ये गंभीर त्रुटी निर्माण होतात. सार्वजनिक ठिकाणांव्यतिरिक्त, विमानतळ, बँका, महत्त्वपूर्ण पायाभूत सुविधा, निवासी सोसायट्या आणि मोठे उद्योग यांसारख्या इतर ठिकाणीही सीसीटीव्ही कॅमेरे अखंडपणे कार्यरत राहतील याची खात्री करण्यासाठी अतिरिक्त वीजपुरवठा असणे आवश्यक आहे.म्हणूनच, वीजपुरवठा खंडित झाल्यावर देखील परिसरावर पाळत ठेवता यावी, तसेच फुटेज रेकॉर्डिंगमध्ये खंड पडू नये, यासाठी सीसीटीव्ही यंत्रणेसोबत यूपीएस किंवा इन्व्हर्टर वापरण्याची शिफारस तज्ज्ञांकडून केली जाते. बॅटरी आणि एकूण क्षमतेनुसार, यूपीएस एक–दोन तास काम करू शकतो. तासन्तास बॅकअप लागत असल्यास सीसीटीव्ही प्रणालीला इन्व्हर्टर/यूपीएसशी जोडणे आणि इन्व्हर्टर/यूपीएस पुढे डीजी बॅकअपला जोडणे सर्वोत्तम ठरते. यामुळे अल्पकालीन आणि दीर्घकालीन दोन्ही प्रकारच्या लोड शेडींग दरम्यान सीसीटीव्हीसाठी अखंड वीजपुरवठ्याची सोय होते.दुर्दैवाने, विविध सरकारी संस्थांनी बसवलेले बहुतेक सीसीटीव्ही कॅमेरे मूलभूत वीजपुरवठ्यावर अवलंबून असतात. त्यांना कोणताही बॅकअप सप्लाय नसतो.



एप्रिल २०२६ पासून, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने देशात विकल्या जाणा या किंवा तयार केल्या जाणाया सर्व सीसीटीव्ही कॅमे ?यांसाठी 'एस.टी.क्यू.सी.' प्रमाणपत्र अनिवार्य केले आहे; परंतु या कॅमे ?यांसाठी पॉवर बॅकअप अनिवार्य करणारा कोणताही देशव्यापी कायदा नाही.पुढाकार घेणारी राज्येपण देशातील एकाही नोकरशहाला किंवा मंत्र्याला या कॅमे ?यांसाठी आवश्यक असलेल्या पॉवर बॅकअपबाबत चिंता वाटत नाही का? सर्वजण या मुद्द्याकडे दुर्लक्ष करत आहेत असे नाही; तेलंगणा, तामिळनाडू आणि दिल्ली येथील राज्य सरकारे नवीन अंमलबजावणीद्वारे या समस्येवर उपाययोजना करत आहेत. या वर्षीच्या फेब्रुवारी महिन्यात दिल्ली सरकारने अत्याधुनिक तंत्रज्ञान असलेले ५० हजार सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची योजना जाहीर केली.या कॅमे–यांचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे त्यासोबत असणारी सौर ऊर्जा प्रणाली (सोलर पॅनेल), लिथियम–आयन बॅटरी आणि उच्च क्षमतेची यूपीएस यंत्रणा. वीजपुरवठा खंडित झाला तरी हे कॅमेरे कार्यरत राहण्यास या बॅकअपमुळे मदत होते. तेलंगणामध्ये हैदराबाद आणि इतर शहरांमध्ये असे कॅमेरे आधीच कार्यान्वित आहेत.तामिळनाडूची राजधानी चेन्नईदेखील या बाबतीत मागे नाही; तिथेही बॅकअप पॉवरची सुविधा असलेले काही कॅमेरे बसवण्यात आले आहेत. आता प्रश्न पडतो की महाराष्ट्राचे काय? महाराष्ट्र गृह विभागाने पोलीस ठाण्यातील कॅमेरांसाठी किमान एक तास चालेल असा यूपीएस बॅकअप असणे गरजेचे असल्याचे आदेश २०१८ मध्ये जारी केले.

परंतु ब–याच ठिकाणी ते चालत नसल्याचे दिसते. मंत्रालय, सरकारी इमारती आणि एखादी ग्रामपंचायत वगळली तर राज्यात कुठेही कॅमेरांना बॅकअप वीज पुरवठा नाही.कमीपणाकॅमेरे बसवण्याचे नियोजन करताना राज्य सरकारे 'पॉवर बॅकअप'ला एक महत्त्वाची गरज का मानत नाहीत? यामागे अनेक कारणे असू शकतात. कदाचित पहिले आणि सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे, आपल्या शहरांमध्ये दीर्घकाळ वीजपुरवठा खंडित होतो, हे मान्य करण्यास कोणतेही राज्य सरकार सहजासहजी तयार होणार नाही.अनेक राज्यांत रोज काही तास लोडशेडिंगसाठी वीज बंद केली जाते. पण कागदोपत्री मात्र तांत्रिक कारणास्तव वीज खंडित झाली अशी नोंद केली जाते व सोशल मीडियावर देखील असेच सांगितले जाते. दुसरे कारण म्हणजे, लोडशेडिंगमुळे कॅमेरे बंद राहतात ही समस्या कदाचित फारशी महत्त्वाची मानली जात नाही. म्हणूनच, लोकप्रतिनिधींचेही याकडे लक्ष वेधले जात नसावे.




# डेटा भविष्यातील मौल्यवान संपत्ती

एकेकाळी जगातील महासत्तांमध्ये भूभागासाठी युद्धे झाली. त्यानंतर तेल, वायू आणि खनिज संपत्तीवर नियंत्रण मिळिवण्यासाठी राष्ट्रांमध्ये स्पर्धा निर्माण झाली. आजही तेलाला जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा मानले जाते. मात्र कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल व्यवहार आणि इंटरनेटच्या युगात एक नवीन संपत्ती वेगाने सर्वाधिक मौल्यवान ठरत आहे ती म्हणजे डेटा.आज आपण दिवसाची सुरुवात मोबाईलने करतो आणि दिवसाचा शेवटही मोबाईलवरच होतो. सोशल मीडिया, ऑनलाइन खरेदी, यूपीआय व्यवहार, जीपीएस, ओटीटी प्लॅटफफॉर्म, सर्च इंजिन आणि विविध मोबाईल अ ?प्सच्या वापरातून आपण सतत माहिती निर्माण करत असतो. आपण कुठे जातो, काय खरेदी करतो, कोणत्या विषयात रस घेतो, कोणत्या बातम्या वाचतो, कोणते व्हिडीओ पाहतो आणि कोणत्या गोष्टींकडे दुर्लक्ष करतो, याची नोंद कुठे ना कुठे होत असते. ही माहिती एकत्रित करून तिचे विश्लेषण केले जाते आणि त्यातून आपल्या सवयी, आवडी, आर्थिक क्षमता आणि निर्णय घेण्याच्या पद्धतीचा अंदाज बांधला जातो. जगात कोणतीही गोष्ट पूर्णपणे मोफत नसते. मोफत वाटणा–या अनेक डिजिटल सेवांची किंमत आपण आपल्या वैयक्तिक माहितीच्या रूपाने चुकवत असतो.अनेकांना या व्यवहाराची जाणीवही नसते. आपण पैसे देत नाही म्हणून सेवा मोफत आहे असे वाटते; पण प्रत्यक्षात आपली माहितीच त्या सेवांचा सर्वात मोठा मोबदला ठरत असते.कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाया वापरामुळे डेटाचे महत्त्व अनेक पटींनी वाआहे. अगब ही जादू नसून माहितीवर आधारित तंत्रज्ञान आहे. जशी शेतक ?याला भरघोस पीक घेण्यासाठी सुपीक जमीन आवश्यक असते, तसाच अगब ला दर्जेदार आणि विश्वासार्ह डेटआवश्यक असतो. चुकीचा किंवा अपुरा डेटा असेल तर चे निष्कर्षही दिशाभूल करणारे ठरू शकतात. त्यामुळे डेटा हे नवीन तेल नाही. डेटा ही नवीन जमीन आहे आणि अगब हा त्या जमिनीवर शेती करणारा शेतकरी आहे.नापीक जमिनीवर भरघोस पीक येत नाही आणि सुपीक जमीन असली तरी शेतकरी नसेल तर तिचा उपयोग होत नाही.याच कारणामुळे आज जगभरात डेटा सार्वभौमत्व आणि डेटा गोपनीयता यांसारख्या संकल्पनांना महत्त्व प्राप्त झाले आहे. नागरिकांचा डेटा कोणाच्या ताब्यात आहे? तो कोणत्या देशात साठवला जात आहे? त्याचा वापर कोणत्या उद्देशासाठी केला जात आहे आणि त्यावर नियंत्रण कोणाचे आहे? हे प्रश्न आता केवळ तांत्रिक राहिलेले नाहीत. अनेक देशांनी डेटा संरक्षणासाठी स्वतंत्र कायदे करण्यास सुरुवात केली आहे. हिंदुस्थाननेही डिजिटल वैयक्तिक डेटा संरक्षण कायदा लागू करून या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे.

भविष्यात आर्थिक सामर्थ्याबरोबरच डेटा सुरिक्षत ठेवण्याची क्षमता हीदेखील राष्ट्रांच्या प्रगतीची महत्त्वाची कसोटी ठरणार आहे.आज जगातील मोठय़ा तंत्रज्ञान कंपन्या आणि अनेक देश डेटा मिळिवण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मोठी गुंतवणूक करत आहेत. कारण डेटा हा केवळ व्यापारासाठीच नाही, तर अर्थव्यवस्था, राष्ट्रीय सुरक्षा, निवडणुका, जाहिरात, संशोधन आणि जनमत घडविण्यासाठीही प्रभावी साधन ठरत आहे. सोशल मीडियावरील अल्गोरिदम आपल्याला आवडणारीच माहिती पुनः पुन्हा दाखवत राहतात आणि नकळत आपल्या विचार विश्वालाही आकार देतात. त्यामुळे डेटा हा केवळ तांत्रिक विषय नसून सामाजिक आणि लोकशाही व्यवस्थेशी संबंधित विषय बनला आहे.डिजिटल सुविधांचा लाभ घेत असताना आपल्या माहितीची किंमत आणि सुरक्षिततेचे महत्त्व समजून घेणे आज अत्यंत आवश्यक आहे. कोणत्या अ ?पला कोणती परवानगी द्यायची, कोणती माहिती शेअर करायची आणि कोणत्या सेवांवर विश्वास ठेवायचा, याचा विचार प्रत्येकाने सजगपणे करायला हवा. कारण भविष्यातील खरी स्पर्धा तेलाच्या साठय़ांवर नव्हे, तर माहितीच्या साठय़ावर आणि त्यावरील नियंत्रणावर असणार आहे. भविष्यात सर्वात श्रीमंत तो नसेल ज्याच्याकडे सर्वाधिक पैसा असेल; तर तो असेल ज्याच्याकडे सर्वाधिक विश्वासार्ह डेटा आणि त्या डेटाचा सुयोग्य वापर करण्याची क्षमता असेल.